13-07-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

ASS/ 10:30

13-07-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A-1

AJIT/ KGS/ MAP/ 10:30

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी /मु.शी. सन 2006-2007ा च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चा आज, दिनांक 13 जुलै, 2006 रोजी घ्यावयाचे ठरले आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचे पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्यने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतो आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1. मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक अे-2, अे-4, एफ-2, एफ-7, जे-1 जे-2, क्यू-3,
2. सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9,
3. उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राज शिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक अे-4, के-7, एन-1, एन-2, एन-4ए,
4. राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक के-4, यु-4,
5. ऊर्जा (अपांरपारिक ऊर्जा वगळून) वैद्यकीय, उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक के-6, एस-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6 डब्ल्यू-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

6. कृषि, जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक डी-2ए, डी-3, एल-3, एल-7,
7. पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक डी-4, डी-5,
8. शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक ई-2,
9. आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक टी-2, टी-5, टी-6,टी-7
10. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एम-2, एम-3,
11. वन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक सी-7.
12. उप मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक बी-1, बी-5, बी-9, बी-10.
13. महसूल मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक सी-1, सी-2, सी-3, सी-4, सी-6 सी-10.
14. जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास व पाणी-पुरवठा व स्वच्छा मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक आय-1, आय-3, आय-5, आय-6.
15. ग्राम विकास व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एल-2,एल-4
16. सहकार, पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक सी-5, व्ही-2
17. वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक जी-1, जी-3, जी-4,जी-6 ओ-4, ओ-5, ओ-7, ओ-9.
18 सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - आर-1.
19 सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्यमंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - एन-3, एन-4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

20 पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य व महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक व्ही-2.

21 वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक ए-5,

22 अपांरपारिक ऊर्जा व फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक -ए-6,के-8.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, याठिकाणी सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी आलेल्या आहेत. राज्याच्या अर्थसंकल्प तीन महिन्यांपूर्वीच सभागृहात सादर झाला होता. असे असताना 711 कोटी 85 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मंजुरीसाठी आलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे तरतूद नसताना खर्च करणे आवश्यक असते तेव्हा तो खर्च आकस्मिक निधीतून करणे अपेक्षित असते, किंवा काही वेळा खर्चाचा अंदाज करणे शक्य नसेल तर पुरवणी मागणी सादर झाली असेल तर आपण समजू शकतो. राज्य सरकारने तीन महिन्यांपूर्वीच अर्थसंकल्प सादर केला असताना आता या 711 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजुरीसाठी आलेल्या आहेत. तेव्हा याबाबत प्रथम स्पष्टीकरण झाल्यास बरे होईल असे वाटते.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, 711 कोटी रुपयांपैकी 620 कोटी रुपयांच्या मागण्या या पाटबंधारे विभागाच्या आहेत. मागच्यावेळी माननीय राज्यापालांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे वाटप न केल्यामुळे अडचण झाली होती. तेव्हा माननीय राज्यापालांनी निदेश दिले होते की, ॲब्रेशन करेक्ट करण्यात याव्यात. त्यानुसार पाटबंधारे विभागाच्या 620 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : पक्षाच्या प्रतोदांनी पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी आपल्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची नांवे द्यावीत.

श्री.विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग पान क्रमांक 5, बाब क्रमांक 6 च्या बाबतीत सेनापती प्रतापराव गुजर यांच्या स्मारकासाठी रुपये 34,30,200 इतक्या खर्चासाठी तरतूद करण्याचे ठरविले आहे, त्याबद्दल मी स्वागत करतो. परंतु याठिकाणी शासनाची अशी परिस्थिती आहे की, पुढून साफ आणि मागून सपाट. कै.विनोबा भावे यांचे स्मारक करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे रुपये 21.71 लाख एवढी तरतूदही करण्यात आली. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली. या समितीने स्मारकाच्या खर्चाचे अंदाजपत्रक रुपये 74 लाखांचे दाखविले. दि.12 मार्च,1998 रोजी रुपये 10 लाख 59 हजार एवढा निधी उपलब्ध करुन दिला. परंतु सन 1998 पासून अद्यापपावेतो 8 वर्षामध्ये उर्वरित निधी देण्यात आला नाही. त्यामुळे स्मारकाचे काम थांबले. एकीकडे आपण पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून राज्यात निरनिराळया ठिकाणी स्मारके बांधण्याची घोषणा करता व दुस-या बाजुस आपण त्याची अंमलबजावणी करीत नाहीत, हे योग्य नाही. कै.भावे यांचे स्मारक होण्याच्या दृष्टीने नेमकी कोणती अडचण आहे, याबाबतचा खुलासा व्हावा.

पान क्रमांक 14, बाब क्रमांक 16 च्या बाबतीत रेनकोट खरेदीसाठी आपण रुपये 1 कोटी 10 लाख रुपयांची तरतूद केली आहे. दोन दिवसांपूर्वीच या शहरामध्ये पाऊस आणि दंगल झाली. त्याबाबत माननीन गृहमंत्र्यांनी पोलिसांचे कोतुक केले. या आपल्या मताशी मी सहमत आहे. परंतु या प्रतिकुल परिस्थितीमध्ये पोलीस कसे सामोरे गेले असतील याची आपल्याला कल्पना आहे का ? महाराष्ट्र टाईम्स् वृत्तपत्रात छापून आले आहे की, "गणपतीचा बंदोबस्त असो दंगल असो, नाही तर पावसाचा हाहाकार... स्पॉटवर पोहोचणारा जो पहिला माणूस असतो तो पोलीस. 26 जुलैनंतरही त्याच्यासाठी काही मदतीची सामग्री आली नाही. पण पोलीस कशासाठी थांबलेला नाही. विपरीत परिस्थितीत, सामग्री नसतानाही काम करण्यातही आमचाच नंबर पहिला, हे तो स्पॉटवर हजर राहूनच दाखवून देत होता." रेनकोट खरेदी करण्यासाठी गृहमंत्र्याकडे प्रस्ताव मांडला आहे. गेल्या 2-3 वर्षापासून पोलिसांना व अधिकाऱ्यांना रेनकोट नाहीत. निसर्गापासून जर पोलिसांचे संरक्षण होत नसेल तर ते जनतेचे संरक्षण कसे करणार ? म्हणूनच "दंगलीपासून

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट....

बॉम्बस्फोट आणि भूकंपापासून पावसाच्या हाहाकारापर्यंत प्रत्येक डिझास्टरच्या वेळी रस्त्यावरचा पोलीस प्रथम नागरिकांच्या मदतीला धावून जात असतो. पण डिझास्टर मॅनेजमेंट प्लॅनमध्ये मात्र या फर्स्ट रिस्पॉण्डरसाठी कोणतीही विशेष तरतूद नाही. गेल्या 26 जुलैनंतर पोलिसांच्या अनेक गरजांची तड लागलीच नाही. तळयातून मार्ग काढणाऱ्या डिंगी बोटी आल्या, तरी त्या पोलिसांना मिळाल्याच नाहीत. रेनकोटची तजवीजही पोलिसांनीच स्पॉन्सरमार्फत केली, तर जलमय रस्त्यावरुन मार्ग काढणारी हाय क्लिअरन्स गाडीही फायनल होऊ शकली नाही." हे आपल्याला भूषणावह आहे का ? आज त्यांना आपण कुठल्याही प्रकारची सुविधा देत नाही. याबाबतीत गृह विभागाने दखल घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, पान क्रमांक 15 व बाब क्रमांक 22 च्या व्हिडीओ कॉन्फरन्सींग यंत्रणा बसविण्याच्या बाबतीत रुपये 92 लाख 35 हजारांची तरतूद करण्यात आली आहे. ही आपण चांगली सुविधा देत आहात. परंतु याही बाबतीत पुढून साफ आणि मागून सपाट अशी परिस्थिती आहे. व्हिडीओ कॉन्फरन्सींग सेवा सुरु करण्याचा आपण निर्णय घेतला परंतु जूनमध्ये आर्थररोड येथील कारागृहातील ही सेवा बंद पडली. त्याठिकाणची सेवा बंद पडल्यामुळे त्याठिकाणी आरोपी श्री.प्रविण महाजन यांना घेऊन जाता आले नाही. एकीकडे अशी व्हिडीओ कॉन्फरन्सींगची सुविधा उपलब्ध करुन देत असाल व दुसरीकडे ही सेवा कालबाहय होणार असेल तर कसे व्हायचे ? ही मशिनरी आपण कुठून घेतली, याचा खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या बाबतीत सन 2001-2002 मध्ये आपण 100 कोटी रुपयांची म्हाडाची ठेव आपण म्हाडा प्राधिकरणास व्याजासह परत केली, त्याबद्दल आपले अभिनंदन. परंतु आपण 1 कोटी 64 लाख 10 हजार रुपये व्याजासह कधी परत करणार ?

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विलास अवचट.....

सध्या मुंबईतील घरदुरुस्ती मंडळाची परिस्थिती पाहिली तर इमारती पडत आहेत, एसआरअेकडे पैसे नाहीत, अशा प्रकारे मुंबई मंडळाचे काम स्थगित झाले आहे. शासनाने जर 1 कोटी 65 लाख रुपये व्याजाचे दिले असते तर म्हाडाला स्वत:चे आर्थिक नियोजन करुन दुरुस्तीसाठी जास्तीत जास्त निधी उभा करता आला असता.

सभापती महोदय, उद्योग विभागाच्या पान क्रमांक 108, बाब क्रमांक 135 अन्वये मेल्ट्रॉनसाठी 5 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. आता त्यांचे व्याज 7 कोटी रुपयांपर्यन्त झाले आहे. सभापती महोदय, मुख्यमंत्री सहाय्यता निधीची व्याख्या मला समजत नाही. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून नैसर्गिक आपत्तीमधील आपदग्रस्तांसाठी मदत केली जाते. परंतु, या ठिकाणी आपण पाहिले तर मेल्ट्रॉनसारख्या तोटयातील महामंडळाला या निधीतून आर्थिक मदत केलेली आहे. असे असेल तर मुख्यमंत्री सहाय्यता निधीची व्याख्या बदलून यापुढे अशाच प्रकारे विविध विभागांना निधी उपलब्ध करुन द्यावा व पुढील वेळी या सर्व पुरवणी मागण्यांवर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. मेल्ट्रॉन हे महामंडळ आजारी पडलेले आहे. आजारी पडलेल्या महामंडळांपैकी सगळयात मोठे महामंडळ हे मेल्ट्रॉन आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून 1 डिसेंबर, 1993 रोजी 16 टक्के व्याजदराने 5 कोटी रुपयांची गुतवणूक करण्यात आली. या महामंडळाची नाजूक परिस्थिती असल्यामुळे 5 कोटी रुपये आणि त्यावर 7 कोटी रुपये व्याज असे मिळून 12 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. हा निधी कशासाठी देण्यात आलेला आहे ? याचे उत्तर सन्माननीय उद्योग मंत्र्यांनी या ठिकाणी दिले पाहिजे. या महामंडळाचा दि.31 मार्च 2006 रोजी संचित तोटा 137 कोटी 85 लाख रुपये एवढा होता. एवढा निधी बुडित असतांना पुन्हा या महामंडळाला 12 कोटी रुपये देण्यात आले, हा वरदहस्त या महामंडळावर का आहे ? याचाही खुलासा झाला पाहिजे.

सभापुती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पान क्रमांक 225 बाब क्रमांक 185 अन्वये जी मागणी सादर करण्यात आलेली आहे यामध्ये सुध्दा पुन्हा मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पैसे दिलेले दिसून येतात. शासनाने एवढी उदारमतवादी भूमिका का घेतली आहे, हे मला समजत नाही. 'अजब न्याय वर्तुळाचा' असे नाटक काही दिवसांपूर्वी सादर झाले. या ठिकाणी मात्र 'अजब न्याय या शासनाचा' असेच म्हणावे लागेल. कारण, या प्रकल्पासाठी केंद्राकडून 2 कोटी रुपयांचा

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.विलास अवचट.....

निधी प्राप्त व्हावयाचा आहे. हा निधी मिळाला नसतांना राज्य शासनाने 2 लाख 25 हजार रुपयांची मागणी या ठिकाणी केलेली आहे. अशा प्रकारे केंद्र शासनाकडून निधी मिळाला नसतांना राज्य शासनाने निधी देणे आणि तोही मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देणे याचे आपण कसे समर्थन करणार आहात ? असेच असेल तर 'मुख्यमंत्री स्वायत्त निधी' असे या निधीचे नामकरण करावयास हवे, एवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 6 पान क्रमांक 5 या मागणी अन्वये प्रतापराव गुजर स्मारकासाठी शासनाने निधीची तरतूद केलेली आहे, याबद्दल मला आनंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन आपण हे राज्य चालवितो. छत्रपतींचे तेरावे वंशज हे सातारा येथे राहतात, त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली आहे की, महाराजांचा इतिहास नवीन पिढीला कळला पाहिजे, ज्ञात झाला पाहिजे या उद्देशाने ज्याप्रमाणे लाल किल्ल्यावर 'लाईटस् ऑफ साऊंड' हा कार्यक्रम सादर केला जातो, अंदमान येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांसंबंधी कार्यक्रम सादर केला जातो, त्याप्रमाणे सातारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधीचा 'लाईटस् ऑफ साऊंड' चा कार्यक्रम सादर व्हावा. तसेच, त्यांनी असेही सूचविले आहे की, यासाठी एक ते दीड कोटी रुपये खर्च अपेक्षित असून सातारा येथे छत्रपतींच्या तेराव्या वंशजांची जी प्रॉपर्टी आहे त्या ठिकाणी असा कार्यक्रम व्हावा. म्हणून माझी या शासनाला विनंती आहे की, सातारा येथे 'लाईटस् ऑफ साऊंड' चा कार्यक्रम करण्यासाठी एक ते दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

महाराष्ट्रातील नवीन पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांनी 350 वर्षापूर्वी कशा प्रकारे इतिहास घडविला याचे ज्ञान मिळावे यादृष्टीने शासनाने यासाठी तरतूद करावी, अशी माझी मागणी आहे.

बाब क्र.13, पृष्ठ क्र.13, गृह विभाग. नवी मुंबईतील पनवेल तालुक्यातील खारघर, कोपरा आणि खामोटे या परिसरात लोकसंख्या वाढलेली आहे. या परिसरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण मोठया प्रमाणावर वाढलेले आहे. या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन असण्याची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी पडलेले दरोडे, बँकांवरील दरोडे यांचा तपास अद्याप पूर्ण होऊ शकलेला नाही म्हणून त्या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनचा प्रस्ताव शासनाने करावा, अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, पोलिसांच्या निवासस्थानाचा एरिया अत्यल्प आहे. पोलिसांचे मानसिक संतुलन व्यवस्थित राहावे, त्यांना चांगल्या प्रकारे काम करता यावे यादृष्टीने पोलिसांचा 2 खोल्यांचा असणारा एरिया 3 खोल्यांचा करावा, अशी माझी मागणी आहे.

बाब क्र.32, पृष्ठ क्र.24, महसूल विभाग. अलिबाग तालुक्यामध्ये जो जमीन खरेदीचा व्यवहार झाला त्यासंदर्भात मी मागच्या अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना दिली होती. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्या लक्षवेधी सूचना उत्तर दिले होते. खरेदी केलेली जमीन मृत व्यक्तींच्या नावावर खरेदी केलेली आहे. फोंटो दुस-याचा आणि 7/12 वर नाव तिस-याचे लावण्यात आले आहे याबाबतचे पुरावे मी लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या निमित्ताने सभागृहामध्ये सादर केले होते. त्या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, या प्रकरणाची पूर्णपणे चौकशी करुन दोषी असणा-यांवर कारवाई केली जाईल. परंतु दुर्दैवाने कारवाई होणे तर सोडाच पण जे बेकायदेशीर व्यवहार झालेले आहेत ते व्यवहार कायदेशीर करण्याचा प्रयत्न महसूल विभाग करीत आहे. जमीन नसलेल्या व्यक्तींची 7/12 वर नावे लावली जात आहेत. शेतकरी नसलेल्या व्यक्तींच्या नावावर 7/12 फिरविण्याचे काम महसूल विभाग करीत आहे, याची पूर्णपणे चौकशी करुन फेरफार थांबविली पाहिजे. शासनाने यासंदर्भात तातडीने कार्यवाही केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

बाब क्र.33, पृष्ठ क्र.24, महसूल विभाग. श्री.ठाकूर नावाचे अधिकारी पूर्वी मुंबईमध्ये उप जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते. बिल्डरकडे असलेल्या मजुरांचे खोटे दाखले दिले आणि त्या व्यक्तींच्या खोटया सहया त्यांनी स्वत:च केल्या, म्हणून ते निलंबित आहेत. ते अलिबागमध्ये राहतात आणि मी उप जिल्हाधिकारी आहे असे सांगून तेथील शेतक-यांवर दबाव आणून खोटे व्यवहार करण्याचा प्रयत्न करतात. त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. त्यांनी मृत लोकांचे खोटे दाखले देऊन सरकारची फसवणूक केलेली आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याची खातेनिहाय चौकशी केली जाते. परंतु त्यांना निलंबित करून तातडीने अशा अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करायला पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो. हे श्री.ठाकूर, उपजिल्हाधिकारी आहेत आणि त्यामुळे ते तेथील अधिकारी व कर्मचारी यांचेवर दबाव आणून त्या भागातील जमिनींचे खरेदी-विक्रीचे व्यवहार करीत आहेत.

सभापती महोदये, बाब क्रमांक 40, पृ. 27 - नागपूरमध्ये ज्या जमिनींचे नुकसान झाले आणि त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागले. दरड कोसळल्याने शेतकऱ्यांच्या जमिनींमध्ये दगड आणि माती आली आणि ते काढण्याचे काम शासनातर्फे करण्यात येईल असे अनेक वेळा येथे घोषित करण्यात आले आहे. पण प्रत्यक्षात मात्र त्यादृष्टीने काम शून्य आहे. आज दुसरा पावसाळा आला तरी त्या जमिनींमधील दगड आणि माती तशीच आहे. तेव्हा शासनाने आपल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करावी अशी या निमित्ताने मी मागणी करीत आहे. सभापती महोदय, महाड, पोलादपूर आणि पेण तालुक्यांमध्ये गेल्या पावसाळ्यात ज्या दरडी पडल्या, त्याची माती तेथील जमिनींमध्ये आली आहे ती काढून शेतकऱ्यांना त्यांची जमीन पूर्ववत करून देण्याचे नियोजन आपण करावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 27, पृ. 40 - शालेय शिक्षण विभाग यासंबंधात मी माझे विचार मांडणार आहे. या राज्यामध्ये पहिली सैनिकी शाळा सातारा येथे निघाली. एक चांगली सैनिकी शाळा म्हणून तिचा लौकिक आहे. असे असतानाही आज त्या शाळेला जे अनुदान दिले जाते ते अतिशय अपुरे आहे. पूर्वी ज्या प्रमाणे अनुदान या शाळेला दिले जात होते त्याप्रमाणे सध्या अनुदान दिले जात नाही. त्यामुळे या सैनिकी शाळेला आपले अस्तित्त्व टिकविण्यासाठी विद्यार्थ्यांकडून वार्षिक 60 हजार रूपये फी घ्यावी लागते आहे. त्यामुळे गरीब मुलांना त्या ठिकाणी शिक्षण घेणे, सैनिकी शिक्षण घेणे परवडत नाही. तेव्हा या सैनिकी शाळेला पूर्ववत अनुदान कसे मिळेल याचा शासनाने अवश्य विचार करावा.

बाब क्रमांक 65, पृ. 50 - वित्त विभाग. सभापती महोदय, मच्छिमारांना दिलेले डिझेल आणि त्यावर मिळणारी सबसिडी याचा परतावा देताना 5 टक्के पैसे अधिकारी घेतात. शासनाने यासाठी अनुदान चालू ठेवले आहे त्याबद्दल जरूर शासनाला धन्यवाद. पण वित्त विभाग आणि मत्स्य संवर्धन विभाग यांच्याकडून हा परतावा मच्छिमारांना दिला जातो. परंतु हा परतावा अधिकाऱ्यांना

..... इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

पाच टक्के रक्कम दिल्याशिवाय मिळत नाही. तेव्हा या परताव्याचे पेपर्स दाखल केल्यानंतर 5 दिवसात पैसे मिळतील अशी व्यवस्था शासनाने केली पाहिजे. कारण डिझेल कोटा किती आहे हे शासनाने ठरवून दिले आहे आणि त्यापेक्षा जास्त डिझेल वापरले गेले तर त्याची चौकशी जरूर करा. पण परतावा मिळण्यासाठी जे 5 टक्के पैसे मोजावे लागतात ते बरोबर नाही आणि तो एक प्रकारे कायदाच होऊन बसला आहे. ते 5 टक्के पैसे दिल्याशिवाय कोणाही मच्छिमाराला परताव्याचे पैसे मिळत नाहीत अशी तेथे परिस्थिती आहे. तेव्हा मच्छिमारांना परताव्याचे पैसे ताबडतोब कशा प्रकारे लवकर मिळतील याचा विचार करून त्या दृष्टीने सोय शासनाने करावी.

बाब क्रमांक 214, पृ. 119 - सहकार विभाग. सभापती महोदय, एन्सीडीसीची कर्जे येतात आणि ते कर्ज पास करता. हे कर्ज हप्त्यामध्ये फेडण्यासाठी मुदत दिली पाहिजे ती शासनाकडून दिली जात नाही. खरे म्हणजे हे पैसे एनसीडीसीकडून आपल्याकडे येतात. त्यातून पहिला हप्ता दिला जातो पण त्यापुढील दुसरा, तिसरा, चौथा हप्ता देताना मात्र वेळ लागतो. त्यामुळे मग प्रकल्पाची किंमत वाढते आणि मग ते प्रकल्प व्हाएबल होत नाहीत आणि असे प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता संस्थांची राहत नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... एफ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

त्या दृष्टीकोनातून एन.सी.डी.सी. चे प्रकरण मंजूर झाल्यानंतर आणि पहिला हप्ता दिल्यानंतर ज्या गतीने केंद्र सरकारकडून पैसे येतात त्या गतीने राज्य सरकारने पैसे दिले पाहिजे. नाहीतर पैसे न दिल्यामुळे अनेक प्रकल्प अपूर्ण राहतात ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, दुसरा शेवटचा मुद्दा सहकार विभागासंदर्भातील आहे. मताचा अधिकार ठरविण्याबाबत ज्या संस्थेला तीन वर्षे झाली आहेत त्यांना मताचा अधिकार आहे, आणि ज्या सभासदांची व्यक्तिगत दोन वर्षे झाली आहेत त्यांना मताचा अधिकार आहे. परंतु या संदर्भात कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने, व नामदार श्री. हसन मुश्रीफ व नामदार श्री. कोरे यांनी 31 मार्च की, 30 जून यापैकी कोणती मुदत ठरवावयाची? संस्थेच्या चेअरमनची निवड झालेल्या दिनांकापासून मुदत ठरवावयाची काय? यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या फुल बेंचपुढे दावा दाखल केला. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने निकष ठरवून दिले आहेत की, ज्या दिवशी चेअरमनची निवड होईल तेव्हापासून त्यांची मुदत दोन वर्षे आणि संस्थेची मुदत तीन वर्षे राहील. सभापती महोदय, वेगवेगळया राज्यांमध्ये सहकारी संस्था आहेत त्याठिकाणी देखील निवडणुका होतात. त्यावेळी अधिकारी वेगवेगळे निकष लावतात. काही ठिकाणी 31 मार्च तर काही ठिकाणी 30 जून या तारखेपासून मुदत ठरविली जाते. त्यामुळे संस्थेला नाहक कोर्टामध्ये जाण्याचा त्रास पडतो. त्याकरिता शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला आहे, त्याप्रमाणे एक परिपत्रक काढून व त्याप्रमाणे एक कट ऑफ डेट ठरवून ज्या दिवशी संस्थेच्या चेअरमनची निवड होईल तेव्हापासून मुदत ठरविण्यात यावी. त्यामुळे सहकारी संस्थांचा वेळ आणि पैसा या दोन्ही गोष्टीं खर्च होणार नाहीत. त्यासंबंधी या पूरक मागणीच्या निमित्ताने शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे. गृह विभागाच्या पृष्ठ क्र. 15 वरील बाब क्र. 20 मध्ये "महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाव्दारे हाती घेण्यात आलेली गृहनिर्माण प्रकल्पाची चालू असलेली कामे पूर्ण करण्यासाठी 2005-06 च्या अर्थसंकल्पात रु. 40 कोटी इतक्या केलेल्या तरतुदींचा वापर करण्यात आला नाही" असे म्हटले आहे. यासंबंधी मला आपल्याला विचारावयाचे आहे की, गेल्या वर्षी याकरिता ठेवण्यात आलेले पैसे कां खर्च होऊ शकले नाहीत.? यावर्षी या कामाकरिता करण्यात आलेल्या नियोजनाप्रमाणे आतापर्यंत 15 कोटी रुपये खर्च केले आहेत. असे असतांना आपण 25 कोटी रुपये जास्त कशासाठी दिले आहेत? ते स्पिलओव्हर कां झाले? यासंबंधी खुलासा होणे आवश्यक आहे.

त्याच पानावरील बाब क्र. 22 मध्ये "कारागृहात व न्यायालयात व्हिडीयो कॉन्फरन्सींग यंत्रणा तसेच कारागृहांमध्ये क्लोज सर्किट दूरदर्शन बसविणे याकरिता 92 लाख 35 हजार इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे" सभापती महोदय, ही खरेदीची प्रक्रिया पार पाडीत असतांना त्याकरिता निविदा मागविण्याची पध्दत आहे, त्याप्रमाणे निविदा मागवून खरेदी केली जाते काय? याबाबत मी आपणास एक उदाहरण देऊ इच्छितो. आम्ही आमच्या आमदार निधीमधून कॉप्युटर, लॅपटॉप घेतो त्याची किंमत 25 ते 30 हजार असते. परंतु याठिकाणी त्याची किंमत 67 ते 75 हजार इतकी दाखविली जाते. आणि म्हणून शासकीय खरेदीमध्ये निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र. 40 व बाब क्र. 57 मध्ये "मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा, नवीन अशासकीय माध्यमिक शाळा सुरु करणे, अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये जादा तुकडया सुरु करणे, सैनिकी शाळा व अशासकीय कनिष्ठ महाविद्यालये यांसाठी सहाय्यक अनुदान देण्याकरिता तरतूद करणे याकरिता रु. 1,00,00,00,000 ची तरतूद करण्यात आली आहे". आपण याठिकाणी जादा तुकडया देण्याकरिता तरतूद केली असली तरी यापूर्वी गेल्या सहा-सात वर्षापासून ज्या जादा तुकडया मान्य केल्या आहेत त्यांची स्थिती काय आहे? नवीन मान्यताप्राप्त नसलेल्या शाळांना अनुदान द्यायला हरकत नाही. 2 हजार सालापासून ज्या शाळा सुरु आहेत त्यांना नॉन सॅलरी ग्रँट दिली जात नाही. माझ्याकडे यासंबंधीचे एक पत्र आहे.आपण त्यांना दोन महिन्यापूर्वी पैसे दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

आहेत. ते गेले वर्षभर नॉन सॅलरी ग्रँटची मागणी करीत आहे. असे असतांना आपले अधिकारी सहा-सहा वेळा त्यांच्याकडून फाईल मागवितात आणि ती फाईल हरविली म्हणून सांगतात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या ग्रामीण भागातील शाळा आहेत याकडे शिक्षण मंत्र्यांनी अतिशय गांभीर्याने पहाणे आवश्यक आहे.

यानंतर पान क्रमांक 45, 46, बाब क्रमांक 63 आणि 64, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिकेला अनुदान दिलेले आहे.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विनोद तावडे)

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानार्तंगत मुंबई महानगरपालिकेला निधी दिला जाणार आहे. त्यामध्ये काही अटी घालण्यात आलेल्या आहेत. मुळामध्ये मुंबई महानगरपालिकेचा कायदा बदलायला सांगितलेला आहे, मालमत्ता करामध्ये सुधारणा करण्यास सांगितलेले आहे. खर्च कमी करण्यास सांगितलेले आहे. त्यानंतर दुसऱ्या दोन अटी या मुंबईच्यादृष्टीने घातक अटी आहेत. त्यामध्ये नागरी कमाल जमीन धारणा नियमावली रद्द करावी, भाडे नियंत्रण कायद्यामध्ये सुधारणा करावी. म्हणजे जे आज 50 ते 60 रुपये भाडे आहे ते 1 हजार रुपये द्यावे लागणार आहे. निधी देण्यापूर्वी महानगरपालिकेला अटी घातलेल्या आहेत, त्यामध्ये पुढे अशीही अट घातलेली आहे की, प्रशासकीय बाबीमध्ये सुधारणा करावी. स्वेच्छा निवृत्तीमध्ये रिक्त पदे होतील ती पदे रिक्तच ठेवावी. याचा अर्थ प्रशासकीय खर्च कमी करावा, अशा अटी आहेत. मला वाटते, पैसे घेण्यापूर्वी या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे असे मला या ठिकाणी आग्रहाने सांगायचे आहे.

त्यानंतर पान क्रमांक 50 बाब क्रमांक, 66, 67. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त झालेल्या रुपये 100 कोटींच्या ठेवीवरील व्याज देण्याकरिता 1 कोटी 64 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. मुळामध्ये अशाप्रकारची तरतूद केली जाते परंतु एकही पैसा दिला जात नाही. गेल्यावर्षी महानगरपालिकेने 180 कोटी रुपये उपकराच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीमध्ये दिलेले होते. तेवढीच मॅचिंग ग्रॅन्ट म्हणून सरकारने म्हाडाला ते पैसे देणे आवश्यक आहे. वर्षभरामध्ये म्हणजे मार्च अखेर 180 कोटी रुपये दोन्ही हेडखाली तरतूद दाखविली परंतु एकही पैसा दिलेला नाही. म्हाडाच्या कायद्यानुसार एक रुपयासुध्दा सरकार स्वत:कडे ठेवू शकत नाही. उपकर गोळा होतो, परंतु शासनाच्या अर्थ खात्याकडून पैसे दिले जात नाहीत. एक रुपया उपकर गोळा होतो, त्यामध्ये 90 पैसे भाडेकरुंचे असतात 10 पैसे लॅन्डलॉर्डचे असतात. यामध्ये शासन स्वत:चे पैसे घालत नाही. असे असतानासुध्दा कोट्यावधी रुपये मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु...

महानगरपालिकेकडून उपकरापोटी शासनाच्या तिजोरीमध्ये जमा केले जातात, परंतु ते पैसे दुसऱ्या कामासाठी वापरले जातात. ते पैसे त्याच कामसाठी देणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.

त्यानंतर सांस्कृतिक विभाग, बाब क्रमांक 168, पान क्रमांक 129. कोल्हापूर चित्रनगरी महामंडळाला कर्ज सहाय्य मंजूर करण्यासाठी तरतूद आहे. श्री.सुभाष घई यांना 22 एकर जागा चित्रनगरी महामंडळाने दिलेली आहे. त्या जागेची बाजारभावाप्रमाणे किंमत 60 ते 70 कोटी रुपये हाते. परंतु ती त्यांना 3 कोटी रुपयास दिलेली आहे. या संदर्भात कॅगने ऑब्जेक्शन काढले, त्या जागेची किंमत 28 कोटी 20 लाख रुपयापर्यन्त असताना, तीन कोटी रुपयाला ती जमीन विकलेली आहे. ही 22 एकर जागा सोडून पीडीआर-व्हीडीओ कंपनीला चित्रनगरी महामंडळाने 1974 साली दोन एकर जागा पैसे न घेता दिली. त्यानंतर त्या जागेवर बांधकाम करण्यासाठीही परवानगी दिलेली आहे..

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

न्यायालयाने स्थगिती दिलेली होती आणि श्री. सुभाष घई यांना कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये असे सांगितले होते. या भ्रष्टाचाराबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना खुलासा करावा. यासंदर्भात कॅगने ऑब्जेक्शन घेतले होते. त्यांच्या दृष्टीने त्या जमिनीची किंमत 28 कोटी 20 लाख रुपये होती तसेच त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणे त्या जमिनीची किंमत 60 ते 70 कोटी रुपये होती. तरी सुध्दा श्री. सुभाष घई यांना ती जमीन 3 कोटी रुपयांना देण्याचे कारण काय ? सांस्कृतिक कार्य खाते आपले आहे. चित्रनगरी आपली आहे. खरे म्हणजे ती जमीन दूग्धविकास विभागाची आहे. ती जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे वर्ग झालेली नाही. असे असताना त्यांना त्या खात्याची परवानगी न घेता 22 एकर जमीन श्री. सुभाष घई यांना दिली. निदान जमीन देताना त्यांच्याकडून बाजार भावाने रक्कम तरी वसूल करावयास पाहिजे होती. शासनाने फक्त 3 कोटी रुपयांना त्यांना जमीन दिलेली आहे. यामध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्याची शासनाने चौकशी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 293, पृष्ठ क्रमांक 175 वर राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, जैविक उपायांच्या प्रक्रियेव्दारे तलावातील पाण्याची गुणवत्ता वाढविणे वगैरेसाठी पूरक मागणी करण्यात आलेली आहे. चिपळूणला लोट्याच्या माळावर जे कारखाने आहेत त्या ठिकाणी जुनी यंत्रणा आहे. त्याकडे पर्यावरण विभाग लक्ष देत नाही. तेथील कारखान्यांमध्ये स्फोट होतात. कारखान्यातील प्रदुषित पाणी बाहेर सोडले जाते. लोटे येथील एमआयडीसी परिसरातील विहिरी किंवा पिण्याचे पाणी दुषित झाल्यामुळे अनेक प्रकारच्या रोगराई आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे व काळजीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याबाबत शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 50 मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे बी-बीयाणे तंत्रशास्त्र केंद्राची स्थापना करणे यासाठी राज्य शासनाचा हिस्सा म्हणून 8 लाख 61 हजार रुपयांची पुरवणी मागणी प्रस्तावित केलेली आहे. आपली जी विविध कृषी विद्यापीठे आहेत त्यांना कृषीच्या संवर्धनाच्या दृष्टीने राज्य शासन मदत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

देते. कोकण कृषी विद्यापीठामध्ये डॉ. शंकर मगर यांनी गेल्या दोन तीन वर्षात जो भ्रष्टाचार केला त्याची कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली नाही आणि त्यांना कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नाही. मी दोन तीन उदाहरणे देतो. विद्यापीठाला राज्य सरकारकडून आणि केंद्र सरकारकडून पैसे मिळतात तसेच विद्यापीठाचे महसुली उत्पन्न असते. त्यातून विद्यापीठाचा आर्थिक कारभार चालतो. राज्य सरकारकडून 26 कोटी रुपये, केंद्र सरकारकडून 10 कोटी रुपये आणि विद्यापीठाचे महसुली उत्पन्न 4 कोटी रुपये असे दरवर्षी 40 कोटी रुपये या विद्यापीठाला मिळतात. परंतु त्या 40 कोटी रुपयांचा कोणताही हिशेब त्यांनी दिलेला नाही. त्यानंतर श्री. मगर साहेबांनी आपल्या डॉक्टर मुलाच्या नावाने 1 लाख रुपयांची खोटी बिले देऊन भ्रष्टाचार केलेला आहे. या बाबींच्या माध्यमातून माझी शासनाकडे मागणी आहे की, ते निवृत्त झाले असले तरी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्यांच्यावर फौजदारी खटला शासनाने भरावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहासमोर असलेल्या पूरक मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 6, पृष्ठ क्रमांक 5 च्या संदर्भात मला बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील नेसरी-पावनखिंड येथील प्रतापराव गुजर यांच्या स्मारकाच्या कामासाठी 34 लाख 31 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे ...

पन्हाळगडाचे वैशिष्ट्य लक्षात घेता श्री. जयंत पाटील यांनी सूचना केल्याप्रमाणे लालकिल्ला आणि अंदमान याठिकाणी ज्या प्रमाणे लाईट ॲण्ड साउंड देखावा केलेला आहे त्याप्रमाणे लाईट ॲण्ड साऊंडचा प्रभावशाली इफेक्ट निर्माण कराणारा देखावा पन्हाळगडावर करावा. या पन्हाळगडाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फार जवळचा संबंध आहे. जेव्हा जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोल्हापूरच्या दौ-यावर जात असत त्या त्या वेळी ते या शिवाजी राजांच्या पन्हाळगडावर वास्तव्य करीत असत. या पन्हाळ गडावर प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक व्हावे अशी कोल्हापूरच्या जनतेची मागणी असून या मागणीचा विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

विधि व न्याय विभाग. पृ.क्र.99, बाब क्रमांक 122. मा. न्यायधीश, मुंबई उच्च न्यायालय यांच्याकरिता प्रबंधक, अपील शाखा यांच्या आस्थापनेवर 36 नवीन पदांच्या बाबतीत 18 लाख 36 हजार रु. तरतूद करण्यात आलेली आहे. वेतन भत्ते यावरील वार्षिक सरासरी खर्च अंदाजे रुपये 54 लाख 48 हजार 112 इतका आहे. औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये अनुसूचित जातीचे युवक श्री. माधव सुरवते व श्री. दांडगे यांना अतिरिक्त ठरवून सेवेतून कमी करण्यात आलेले आहे. हे दोघेही मॅटमध्ये गेल्यानंतर मॅटने त्यांना सेवेमध्ये सामावून घेण्यासंबंधीचा निर्णय देऊन देखील त्यांना सेवेमध्ये सामावून घेण्यात आलेले नाही. तेव्हा विधि व न्याय विभागाने श्री. माधव सुरवते व श्री.दांडगे यांना न्याय द्यावा आणि त्यांना सेवेमध्ये सामावून घ्यावे.

गृह विभाग, पृ.क्र.13, बाब क्रमांक 14.- भारतीय पोलीस सेवेच्या अधिका-यांची 6 अधिसंख्य पदे निर्माण करण्यासाठी 1 हजार रु.ची लाक्षणिक मागणी करण्यात आलेली आहे. श्रीमती भित्रे या मागासवर्गीय अधिका-यांना आयपीएस कंसिडरेशन झोनमध्ये वगळण्यात आलेले आहे. त्यांच्या संदर्भात गृह विभागाने विचार करावा.

गृह विभाग, पृ.क्र.14, बाब क्रमांक 19.- पोलिसांच्या क्रीडा विषयक कौशल्यात वाढ करण्यासाठी दोन कोटी रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. पोलीस विभागामध्ये क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळविलेले अधिकारी कर्मचारी आहेत. अशा अधिकारी व कर्मचा-यांना विशेष प्रोत्साहन दिले जाते. नागपूर येथील अनुसूचित जातीच्या एका तरुण मुलीने हॉकीमध्ये कलर होल्डर किताब प्राप्त करुन देखील त्या मुलीला नागपूरच्या पोलीस भरतीमध्ये डावलण्यात आलेले आहे. याबाबतीत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

वित्त विभाग, पृ.क्र.50, बाब क्रमांक 66 - राष्ट्रीय सार्वजनिक वित्त व धोरण संस्थेला, सहायक अनुदान देण्याकरिता 1 लाख रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद केल्या बद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु मी प्रत्येक अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळी आणि प्रत्येक पुरवणी मागण्याच्या वेळी मागणी करीत असतो की, अमरावती विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद करावी. अशा प्रकारचा अभ्यासक्रम नागपूर आणि मुंबई विद्यापीठामध्ये सुरु करण्यात आलेला आहे. मी वारंवार मागणी करुन देखील अद्याप पर्यन्त हा निधी अमरावती विद्यापीठाला देण्यात आलेला नाही.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, नाशिक येथे जागतिक किर्तीचे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आहे. या मुक्त विद्यापीठामध्ये या सदनाचे सदस्य म्हणून व्यवस्थापन मंडळामध्ये मी प्रतिनिधीत्व करतो. ज्याप्रमाणे दिल्लीच्या इंदिरा गांधी ओपन युनिव्हर्सिटीला केंद्र सरकार आर्थिक मदत करते, पण त्याच धर्तीवर असणाऱ्या या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. या संदर्भात शासनाला माझी विनंती आहे. कमीत कमी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला एकमुस्त 25 कोटी रुपयांचे अनुदान दिले तर भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान देण्याची गरज भासणार नाही. या 25 कोटी रुपयांमुळे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केवळ राज्याच्या, देशाच्या नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर दू:रस्थ शिक्षण क्षेत्रात अत्यंत उत्कृष्ट कार्य करीत आहे त्याला निश्चितपणे चालना मिळेल.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभाग, पृष्ठ क्रमांक 139, बाब क्रमांक 175 अन्वये एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकासाकरीता 36 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अलिकडे मुंबईमध्ये एस.आर.ए.योजना सुरु झाली आहे. या योजनेमध्ये अनेक प्रकारचे गोंधळ, घोळ व भ्रष्टाचार सुरु आहे. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक 160,बाब क्रमांक 196 अन्वये मुंबईतील ख्यातनाम ग्रँट मेडिकल कॉलेजकरीता 14.82 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. ग्रँट मेडिकल कॉलेजचा दर्जा एम्सच्या दर्जाचा व्हावा यासाठी केंद्र सरकारने देखील 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ज्याप्रमाणे ग्रँट मेडिकल कॉलेजचा दर्जा एम्सच्या दर्जाचा व्हावा म्हणून तरतूद केली त्याचप्रमाणे नागपूरच्या ऐतिहासिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पृष्ठ क्रमांक 185, बाब क्रमांक 221 संबंधी बोलत असताना रायगड जिल्हयातील लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा दर्जा वाढविण्यासाठी आणि हे विद्यापीठ राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीचे व्हावे यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पृष्ठ क्रमांक 112, बाब क्रमांक 137 अंतर्गत विदर्भामध्ये पाणलोट विकास मिशन स्थापन करण्याकरीता तरतूद करण्यात आली आहे, ती पुरेशी आहे असे वाटत नाही. विदर्भामध्ये पाणलोटाचे प्रमाण वाढावे, पाणलोटाचे क्षेत्र वाढावे यासाठी आणखी विशेष तरतूद केली असती तर बरे झाले असते. विदर्भामध्ये जी शेततळ्यांची योजना आहे, ती शेततळी निर्माण करण्यासाठी विशेष प्रकारच्या निधीची तरतूद करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभाग, पृष्ठ क्रमांक 167, बाब क्रमांक 203 अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या एकलव्य निवासी शाळांसाठी मागणी करण्यात आली आहे. या एकलव्य निवासी शाळा आदिवासी मुलांकरीता आहेत. त्यांचा दर्जा उत्कृष्ट व्हावा यादृष्टीने विशेष तरतूद करण्याची गरज आहे असे मला आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य आणि विशेष सहाय्य विभाग, पृष्ठ क्रमांक 125, बाब क्रमांक 153 अन्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या योजनांसाठी व्यापक प्रसिध्दी देण्याकरीता जिल्हा, तालुका व गाव पातळीवर सामाजिक न्याय विभागाचे विविध प्रकारचे विकासाचे कार्यक्रम आहेत ते कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचावेत याकरीता प्रसिध्दी देण्यासाठी परिणामकारक जाहिराती करण्यासाठी 3 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाचे मागासवर्गीयांच्या विकासाचे अनेक कार्यक्रम असतात, ते कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचत नाहीत. सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी, विभागीय समाजकल्याण अधिकारी, तालुका समाजकल्याण अधिकारी यांच्याकडेच ते कार्यक्रम पडून राहतात. त्या कार्यक्रमांची माहिती अनुसूचित जातीच्या वर्गाला मिळत नाही. यादृष्टीने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 125, बाब क्रमांक 154 अंतर्गत गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविण्याची योजना लिडकॉमच्या माध्यमातून चालविण्यात येत होती. ती योजना मध्यंतरी बंद करण्यात आली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे गटई कामगारांना रस्त्याच्या फुटपाथवर, उन्हातान्हात राहून काम करावे लागते त्यामुळे गटई कामगारांची सोय करण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. तसेच गटई कामगारांना स्टॉल उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात अनेक प्रकारची कागदपत्रे जोडावी लागतात त्यामुळे सध्याची कागदपत्र देण्याची जी पध्दत आहे ती बदलून सोपी पध्दत उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 128, पृष्ठ क्रमांक 64 यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनासाठी 139 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले तसेच छत्रपती शिवराय हे आपले आदर्श आहेत. काही मंडळी तर डॉ. बाबासाहेबांच्या नावाला विरोध करीत असतात परंतु अशा प्रकारची भुमिका घेणे योग्य नाही एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय मंदिर बांधण्यासाठी 139 कोटी रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे मी शासनाचे मनापासून आभार मानतो.

आता मी महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 26, पृष्ठ क्रमांक 37 च्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना आर्थिक सहाय्य देण्याच्या संदर्भात शासनाने आर्थिक पॅकेजची घोषणा केलेली आहे. यासंदर्भात शासनाने 12 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना आर्थिक सहाय्य लवकरात लवकर कसे उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवी शेतक-यांच्या परिवारापर्यंत हे आर्थिक सहाय्य युध्द पातळीवर पोहचले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, महार वतनाच्या जमिनीचा पश्चिम महाराष्ट्रात मोठया प्रमाणात प्रश्न निर्माण झालेला आहे. आपल्या मार्फत मी माननीय मंत्रीमहोदयांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, सांगली जिल्हयातील तासगाव येथे 40 एकर महार वतनाची जमीन एका धनदांडग्याने हडपलेली आहे. या प्रकरणी तलाठी आणि उपविभागीय अधिका-यानी चुकीचे निर्णय घेऊन ही जमीन हडप करण्यासाठी प्रोत्साहन दिलेले आहे त्यामुळे यासंदर्भात योग्य ती कारवाई करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 151, पृष्ठ क्रमांक 87 च्या संदर्भात माझे विचार मांडणार आहे. पुणे जिल्हयामध्ये जिल्हा कुष्ठ रोग समितीला शासनाने अनुदान दिलेले आहे त्यामुळे शासनाचे मी अभिनंदन करतो.

आता मी जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 95, पृष्ठ क्रमांक 115 च्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळासाठी 249 कोटी रुपयांची पुरक मागणी करण्यात आलेली असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

आता मी बाब क्रमांक 95, पृष्ठ क्रमांक 118 पुर नियंत्रण कामसाठी शासनाने 9.86 कोटी रुपयांची मागणी करण्यात केलेली आहे. परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, जळगाव जिल्हयातील चोपडे गावातील रत्नावती नदीला महापूर आल्यामुळे या नदीकाठची शेकडो घरे, गुरे-ढोरे वाहून गेलेली आहे. या महापुरामुळे मोठया प्रमाणात शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यामुळे या ठिकाणच्या लोकांचे लवकरात लवकर पुनर्वसन करुन द्यावे अशी विनंती करतो व मला बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय भीम.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, नगर विकास विभाग से संबंधित बाब क्रमांक 64 के बारे में अपने विचार प्रकट करते हुए मैं यह कहना चाहती हूँ कि हाल ही में परभणी शहर में "बिलो पॉवर्टी लाइन" के लोगों की पहचान करने के लिए दुबारा सर्वे किया गया है, लेकिन उसकी यादी नगरपालिका ने बोर्ड पर नहीं लगाई है. समाचार पत्र में अंतिम तारीख प्रकाशित की गई, जो समाप्त हो गई है. इस प्रकार से अंतिम तारीख गुजर गई और किसी को वह यादी देखने की संधि नहीं दी गई. इस वजह से अनेक लाभार्थी वंचित रह सकते हैं. इसलिए मेरा शासन से अनुरोध है कि यह यादी वार्ड के हिसाब से नगरपालिका के बोर्ड पर लगाई जाए.

सभापति महोदय, नगर विकास विभाग से संबंधित बाब क्रमांक 61 के बारे में मैं यह कहना चाहती हूँ कि पिछले साल अतिवृष्टि होने के बाद परभणी शहर में करोड़ों रुपए की मदद शासन की ओर से दी गई. लेकिन दुबारा परभणी शहर में पानी न भरे, इसके लिए कुछ नहीं किया गया. वहां पर 3 नालों का पानी जमा होता है. मैं पिछले 4 साल से मांगणी कर रही हूँ कि परभणी शहर के ड्रेनेज सिस्टम के लिए सर्वे किया जाए. शासन की ओर से करोड़ो रुपए मदद के लिए तो दिए जाते हैं, लेकिन विकास के काम वहां पर नहीं होते हैं. मराठवाडा के सभी शहरों में ड्रेनेज सिस्टम हो चुका है. इसलिए मेरी सरकार से मांग है कि परभणी शहर के ड्रेनेज सिस्टम के लिए पर्याप्त निधि की तरतूद की जाए.

सभापति महोदय, मा. मुख्यमंत्री से संबंधित बाब क्रमांक 8 के विषय में मैं कहना चाहती हूँ कि अल्पसंख्यक शैक्षणिक संस्थाओं को अलग अलग अभ्यासक्रमों के लिए अलग अलग प्रमाण पत्र लेना पड़ता है. किसी शैक्षणिक संस्था को अल्पसंख्यक का दर्जा मिलने के बाद नए अभ्यासक्रम के लिए अलग से अल्पसंख्यक प्रमाण पत्र लेने की जरुरत नहीं होनी चाहिए. यह उनका संवैधानिक अधिकार होने के बावजूद डिले करके उनको परेशान किया जाता है. जी.ए.डी. ने यह मुद्दा एक साल के लिए आगे कर दिया है. मेरी मांग है कि इसी साल इस मुद्दे का हल निकाला जाए. अल्पसंख्यक समाज का संवैधानिक अधिकार होते हुए उनको सर्टीफिकेट के लिए परेशान किया जाता है. मेरी मा. मुख्यमंत्री से विनंती है कि जल्दी से जल्दी निर्णय लेकर इस मुद्दे को हल करना चाहिए.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान जारी

सभापति महोदय, अनुकम्पा तत्व पर नियुक्ति करते समय 5 प्रतिशत का आरक्षण दिया गया है. 5 प्रतिशत आरक्षण में एक भी केन्डीडेट की नियुक्ति नहीं हो पाती है. इसलिए अनुकम्पा तत्व पर नियुक्ति के समय 5 प्रतिशत का आरक्षण न लगाते हुए वेटिंग लिस्ट में जितने लोग हैं, उनका नौकरी में समायोजन किया जाए और उसके बाद भविष्य के लिए 5 प्रतिशत आरक्षण की शर्त लागू की जाए. ऐसा करना अनुकम्पा तत्व के लोगों के लिए बहुत जरुरी है.

सभापति महोदय, कृषि विभाग से संबंधित बाब क्रमांक 48 के बारे में मैं कहना चाहती हूँ कि विदर्भ के 6 जिलों के लिए स्पेशल पेकेज किसानों की आत्महत्या की वजह से शासन ने घोषित किया है. यह स्वागत योग्य कदम है. लेकिन मराठवाडा में 372 आत्महत्या हुई हैं. मराठवाडा के लिए कोई भी पेकेज या मदद नहीं दी गई है. माननीय प्रधानमंत्री विदर्भ में आए और सभी पक्षों के लोग विदर्भ में जा रहे हैं. मराठवाडा के किसानों के लिए भी स्पेशल मदद होनी चाहिए, ऐसी आग्रही और पुरजोर मांगणी मैं करती हूँ.

सभापति महोदय, पशुसंवर्धन विभाग से संबंधित बाब क्रमांक 55 के बारे में मैं कहना चाहती हूँ कि दुग्ध व्यवसाय योजना के अन्तर्गत लाभर्थियों को गांवों में जानवर दिए जाते हैं. लेकिन ग्रामीण भाग के बहुत से लोग जानवरों को बेच देते हैं. इस वजह से जो लाभ होना चाहिए, वह नहीं होता है. इसलिए मेरी मांगणी है कि एक धोरणात्मक निर्णय लेकर महिला बचत गट को जानवर देने का निर्णय शासन को लेना चाहिए. महिला बचत गट के माध्यम से डेयरी का अच्छा व्यवसाय हो सकता है. महिला बचत गट में ग्रुप में काम होता है, इसलिए इसमें भ्रष्टाचार नहीं होगा और शासन का पैसा बर्बाद नहीं होगा. यह धोरणात्मक निर्णय शासन को लेना चाहिए.

सभापति महोदय, पूरक मांगणी क्रमांक एच-5 के संदर्भ में मैं यह कहना चाहती हूँ कि नेशनल हाइवे नं 22 परभणी शहर के अन्दर से जा रहा है. नेशनल हाइवे शहर के अन्दर से जाने की वजह से काफी आर्थिक नुकसान होता है और बिल्डिगों को डिमोलिश करना पड़ता है. शहर के अन्दर से हाइवे ले जाने की वजह से काम में अड़चन आ सकती है. इसलिए यह हाइवे शहर के अन्दर से जाने की बजाय बाय-पास से जाना चाहिए, यह मांग मैं शासन से करती हूँ.

.....L-3

. . . श्रीमती फौजिया खान जारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, टोल नाका के संबंध में मैं अपनी नाराजगी प्रकट करना चाहती हूँ. जब हमारी गाड़ी टोल नाका पर रुकती है तो हमारा अपमान किया जाता है. लेबर क्लास के लोगों को पता नहीं रहता है और वे चोर की तरह से हमारा परिचय पत्र देखते हैं. 10 मिनट तक हमें वहां रुकना पड़ता है. मैं सरकार से कहना चाहती हूँ कि अगर आपने हमें यह प्रिविलेज दिया है तो इसको वापस ले लीजिए. आमदार का इस तरह से अपमान होना अच्छी बात नहीं है. बार बार यह बात सभागृह में उठाई गई है. इसके बारे में शासन को कुछ न कुछ कदम उठाने चाहिए. इसके अलावा एक बात यह भी है कि इसके दर में समानता नहीं है. कहीं यह 8 रुपए है तो कहीं 10 रुपए लिया जाता है. एक्सप्रेस हाइवे पर ऑफिसियल्स की गाड़ी से 100 रुपए लिए जाते हैं. टोना नाका पर एक समान दर हो और आमदारों का अपमान न हो, इस तरफ शासन को ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, नागरी पुरवठा विभाग से संबधित बाब क्रमांक 146 के बारे में मैं यह कहना चाहती हूँ कि राशन कार्ड के शुल्क में वृद्धि की गई है. बी.पी.एल. के लोगों के लिए 200 रुपए शुल्क रखा गया है और उसके ऊपर के लोगों के लिए 500 रुपए शुल्क रखा गया है. इतना शुल्क लोग नहीं दे सकते हैं और राशन कार्ड उसकी सही आयडेन्टिटी होती है. इसलिए शासन को यह शुल्क वापस लेने की जरुरत है, ऐसा मैं शासन से अनुरोध करती हूँ.

. . . . भाषण जारी,नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान .....

सभापति महोदय, बाब क्रमांक 13 - के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि महिलाओं पर बढ़ते अत्याचार को देखते हुए हर तालुके में एक महिला पुलिस स्टेशन स्थापित किया जाना चाहिए, यह मेरा सुझाव है. परभणी में भी महिलाओं पर होने वाले अत्याचारों की संख्या में वृध्दि हुई है. इसलिए परभणी में तुरन्त एक महिला पुलिस स्टेशन स्थापित किया जाए,क्योंकि हम यह देख रहे हैं कि महिलाओं को न्याय नहीं मिल रहा है. महिलाओं का शोषण रोकने के लिए महिला पुलिस स्टेशन की अत्यंत आवश्यकता है. अत: परभणी में एक महिला पुलिस स्टेशन स्थापित किया जाए. दूसरा मेरा यह सुझाव है कि जिस प्रकार से बिहार एवं झारखंड में बाल पुलिस नियुक्त किए गए हैं, उसी प्रकार से महाराष्ट्र में भी बाल पुलिस नियुक्त किए जाए. भले ही वे 18 साल से कम आयु के हो. जो 50 प्रतिशत आरक्षण रखा गया है, उसके अन्तर्गत सारे पद नहीं भर पाते हैं तब इन्हें आगे समाहित किया जाता है. मुंबई में बाल पुलिस नियुक्त करने का नियम है, ऐसा मैं समझ ाती हूं. अगर यह सही है तो पूरे महाराष्ट्र के लिए यह नियम बनाया जाए और बाल पुलिस की नियुक्ति की जाए.

बाब क्रमांक 215 के अन्तर्गत में यह कहना चाहूंगी कि परभणी कृषि विद्यापीठ के अन्तर्गत प्रकल्प ग्रस्तों के पुनर्वास का विषय बर्निंग इश्यू है. वहां के प्रकल्पग्रस्त बलसा गांव में जाने के लिए तैयार है. चूंकि इस काम के लिए ज्यादा निधि की आवश्यकता है. इसलिए शासन इस विषय को प्रधानता दें और ज्यादा निधि की व्यवस्था करें.

बाब क्रमांक 169 के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि महाराष्ट्र में मौजूद सेरीकल्चर पोटेन्शियल की ओर उचित ध्यान नहीं दिया जा रहा है. इसलिए मैं यह मांग करती हूं कि नेशनल सेरीकल्चर मिशन की तरह स्टेट सेरीकल्चर मिशन अमल में लाया जाए.

सभापति महोदय, पिछली बार यह घोषणा की गई थी कि परभणी में महिला अस्पताल स्थापित किया जाएगा. लेकिन इस के संबंध में आगे कोई कार्यवाही नहीं हो रही है. इसलिए मेरी यह मांग है कि परभणी में महिला अस्पताल बनाने का काम तुरन्त शुरु किया जाए और उसके लिए आवश्यक धनराशि का प्रावधान किया जाए.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान .....

सामाजिक न्याय विभाग के अन्तर्गत मैं यह बात रखना चाहती हूं कि जाति पड़ताल प्रमाणपत्र देने हेतु एक समिति बनाई गई है, यह समिति जाति की पड़ताल करके प्रमाणपत्र जारी करती है. लेकिन भटक्या एवं विमुक्त जातियों के लिए अलग से नियम है. इसमें खास तौर से मुस्लिम समाज के लोगों को जाति का प्रमाण पत्र प्राप्त करने में परेशानी हो रही है. निज़ाम के काल में मुस्लिमों के संबंध में जाति के सामने " मुस्लिम " शब्द लिख दिया जाता था. यही पध्दति आज भी है. इसी वजह से मुस्लिमों को जाति प्रमाण पत्र प्राप्त करने के लिए वैलीडिटी में परेशानी आ रही है.इस वजह से मेरी यह मांग है कि जाति पड़ताल समिति में अशासकीय सदस्य के रुप में भटक्या व विमुक्त जाति का एक प्रतिनिधि रखा जाए.

सभापति महोदय, इसी तरह से मैं लोवर दूधना प्रकल्प के अन्तर्गत आने वाली मुख्य समस्या को हल करने की मांग करती हूं.

शालेय शिक्षा विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि उर्दू स्कूलों में 12 दिन का प्रशिक्षण दिया गया था. लेकिन प्रशिक्षण के दौरान आवश्यक साहित्य उन तक पहुंचा नहीं था. जिसकी वजह से यह प्रशिक्षण नाकारा साबित हो गया है. मैंने इस सिलसिले में माननीय मंत्री महोदय को फोन करके बताया था. इसलिए मेरी यह मांग है कि उर्दू स्कूलों में फिर से प्रशिक्षण दिया जाए ताकि उन पर अन्याय न हो सके.

सभापति महोदय,परभणी में स्टेडियम का काम निधि के अभाव के कारण बहुत धीमी गति से चल रहा है. स्टेडियम का निधि दूसरे काम के लिए दे दिया गया. इसलिए मेरी यह मांग है कि स्टेडियम के काम के लिए तत्काल निधि का प्रावधान किया जाए.

सभापति महोदय, वन विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगी कि परभणी कृषि विद्यापीठ को डिफॉरेस्ट का काम दिया गया है. चूंकि वहां कोई वन जमीन नहीं है लेकिन नियम के अनुसार जंगल से 10 किलोमीटर तक कोई सॉ-मिल स्थापित नहीं की जा सकती है.इस वजह से लोगों को भूखों मरने की नौबत आ गई है. इस संबंध में नागपुर में वन मंत्री जी के साथ बैठक भी हुई थी लेकिन कोई कार्यवाही नहीं हुई. इस संबंध में वहां के डी.सी.एफ. ने शासन के पास कोई प्रस्ताव नहीं भेजा है. वहां दो हजार लोगों के सामने भूखों मरने की नौबत आ गई है. वन विभाग के अधिकारी कोई काम नहीं कर रहे हैं. इसलिए शासन को इस बारे में ध्यान देना चाहिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

..... (यानंतर श्री.रोझेकर.....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पान क्रमांक 6 - बाब क्रमांक 60 या मागणीअन्वये तुकडोजी महाराजांच्या स्मारकाचे सौदर्यीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मी त्याचे स्वागत करतो. त्याचबरोबर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची आळंदी येथे समाधी असून या ठिकाणी सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांच्याशी माझी याबाबत चर्चा झाली त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, शासनाकडून निधी उपलब्ध होत नसल्यामुळे हे काम राहिलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, आळंदी येथील संतश्रेष्ठ ज्ञानोबांच्या समाधीचे सुशोभिकरण व सौदर्यीकरण करण्यासाठी 1 ते 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व या कामासाठी अनुदान देण्यात यावे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 75 अन्वये पुलाच्या बांधकामाच्यासंदर्भात मागणी करण्यात आलेली आहे. एक बाब मला या ठिकाणी लक्षात आणून द्यावयाची आहे की, पुणे शहराच्या जवळील कात्रज घाटाचे काम जलदगतीने पूर्ण करावे, अशी गेल्या कित्येक वर्षांपासून मागणी होत आहे. या घाटातून पुढे मुंबई, पुणे, इचलकरंजी, सांगली कोल्हापूर, शिरवळ वगैरेकडे जाणा-या वाहतूकीची कोंडी होते व या घाटातून प्रवास करणा-या या सर्व भागातील उद्योजकांना फार मोठी अडचण निर्माण होत आहे. या भागातून प्रवास करण्यासाठी कात्रज घाटाला पर्याय नसल्यामुळे पलिकडच्या भागातील 850 उद्योगांवर त्याचा गंभीर परिणाम होणार आहे. या घाटाच्या दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. हायवे ॲथॉरिटीकडून असे सांगण्यात येते की, त्यांनी आतापर्यन्त दुरुस्तीसाठी 1 कोटी रुपयांचा निधी दिलेला असून या निधीच्या खर्चाचा तपशिल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्यांना मिळाला नसल्यामुळे उर्वरित 1 कोटी 50 लक्ष रुपयांच्या निधीचे वितरण त्यांच्याकडून होऊ शकत नाही. हायवे ॲथॉरिटीकडून शासनाला निधी मिळणार आहे, काम पूर्ण झाले तर तेथील उद्योजकांचा आणि इतरही प्रवाश्यांचा वाहतूकीचा ब-याच वर्षापासून प्रलंबित असणारा प्रश्न मार्गी लागणार आहे, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने झालेल्या खर्चाचा तपशिल विनाविलंब हायवे ॲथॉरिटीला सादर करुन उर्वरित निधी प्राप्त करुन घ्यावा व दुरुस्तीचे काम जलद गतीने पूर्ण करावे, अशी माझी या निमित्ताने आग्रहाची मागणी आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MHM/

श्री.अरविंद सावंत.....

सभापती महोदय, मुंबईमध्ये प्रियदर्शनीजवळील पूल, पवई, जोगेश्वरी येथील पूल अद्याप इ ालेले नाहीत. येथील पूल होणे अत्यंत गरजेचे असून यासंदर्भातही शासनाने लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, उर्जा विभागाच्या बाब क्रमांक 129 पान क्रमांक 106 या मागणी अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित या कंपनीस सहाय्यक अनुदान देण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे विभाजन करण्यात येऊन शासनाने होल्डिंग कंपनीसह 4 कंपन्या निर्माण केल्या. यापैकी एक असलेल्या विद्युत वितरण कंपनीकडून धाडी टाकण्यात येत आहेत. संगमनेरमधील नानज धुमाळा येथील वीज चोरीबाबत तेथील दक्ष ग्राहकांनी व्हिडिओ चित्रिकरण करुन ही सी.डी. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री.भाटिया यांना पाठविली आहे. यानंतर श्री.भाटिया यांनी या ठिकाणी धाड घालण्याच्या सूचना संबंधित अधिका-यांना दिल्या आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MHM/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर 11:40

श्री.अरविंद सावंत .....

सभापती महोदय, यासंदर्भातील धक्कादायक माहिती माझ्याकडे आहे. वीज चोरी पकडण्यासाठी अधिकारी तेथे गेल्यानंतर त्या अधिका-याला कळले की, ही निर्मिती कन्स्ट्रक्शन कंपनी माननीय कृषीमंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांचे सख्खे चुलत भाऊ श्री.इंद्रजित पंडितराव थोरात यांची आहे. आकडा टाकून, स्वत:चा खाजगी ट्रान्सफार्मर बसवून वीज चोरी चालू होती. श्री.इंद्रजित पंडितराव थोरात हे माननीय कृषीमंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांचे सख्खे चुलत भाऊ आहेत असे त्या अधिका-याला कळले. धक्कादायक बाब अशी आहे की, कारवाई करण्याऐवजी तो अधिकारी तेथून पळून गेला. हे प्रकरण घडल्यानंतर संगमनेरपासून नगरपर्यंतचे सर्व अधिकारी वैद्यकीय कारणाने रजेवर गेले व एकाच वेळेस सर्व अधिकारी आजारी पडले. राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या लोकांनी एम.एस.ई.बी. कार्यालयावर मोर्चा काढला. वीज चोरी पकडण्याचे फक्त नाटक केले गेले. यासंदर्भात एम.एस.ई.बी.च्या अधिका-याने तहसिलदारांना पत्र दिलेले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी असे लिहिलेले आहे की, संगमनेर तालुक्यातील नानज दुमाला शिवारात श्री.इंद्रजित पंडितराव थोरात यांच्या स्टोन क्रेशरला अनधिकृत विद्युत पुरवठा घेतल्याचे उघडकीस आल्याने कंपनीतर्फे विद्युत कायदा, 2003 कलम 135 व 126 नुसार कारवाई करण्यात आली आहे व पोलीस कारवाईची सूचना संबंधितांना देण्यात आली आहे. कायद्यातील तरतुदीनुसार सदर इसमाने दंडात्मक निर्धारीत देयक भरण्याची तयारी दर्शविल्यामुळे पोलीस कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवला नाही. सदर इसमाने दंड तडजोड आकार व निर्धारीत बिलाची रक्कम रुपये 7,65,849/- दिनांक 01.07.2006 रोजी भरणा केलेला आहे.

तालिका सभापती : हा विषय गंभीर आहे. शासनाने याची नोंद घ्यावी.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हे प्रकरण गंभीर आहे. 22 लाखाची वीज चोरी झाली आणि दंड तडजोड आकार व निर्धारीत बिलाची रक्कम फक्त 7,65,849/- भरण्यात आली. वीज कनेक्शनचा रितसर अर्ज नाही. स्वत:चा ट्रान्सफार्मर बसविलेला आहे. ते मंत्री महोदयांचे भाऊ आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही. हे वीज कनेक्शन किती वर्षा पासून सुरु होते ? शासनाला किती रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागला ? या वीज चोरीसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केले

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

आणि माननीय मंत्री महोदयांचा राजीनामा मागितला, कारण त्यांच्या पाठिंब्यामुळे वीज चोरी होत होती अशी माहिती आहे. वीज चोरीच्या बाबतीत राजकीय व्यक्तीचा संबंध आहे म्हणून आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? आपण त्यांना राजीनामा देण्यास सांगणार आहात की नाही ? हा माझा प्रश्न आहे.

बाब क्र.108, ग्रामविकास विभाग. यामध्ये रस्त्यांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पुणे जिल्हयातील वेल्ले तालुक्यातील 24 गावांचा पावसाळा आला की, मागच्या 50 वर्षापासून संपूर्ण जगाशी संबंध तुटतो. राजगढ नदीवर पूल बांधण्याची आवश्यकता आहे. राजगडाच्या पायथ्या जवळ असलेली ही गावे आहेत. हा पूल तातडीने करावा आणि या 24 गावांना सहकार्य करावे, मदत करावी अशी मी अपेक्षा करतो.

बाब क्र.142- कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो. परंतु कोकणामध्ये बंधारे बांधले जात नाहीत. कोकणामध्ये बंधारे बांधण्याची आवश्यकता आहे.

बाब क्र.149- जेट्रोफाच्या रोपासंदर्भात शासनाने जी.आर. काढलेला. परंतु नारळ, जेट्रोफाची रोपे मिळत नाहीत. ती मिळण्याबाबत शासनाने पाऊल उचलावे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, पूरक मागणी क्रमांक इ-2, 2202, सर्वसाधारण शिक्षण या शीर्षाखालील बाब क्र.57, पृ.40 - मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा, नवीन अशासकीय माध्यमिक शाळा सुरू करणे, अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये जादा तुकड्या सुरू करणे इत्यादीसाठी सहाय्यक अनुदान देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, राज्यातील विशेषत: जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था ही अत्यंत वाईट आहे. या ठिकाणी शिक्षणाच्या प्रस्तावावर बोलताना मी माननीय शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास काही बाबी आणल्या होत्या. आताही या पूरक मागणीच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यासंबंधात सांगू इच्छितो की, तेथील प्राथमिक शिक्षकांसाठी संख्या ही 7845 इतकी आहे. परंतु अने शाळांमध्ये दोन शिक्षकांची पदे मंजूर असतानाही तेथे शिक्षकांची नेमणूकच करण्यात आलेली नाही. त्यामुळे तेथील अनेक शिक्षकांची पदे रिक्त आहेत परिणामी चार-चार वर्गांसाठी एकच शिक्षक दिलेला आहे. जेथे 7 वर्ग आहेत तेथे दोन शिक्षक आहेत तर काही ठिकाणी एकच शिक्षक आहे अशी अवस्था तेथे आहे. त्यामुळे तेथे आजही एक शिक्षकी पद्धत चालू आहे असे दिसून येते. तेव्हा या निमित्ताने माझा माननीय शिक्षणमंत्र्यांना सवाल आहे की, आपण एकविसाव्या शतकामध्ये वाटचाल करीत आहोत. अशा परिस्थितीमध्ये नांदेडमध्ये आजही एक शिक्षकी शाळा सुरू आहेत. एकाच वर्गामध्ये 4थी ते 7वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बसविले जाते आणि शिक्षण दिले जाते. एकच खोली आहे आणि त्यात 4थी ते 7 वी पर्यंतची मुले बसविली जातात. खरे तर प्रत्येक विषयाला विषय निहाय शिक्षक दिला पाहिजे. परंतु एकच शिक्षक सर्व विषय शिकवितो अशी अवस्था तेथे आहे. नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यामधील वाहाद शाळेत गेल्या पाच वर्षांपासून सतत मागणी करूनही शिक्षक न दिल्यामुळे शेवटी परवा दिनांक 30 जून रोजी तेथील शिवसेनेच्या एका जिल्हा परिषद सदस्याने शाळेतील 39 मुलांना घेऊन शिक्षणाधिकाऱ्याच्या कार्यालयामध्येच शाळा भरविली. सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यात देखील तीच स्थिती आहे. तेथील संगमेश्वर तालुक्यातील मराठवाडी शाळेसाठी पंचायत समितीमार्फत 1.30 लाखाचा निधी मंजूर झाला होता परंतु तो निधी शाळेला मिळालाच नाही. त्यामुळे आजही तेथे देवळामध्ये बसून तेथील मुले शिक्षण घेत आहेत, अभ्यास करीत आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील बोथबोडन येथील शाळा पाहिली तर या शाळेमध्ये मुलांपेक्षा शेळ्या-मेंढ्याच जास्त येतात आणि शाळेत व शाळेच्या आवारात घाण करून टाकतात. त्यांच्या मलमूत्राच्या

..... पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

दुर्गंधीमुळे मुले तेथे बसू शकत नाहीत. सभापती महोदय, जालना जिल्ह्यामध्ये रेंगे गावची अशीच एक शाळा आहे. संपूर्ण शाळेच्या आवारात कचऱ्याचे साम्राज्य आहे तसेच शाळेला छप्पर नाही, तेथील फळा देखील तुटलेला आहे. तसेच रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषदेची दुसरी एक शाळा आहे की तेथे वर्गखोलीच्या चार कोपऱ्यामध्ये गड्डा करून मुले बसतात. कारण मध्यभागी वरून पावसाच्या पाण्याची सतत धार लागलेली असते. सभापती महोदय, माननीय मंत्री जेव्हा ही मागणी येथे मागतात तेव्हा असे वाटते की, दुर्गम भागातील किंवा एक शिक्षकी शाळा आहेत तेथे वर्ग तितक्या खोल्या आणि वर्ग तितके शिक्षक देण्याचा प्रयत्न आपण करणार काय ? याचे उत्तर आपण या चर्चेच्या माध्यमातून द्यावे.

सभापती महोदय, पृष्ठ 106 वरील पूरक मागणी क्र. के-6, 2801, वीज या शीर्षाखाली ग्रामीण विद्युतीकरणाच्या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित यांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी बाब क्र.129 द्वारा 9.49 कोटी रूपयांची मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, हे विद्युतीकरण करताना केबल्स व ट्रान्सफॉर्मरची गरज असते. त्यासाठी वीज वितरण कंपनी त्यांच्या भांडार विभागाकडून केबल्स पुरवठ्याचे आदेश काढते. यापूर्वी 2004 ते 2006 या कालावधीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास पुरवठा करण्यात आलेल्या केबल्सपैकी 10 कोटी रूपयांच्या केबल्स ठरवून दिलेल्या निकषानुसार नव्हत्या आणि त्याचा पुरवठा करणाऱ्या कंपन्या पुढीलप्रमाणे होत्या. .. 1) मे. डेको इंडस्ट्रीज, दिल्ली., 2) मे. के.के.पॉवर व केबल्स, पुणे., 3) मे. कृष्णा इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज, ग्वाल्हेर., 4) मे. महालक्ष्मी केबल इंडस्ट्रीज, नवी दिल्ली., 5) मे. फोनिक्स इंडस्ट्रीज, उल्हासनगर, महाराष्ट्र., 6) मे. सनलाईट केबल्स, सिल्वासा., 7) मे. सरस्वती वायर व केबल्स, पालघर, महाराष्ट्र., 8) मे. युनिसेफ केबल्स, गाजियाबाद., 9) मे. वर्धमान केबल्स, बेळगाव (सीनोली,कोल्हापूर) महाराष्ट्र., 10) मे. विजया केबल्स, दिल्ली., 11) मे. विमल इलेक्ट्रिकल्स, दिल्ली. सभापती महोदय, या सगळ्या कंपन्यांनी सदोष केबल्सचा पुरवठा केलेला आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... क्यू 1 ...

अशुद्धीत प्रत / मुद्रितशोधनाची नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, राज्यामधील फक्त तीन-चार कंपन्या आहेत, बाकीच्या परराज्यातील कंपन्या आहेत. या कंपन्यांनी सदोष केबलचा पुरवठा केल्यानंतर त्यांना केबलच्या किंमतीच्या फक्त दहा टक्के दंड केला आहे. कोटयावधी रुपयांच्या सदोष केबलचा पुरवठा केल्याचे आढळल्यानंतर त्याची चौकशी सुरु करण्यात आली, त्या चौकशीचे पुढे काय झाले? फक्त दहा टक्के इतक्या रकमेचा दंड आकारला असला तरी ती कारवाई अजून पूर्ण झालेली नाही. या केबल कंपनीने वीज मंडळाला प्रत्यक्षात किती कोटी रुपयांचा केबल पुरवठा केला हे आपण याठिक्राणी स्पष्ट करावे. हे एकदा स्पष्ट झाल्यानंतर त्यामधील भ्रष्टाचाराची व्याप्ती किती आहे हे स्पष्ट होईल. आश्चर्याची गोष्ट अशी की, या सर्व पुरवठादारापैकी एकाही पुरवठादाराविरुध्द अंतिम स्वरुपामध्ये कारवाई करण्यात आलेली नाही. काही पुरवठादारांना उपयोगात न आलेले केबल्स बदलून घेणे यासाठी फक्त 5 टक्के दंड आकारण्याची कारवाई केली आहे. खरे तर या पुरवठादाराने भ्रष्टाचार केला आहे, त्यांनी या महाराष्ट्राला आणि वीज मंडळाला फसविले आहे, सरकारला फसविले आहे. त्याबद्दल या पुरवठादाराला आपण जेलमध्ये टाकावयास हवे होते. परंतु थातूर मातूर दंड वसूल करुन त्यांना सोडून देण्यात आले. सभापती महोदय, केबलच्या तपासणीसाठी 17 कार्यकारी अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली. खरे म्हणजे एवढया मोठया प्रमाणावर अधिकारी नेमण्याची गरज नव्हती. या 17 अधिकाऱ्यांनी योग्यप्रकारे चौकशी केली नाही, त्यांनी पुरवठादाराला सहकार्य केले याबद्दल या 17 कार्यकारी अभियंत्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु आहे. परंतु वीजमंडळाला सदोष केबलचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादारापासून अधिकाऱ्यांपर्यंत कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. वीज केबल प्रमाणेच ट्रान्सफॉर्मर्स खरेदीमध्ये देखील प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. ट्रान्सफॉर्मर्स पुरविणाऱ्या ज्या पुरवठादाराकडून दंड वसूल करण्यात आला आहे, त्यामध्ये प्रामुख्याने मे.भोपाळ वायर्स प्रा. लि. भोपाळ यांचेकडून 11 लाख 8 हजार 704, रामकृष्ण इलेक्ट्रिक प्रा. लि. नागपूर, यांचेकडून 21 लाख 76 हजार 324, मे. विजयालक्ष्मी इलेक्ट्रिकल्स यांचेकडून 8 लाख 72 हजार 789, मे. स्टारडेल्टा ट्रान्सफॉर्मर्स लि. भोपाळ यांचेकडून 21 लाख 64 हजार 468 आणि मे. राजस्थान ट्रान्सफॉर्मर्स अँड स्विचगिअर्स जयपूर यांचेकडून 22 लाख 18 हजार 369 इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. याशिवाय मे. फेअरडिलर इलेक्ट्रिकल्स अँड इंजिनिअरींग, मे. ॲक्युरेट ट्रान्सफॉर्मर्स व रिमा ट्रान्सफॉर्मर्स या कंपन्यांचीही चौकशी सुरु आहे. ही चौकशी किती दिवस चालणार आहे? अशाप्रकारचा प्रश्न मागील अधिवेशनामध्ये विचारण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आला होता. त्यावेळी उत्तर देतांना यासंबधी चौकशी सुरु असून त्यानंतर कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात आले. ही कारवाई किती दिवस चालणार आहे? वर नमूद केल्याप्रमाणे केबलचा पुरवठा एकूण 90 भागामध्ये टप्प्याटप्प्याने करण्यात आला. त्यामुळे या प्रत्येक टप्प्यावर कागदपत्रांची तपासणी करणे व संबंधित अधिकाऱ्यांचे जाब जबाब घेणे इत्यादी कामांना काही प्रमाणात विलंब होत असल्यामुळे प्रतिबंधात्मक कारवाई करणे अद्यापि शक्य झाले नाही, मात्र लवकरच वितरण कंपनीतर्फे कारवाई पूर्ण करण्यात येत आहे असे मार्च महिन्यातील अधिवेशनामध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देण्यात आले होते. सभापती महोदय, याठिकाणी ग्रामीण विद्युतीकरणाच्या कामासाठी 9 कोटी रुपयांची मागणी करण्यात येत आहे. परंतु या खरेदीस जबाबदार असणाऱ्या वीज मंडळातील 2 मुख्य अभियंते, 2 कार्यकारी अभियंते, 1 अधिक्षक अभियंता व 4 कार्यकारी अभियंता यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यापलिकडे दुसरी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासनाचा कोटयावधी रुपयांचा पैसा बोगस केबल आणि बोगस ट्रान्सफॉर्मर्स खरेदी करण्यासाठी वापरला गेला. अशाप्रकारे ही खरेदी करुन या शासनाची दिशाभूल केली, भ्रष्टाचार केला आणि त्यामधून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान केले आहे. बोगस ट्रान्सफॉर्मर्स बसविल्यामुळे हे ट्रान्सफॉर्मर्स ताबडतोब जळतात. एकदा ट्रान्सफॉर्मर जळल्यानंतर दोन ते तीन महिने त्या शेतकऱ्याला ट्रान्सफॉर्मर दिला जात नाही. त्यामुळे शेतकऱ्याचे विजेचे कनेक्शन बंद राहते. परिणामी शेतकऱ्याचे पिक जळून जाते. म्हणून माझी अशी मागणी आहे की, यासंबंधी सन्माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा. महाराष्ट्र राज्यामध्ये किती कोटी रुपयांचे केबल खरेदी करण्यात आले होते? त्यामधील भ्रष्टाचार उघडकीस आल्यानंतर किती केबल परत करण्यात आले?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

किती अधिकाऱ्यांची चौकशी केली ? याबाबतचा खुलासा करावा अशी माझी मागणी आहे.

त्यानंतर मागणी क्रमांक 2216, बाब क्रमांक 175, पृष्ठ क्रमांक 139. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाकरिता निधीची तरतूद केलेली आहे. मुंबईचे शांघाय करावे अशाप्रकारची घोषणा दोन-तीन वर्षापासून या सभागृहामध्ये सतत ऐकत आहे. शांघाय करण्यासाठी येथील झोपडपट्टयांचे पुनर्वसन झाले पाहिजे. झोपडपट्टीतील माणसे चांगल्या घरामध्ये गेली पाहिजेत, अशा चांगल्या उद्देशाने योजना कार्यान्वित करण्यात आली. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, त्यासाठी 36 कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. मौजे माजीवडा गांधीनगर पोखरण रोड नं.1 येथील ठाणे महानगरपालिका हद्दीतील सि.स.नं.507 या जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत 5 सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्थापना व नोंदणी झालेली आहे. त्यामध्ये (1) श्री.भैरवनाथ को-ऑप.हौसिंग सोसायटी लि., (2) जय भैरवनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., (3) जय भौरवनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., (4) चांगभले भैरवनाथ् को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., (5) जयभवानी को-ऑप. हौसिंग सोसायटी लि. वरील प्रमाणे 1 ते 4 या संस्थांना मुख्य प्रवर्तक म्हणून श्री.प्रेमचंद जगन्नाथ लोखंडे, मेसर्स गॅमन लि. (मेसर्स श्री.रीमा कन्स्ट्रक्शन कंपनी मार्फत संचाकल) गेमन हाऊस लि. प्रभादेवी, मुंबई-400 025 हे होते. अनुक्रमांक 1 ते 4 या संस्थांची नोंदणी होण्यापूर्वी श्री.प्रेमचंद जगन्नाथ लोखंडे या मुख्य प्रवर्तकानी मेसर्स गॅमन निर्माण लि. आणि त्यांचे भागीदार श्री.रीमा कन्स्ट्रक्शन कंपनी या विकासकाशी दिनांक 21 फेब्रुवारी 2005 रोजी विकास करार करण्यात आला होता. श्री.प्रेमचंद जगन्नाथ लोखंडे हे ज्या 4 संस्थांचे मुख्य प्रवर्तक असून ते मेसर्स श्री. रीमा कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे संचालक असून विकासक देखील आहेत. वास्तविक पहाता, मुख्य प्रवर्तक असणारी व्यक्ती ही झोपडपट्टीत रहाणारी असणे आवश्यक आहे आणि झोपडपट्टीत रहात असल्याचा पुरावा म्हणजे त्या व्यक्तीकडे अधिकृत फोटोपास असणे आवश्यक आहे. परंतु श्री.प्रेमचंद जगन्नाथ लोखंडे हे झोपडपट्टीत रहात नसून ते अधिकृत फोटोपासधारकही नाहीत. संस्थांची नोंदणी होण्यापूर्वीच प्रवर्तकांनी विकासकाशी करार करणे तसेच प्रवर्तक हा अधिकृत फोटोपासधारक नसल्याने सदर संस्थांची नोंदणी रद्द करण्याची आवश्यकता आहे. तसेच या सर्व गैरप्रकाराची उच्च स्तरीय चौकशी होण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहराचे शांघायमध्ये रुपांतर करण्यासाठी या महानगरातील गलिच्छ झोपडपट्टटया मोठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु....

अडचण दूर करण्यासाठी तसेच झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांना तिन्ही ऋतुमध्ये राहू शकतील असा निवारा मिळावा, या चांगल्या हेतूने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची सुरुवात करण्यात आली. या योजनेद्वारा दारिद्र्यात खितपत पडलेल्या लोकांचे जीवनमान उंचावले जावे ही सार्थ व रास्त अपेक्षा होती. परंतु झोपडपट्टयामध्ये रहाणाऱ्या लोकांना दमदाटी करुन त्यांना सह्या करायला भाग पाडले. यामध्ये धनदांडगे बिल्डर्स घुसलेले आहेत. झोपडपट्टीतील लोकांचे पुनर्वसन करण्यापेक्षा स्वत:चा स्वार्थ साधण्यामध्ये त्यांना अधिक स्वारस्य आहे. अतिशय चांगल्या हेतुने सुरु केलेल्या योजनेमध्ये आज बिल्डर आणि त्यांचे रॅकेट शिरले असेल तर त्याबाबतची चौकशी करणार आहात काय ? अशा प्रकारची मागणी या निमित्ताने करतो.

यानंतर श्री.बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 76, पृष्ठ क्रमांक 63 बाबत मी बोलणार आहे. यामध्ये केंद्रीय मार्ग निधीतून तरतूद करुन रस्ते व पुलांची बांधकामे कार्यान्वित करणे यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. विदर्भातील अकोला शहराच्या बाहेरुन जाणारा रस्त्याचे चौपदरीकरण केले गेले. त्या रस्त्याचे काम एका कंत्राटदाराला देण्यात आले. त्या ठिकाणी टोलनाका बसवून देण्यात आला. अजूनही त्या रस्त्याचे दोन ते अडीच कोटी रुपयांचे काम बाकी आहे. त्या रस्त्यावरुन आम्ही दर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी जातो. त्या रस्त्याचे दोन ते अडीच कोटी रुपयांचे काम बाकी असताना त्या कंत्राटदाराने टोल सुरु केलेला आहे. त्यांना यासाठी परवानगी कशी दिली ? रोज 40 ते 50 लाख रुपयांचे उत्पन्न तो कंत्राटदार त्या ठिकाणी घेतो. रस्त्याचे अडीच कोटी रुपयांचे काम अजून व्हावयाचे बाकी असताना अशा तो टोल सुरु करतो आणि लोकांच्या खिशातून पैसे काढतो. या गोष्टीकडे खात्याचे लक्ष जात नाही. याची शासनाने चौकशी करावी आणि ते काम पूर्ण होईपर्यंत तो टोल सुरु होणार नाही तसेच तो टोल ताबडतोबीने बंद करण्याची घोषणा करावी अशी या निमित्ताने मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 40 वर मी बोलणार आहे. यामध्ये मान्यताप्रापत खाजगी प्राथमिक शाळा, नवीन अशासकीय माध्यमिक शाळा सुरु करणे, अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये जादा तुकड्या सुरु करणे यासाठी 100 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. मला या निमित्ताने मुंबईतील शाळांकडे लक्ष वेधावयाचे आहे. ही तरतूद जरुर स्वागतार्ह आहे परंतु अनुदानित शाळेमध्ये नवीन तुकड्या देत असताना कायम विनाअनुदानित म्हणून दिल्या जातात. त्यामध्ये एकाच शाळेमध्ये अनुदानप्राप्त शिक्षक आणि अनुदानाशिवाय असलेले शिक्षक अशी विसंगती तयार होत आहे. दक्षिण मुंबईमध्ये ज्या शाळा बंद झाल्या किंवा ज्या तुकड्या बंद करण्यात आल्या त्या तुकड्या राज्यामध्ये अन्यत्र नेण्यात आल्या. मुंबईमध्ये वाढीव तुकड्यांसाठी किंवा वाढीव शाळेला मान्यता दिली हात नाही. दक्षिण मुंबईतील सर्व तुकड्या उपनगरांमध्ये दिल्या पाहिजेत. कारण त्या ठिकाणी वस्ती वाढलेली आहे. ही वस्ती महाराष्ट्रातूनच स्थलांतरित झालेली आहे. झोपडपट्टयांमध्ये शाळा वाढलेल्या आहेत. त्या ठिकाणी वर्ग वाढलेले आहेत. त्यांना अनुदान मिळाले पाहिजे. त्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. दुसऱ्या एका मुद्याकडे मला माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधावयाचे आहे. गेल्यावर्षी अतिवृष्टीच्या काळात नुकसान झाल्यानंतर माननीय शिक्षण मंत्र्यांनी घोषणा केली की, शाळांना नुकसानभरपाई दिली जाईल. त्यांना वेतनेतर अनुदान देखील प्राप्त झालेले नाही. ते अनुदान जरी मिळाले असते तरी शाळा पूर्वपदावर येऊ शकल्या असत्या. अनेक शाळांच्या इमारतींची पडझड झालेली आहे. लॅब खराब झालेल्या आहेत. संगणक लॅब खराब झालेल्या आहेत. त्यांना ताबडतोब पैसे देण्याची आवश्यकता आहे. त्यांना वेतनेतर अनुदान जरी मिळाले असते तरी त्यांचे पुनर्वसन होऊ शकले असते. दुसरी बाब अशी की, ज्या ठिकाणी पाणी साचत होते त्यांना कोणतीही मदत मिळालेली नाही. त्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. मिठी नदीच्या पुराच्या वेळी नदीच्या तिरावरील चार पाच शाळा धोकारेषेमध्ये होत्या. त्या शाळा पूर्णपणे पडलेल्या होत्या. मिठी नदीच्या परिसरातील पुनर्वसनाचे काम शासनाने हाती घेतलेले आहे परंतु शिक्षण विभागाने आपल्या शाळांचे पुनर्वसन त्यातून केलेले नाही. या सर्व शाळांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन झाले पाहिजे. तरच त्या शाळा चालू शकतील. अन्यथा ज्यावेळी पूर येईल त्यावेळी त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

शाळांमध्ये जीवित हानी होण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी परभणीच्या उर्दू शाळेच्या संदर्भात सांगितले. मुंबईमध्ये अनेक उर्दू शाळा वाढलेल्या आहेत त्यांना अनुदान मिळालेले नाही. तुकड्यांना अनुदान मिळालेले नाही. ॲटॉप हिल सारख्या रात्रशाळेत मुलामुलींना बसण्यासाठी जागा नसते. तेथील रात्रशाळेतील मुलगी पहिली आली. त्या शाळेमध्ये सुध्दा वाढीव तुकड्यांना अनुदान किंवा मंजुरी मिळालेली नाही. त्यासाठी तातडीने तरतूद झाली पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील....)

त्या ठिकाणी गरीब वर्गातील मुले शिक्षण घेतात. त्याकडे माननीय शिक्षण मंत्र्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी ग्रामीण भागातील एकशिक्षकी शाळांचा उल्लेख केला. मंबईत देखील एकशिक्षकी शाळांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. सात-सात वर्गासाठी केवळ दोन-दोन शिक्षक आहेत. मुंबई महानगरपालिका ही केरळ राज्यापेक्षाही श्रीमंत आहे. याबाबतीत जरी संबंध नसला तरी देखील माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी याबाबीकडे लक्ष द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. या सदनामध्ये अशी माहिती देण्यात आली की, मुंबईतील 40 हजार मुले निरक्षर आहेत. 4थीच्या मुलांना स्वत:चे नाव लिहिता येत नाही. मुख्य म्हणजे शाळेमध्ये शिकवण्यासाठी शिक्षकांची पुरेशी संख्या नसल्यामुळे मुलांचा शैक्षणिक दर्जा खालावलेला दिसतो. मुंबईतील शाळांची ही अवस्था असेल तर इतर भागामधील शाळांची अवस्था काय असेल याची कल्पनाच करवत नाही. तेव्हा याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पृ.क्र.41, बाब क्रमांक 59 - राष्ट्रीय छात्रसेनेच्या आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये छात्राला मृत्यू किंवा विकलांगता आल्याच्या प्रसंगी राष्ट्रीय छात्र सेना कल्याण संस्थेला वित्तीय सहाय्य देण्यासाठी 1हजार रु.ची लाक्षणिक मागणी करण्यात आलेली आहे. शिक्षणाच्या बाबतीत मुंबईची स्थिती ही राज्यापेक्षा काही वेगळी नाही. मुंबईतील अनेक शाळांमधून शारीरिक शिक्षक नाहीत. 250 विद्यार्थ्यांसाठी एक शारीरिक शिक्षक असला पाहिजे. पण मुंबइतील शाळांमधून दीड हजार विद्यार्थ्यांसाठी एक देखील शारीरिक शिक्षक नसतो. गेल्या दोन वर्षामध्ये शिक्षणसेवकांना शारीरिक शिक्षक म्हणून नेमण्यात आले होते. परंतु मधल्या काळामध्ये त्यांना अतिरिक्त ठरविल्यामुळे त्यांना घरी जावे लागले. ज्या शाळामध्ये शारीरिक शिक्षक नसतो त्या शाळेमध्ये तो शिक्षक अतिरिक्त ठरता कामा नये. म्हणून ज्या शाळेमध्ये शारीरिक शिक्षक नाही त्या शाळेमध्ये शारीरिक शिक्षकाची त्वरित नेमणूक करावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

गृहनिर्माण विभाग, पृ.क्र.139, बाब क्रमांक 175. - ही बाब गृहनिर्माण विभागाशी संबंधीत असली तरी शालेय शिक्षण विभागाशी तिचा संबंध येत असल्यामुळे मी तिचा उल्लेख करीत आहे. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाकरिता 36 कोटी रु.ची पूरक मागणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

करण्यात आलेली आहे. एसआरअे योजनेअंतर्गत झोपडपट्टीवासीयांना घरे देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते. परंतु हे पुनर्वसन करीत असताना त्या झोपडपट्टीमध्ये असलेल्या शाळेला मात्र पर्यायी शाळा बांधून दिली जात नाही. त्यामुळे त्या शाळेतील मुलांना अन्य शाळेमध्ये जावे लागते. अशा प्रकारे मुंबईतील एसआरअे योजनेअंतर्गत येणा-या 100 शाळांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. या एसआरअे योजनेअंतर्गत शाळेला शाळा मिळाली पाहिजे. त्यासाठी तरतूद होणे आवश्यक आहे. झोपडपट्टीमध्ये असलेल्या शाळांची अवस्था अत्यंत वाईट असते. त्या शाळांना एसआरअे योजनेअंतर्गत नवीन शाळा दिली तर मुलांना चांगल्या पर्यावरणामध्ये शिक्षण घेता येईल. श्री. मनोहर जोशी हे राज्याचे मुख्यमंत्री असताना केवळ शाळेच्या बाबतीत 4 एफएसआय दिलेला होता. परंतु झोपडपट्टीतील शाळांच्या बाबतीत हा एफएसआय मिळत नाही. झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत विकासकाला शाळेच्या बाबतीत जादा एफएसआय दिला तर एक नया पैसाही खर्च न करता या शाळांचे चांगल्या पध्दतीने पुनर्वसन होईल. याबाबतीत माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी आणि माननीय गृहनिर्माण मंत्र्यांनी एकत्रितपणे लक्ष घालावे अशी मी या निमित्ताने त्यांना विनंती करतो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्रमांक-85, पृष्ठ क्रमांक-69 अन्वये जळगावमधील बोधवड तहसीलसाठी, उस्मानाबाद जिल्हयातील लोहारा, नांदेड जिल्हयातील नायगाव तहसीलसाठी 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचवेळेला कोकणातील दोडामार्ग हा नवीन तालुका त्याचसुमारास निर्माण झाला, या तालुक्याच्या तहसील कार्यालयासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार मान्यता देण्यात येईल असे लेखी उत्तर शासनाने दिनांक 1 जुलै, 2006 रोजी दिले होते. माझी या संदर्भात शासनाला विनंती आहे की, पुरवणी मागण्यांमध्ये किमान 20 लाख रुपये दोडामार्ग तालुक्यासाठी तरतूद करणे अतिशय आवश्यक आहे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये कालच्या पुरवणी मागण्या आज घ्यायचे ठरले त्यानुसार कालच्या आणि आजच्या पुरवणी मागण्यांवर एकत्रित चर्चा होत आहे. केवळ दोन तासाच्या अवधीमध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा व उत्तराचे भाषण पूर्ण होणे शक्य दिसत नाही. त्यामुळे उत्तराचे भाषण दुपारी किंवा उद्या सकाळी घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी आपले भाषण सुरु करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक-61 संबंधी मी माझे विचार मांडू इच्छिते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. देशातील 33 टक्के आयकर, 60 टक्के कस्टम ड्युटी, 20 टक्के एक्साईज ड्युटी एकट्या मुंबई शहरामधून केंद्र सरकारकडे जमा होते. परंतु त्या प्रमाणात केंद्र सरकारकडून मुंबईच्या विकासासाठी तेवढी मदत दिली जात नाही. सध्या मुंबईकडे काही प्रमाणात लक्ष दिले जात आहे, परंतु ते पुरेसे नाही असे मला नमूद करावेसे वाटते. सभापती महोदय, मुंबई शहर हे जागतिकदृष्ट्या महत्वाचे शहर आहे. हे शहर चांगले असावे, स्वच्छ असावे, सुंदर असावे, आरोग्याला पोषक असे वातावरण या शहरामध्ये असावे अशा प्रकारची या शहरातील नागरिकांची इच्छा आहे. प्रत्येकाच्या हाताला काम मिळावे असेही वाटते. ते सुरक्षित असावे असेही त्यांचे म्हणणे आहे. परंतु परवा जे बॉम्बस्फोट झाले त्यानंतर हे शहर किती असुरक्षित आहे हे दाखवून दिले आहे. याची पुन्हा आपल्याला प्रचिती आली आहे. मुंबईकर हे धैर्यशील आहेत, सहिष्णू आहेत, अतिशय सहनशील आहेत. मुंबईकर एकमेकांना मदत करीत असतात असे फक्त म्हणून चालणार नाही. त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याची आणि त्यासाठी ठोस पावले उलचण्याची अतिशय आवश्यकता आहे. मुंबईकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये असे या निमित्ताने मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, या मुंबई शहराला अनेक प्रश्नांनी ग्रासले आहे. या शहरामध्ये जुन्या इमारतींचा प्रश्न आहे. गृहनिर्माणाचा, गलिच्छ वस्त्यांचा, झोपडपट्टींचा प्रश्न आहे. शहरातील ड्रेनेजचा, आरोग्याचा प्रश्न आहे. शहरातील रस्ते अतिशय नादुरुस्त झालेले आहेत. वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. प्रदूषण आणि प्रचंड प्रमाणात वाढणारी बेकारी व गुन्हेगारी यांनी सुध्दा मुंबई शहराला ग्रासले आहे. म्हणूनच या शहराकडे अतिशय मनापासून लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे. या शहराचे जे मोठे प्रश्न आहेत त्याकडे प्राधान्याने लक्ष पुरवून विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 57 अन्वये शालेय शिक्षण विभागाने राज्यामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु केलेले आहेत. असे असताना व्यवसाय शिक्षणाला प्राधान्य देण्याचे धोरण अद्याप कागदावरच आहे असे मला म्हणावेसे वाटते.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

सभापती महोदय, लहानपणापसून विद्यार्थ्यांना छोटया मोठया कलात्मक वस्तू बनविण्यास वाव दिला तर त्याचा पुढील आयुष्यात चांगला उपयोग होतो. त्यामुळे छोटया मुलांना व्यावसायिक शिक्षण लहानपणापासून देण्याची गरज आहे. तसेच प्राथमिक आणि माध्यमिक शाळेमध्ये हस्तकलेमध्ये प्रशिक्षण घेतलेले अनुभवी असे शिक्षक सक्तीने नेमण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अशा प्रकारची सक्ती करण्याचे आदेश माननीय शिक्षण मंत्र्यांनी शाळांना द्यावेत असे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

आता मी बाब क्रमांक 135, उद्योग विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील अनेक औद्योगिक वसाहतींना पायाभूत सुविधा मिळाल्या नसल्यामुळे अनेक औद्योगिक वसाहतीमध्ये छोटया उद्योजकांनी आपले उद्योग सुरुच केले नाही. त्यामुळे औद्योगिकरणाला बाधा आल्यामुळे प्रगती झालेली नाही. तसेच अनेक ठिकाणी प्लॉटींग बंद पडलेले आहेत. त्यामुळे नव्याने उद्योगांकडे वळणा-या उद्योजमांना उद्योग सुरु करणे कठीण झाले आहे. तरी संपूर्ण राज्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये लाई, पाणी, रस्ते इत्यादी पायाभूत सुविधा तातडीने उपलब्ध करुन द्याव्यात व बंद केलेले प्लॉटिंग धोरण लवकरात लवकर सुरु करुन नवीन उद्योजकांना संधी द्यावी अशी माननीय उद्योग मंत्र्यांना विनंती करते.

आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 74 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. मुंबई-पणे, मुंबई-नाशिक तसेच पुणे-कोल्हापूर या एक्सप्रेस हायवेवर अनेक ठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत . रस्त्यावर खड्डे पडलेले असल्यामुळे वाहनांचे अपघात मोठया प्रमाणात होऊन वाहनांचे नुकसान होत असते. वाहन धारकांकडून लाखो रुपये टोल घेतला जातो परंतु दिवसेंदिवस या रस्त्यांकडे या खात्याचे दुर्लक्ष होत आहे. मुंबईच्या रस्त्यांबद्दल न बोललेले चांगलेच. कारण मुंबईच्या रस्त्यावर सगळीकडे आनंदी आनंद आहे. पुणे-सातारा मार्गावारील बोगद्याच्या कामात म्हणावी तशी प्रगती नाही. त्यामुळे याबाबत सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी लक्ष घालून हे महत्वाचे मार्ग तातडीने दुरुस्त करावेत अशी विनंती करते.

सभापती महोदय, आता मी गहनिर्माण विभागाच्या बाब क्रमांक 175 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. घाटकोपर पश्चिम येथील गंगावाडी मधील झोपडपट्टीत राहणारे अनेक रहिवाश्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

एकत्र येऊन झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत गांगावाडी हौसिंग सोसायटी वैतरा कन्सट्रक्शन यांना डेव्हलपर करण्यासाठी दिली. परंतु एसआरए प्रोजेक्ट अंतर्गत या योजनेतून लाभार्थ्यांना घरे मिळण्यासाठी आज 12 वर्षापेक्षा अधिक कालावधी लागला आहे. आता ही स्कीम अंतीम टप्प्यात असतांना वैतरा कन्सट्रक्शन यांनी ही स्कीम पूर्ण करण्यासाठी म्हाडा बरोबर पॉवर ऑफ ॲटर्नी केलेली आहे. या रेमिडी कन्सट्रक्शन डवेव्हपर्सची पॉवर ऑफ ॲटनी अचानकपणे काढून घेतल्यामुळे त्यांच्याकडून गेल्या एक ते दीड महिन्यापासून काम बंद केले आहे. या गंगावाडी सोसायटीचे म्हाडा (एसआरए) कडे 90 लाख रुपये बाकी आहेत. या कामातील टीडीआर विकून ही रक्कम अद्यापही भरलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांची सेल बिल्डींग मधील "ए" व "सी" वींग मध्ये ज्यांनी प्लॉट घेतले आहेत त्या ठिकाणी गेल्या एक दीड महिन्यापासून काम बंद असल्यामुळे असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

तेव्हा यामध्ये शासनाने लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, ज्या एस.आर.ए.च्या बिल्डींग्ज आहेत त्या सर्व बिल्डींग्जची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. सांताक्रुझ येथील ट्रान्झिट कॅम्पची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सार्वजनिक आरोग्य विभाग-बाब क्रमांक 102 - बेळंकी, तालुका मिरज, जिल्हा सांगली येथे सार्वजनिक आरोग्य विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा दिलेला आहे. परंतु त्याठिकाणी असलेली रुग्णालयाची इमारत अपुरी पडत आहे. रुग्णासाठी वॉर्ड, एक्स-रे मशीन, पॅथॉलॉजी रुमची आवश्यकता आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी व परिचारिका यांच्याकरिता निवासस्थानाची आवश्यकता आहे. तेव्हा या कामासाठी शासनाने भरीव तरतूद केली पाहिजे अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

सांस्कृतिक कार्य विभाग -बाब क्रमांक 168- छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचविणाऱ्या जीवा महाले यांचे स्मारक प्रतापगडावर व्हावे यासाठी या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी वारंवार मागणी केलेली आहे. परंतु शासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा प्रतापगडावर जीवा महाले यांचे स्मारक बांधण्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी विनंती आहे.

पर्यावरण विभाग -बाब क्रमांक 213- सांगली जिल्ह्यात मिरज तालुक्यातील आरग येथे मोहनराव शिंदे सहकार साखर कारखान्याने श्रीरेणुका शुगर्स, बेळगाव, यांना हा साखर कारखाना सहा वर्षासाठी भाडेतत्वावर चालविण्यास दिलेला आहे. श्री रेणुका शुगर्स कारखान्याने कारखाना परिसरातील 30 एकर जमीन डिस्टलरी प्रकल्प उभारण्यासाठी देण्याचे मान्य केले आहे. त्याठिकाणी डिस्टलरी प्रकल्प उभा राहिल्यास आजुबाजूच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होईल तसेच गावांच्या जमिनीचे देखील नुकसान होणार आहे. जवळच्या म्हैशाळ प्रकल्पाचा मुख्य आरग कालवा देखील दूषित होईल. म्हणून या प्रकल्पास विरोध करणरे ठराव 6-7 ग्रामसभांनी केले आहेत. या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आणि जनावरांच्या जीवितास धोका निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

होणार आहे. मोहनराव शिंदे साखर कारखाना आणि श्री रेणुका शुगर्स यांच्यातील भाडेकरार रद्द करण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करावा अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(तालिका सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी)

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागणी क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 40 च्या बाबतीत मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा, नवीन अशासकीय माध्यमिक शाळा, शाळांमध्ये जादा तुकडी सुरु करणे, सैनिकी शाळा व अशासकीय कनिष्ठ महाविद्यालय यासाठी सहाय्यक अनुदान देण्यासाठी 1 कोटी रुपये तरतूद केलेली आहे. परंतु ही तरतूद अत्यंत अपुरी आहे. याचे कारण 1994-95 पासून वेतनेत्तर अनुदान व इतर अनुदान देण्यात आले, त्या अनुदानाची रक्कम हेतुपुस्सरपणे शाळेच्या बँकांच्या खात्यातून परस्पर वळविण्यात आली आणि म्हणून सदरहू अनुदान हे तातडीने संबंधित शाळांना देण्याच्या दृष्टीने तात्काळ निर्देश देण्यात यावेत. यामध्ये ज्या शाळांचे लेखापरिक्षण झालेले आहे आणि ज्या शाळा 25 लाखांच्यावर अनुदान घेतात अशा शाळांचे लेखापरिक्षण महालेखाकार, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून केले जाते व त्या शाळांचे लेखापरिक्षण झालेले असतानाही शिक्षणाधिकारी यांच्याकडून पुन:श्च लेखापरिक्षण करण्याचे आदेश देतात व त्याकारणाने अनुदान रोखले जाते ही बाब अत्यंत गंभीर आहे. याबाबतसुध्दा ठोस उपाययोजना व निर्देश देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 74, पृष्ठ क्रमांक 62 बाबत मी बोलू इच्छितो. बाराव्या वित्त आयोगाने महाराष्ट्रासाठी रस्त्याचे परिक्षण व दुरुस्तीसाठी सन 2005 ते 2010 या कालावधीकरिता एकूण 1189.68 कोटी रुपये एवढया अनुदानाची शिफारस केली आहे. सदर सहाय्यक अनुदान प्रतिवर्षी रुपये 297.42 कोटी याप्रमाणे राज्यास प्राप्त होणार आहे. या निधीमधून राज्यामध्ये कोणकोणत्या जिल्हयांमध्ये कशाप्रकारे वाटप करण्यात येणार आहे व यामध्ये कोणकोणती कामे घेण्यात येणार आहेत याची माहिती देण्यात आलेली नाही, ती देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 176, पृष्ठ क्रमांक 144 वर बोलू इच्छितो. राज्यात दारिद्रय रेषेखाली असलेल्या रुग्णाला जीवनदायी योनजेंतर्गत हृदयविकाराच्या शस्त्रक्रियेकरिता रुपये 70 हजार देण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. परंतु जिल्हास्तरावर जी समिती स्थापन करण्यात आली आहे ती समिती रुग्णाला शस्त्रक्रियेकरिता लागणारा संपूर्ण खर्च कधीच मंजूर करीत नाही. याउलट फक्त 35 ते 45 हजारापर्यंत अनुदान मंजूर करीत असल्याने रुग्णाला उपचाराकरिता फार त्रास होतो. तसेच गरीब व दारिद्रय रेषेखालील रुग्ण हा खाजगी रुग्णालयामध्ये पैशाअभावी उपचार घेऊ शकत नाही. त्यामुळे त्या रुग्णाला शासनाकडून मदत

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होण्याऐवजी त्याची कुचंबणा करीत असल्याचे प्रत्यक्षदर्शी लक्षात येते. यामुळे यासंदर्भात शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने शासकीय रुग्णालयाकडून मिळणाऱ्या अंदाजपत्रकानुसार जी रक्कम दर्शविलेली असेल तेवढी रक्कम पूर्णपणे समितीने मंजूर करावी अशा प्रकारचे आदेश शासनस्तरावर तातडीने काढणे आवश्यक आहे. परंतु हे शासन गोर-गरिबाला मदत करण्याऐवजी खाजगी रुग्णालयामध्ये गरीब रुग्णाला जाण्यास भाग पाडीत आहे व खाजगी डॉक्टर भरमसाठ रक्कम घेऊन गरीब रुग्णाची पिळवणूक करीत आहेत. त्यामुळे याबाबत माझी मागणी आहे की, हृदयविकाराच्या शस्त्रक्रियेकरिता येणारा संपूर्ण खर्च हा जीवनदायी योजनेमध्ये पूर्णपणे मंजूर करावा, अशा प्रकारचे आदेश त्वरीत काढण्यात येऊन त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 27 वर बोलू इच्छितो. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार शासनाने चालू वित्तीय वर्षासाठी आपत्ती निवारण निधीसाठी रुपये 87,07,00,000/- एवढा निधी स2006-2007 मध्ये तरतूद करण्याचे ठरविले आहे. परंतु ही तरतूद अत्यंत अल्प आहे. सध्याला राज्यात नैसर्गिक आपत्तीची स्थिती फारच बिकट आहे. नुकतेच मुंबईमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे गोर-गरीब लोकांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच विदर्भामध्ये सुध्दा 20 लोकांचे बळी अतिवृष्टीमुळे गेले आहेत. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या नागरिकांना वेळेवर आर्थिक मदत देण्यात शासन अपयशी ठरले आहे. परिणामी ही तरतूद आणखी वाढवावी व शासनाच्या माध्यमातून नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या नागरिकांना पूर्णपणे मदत देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करावी.

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 37, पृष्ट क्रमांक 26 वर बोलू इच्छितो. सदरहू बाबीमध्ये शेतकऱ्यांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत देण्यासाठी राज्य शासनाने जी तरतूद केलेली आहे ती अल्प असून त्वरीत ती वाढविण्याची आवश्यकता आहे तसेच अद्यापपावेतो विशेष पॅकेजमध्ये जो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, त्या निधीचे वाटप प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेले नाही. त्यामुळे आता जी तरतूद केली आहे तीसुध्दा शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल की नाही अशी शंका निर्माण होते. तरी याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी. तसेच जिल्हाधिकारी यांना अधिक अधिकार देऊन तातडीने आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 1 लाख रुपये आर्थिक मदत त्वरीत द्यावी, अशी माझी आग्रहाची मागणी आहे. (..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 61, पृष्ठ क्रमांक 45 वर बोलू इच्छितो. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने 155 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीनुसार राज्यातील सर्व नगरपरिषद व महानगरपालिका यांना जे अनुदान देण्यात येणार आहे त्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसारच नगरविकास विभागाने कारवाई केलेली असावी असा माझा विश्वास आहे. परंतु आर्वी नगरपरिषदेत मात्र शासनाने जी भूमिका घेतलेली आहे ती संशयास्पद आहे. याचे कारण नगरपरिषदेने कोणकोणती कामे घ्यावयाची आहेत, त्याकरिता सर्वसाधारण सभेत ठराव पारित करुन कामांचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरीसह शासनाकडे प्रशासकीय मान्यतेकरिता पाठविण्यात आलेले होते. परंतु शासनाने मात्र नगरपरिषदेच्या हक्कांवर गदा आणलेली आहे आणि नगरपरिषदेच्या प्रस्तावांचा विचार न करता राजकीय दबावाखाली शासनस्तरावरच कोणती कामे घ्यावयाची त्याचे आदेश नगरविकास विभागाने परस्पर काढून नगरपरिषदेला कळविलेले आहेत, ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या हक्कांवर जाणून बुजून शासन अन्याय करीत आहे, ही गोष्ट प्रत्यक्षदर्शी निदर्शनास आलेली आहे. तसेच या नगरपरिषदेमध्ये एका खाजगी संस्थेच्या वाचनालयाला 25 लक्ष रुपयांचे अनुदान वाटप करावे असे आदेशसुध्दा नगरविकास विभागाने दिलेले आहेत, ही बाब खेदजनक आहे. राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था या स्वतंत्र असून त्यांचे अस्तित्व टिकावे याकरिता शासनाने अशाप्रकारचा घोळ करु नये आणि नगरपरिषदेनेच दिलेल्या प्रस्तावास शासनाने द्यावी. जर एखादा प्रस्ताव चुकीचा असेल तर अशा प्रस्तावाच्या दुरुस्तीकरिता नगरपरिषदेला सूचना करावी. हे न करता शासनाने एका राजकीय व्यक्तीच्या स्वार्थासाठी नगरपरिषदेला त्रास देण्याचे काम केलेले आहे, ही गोष्ट बरोबर नाही. तरी याबाबत शासनाने नगरपरिषदेला विश्वासात घेऊनच काम करावी, अशी माझी मागणी आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या बाब क्रमांक 175, पृष्ठ क्रमांक 139 अन्वये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांकरिता निधीची तरतूद रु.36 कोटी सन 2006-2007 मध्ये करण्यात आलेली आहे. यामध्ये मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्विकास कार्यक्रमासाठी शासनाचे जे धोरण आहे ते अत्यंत चुकीचे आहे. याचे कारण, झोपडपट्टीतील मूळ झोपडपट्टीधारक एकत्र येऊन एसआरएकडे संस्थेचे पंजीकरण करण्याकरिता प्रस्ताव दाखल करतात व त्यानंतर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत त्या झोपडपट्टीचा विकास केला जातो. परंतु आज मात्र चित्र पूर्णपणे वेगळेच आहे. मुंबई शहरात बांद्रे रेक्लमेशन येथील एसआरए को.ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीमधील मूळ नागरिकांनी सोसायटी स्थापन करुन विकासकाला झोपडपट्टीचा विकास करण्याकरिता करारनामा केला असता शासनाच्या एसआरए विभागाने मात्र या सर्व वसाहतींमध्ये मूळ नागरिकांनाच बाजूला करुन बाहेरील लोकांना संस्थेचे सभासद दाखवून भूखंड माफियांच्या हातामध्ये या सर्व जागा दिलेल्या आहेत. त्यामुळे मूळ झोपडपट्टीधारकावर आज रस्त्यावर राहण्याची वेळ आलेली आहे. याबाबत मी स्वत: सुध्दा अनेकदा माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु त्याची दखलसुध्दा घेतलेली दिसत नाही, ही गंभीर बाब आहे. त्यामुळे झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत जी तरतूद दर्शविली आहे ती खरोखरच झोपडपट्टीधारकांपर्यन्त पोहोचते काय ? अशी शंका निर्माण झालेली आहे. तसेच ही योजना राज्यातील इतर जिल्हयांमध्येसुध्दा राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे याची माहिती दिलेली नाही, ती देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 54, पृष्ठ क्रमांक 35 अन्वये कुक्कुट पालन व्यवसाय करणा-या शेतक-यांना वित्तीय सहाय्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद दर्शविलेली आहे.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्य, श्री.संजय केळकर हे चर्चेमध्ये पहिल्यांदाच भाग घेत आहेत. असे असले तरी त्यांना जर पुरवणी मागण्यांवर संक्षिप्त बोलण्यात अडचण असेल तर त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, संक्षिप्तपणे माझे म्हणणे मांडण्याचा मी प्रयत्न करतो.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभागाने दर्शविलेल्या तरतुदीनुसार कुक्कुट पालन शेतक-यांना प्रति पक्षी रु.20 या दराने वित्तीय सहाय्य देण्याचे ठरविले आहे, असेसुध्दा नमूद केलेले आहे. परंतु, ज्या शेतक-यांनी आपल्या स्वत:च्या जागेत बँकेचे कर्ज घेऊन हा कुक्कुट पालन व्यवसाय सुरु केलेला आहे त्या शेतक-यांचा व्यवसाय बर्ड फ्ल्युमुळे बंद झाला आहे आणि आज त्या शेतक-यांवर उपासमारीची पाळी आलेली आहे. याबाबत मार्च 2006 च्या अधिवेशनात संगमनेर येथे त्या भागातील शेतकरी तहसिल कार्यालयासमोर उपोषणालासुध्दा बसलेले होते आणि संबंधित विभागाने नुकसान भरपाईकरिता जे पंचनामे केलेले आहेत त्यामध्येसुध्दा फार मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झालेला आहे. याचे कारण मूळ व्यवसाय करणा-या शेतक-यांना नुकसान भरपाई न मिळता इतर लोकांनाच ही भरपाई मिळालेली आहे असे प्रत्यक्षदर्शी निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदरहू नुकसान भरपाईकरिता शेतक-यांना वित्तीय सहाय्य त्वरित देण्यात यावे व पुन:श्च सर्वेक्षण करुन शेतक-यांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

तालिका सभापती : मला सदनाच्या असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, पुरवणी मागण्यांवरील चर्चा 1 वाजून 5 मिनिटांपर्यन्त करण्यात येईल. नियमित बैठकीत लक्षवेधी सूचनांवरील चर्चा आटोपल्यानंतर पुरवणी मागण्यांच्यासंदर्भात संबंधित मंत्रीमहोदयांचे उत्तर होईल.

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 43 अन्वये राष्ट्रीय महामार्गांवर वनरोपणासाठी तरतूद केलेली आहे. ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे. परंतु, या ठिकाणी कोणत्या प्रकारचे वृक्ष लावले जाणार आहेत, याचा खुलास होणे आवश्यक आहे. वृक्षांमुळे रस्त्यांना व्यक्तिमत्व मिळत असते. त्यामुळे प्रिप्लँटेशन करतांना आर्किटेक्टची मदत घेऊन वृक्षारोपण केले जावे, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागाच्या बाब क्रमांक 146 मध्ये असे म्हटले आहे की, राज्यात 1008 गोदामे आहेत, या गोदामांच्या दुरुस्तीसाठी या निधीची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्राचा आर्थिक पहाणी अहवाल बघितला तर फार मोठया प्रमाणामध्ये रेशन धान्य वेगवेगळया प्रकारे लोकांपर्यन्त पोहोचले पाहिजे परंतु ते पोहोचत नाही.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून यासंदर्भात अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने गोदाम दुरुस्तीमध्ये झालेल्या हलगर्जीपणामुळे लोकांपर्यंत धान्य पोहोचले किंवा नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

बाब क्र.147, यामध्ये राज्य आयोग आणि जिल्हा ग्राहक मंच यांच्या मजबुतीकरणासाठी आपण 31 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु त्यासाठी अधिक तरतूद करुन वेळ आली तर भेसळ शोधण्यासाठी स्टिंग ऑपरेशनसाठी देखील निधीची तरतूद करावयास पाहिजे, असे मला सूचवावेसे वाटते. सभापती महोदय, आदिवासी विकास मंत्र्यांनी अनेक वसतिगृह आणि आदिवासी आश्रमशाळा दुरुस्तीसाठी निधी वाढविलेला आहे आणि त्याचबरोबर अनुसूचित जमातींच्या आश्रमशाळांसाठी देखील निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. माझी अशी सूचना आहे की, महिलांचे हक्क आणि कल्याण समिती त्याचबरोबर आदिवासींच्या आश्रमशाळांसाठी आपल्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशीनुसार आपण या निधीचा वापर केलेला आहे किंवा नाही हे तपासून बघणे अत्यावश्यक आहे. आदिवासी आश्रमशाळा, अनुसूचित जमातींसाठी असणा-या आश्रमशाळा आणि अनुसूचित जातींसाठी असणा-या मुलींच्या आश्रमशाळा यांची जी दुरावस्था झाली आहे त्या आश्रमशाळांच्या दुरावस्थेबाबतची उदाहरणे त्या अहवालामध्ये आहेत, त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, असे मला खास करुन सूचवावेसे वाटते. सभापती महोदय, 11 वा प्लॅन येत असतांना ॲप्रोच पेपर नुकताच राष्ट्रीय नियोजन मंडळाने लोकांसमोर सादर केलेला आहे. त्यामध्ये जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाचा उल्लेख आहे आणि नगरविकास विभागाच्या बाब क्र.63 आणि 64 मध्ये यातील काही बाबींचा उल्लेख केलेला आहे. खास करुन नागपूरच्या विकासाकरिता जी तरतूद केलेली आहे ती स्वागतार्ह आहे. परंतु या संपूर्ण नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या कारभारामध्ये आम्ही मागच्या 2-3 वर्षापासून सभागृहामध्ये सातत्याने मुद्दा मांडतो की, नगरपालिका आणि महानगरपालिकांची जी अनुदाने थकीत आहेत ती थकीत अनुदाने ऑन पेपर मिळालेली आहेत. परंतु प्रत्यक्षात त्या नगरपालिका आणि महानगरपालिकांपर्यंत अनुदान पोहोचलेलेच नाही. नगर विकास विभागाने यामध्ये लक्ष घालावे. माननीय वित्तमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. नगर विकास विभागाला पैसे मिळावे यासंदर्भात वित्तमंत्र्यांनी सहकार्य करावे, असे मला वाटते. परंतु

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

नगर विकास आणि वित्त विभागासंदर्भातील या अनिर्णित स्वरुपाच्या मागण्या आहेत, याकडे मला माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावेसे वाटते.

सामाजिक न्याय विभागामध्ये ऊस तोड कामगारांसाठी तरतूद केलेली आहे. खरोखर आता अपेक्षाभंगाची कमाल झालेली आहे. त्याचे कारण असे आहे की, एवढया मोठया प्रमाणावर ऊसतोड कामगार महाराष्ट्रामध्ये आहेत. माझ्या अशासकीय ठरावाला उत्तर देतांना माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी राणा भीमदेवी थाटामध्ये मला असे सांगितले होते की, तुम्हाला ऊसतोड कामगारांचा प्रश्न सभागृहामध्ये पुन्हा घ्यावा लागणार नाही, अशी आम्ही व्यवस्था करु. परंतु प्रत्यक्षात मात्र शिक्षण विभाग, समाज कल्याण विभाग आणि असंघटीत कामगारांचे प्रश्न हाताळणारे सर्व विभाग विश्वामित्री भूमिका घेत आहेत. ऊसतोड कामगारांसाठी आपण अतिशय तुटपुंजी तरतूद केलेली आहे, ही तरतूद वाढविली गेली पाहिजे. त्याचबरोबर, दोन-तीन विभागांनी समन्वय साधून या मुलांच्या गरजांकडे लक्ष दिले पाहिजे. सामाजिक न्याय भवन उभारण्यासाठी 139 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे आणि त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, महिला बचत गटांसाठी देखील त्यांची पणन व्यवस्था आम्ही करणार आहोत, हे स्वागतार्ह आहे. परंतु सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम चांगले व्हावे, त्यामध्ये आदिवासी आश्रमशाळांसारखे प्रकार होऊ नयेत आणि त्याच बरोबर ज्या बचत गटांची तेवढी क्षमता असेल, ज्या संस्थांची तेवढी क्षमता असेल त्यांचे देखील बांधकाम करणे आवश्यक आहे. महत्वाचा मुद्दा असा निर्माण होणार आहे की, यांचे मेंटेनन्स कोण करणार आहे ? त्याचे मेंटेनन्स झाले नाही तर मोठ मोठया वास्तू उभारणार आणि शेवटी ती उंदीर, घुशींची मालमत्ता होण्याची भिती आहे. म्हणून त्यांच्या मेंटेनन्सकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, विधानमंडळाच्या तरतुदींवर बोलू नये असे अपेक्षित असते. आमदारांच्या परदेश दौ-यांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. काही आमदार माझ्यावर नाराज होतील. परंतु मला नमूद करावयास पाहिजे की, शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, कुपोषणाचा प्रश्न आहे, छोटया छोटया गोष्टींसाठी गावातील लोकांच्या 5-10 लाख रुपयांसाठी मागण्या पेंडिंग असतांना आमदारांच्या परदेश दौ-यासाठी शासनाचे पैसे वापरणे मला योग्य वाटत नाही.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

म्हणून मला येथे सुचवावेसे वाटते की, इंटरनॅशनल पार्लमेंटरीयन्स युनियन आणि सीपीए यांच्याकडून यासाठी अनुदान मिळते आणि बऱ्याचशा देशातील पार्लमेंटरीयन्स जेव्हा येथे येतात तेव्हा त्यांना कोठल्या ना कोठल्या अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी स्पॉन्सर केलेले असते. तेव्हा आपण याचा बोजा शासनावर कशासाठी टाकता ? ....

श्री. जयंत पाटील (खाली बसून..) : आपला मुद्दा मला समजला नाही. कृपया आपण परत सांगितला तर बरे होईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आमदारांसाठी म्हणजेच पार्लमेंटरीयन्ससाठी जेव्हा अशा पकारचे दौरे होतात तेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाबरोबर वा त्याला समांतर असलेल्या ज्या युनियन्स वा संस्था आहेत त्या किंवा सार्क देशांच्या अनेक सपोर्टेड संस्था आहेत की ज्या शासनाला यासाठी पैसे देऊ शकतात आणि शासन देखील अशा संस्थांकडून अशा कारणांसाठी अनुदान घेत असते, या संस्थांच्या स्पॉन्सरशीप वर असे कार्यक्रम केले जातात. ...

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना मी सांगू इच्छितो की, आपण येथे उपस्थित करीत असलेल्या प्रश्नावर मंत्र्यांकडून उत्तर दिले जाईल असे वाटत नाही. त्यामुळे ज्या पुरवणी मागण्या येथे ठेवल्या आहेत आणि ज्यावर मंत्र्यांकडून उत्तर येथे मिळू शकेल असे मुद्दे आपण उपस्थित केल्यास त्यावर आपल्याला उत्तरे मिळू शकतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ठीक आहे. या संबंधातील माहिती माननीय मंत्री महोदयांना मी नंतर एखाद्या बैठकीमध्ये देखील देण्यास तयार आहे जेणे करून यातून आपण मार्ग काढू शकता.

दुसरे मला असे सांगावयाचे आहे की, कोठेवाडी येथे पोलीस चौकी व्हावी ही अनेक दिवसांपूर्वीपासूनची मागणी आहे. यापूर्वीच्या गृहमंत्र्यांकडे ही मागणी केली होती पण ते गेले, नंतर दुसरे आले पण तरीही ही मागणी पूर्ण होत नाही. अशा प्रकारे दोन जिल्ह्यांच्या हद्दीवर असलेला एरिया असतो त्या ठिकाणी मग एका जिल्ह्यात चोऱ्या करतात आणि दुसऱ्या जिल्ह्यामध्ये पळून जातात. कोठेवाडीचा हा भाग असाच आहे. पाथर्डी तालुका आणि बीड जिल्ह्याच्या हद्दीवर हा भाग येतो त्यामुळे तेथे पोलीस स्टेशन, पोलीस चौकी असावी, विशेषत: कोठेवाडी येथे पोलीस चौकी व्हावी ही मागणी पूर्वीपासूनची आहे. तरी त्या मागणीचा विचार करून लवकरात लवकर तेथे पोलीस चौकी केली जावी. ..... एए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

सभापती महोदय, त्यानंतर ऊर्जा विभागाच्या पूरक मागणी संदर्भात मी आपल्याला सांगेन की, श्री.राजेंद्र गायकर हे शरद बँकेचे सदस्य असून ते आंबेगाव येथे राहणारे आहेत आणि त्यांनी वीजचोरी करून नंतर वाटाघाटी करून 6 हजाराचे वीजबील भागविले आहे. तेव्हा या प्रकरणी चौकशी करून त्यांचेकडून योग्य असे वीज बील वसूल करावे एवढे सांगून मी भाषण संपविते.

****

..... एए 3 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, नगरविकास विभागाची बाब क्रमांक 62, 63, पृ. 43 या संबंधात मला प्रथमत: बोलावयाचे आहे. सभापती महोदय, मुंबई ही औद्योगिक नगरी आहे. मँचेस्टर ऑफ इंडिया म्हणूनही एके काळी या मुंबईला ओळखले जात होते. परंतु मुंबईतील या गिरण्या, कापड उद्योग बंद झाला आणि त्यामुळे त्या उद्योगांवर अवलंबून असलेल्या लोकांची दैना झाली. खामगाव, आमगाव, रायगड पासून खेड्यापाड्यातून लोक येथे या उद्योगांमध्ये नोकरी-धंद्यासाठी येतात पण त्यांना कामधंदा काही मिळत नाही. महाराष्ट्र राज्याने 1991 मध्ये एक कमिटी तयार केली होती. वसई-विरारमध्ये उद्योगधंदे चालू करण्यासाठी एक प्लॅन तयार करण्याचे ठरविले. पण आज 16-17 वर्षे झाली तरीही त्याबाबतीत काहीही झालेले नाही वा त्याबाबत निर्णय लागलेला नाही. मौजे कण्हेर, विरार मध्ये एका शेतकऱ्याला तबेला बांधण्यासाठी नगरविकास विभागाने परवानगी दिली. त्यानंतर त्याने सांगितले की, तेथे तबेला बांधून काही होणार नाही. त्या भागात आजूबाजूला शेती, डोंगराळ भाग असल्याने त्या ठिकाणी फ्लॅट बांधण्यासाठी त्याला परवानगी दिली गेली. पण तेथे कोणतेही उद्योगच नसल्याने लोक निवाऱ्यासाठी कसे काय येतील ? त्या शेतकऱ्याने गेल्या 10 वर्षांपासून यासाठी प्रयत्न चालविला आहे, त्यासाठी त्याने आपल्या चपला झिजविल्या आहेत पण त्याला परवानगी मिळत नाही. आपले धोरण आहे की, तुम्ही साखर कारखाना काढला म्हणूनच पुण्यापासूनच्या गरीब माणसाला तेथे नोकरी मिळून गेली. ....

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी मूळ बाबीवर बोलावे अशी मी त्यांना विनंती करतो.

(यानंतर श्री. सरफरे .... बीबी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मागील वेळी मी सभागृहामध्ये मागणी केली होती की, त्या शेतकऱ्याला वीजेचा पुरवठा आणि रस्त्याची व्यवस्था करण्यात यावी. त्याचप्रमाणे त्याला उद्योग सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात यावी. परंतु महाराष्ट्र शासनाचे डोळे अजून उघडले नाहीत. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना व संबंधित खात्याच्या मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, भंडारा, रामटेक, रायगड व कोकणातील जे शेतकरी छोटे मोठे उद्योग करु इच्छितात त्यांना उद्योग सुरु करण्यासाठी वीज पुरवठयासहीत उद्योग सुरु करण्याची परवानगी दिली पाहिजे. अशाप्रकारची विनंती मी मेळाव्यामध्ये देखील केली होती, परंतु त्याची अंमलबजावणी झाली नव्हती ती करण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 148 व 149 च्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, आपण गोरगरिबांना सवलतीच्या दरामध्ये तेल, केरोसिनचा पुरवठा करतो. परंतु आज संपूर्ण महाराष्ट्रातील ठाणे, भंडारा, नागपूर इत्यादी जिल्हयांमध्ये केरोसिनचा काळाबाजार होत आहे. याला आळा घालण्यासाठी सरकारने काहीतरी ठोस उपाय योजना करावी. नागपूर येथे श्री. मदन पाटील हे केरोसिनचे विक्रेते असून त्यांनी गेल्या 5 वर्षामध्ये केलेल्या काळाबाजाराची आपण चौकशी केली पाहिजे. त्याचप्रमाणे कार्डधारकांना त्यांनी पुरविलेल्या खाद्यतेलाची देखील संबंधित विभागामार्फत व पोलिसांमार्फत चौकशी करण्यात यावी.

सभापती महोदय, मी ऊर्जा विभागाचे माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांना व राज्य शासनाला धन्यवाद देतो. पुढील चार वर्षामध्ये विजेचा पुरवठा पूर्ववत करण्यात येईल असे शासनाने सांगितले होते. परंतु डिसेंबर महिन्यापर्यंत आपण दाभोळच्या एन्रॉन प्रकल्पामधून, कोराडी, पारस, खापरखेडा इत्यादी प्रकल्पांना अतिरिक्त मान्यता देऊन वीज निर्मितीचे काम करीत आहात त्याबाबत महाराष्ट्र शासनाचे मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्र. 151 वरील बाब क्र. 189 च्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, उत्तर नागपूरच्या विभागामध्ये अनुसूचित जाती, दलित मागासवर्गीय लोकांची वस्ती आहे. या विभागामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आरोग्य उपकेंद्र बांधण्यात आले आहे. एकूण 7 कोटींचा हा प्रकल्प असून त्याठिकाणी एक डॉक्टर व एक नर्सची व्यवस्था करण्यात यावी अशी मी मागणी करतो. त्याचप्रमाणे डॉ. चौबे यांनी आपण सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ऑनररी सर्व्हिस देण्यास तयार आहोत अशाप्रकारची विनंती माननीय मंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

श्री. दिलीप वळसे पाटील व माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे केली होती. त्याठिकाणी असलेल्या सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये गेल्या तीन वर्षापासून ऑनररी डॉक्टर्सची कमतरता आहे. तेव्हा त्यांच्या मागणीचा विचार करण्यात यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या पृष्ठ क्र. 51 वरील बाब क्र. 70 च्या अनुषंगाने असे सांगू इच्छितो की, श्री. नाना शेंडे हे एक दलित साहित्यिक होते. त्यांचे शेषाश्रम असलेले घर पडून गेले. गेल्या 25 वर्षापासून त्यांनी कुणाकडून एकही पैसा न घेता स्वत: साहित्य संमेलन भरविले. तेव्हा भंडारा जिल्हयामध्ये त्यांच्या नावाचे एक स्मारक करण्यात यावे. त्यांच्या पडलेल्या शेषाश्रमासंबंधी मी भंडाऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना देखील पत्र लिहिले आहे. अशाप्रकारे एका दलित साहित्यिकावर होत असलेला अन्याय माननीय वित्त मंत्र्यांनी दूर करावा .

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (पुढे सुरु....

सभापती महोदय, पान क्रमांक 95, बाब क्रमांक 115, जलसंपदा विभाग, विदर्भातील जलसिंचन विभागासाठी 1600 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे, परंतु आमच्या विदर्भातील अधिकाऱ्यांनी 600 कोटी रुपयाचे बजेट तयार केलेले आहे. एक हजार कोटी रुपये लॅप्स केले केले असतील तर तर विदर्भाचा विकास कसा होणार ? विदर्भ, कोकण आणि महाराष्ट्राबरोबर आहे. याचा विचार करावा, एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुरवणी मागण्यांतील पाच-सहा बाबींवर बोलणार आहे. बाब क्रमांक 216, पान क्रमांक179, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य. कांदा विक्रीसाठी आणणाऱ्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्येक क्विंटल मागे रुपये 50 इतके अर्थसहाय्य दिलेले आहे. याबद्दल सरकारला धन्यवाद देतो. 50 रुपये सबसिडी दिलेली आहे, ही कमी आहे. ती 100 रुपये देणे गरजेचे आहे अशी माझी मागणी आहे.

त्यानंतर बाब कमांक 108, पान क्रमांक 92, डांगुर्ली उपसा सिंचन योजना, जिल्हा गोंदिया यांच्या विशेष दुरुस्तीच्या कामासाठी 10 हजार रुपयाची तरतूद केलेली आहे. माझी शासनाला विनंती आहे की,अशा अनेक उपसा जलसिंचन योजना सहकारी तत्वावर सुरु झालेल्या आहेत. त्या आज बंद पडलेल्या आहेत. शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज दिले जात आहे. उपसा सिंचन योजना चालू राहिल्या तरच त्या शेतकऱ्यांना शेतात पीक घेता येईल. अशा उपसा जलसिंचन योजनांसाठी एक पॅकेज शासनाने देण्याबाबत विचार करणे गरजेचे आहे. पाणी मिळाल्याशिवाय पिकाचे उत्पादन घेता येणार नाही. त्यासाठी सरकारने याकडे लक्ष घालावे अशी विनंती आहे.

त्यानंतर बाब क्रमांक 62, पान क्रमांक 45, सातारा जिल्ह्यातील वाई येथे नाट्यगृहाचे बांधकाम करण्यासाठी आणि महाबळेश्वर येथे भूयारी जलनिस्सारण पध्दतीच्या कामासाठी नगरपालिकांना निधीची तरतूद केलेली आहे. माझी शासनाला या निमित्ताने विनंती आहे की, नांदेड येथे गुरुदा गद्दी त्री शताब्दी महोत्सव आहे. त्या ठिकाणच्या प्रथा, रुढी लक्षात घेणे गरजेचे आहे. नांदेड जिल्हयात गुरुद्वार आहे, तसेच मनमाड येथेही गुरुद्वार आहे. शंकराच्या मंदिरामध्ये नंदीला महत्व आहे, रामाच्या मंदिरामध्ये हनुमानाला महत्व आहे. तसे प्रत्येकवेळी नांदेडला जावयाचे असेल तर अगोदर मनमाडला यावे लागते, त्या ठिकाणच्या गुरुद्वाराचे दर्शन घेऊन नंतर नांदेडला जावे लागते. नांदेडला दर्शन घेतल्यानंतर परत मनमानडला यावे लागते आणि नंतर घरी जावे लागते. याचा विचार करता, मनमाड नगरपालिकेला ग्रॅन्ट देणे गरजेचे आहे. नांदेडला जाण्यापूर्वी लोकांची गदी ही मनमाडला होणार आहे. म्हणून मनमाड येथील रस्ते आणि इतर कामासाठी मनमाड नगरपालिकेला ग्रँट देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

यानंतर बाब क्रमांक 57, पान क्रमांक 40, मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळा, नवीन अशासकीय माध्यमिक शाळा सुरु करणे यासाठी मागणी केलेली आहे. माझी शासनाला विनंती आहे की,सॅलरी ग्रॅन्ट आणि नॉन सॅलरी ग्रँट असा फरक का ठेवलेले आहे ? हे मला कळत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

डॉ.वसंत पवार (पुढे सुरु....

महाराष्ट्रातील शाळांना 234 कोटी रुपये इतकी नॉन सॅलरी ग्रँट अजून द्यावयाची आहे. ती ग्रँट लवकर देण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे, यासाठी शिक्षण मंत्र्यांनी लक्ष घलावे अशी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील (बसून) : सन्माननीय सदस्य श्री.वसंत पवार हे ही बाब वारंवार सभागृहात मांडतात, परंतु शासन काही करत नाही.

डॉ.वसंत पवार : शिक्षण ही फार मोठी इन्व्हेस्टमेंट आहे.

त्यानंतर बाब क्रमांक 40, पान क्रमांक 27. नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी 234 कोटीची तरतूद केलेली आहे. त्यापैकी 146 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार .....

सभापती महोदय, मुंबईमध्ये या पावसाळ्यामध्ये आलेला पूर तसेच मागच्या वर्षी आलेला पूर आपण पाहिलेला आहे. माझी शासनाला नम्र विनंती राहील. माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प तयार करताना कॅलॅमिटी रिलीफ फंड ठेवणे गरजेचे आहे. जोपर्यंत आपण तसा फंड ठेवणार नाही तोपर्यंत प्रत्येक वेळी आपल्याला पुरवणी मागणीव्दारे तरतूद करावी लागेल. आपण यासंदर्भात परसेंटेजवाईज निर्णय घेऊन तरतूद केली तर निश्चितपणे फायदा होईल.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 37 आणि 38, पृष्ठ क्रमांक 26 बाबत बोलणार आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी 12 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना 1 लाख रुपये द्यावेत अशी मागणी सन्माननीय सदस्यांनी केली. आतापर्यंत सरकार आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना 1 लाख रुपये देते. परवा बॉम्बस्फोटामध्ये जे लोक मृत्यूमुखी पडले त्यांना रेल्वेमंत्री श्री. लालूप्रसाद यादव यांनी 5 लाख रुपये देऊ केले आहेत. माझी शासनाला विनंती आहे की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना सुध्दा 1 लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचा सुध्दा शासनाने विचार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या बाब क्रमांक 175, पृष्ठ क्रमांक 139 बाबत मी बोलणार आहे. यामध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाकरिता राज्याचा हिस्सा म्हणून 36 कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद केलेली आहे. शासनाने यामध्ये 100 कोटी रुपयांची तरतूद केली असती तरी ती तरतूद स्वागतार्ह ठरली असती. केंद्र शासनाची ही एक खूप चांगली योजना आहे. यामध्ये शासनाचे दोन फायदे आहेत. यामध्ये 36 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 100 कोटी रुपयांची तरतूद केली असती तर पूर्ण महाराष्ट्रामध्ये गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम राबविता आला असता. शासनाला हे माहीत असावयास पाहिजे की, या 36 कोटी रुपयांमध्ये सुध्दा 12 टक्के रक्कम टॅक्सच्या माध्यमातून वसूल होणार आहे. यामध्ये शासनाचे 36 कोटी रुपये लागणार नाहीत. यामध्ये शासनाने 100 कोटी रुपयांची तरतूद करावयास पाहिजे होती. इतर राज्यांनी या योजनेसाठी 100-100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि त्याप्रमाणे त्या ठिकाणी त्यांनी योजनेची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. त्या 100 कोटी रुपयांमध्ये राज्यातील गृहनिर्माण व झोपडपट्टयांचा विकास होणार आहे. 100 कोटीमध्ये राज्य सरकारला सिमेंट आणि लोखंडाच्या संदर्भात 12 टक्के टॅक्स मिळणार आहे. 36 कोटी रुपयांएवेजी 100 कोटी रुपयांची तरतूद केली तर झोपडपट्टी आणि गृहनिर्माणाचा विकास होणार आहे आणि लोह व सिमेंटच्या बाबतीत येणारा 12 टक्के टॅक्स असे मिळून 112 कोटी रुपये मिळणार आहेत. 36 कोटी रुपयांऐवजी 100 कोटी रुपयांची तरतूद केली तर राज्य शासनाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. याबाबत शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, यानंतर मी विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 123, पृष्ठ क्रमांक 100 बाबत बोलणार आहे. यामध्ये न्यायालयीन सभागृहांच्या बांधकामाकरिता भरपूर तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय विधी व न्याय खात्याचे मंत्रिमहोदय श्री. मुश्रीफ साहेब या ठिकाणी बसलेले आहेत. ज्यावेळी माननीय मंत्रिमहोदय अकोल्याला आले होते त्यावेळी 100 वकिलांनी त्यांना निवेदन दिले होते. अकोला येथे पाच जिल्ह्यांकरिता एका को-ऑपरेटिव्ह कोर्टाला शासनाने परवानगी दिलेली आहे. परंतु बांधकामाची परवानगी प्रलंबित आहे. त्या कोऑपरेटिव्ह कोर्टाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया .....

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 82, पृष्ठ 67 बाबत बोलणार आहे. यामध्ये भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. अकोल्याला हिंगणारोड म्हणून एक रस्ता आहे. हा रस्ता नागरी आणि ग्रामीण विभागाला जोडणारा रस्ता आहे. या रस्त्याच्या बाबतीत जिल्हा परिषद लक्ष देत नाही आणि नगरपालिकाही लक्ष देत नाही. मी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना विनंती करतो की, हिंगणारोड या रस्त्याच्या बांधकामासाठी पुरवणी मागण्यांमध्ये भरीव तरतूद करण्यात यावी.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गोपीकिसन बाजेरिया...)

नगरविकास विभाग, बाब क्रमांक 61 व 62, पृ.क्र.45 - या बाबींच्या अनुषंगाने मी शासनाचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. सन 2002मध्ये अकोला नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर झाले. त्यामुळे बरेचसे अनुदान महानगरपालिकेला देण्यात येत नाही. ऑक्ट्राय आणि मालमत्ता कर यामधून मिळणा-या उत्पानाच्या आधारे ही महानगरपालिका आपला कारभार चालविते. अकोला शहरामध्ये ड्रेनेजचा मोठा प्रश्न आहे. हा ड्रेनेजचा प्रश्न सोडविण्यासाठी तरतूद करण्यात यावी. ऑक्ट्रायच्या संदर्भात दोन-तीन महिन्यांपूर्वी निविदा काढण्यात आली होती. यामध्ये गैरप्रकार झालेला आहे. तीन महिन्यानंतर निविदा देण्यात आली. याबाबतीत नगरविकास मंत्र्यांनी लक्ष घालावे.

महसूल विभाग, पृ.क्र.26, बाब क्रमांक 37 - आत्महत्या करणा-या शेतक-यांसाठी तरतूद करण्यात अलेली आहे. माननीय राज्यमंत्री महोदय डॉ. राजेंद्र शिंगणे याठिकाणी उपस्थित आहेत. एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी त्यांचे लक्ष वेधू इच्छितो. पीकेव्ही, काटेपूर्णा, महान या प्रकल्पामध्ये विस्थापित झालेल्या शेतक-यांना वर्ग-2च्या जमिनी देण्यात आलेल्या आहेत. बी टेन्युअर मधील या जागा आहेत. बी टेन्युअरमधील जागांच्या बाबतीत 50 टक्के रक्कम भरावी लागते. शेतक-यांना पुनर्वसनाच्या अंतर्गत ज्या वर्ग-2च्या जमिनी दिलेल्या आहेत त्या जमिनीवर त्यांना बँकाकडून कर्ज मिळत नाही किंवा त्या विकताही येत नाही. तेव्हा याबाबतीत मंत्री महोदयांनी लक्ष घालावे.

गृह विभाग, पृ.क्र.13, बाब क्रमांक 13 - नवीन पोलीस स्टेशन्ससाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. अकोला शहराची लोकसंख्या मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. अकोला शहराचे अकोला पूर्व आणि अकोला पश्चिम अशा दोन भागामध्ये विभाजन झालेले आहे. अकोला पूर्वमध्ये 1 पोलीस स्टेशन आणि अकोला पश्चिममध्ये 6 पोलीस स्टेशन्स आहेत. तेव्हा अकोला पूर्वमध्ये आणखी एक पोलीस स्टेशन देण्यात यावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शांताराम करमळकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सहकार विभागाच्या बाब क्रमांक 214 ते 217कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधत आहे. या देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की जे गेली तीन-चार वर्षे खादीवर केवळ 5 टक्के सूट देत होते. ही सूट देण्याचे बंद करण्यात आलेले आहे. केन्द्र सरकार खादीवर 10 टक्के सूट देते. केन्द्राने सूट देण्याचा कालावधी 100 दिवस केलेला आहे. गुजरातमध्ये खादीवर 10 टक्के सूट दिली जाते तर आंध्रप्रदेशमध्ये 15 टक्के सूट दिली जाते. तेव्हा महाराष्ट्र राज्यामध्येही 2 ऑक्टोबर ते 31 मार्च या कालावधीत खादीवर सूट द्यावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. शांताराम करमळकर यांनी केलेल्या सूचनेकडे शासनाने विशेष लक्ष द्यावे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शिवसेना पक्षाकडून दोन सन्माननीय सदस्य बोलणार आहेत, त्यांना बोलण्याची संधी कधी मिळणार आहे?

तालिका सभापती (ॲड.गुरुनाथ कुळकर्णी) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व डॉ.दीपक सावंत यांना दुपारी पुन्हा ज्यावेळी पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु होईल त्यावेळी बोलण्याची संधी दिली जाईल. पुरवणी मागण्यांवरील अपूर्ण राहिलेली चर्चा व मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण लक्षवेधी सूचनेवरील चर्चेनंतर होईल. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून दुपारी 1.15 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.06 वाजता दुपारच्या 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती स्थानी माननीय सभापती

अमरावती येथील उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचेविरुध्द चौकशीचे आदेश

(१) * १७४२३ श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. रामनाथ मोते , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. नितीन गडकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १४५२१ ला दिनांक २१ मार्च, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यमान उपसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था अकोला येथे प्राचार्य पदावर कार्यरत असताना खरेदी प्रकरणात गैरव्यवहार, वित्तिय अधिकारांचे उल्लंघन, नियमबाह्य देणग्या स्विकारणे, पदाचा दुरुपयोग शासन निर्णयाचे उल्लंघन करणाने मनमानी वर्तन, चौकशी अधिकाऱ्यास असत्य माहिती देणे इत्यादी बाबतीत प्राथमिक चौकशीत दोषी आढळल्याने त्यांच्या विरुध्द सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय चौकशी पूर्ण होऊन सदरहू प्रकरणात काय कारवाई करण्यात आलेली आहे,

(३) तसेच, अद्याप कारवाई करण्यात आलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) होय.

(२) विभागीय चौकशी पूर्ण झालेली असून त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालावर विहीत कार्यपध्दतीनुसार शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात आतापर्यंत एकूण तीन वेळा या सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. पहिल्यांदा 17.3.2006 रोजी, दुस-या वेळेस 21.3.2006 रोजी व आज 13.6.2006 रोजी तोच प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, श्री. आसाव हे केलेल्या चौकशीमध्ये दोषी आढळून आलेले आहेत का ? असा प्रश्न विचारला असता त्याला "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, जर श्री. आसाव हे दोषी आढळून आले आहेत तर त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे? वास्तविक पाहता संबंधितांना सस्पेंड करावयास पाहिजे होते परंतु त्यांना सस्पेंड न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17423.....

श्री. वसंतराव खोटरे....

करता त्यांची अकोला येथे शिक्षण उपसंचालक म्हणून बदली करण्यात आलेली आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात संबंधित दोषी आढळून आलेले असल्यामुळे त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आलेली आहे? तसेच संबंधितांना बडतर्फ करुन त्यांच्यावर किती दिवसात कारवाई केली जाणार आहे?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17423.....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भात चौकशी समिती नियुक्त केलेली होती. त्या चौकशीचा अहवाल विभागाला दिनांक 20.4.2006 रोजी प्राप्त झालेला आहे.त्यानंतर शिक्षण विभागाने त्या नस्तीवर स्वत:चे मत नोंदवून ती नस्ती जी.ए.डी.कडे पाठविलेली आहे. या नस्तीवर अंतिम निर्णय जी.ए.डी. घेणार आहे. जी.ए.डी.ने अंतिम निर्णय दिल्यानंतर त्यावर संबंधित कर्मचाऱ्याचे काय म्हणणे आहे त्याचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल. त्यानंतर एम.पी.एस.सी. ला कळवून अंतिम निर्णय घेण्यात येईल. या सर्व प्रोसिजरसाठी आणखी किमान सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी सुध्दा लवकरात लवकर कार्यवाही पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, एप्रिल 2006 रोजी विभागाकडे अहवाल प्राप्त झाला. पुढील कार्यवाहीसाठी आणखी सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यामध्ये कोणकोणती अनियमितता आढळून आलेली आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, संबधित कर्मचाऱ्यावर एकूण पाच प्रमुख आरोप ठेवण्यात आले आहेत. एक हजार रुपयांची देणगी स्वीकारणे, सनमायका खरेदीमध्ये तफावत असणे, एका कर्मचाऱ्याच्या कार्यकालाबद्दल दिशाभूल करणे, कंत्राटी पध्दतीचे उल्लंघन करणे, या गोष्टी अहवालात नमूद करण्यात आल्या आहेत. या पाच आरोपांपैकी चार आरोप सिध्द होत नाहीत. परंतु सनमायका खरेदीमध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आढळून आले आहे आणि ते अंशत: सिध्द झाल्याचे दिसते. तेव्हा विभागाने संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द सर्व प्रोसिजर फॉलो करुन आवश्यकती कार्यवाही करण्याचे धोरण स्वीकारलेले आहे.

श्री.जी.एल.अैनापुरे: सभापती महोदय, अशाप्रकारच्या घटना अनेक ठिकाणी होत आहेत. विशेषत: खरेदीच्या बाबतीत अशा गोष्टी घडत आहेत. खरेदीबाबत असत्य माहिती देणे हे सर्वच संस्थामध्ये चालू आहे. तेव्हा खरेदीबाबत काही नियमावली करुन अशा गोष्टींना शासन आळा घालणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17423.....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, खरेदी करण्याबाबत शासन स्तरावर एक पर्चेस कमिटी नियुक्ती केलेली आहे. संस्था पातळीवर देखील पर्चेस कमिटी आहे. संचालक स्तराव पर्चेस कमिटी आहे. खरेदी करण्यासंबंधी एक जी.आर.देखील काढण्यात आलेला आहे. त्या जी.आर.चे उल्लंघन कोणत्याही पर्चेस कमिटीकडून होणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश देखील देण्यात आलेले आहेत. जर पर्चेस नियमामध्ये काही त्रुटी असतील तर त्याचा आढावा घेऊन त्या दुरुस्त करण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे सांगण्यात आले आहे की, विभागीय चौकशी पूर्ण झालेली असून त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे, प्राप्त अहवालावर विहित कार्यपध्दतीनुसार शासन स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सभापती महोदय, हे प्रकरण गेल्या दोन वर्षापासून सुरु आहे. या उपसंचालकाविरुध्द अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्याबाबत चौकशी सुरु झालेली आहे. खरेदीमध्ये नियमांचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, चौकशी अहवाल केव्हा पूर्ण झाला ? तसेच तो शासनास केव्हा प्राप्त झाला ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, दिनांक 20.4.2006 रोजी विभागाकडे चौकशी अहवाल प्राप्त झाला. सुरुवातील संबंधित कर्मचाऱ्याच्या संदर्भात आरोप करण्यात आले. दिनांक 30 जुलै 2004 रोजी त्याला ज्ञापन देऊन त्याच्यावर दोषारोप पत्र ठेवण्यात आले होते. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी जी.ए.डी.विभागाचे सचिव (2) यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांच्या कामात प्रगती झाली नाही. हा प्रश्न सभागृहात चार-पाच वेळा उपस्थित झाल्यानंतर मुख्य सचिवांना विनंती करण्यात आली की, दुसरा चौकशी अधिकारी नेमून हे प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्यात यावे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17423....

श्री.दिलीप वळसे-पाटील...

त्यानंतर मुख्य सचिवांनी दि.2 सप्टेंबर,2005 रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, श्री.मदान यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले. दि.23 सप्टेंबर,2005 रोजी त्याची पहिली सुनावणी झाली, त्यानंतर दि.10 ऑक्टोबर,2005 रोजी संबंधितांची साक्ष नोंदविण्यास विभागाला कळविण्यात आले व त्यानंतर चौकशी अहवाल प्राप्त झाला. चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबतीतील ज्या काही स्टेप्स् आहेत, त्याप्रमाणे कृती केली नाही तर त्यामध्ये काही त्रुटी राहून अशा प्रकारची प्रकरणे कोर्टामध्ये सुटून जात असतात.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रथमदर्शनी अहवालामध्ये ते दोषी आढळून आले आहेत. त्यामुळे आपण त्यांना त्वरीत निलंबित केले पाहिजे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. त्याप्रमाणे 5 आरोप होते, त्यापैकी 4 आरोपांमध्ये तो निर्दोष आहे. एका अरोपांमध्ये त्याच्यावर दोष सिध्द झ ाले आहेत. अशावेळी त्यांच्यावर कोणती शिक्षा द्यावयाची, याबाबत विभागीय स्तरावर विचार विनिमय चालू आहे. यासंदर्भात वेळ लागणार असेल तर जी.ए.डी.च्या माध्यमातून विभागीय स्तरावर या कर्मचाऱ्याच्या संदर्भात कोणती भूमिका घ्यावयाची यासंबंधीचा निर्णय एक महिन्यांच्या आत घेतला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, यासंदर्भात हायकोर्टाने 5 हजार रुपयांचा दंडही बजावला आहे. अशा प्रकारे काम करीत आहेत, म्हणून याबाबतीत चौकशी सुरु आहे. याबाबतीत मी काही प्रश्न विचारणार नाही. परंतु याठिकाणी सरकारलाही तो दोषी असल्याचे आढळून आले आहे. अशाप्रकारे त्याने शासनाला खाली पाहायला लावण्याचे काम त्याने केले आहे त्यामुळे याबाबतीत आपण नियमाप्रमाणे कारवाई झाली पाहिजे. सदरहू अहवाल एप्रिल महिन्यांत आलेला आहे. मग, चौकशीसाठी आपल्याला आणखी सहा महिने कशासाठी लागणार आहेत ? याबाबतीत किमान प्रोसिजरप्रमाणे किमान वेळेत कारवाई पूर्ण करावी, ती आपण केव्हा पूर्ण करणार ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17423....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, संपूर्ण प्रोसिजर पूर्ण होण्यास किमान 6 महिने लागणार असतील तर, विभागीय स्तरावर या संदर्भात जो निर्णय घ्यावयाचा आहे तो एक महिन्यांमध्ये घेतला जाईल.

..3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात विशेषत: औरंगाबाद, गडचिरोली, यवतमाळ, व सोलापूर जिल्ह्यात कुपोषणामुळे बालकांच्या मृत्यूत झालेली वाढ

(२) * १९६५० श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्रीमती कांता नलावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: औरंगाबाद, गडचिरोली, यवतमाळ, व सोलापूर जिल्ह्यात मे, २००६ अखेर कुपोषणामुळे बालकांच्या मृत्यू होण्याच्या घटनेत मे २००६ अखरेपर्यंत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता : (१) औरंगाबाद, गडचिरोली, यवतमाळ व सोलापूर जिल्हयांत मे,२००६ अखेर झालेले बालमृत्यु कुपोषणामुळे झालेले नसून कमी वजन, अपुऱ्या दिवसाचे जन्म, न्युमोनिया, जंतूससर्ग इ.कारणांनी झालेले आहेत.

(२) बालमृत्यूबाबत नियमित सर्वेक्षण केले जाते.

(३) गडचिरोली, यवतमाळ हे आदिवासी जिल्हे असल्याने येथे नवसंजीवनी योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येते-

(१) राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन अंतर्गत गर्भवती स्त्रियांची प्रसूतीपूर्व काळजी, नवजात अर्भकांची, ० ते २ वर्ष वयोगटातील बालकांचे आरोग्य, आहार, लसीकरणाबाबत विशेष लक्ष देणे, ० ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषण श्रेणी ३ व ४ बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, सर्वसाधारण श्रेणीमधील बालकांचे प्रमाण वाढवून त्यांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणावर भर देणे.

(२) गडचिरोली जिल्ह्यासाठी जून २००६ व २० जून २००६ रोजी पल्स पोलिओच्या धर्तीवर जंतनाशक मोहिम व अ जीवनसत्व वाटप मोहिम तसेच रक्तक्षय प्रतिबधक मोहिम राबविण्यात येत आहे व अशीच मोहिम १४ नोव्हेंबर, २००६ रोजी राबविण्यात येणार आहे.

३) मातृत्व अनुदान, दाई बैठक योजना
४) मान्सूनपूर्व उपाययोजना, माहे मे व जून महिन्यात प्रत्येक गावात लसीकरण व सर्वेक्षण
५) संपर्क तुटणाऱ्या गावात आरोग्य कर्मचाऱ्यांना मुख्यालयी ठेवणे.
६) प्रभावी सनियंत्रण व पर्यवेक्षण
७) पिण्याच्या पाण्याच्या शुध्दिकरणासाठी मेडीक्लोअर व ब्लिचिंग पावडरचा पुरवठा
८) उपकेंद्र स्तरावर कौटुंबिक जागृती मोहिम
९) ग्रामीण रुग्णालयात पेडीयाट्रीक आय.सी.युची स्थापना
१०) बोको पेटीचा वापर
११) प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वॉर्मरुमची व्यवस्था (..४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

१२) ग्रामीण रुग्णालयात बालरोग तज्ञ/स्त्रीरोग तज्ञांच्या सेवा
१३) प्रसिध्दी व जनजागृती

सोलापूर व औरंगाबाद या बिगर आदिवासी जिल्ह्यामध्ये खालील योजना राबविण्यात येतात :-

१) ० ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांची तिमाही तपासणी करण्यात येते.
२) ० ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालके श्रेणी ३ व ४ मध्ये जाणार नाहीत याची विशेष काळजी घेतली जाते.
३) ० ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांची बालरोग तज्ञांकडून तपासणी व उपचार केले जातात. तसेच सतत ३ महिने वजनात घट वा वाढ न होणाऱ्या बालकांची प्रत्येक महिन्यात बालरोग तज्ञामार्फत तपासणी करण्यात येते.
४) गंभीर व दुर्धर आजारी बालकांना आवश्यकतेनुसार संदर्भसेवा दिली जाते.
५) गर्भवती माता व स्तनदा मातांसाठी आरोग्य तपासणी, आहार व आरोग्य शिक्षण दिले जाते.
६) ० ते ६ वर्ष वयोगटातील बालके आणि गरोदर माता यांच्यासाठी आरोग्य सेवा सत्र व लसीकरण सत्र आयोजित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये थोडीशी दुरुस्ती आहे. दोन क्रमांकाच्या उत्तरामध्ये "गडचिरोली जिल्हयासाठी जून 2006 व 20 जून 2006 रोजी पल्स पोलिओच्या धर्तीवर" असे म्हटले आहे त्याऐवजी "दि.20 जून,2006 ते 27 जून,2006 असे वाचावे."

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मागे ज्यावेळी हा प्रश्न आला होता, त्यावेळी जे उत्तर दिले होते, त्याचप्रमाणे आताही उत्तर दिलेले आहे. कुपोषणामुळे मृत्यू झालेले नाहीत असे आपण म्हणत आहात. यासंदर्भातील आकडेवारी माझ्याकडे आहे. तसेच, वृत्तपत्रातील कुपोषित बालकांचे आकडेही माझ्याकडे आहेत. आज हा आकडा लाखोंच्या वर गेलेला आहे. याबाबतीत माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, कुपोषणामुळे मृत्यू झाले नसतील तर ते कशामुळे इ ाले ? व याची कारणे काय ? तसेच, आत्तापर्यंत याबाबतीत किती मृत्यू झाले ?

नंतर श्री.रोझेकर...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.19650 पुढे सुरु.....</u>

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मराठवाडा विभागाची आकडेवारी विचारली आहे. माझ्याकडे औरंगाबादची आकडेवारी आहे. न्युमोनियामुळे 5, हायपोथेरिया 4, डायरिया 6, जॉईंडिस 4, हार्ट डिसिज 1 अशा प्रकारे मृत्यू झालेले आहेत.

सभापती : मंत्रीमहोदय आपण जे उत्तर देत आहात ते बरोबर आहे. प्रश्न 4 जिल्हयांपुरता विचारलेला आहे, त्याची माहिती आपण द्यावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रिमॅच्युअर 14, लो-ब्लड प्रेशर 23, एक्सपेसिया 7 आणि इतर कारणांमुळे 10 अशा प्रकारे मृत्यू झालेले आहेत.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी मृत्युची कारणे सांगितली आहेत. माझा प्रश्न असा आहे की, कुपोषणामुळे बालकांची प्रतिकारक्षमता कमी झाली व त्यामुळे त्यांना मृत्यू आला, हे खरे आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शक्यता नाकारता येणार नाही.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मंत्रीमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जर मंत्रीमहोदयांकडे परिपूर्ण माहिती नसेल तर हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, औरंगाबाद येथे जे बालमृत्यू झाले त्यामध्ये कुणीही बालक कुपोषित नव्हते. जे बालक कुपोषित होते त्यांचा मृत्यू झालेला नाही. ग्रेड 3 व ग्रेड 4 चे रुग्ण नव्हते. गडचिरोलीमध्ये जे बालमृत्यू झाले त्यामध्ये काही बालके कुपोषित होती. औरंगाबादमध्ये जे बालमृत्यू झाले त्यामध्ये मालन्युट्रिशन नव्हते. मात्र, गडचिरोली आणि यवतमाळमध्ये जे मृत्यू झाले त्यामध्ये काही बालके कुपोषित होती

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदय स्वत:चेच स्टेटमेंट कॉंट्रॅडिक्टरी करीत आहेत. रोग प्रतिकारक्षमता कमी झाल्यामुळे बालकांचा मृत्यू झाला का ? असे विचारले असता मंत्रीमहोदयांनी सांगितले की, काही बालकांचा झाला. त्यामुळे बालकांमध्ये कुपोषणामुळे फायटिंग स्पिरिट नव्हते हे त्यांनी मान्य केले आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी असे कबूल केलेले नाही.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

<u>ता.प्र.क्र.16650 पुढे सुरु.....</u>

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आवश्यकता असेल तर रेकॉर्ड काढून तपासावे, मंत्रीमहोदय तसेच बोलले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, गडचिरोली व यवतमाळ या जिल्हयांमध्ये बालमृत्यू किती झाले ? या जिल्हयांमध्ये ग्रेड 3 व ग्रेड 4 ची मुले किती होती ? राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन ही संस्था शासनाने निर्माण केली आहे. या संस्थेचा अहवाल हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला सादर करण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रेड 3 चे गडचिरोली जिल्हयामध्ये 1042 व यवतमाळ जिल्हयामध्ये 1443 व ग्रेड 4 चे गडचिरोली जिल्हयामध्ये 134 व यवतमाळ जिल्हयामध्ये 123 बालके होते. तसेच बालमृत्यू ग्रेड 3 व 4 मध्ये 37/37 एवढे झाले होते. त्याचप्रमाणे राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनचा अहवाल पुढच्या अधिवेशनात सभागृहाला सादर करण्यात येईल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19650 .....

श्री.रणजित कांबळे .....

सभापती महोदय, तपासणी सुरु आहे. महिला व बाल विकास विभागाकडून आमच्याकडे आल्यानंतर अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

सभापती : राज्यमंत्री पुढच्या अधिवेशनामध्ये म्हणतात, त्या ऐवजी 2 महिन्यांमध्ये करण्याचा प्रयत्न करावा.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, कुपोषणामुळे बालमृत्यू झालेले नाहीत, इतर कारणामुळे झालेले आहेत, असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्या आजारामुळे हे बालमृत्यू झाले त्या आजारासंबंधी कोणती काळजी घेण्यात आली होती ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बालमृत्यू संदर्भात नेमण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीच्या किती बैठका झाल्या ? त्यामध्ये कोणते निर्णय झाले आणि त्याची अंमलबजावणी झाली का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, बालमृत्यूच्या संदर्भात कोणती काळजी घेण्यात आली होती असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. कॉज ऑफ डेथ संदर्भात राज्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. ग्रेड 3 आणि 4 च्या बालकांना आपण रुग्णालयामध्ये ॲडमिट करतो. आदिवासी भागामध्ये नवसंजीवनी योजना प्रकल्प राबविण्यात येतो. त्यामध्ये बालकांना ॲडमिट करुन त्यांना ट्रिटमेंट दिली जाते. न्युमोनिया, डायरिया जे कॉजेस असतील त्याप्रमाणे ट्रिटमेंट दिली जाते. तसेच, जे पालक त्यांच्या सोबत असतात त्यांना दोन वेळचा आहार आपण मोफत देत असतो, अशा प्रकारची काळजी आपण घेत असतो. सन्माननीय सदस्यांनी बालमृत्यू संदर्भात नेमण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीच्या संदर्भात प्रश्न विचारला. बालमृत्यूच्या संदर्भातील समितीचे दोन्ही अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. ॲक्शन टेकन रिपोर्टच्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, कुटुंब कल्याण विभागामध्ये ॲडीशनल डायरेक्टरचा वेगळा विभाग आहे. मी स्वत:या तीन बैठका घेतलेल्या आहेत. डायरेक्टर प्रत्येक महिन्याला बैठक घेत असतात. त्याच प्रमाणे राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन, नवसंजीवनी प्रकल्प 5 जिल्हयांमध्ये राबविले जातात.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19650 .....

डॉ.विमल मुंदडा .....

टप्प्याटप्प्याने उर्वरित 15 आदिवासी जिल्यांमध्ये आपण ते प्रकल्प राबविणार आहोत. संपूर्णत: महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या जन्म आणि मृत्यूची नोंद केली जाते आणि ॲक्शन टेकन रिपोर्ट तयार केला जातो. बालमृत्यूच्या आणि कुपोषणाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने चांगल्या पद्धतीने यंत्रणा निर्माण केली आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "कुपोषणामुळे मृत्यू झाले नसून कमी वजन, अपु-या दिवसाचे जन्म, न्युमोनिया, जंतूसंसर्ग इत्यादी कारणांनी झालेले आहेत." माझा पहिला प्रश्न असा आहे की, कमी वजन, न्युमोनिया, जंतूसंसर्गामुळे मृत्यू झालेले आहेत, तर यासंदर्भात आपण कोणती उपाययोजना करणार आहात ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गडचिरोलीमध्ये आपण एन.आय.सी.यु. युनीट तयार केले आहे. कमी वजनाची मुले झालेली आहेत म्हणून आपण तेथे इन्कुबिटरची व्यवस्था करणार आहात काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, विविध पद्धतीच्या योजनांमध्ये गडचिरोलीमध्ये जिल्हयाच्या ठिकाणी एकच एन.आय.सी.यु. युनीट आहे. बाकीच्या ठिकाणी थरमॉकॉलचे बॉक्स दिलेले आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी प्री मॅच्युअर बर्थ व नवजात बालकांची काळजी घेतली जाते. गडचिरोलीमध्ये एन.आय.सी.यु. युनीट आहे. तसेच, आर.एच. बद्दलची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवते.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.19650 ....

श्री. धनाजी साठे : सभापती महोदय, सोलापूर जिल्ह्यामध्ये एकंदर किती बालमृत्यू झाले आहेत आणि त्यामध्ये श्रेणी 3 व 4 मधील बालकांची संख्या किती आहे ? दुसरा प्रश्न म्हणजे 'कमी वजन' असा उल्लेख या उत्तरात केलेला आहे त्याचा अर्थ काय आहे ? तसेच सोलापूर सारख्या प्रगत जिल्ह्यामध्ये कुपोषण होऊन बालके श्रेणी 3 व 4 मध्ये जाण्याची कारणे काय आहेत?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, कुपोषण हा एक सामाजिक विषय देखील आहे. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक अशी वेगवेगळी कारणे यामागे आहेत. यातील मुख्य कारण असलेल्या बालविवाहाचे प्रमाण कमी करण्याचा आपला प्रयत्न आहे. त्यातून अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. लौकर लग्न झाले की त्या स्त्रीला लवकर मुले होणार आणि अशा 70 टक्के स्त्रियांमध्ये ॲनिमियाचे प्रमाणे मोठे असते. या शिवाय आपण पल्स पोलिओ सारखे कार्यक्रम देखील घेतले आहेत. नुकताच 20 व 27 जून रोजी त्यासाठीचा कार्यक्रम आपण राबविला आहे. तसेच जंतूसंसर्ग होतो म्हणून तो होऊ नये यासाठी देखील आपण दक्षता घेत असतो. लहान वयामध्ये लग्न व मुले होत असल्याने स्त्रियांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण मोठे असते त्यासाठीच आपण सुदृढ माता होण्यासाठी गर्भवती माता व स्तनदा मातांसाठी आरोग्य तपासणी, आहार व आरोग्य शिक्षण देण्याची योजना राबवित आहोत. त्यावेळी प्रसूतीनंतरची काळजी देखील चांगल्या पद्धतीने घेतली जावी याचेही शिक्षण देतो. अशा प्रकारे व्यापक कार्यक्रम आपण घेतलेला आहे. जेणे करून भविष्यात कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे. थोडक्यात सांगावयाचे तर हा विषय शासनाने गांभीर्याने घेतला असून त्यासाठी आरोग्य पोषण मिशन सुरू केले आहे.

सभापती : या प्रश्नावर उपप्रश्न विचारण्यास उत्सुक असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आता या प्रश्नावर आपल्याला अधिक वेळ देता येणार नाही तेव्हा या विषयावर अर्धा तास चर्चा मात्र मी जरूर दाखल करून घेईन. तेव्हा आता मी पुढील प्रश्न चर्चेला घेतो.

****

..... एलएल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

छत्तीसगड येथील राय विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठात सामावून घेणेबाबत

(3) * 17538 मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सर्वोच्च न्यायालयाने छत्तीसगडमधील खाजगी विद्यापीठ कायदा रद्दबातल ठरविल्यानंतर मान्यता काढून घेण्यात आलेल्या राय विद्यापीठाच्या 1,300 विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठात सामावून घेण्याबाबत दिनांक 24 एप्रिल, 2006 वा त्या सुमारास विद्यार्थ्यांनी आझाद मैदानात धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत राय विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(3) सन 2006-2007 चे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सदर विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न तडीस लावणार आहे काय,

(4) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(5) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (1), (2), (3), (4) व (5) तत्कालीन राय विद्यापीठाच्या मुंबई येथील अभ्यासकेंद्रातील विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण होण्याच्यादृष्टीने मार्ग काढण्यासाठी दिनांक 24 एप्रिल, 2006 रोजी आझाद मैदान येथे धरणे आंदोलन केले होते.

सदर समस्येतून मार्ग काढण्यासाठी मुंबई विद्यापीठाकडून अहवाल मागविण्यात आला होता. तथापि मुंबई विद्यापीठाने राय फाऊंडेशन या संस्थेस संलग्नीकरण देण्याबाबत असमर्थता व्यक्त केली. यासंदर्भात मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचेकडे दिनांक 27/4/2006 व दिनांक 3/5/2006 रोजी दोन बैठका आयोजित केल्या. बैठकीत ठरल्याप्रमाणे छत्तीसगड येथील पंडित रविशंकर शुक्ल विद्यापीठास सदर विद्यार्थ्यांच्या परीक्षा मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने घेण्याबाबत विनंती करण्यात आली. तथापि सदर विद्यापीठाने विनंती मान्य केली नाही.

या विद्यार्थ्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मा.राज्यमंत्री उच्च व तंत्रशिक्षण यांचेकडे दिनांक 6 जून, 2006 रोजी बैठक झाली. या बैठकीत ठरल्याप्रमाणे राय फाऊंडेशन या संस्थेकडून संस्थेला एकवेळ मान्यता मिळण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे प्रस्ताव प्राप्त झाला आहे व विद्यापीठ सदर प्रस्तावाची तपासणी करीत आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, या प्रश्नावरून मोठे प्रश्न समोर येतात. आपल्या राज्यामध्ये अनेक खाजगी विद्यापीठे, परदेशातील विद्यापीठे देखील जाहिराती देऊन मुलांना एन्रोल करतात पण नंतर त्यांना परीक्षा देता येत नाही अशी परिस्थिती निर्माण होते. आता या केसमध्ये देखील असेच झालेले आहे. जवळपास 1300 विद्यार्थी राय विद्यापीठाच्या मुंबई अभ्यास केंद्रात होते, पण सुप्रीम कोर्टाने राय विद्यापीठाची मान्यताच रद्द केल्याने त्यांना परीक्षा देता आल्या नाहीत. त्यामुळे अशा घटना पुन्हा पुन्हा घडू नयेत यासाठी शासनाने काय उपाय योजना केली आहे वा

..... एलएल 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत (पुढे चालू...) ता.प्र.क्र.17538 ...

करीत आहे आणि या 1300 विद्यार्थ्यांना लवकरात लवकर परीक्षेला बसविण्यासाठी शासन काय करणार आहे ? मुंबई विद्यापीठाने या विद्यार्थ्यांना परीक्षा घेण्यासाठी नाकारले आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे दोन प्रश्न विचारले आहेत. राय विद्यापीठामार्फत या मुंबईमध्ये जे अभ्यासकेंद्र चालविण्यात येत होते. पण त्या राय विद्यापीठाची मान्यता सुप्रीम कोर्टानेच रद्द केल्यानंतर खरा प्रश्न यातून निर्माण झालेला आहे. या राय विद्यापीठामार्फत जे विद्यार्थी या राज्यामध्ये शिकत होते त्या सर्व 1082 विद्यार्थ्यांचे भवितव्य अंध:कारमय झालेले आहे. या संदर्भात छत्तीसगड राज्याने अशी खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता आणि असे विद्यापीठ स्थापन केल्यानंतर त्या विद्यापीठाची अभ्यास केंद्रे बाकीच्या राज्यांमध्ये स्थापण्याचा निर्णय घेतला. त्यात परदेशी विद्यापीठे देखील आपल्याकडे येत आहेत. त्यातील अभ्यासक्रम शिकवायचे असतील तर त्या विद्यापीठांनी आपल्या राज्याच्या कायद्यानुसार, महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील कलम 6 नुसार आपल्या विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु हे विद्यापीठ रद्द केल्यानंतर, न्यायालयानेच तसा निर्णय दिल्यानंतर छत्तीसगड राज्यातील जे विद्यार्थी होते त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून त्या राज्यातील पं.रविशंकर शुक्ल विद्यापीठाला या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यासाठी सूचना केली आणि त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... एमएम 1 ...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

ता.प्र.क्र. 17538...

श्री. दिलीप वळसे पाटील...

या राज्यातील विद्यार्थ्यांच्या संदर्भात हा प्रश्न सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चेस आला. त्यावेळी या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जसा कायदा रद्द केला त्याप्रमाणे संलग्नीकरणाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, ज्या कार्यक्षेत्रामध्ये ही मुले शिकतात त्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठांनी त्यांच्या परीक्षेची व्यवस्था करावी. परंतु त्यांनी मुंबई विद्यापीठाकडे यासंबंधी अर्ज केल्यानंतर मुंबई विद्यापीठाने त्यांच्या अर्जाला नकार दिला. आणि तो दिल्यानंतर त्यामधील काही मुले उपोषणाला बसली, काही वेगवेगळया पक्षांच्या नेत्यांना भेटले. या संदर्भात दि.27.4.2006 रोजी माझ्या स्तरावर एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीला मुंबई विद्यापीठांचे प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी व पालक आणि राज्य सरकारचे प्रतिनिधी हजर होते. त्यांचेबरोबर चर्चा केल्यानंतर तीन-चार पर्यायाचा विचार करण्यात आला. त्यामध्ये पहिला पर्याय असा की, या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी छत्तीसगढ विद्यापीठाशी संपर्क साधून त्यांना विचारण्यात आले की, या विद्यार्थ्यांचे ॲडमिशन तुम्ही करावे, आणि त्यांची परीक्षा घेण्याचे काम महाराष्ट्रामध्ये मुंबई विद्यापीठामार्फत करण्यात येईल. दुसरा पर्याय अे.आय.सी.टी.ई. च्या अधीन राहून या स्टडी सेंटरला संलग्नीकरण द्यावे. तिसरा पर्याय मुंबई विद्यापीठामार्फत डिस्टन्स एज्युकेशनचा कार्यक्रम राबविला जातो. त्या कार्यक्रमामधून या विद्यार्थ्यांची सोय करता येईल कां ते पहावे. आणि चौथा पर्याय यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांची परीक्षा घेण्यात येईल कां ते पहावे. मुंबई विद्यापीठाने अशी भूमिका घेतली की, हे विद्यार्थी वेगवेगळया फॅकल्टीजमध्ये शिक्षण घेत होते. त्यामधील अनेक कोर्स मुंबई विद्यापीठामध्ये नाहीत. परंतु त्यांची टर्म पूर्ण करण्याचा प्रश्न असल्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला विनंती केली. आणि त्यामुळे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने डिस्टन्स एज्युकेशनच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांच्याकरिता वेगळे कोर्सेस कंडक्ट करुन त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याचा विचार करता आला तर करावा अशाप्रकारची विनंती यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला केली. त्याकरिता दिनांक 24 जुलै 2006 रोजी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कॉन्सिलची बैठक होणार आहे, त्यामध्ये या संबंधी विचार करण्यात येईल असे त्यांनी कळविले आहे. मुंबई विद्यापीठाने या विद्यार्थ्यांच्या परिक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

घेण्यासाठी त्यांना ॲडमिट करुन घेऊन त्यांचे एन्रोल करण्याबाबत पूर्णपणे समर्थता दाखविली आहे.

श्री. जी.एल. अैनापूरे : सभापती महोदय, या राज्यामध्ये जेव्हापासून ही खाजगी विद्यापीठे सुरु झाली तेव्हापासून हे सर्व प्रकार होणार असल्याचे आपण गृहीत धरावयास हवे होते. या देशामध्ये अनेक युनिव्हर्सिटीज येणार आहेत. त्यामध्ये या राय युनिव्हर्सिटीने वर्षभर मोठया प्रमाणावर प्रचार केला, बॅनर लावले, आणि त्यामधून विद्यार्थ्यांकडून लाखो-करोडो रुपये जमा केले. त्यावेळी या विद्यापीठाच्या कार्यपध्दतीबाबत संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यांनी प्रवेश दिलेल्या फक्त 1800 विद्यार्थ्यांचा हा प्रश्न नाही तर अशा हजारो विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये गोळा करण्यात आले आहेत. अशा अनेक युनिव्हर्सिटीनी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांची सोय करण्याची प्रथा आपण सुरु केली तर त्यांची सोय करणे एवढेच आपले काम राहिल. तेव्हा अशाप्रमारे मोठया प्रमाणात जाहिरात करुन या शिक्षण संस्था अस्तित्वात येत आहेत त्यांचा आपण शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र शासन स्वत:च्या अधिकारामध्ये कायदा करणार आहे काय?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, आज शिक्षणाचा झपाटयाने विस्तार होत आहे. त्यामध्ये फक्त विद्यापीठामार्फत शिक्षण दिले जाते असा प्रश्न नाही. आज गॅट करारानंतर शिक्षण क्षेत्र सर्व्हिस सेक्टरमध्ये गेले असल्यामुळे जगातील अनेक विद्यापीठे आपली ब्रँच दुसऱ्या देशामध्ये सुरु करावयास लागले आहेत आपल्या देशामधील विद्यापीठामध्ये स्टडी सेंटर काढावयास लागले आहेत. आज या देशामध्ये, या राज्यामध्ये बाहेरच्या एखाद्या परदेशी विद्यापीठाने किंवा राज्यातील विद्यापीठांने येण्याच्या संदर्भात सेक्शन 6 मध्ये तरतूद आहे. परदेशातील शिक्षण संस्थांनी या राज्यामध्ये येऊन नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याचे काम सुरु केले आहे त्यासंबंधी माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17538 (पुढे सुरु...

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

दुसरा प्रश्न असा की सगळेच लोक विद्यापीठाच्या मार्फत शिक्षण देतात असे नाही. अनेक शैक्षणिक संस्था ॲटोनॉमस कोर्सेस अे.आय.सी.टी.ई,.यु.जी.सी., विद्यापीठाची मान्यता नसतानाही कोर्सेस चालवितात. पुणे येथे ज्ञानेश्वर विद्यापीठ आहे, त्यास कोणाचीही मान्यता नाही. त्या ठिकाणी ॲटोनॉमस कोर्सेस चालतात, 100 टक्के प्लेसमेंट होते. अनेक शैक्षणिक संस्था अशा आहेत की, स्वत: ॲटोनॉमस कोर्सेस चालवितात. त्या ठिकाणी असलेल्या कोर्समध्ये 300 जागा असतील तर त्यासाठी 10 हजार अर्ज येतात. अशा परिस्थितीमध्ये उद्या मोठ्याप्रमाणावर विद्यापीठे किंवा अशाप्रकारच्या शैक्षणिक संस्था ज्यावेळेला आपल्या राज्यात येतील, त्यावेळेला या सगळया संस्थांची नोंदणी शासन स्तरावर करावी, की नाही, याबाबत राज्य सरकारने विचार सुरु केलेला आहे. दुसरे असे की आपण विशिष्ट कायदा केला आणि त्यामध्ये त्यांचा सहभाग घ्यायचे ठरविले, परदेशी संस्था या राज्यात आल्यानंतर त्याची नोंद सरकारने घेतली तर ते महाराष्ट्र सरकारची मान्यता प्राप्त आहे, अशाप्रकारचे बोर्ड लावतील. त्या शैक्षणिक संस्थेमध्ये काही गडबड झाली, घोटाळे झाले, शिक्षणाच्या दर्जा संबंधीचे प्रश्न निर्माण झाले तर निश्चित प्रकारे त्यामध्ये अडचणी निर्माण होतील. म्हणून मी या द्विधा मन:स्थितीत आहे. बाहेरच्या राज्यातून येणारी विद्यापीठे किंवा शैक्षणिक संस्था या राज्यामध्ये नियंत्रण करण्याच्या संदर्भात, त्यांची नोंदणी करण्याच्या संदर्भात शासनाचा कंट्रोल असण्यासाठी नव्याने कायदा करण्याबाबत विचारविनिमय सुरु केलेला आहे. त्यासंबंधीचा ड्राफ्ट तयार केलेला आहे. या क्षेत्रातील अन्य लोकांशी चर्चा करुन, How to regulate these educational institutions या संदभामध्ये विचार करत आहोत. निश्चित प्रकारे या सभागृहातील सन्माननीय सदस्य आणि विधानसभेतील सन्माननीय सदस्यांशी चर्चा करुन या संबंधातील कंट्रोल कसा करायचा ? याबाबतचे मत घेतले जाईल. लोक शैक्षणिक गुंतवणूक करायला लागलेले आहेत. त्यांना बाजूला ठेवता येणार नाही. त्यांच्यावर नियंत्रण कसे करायचे, या संदर्भात राज्य सरकारच्या स्तरावर विचार सुरु आहे. त्याबाबत राज्य सरकार लवकरच निर्णय घेईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विद्यापीठ कायद्या अंतर्गत खाजगी विद्यापीठे आपल्या राज्यामध्ये सुरु करावयाची असतील तर आपल्या विद्यापीठाची परवानगी, अनुमती ही कायद्याच्या कलम 6 अंतर्गत घेणे आवश्यक आहे. राय विद्यापीठाने मुंबई विद्यापीठाकडे अशाप्रकारची परवानगी मागितलेली होती काय ? मागितली असेल तर मुंबई विद्यापीठाने त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.17538 (पुढे सुरु...

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

परवानगी दिलेली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, राय फाऊंडेशनने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठविला असल्याचे सांगण्यात आले. मी या सभागृहाचा सदस्य म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर सदस्य म्हणून आहे. 10 जून रोजी बैठक झाली, त्यावेळेला अशाप्रकारचा प्रस्ताव आलेला नव्हता. परंतु 24 जुलैला अशाप्रकारचा प्रस्ताव येण्याची शक्यता आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, मुंबई विद्यापीठाने त्यांना मान्यता दिली की नाही, मान्यता दिली नसेल तर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे त्यांचा प्रस्ताव पाठविण्याचे कारण काय आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राय फाऊंडेशनचे स्टडी सेंटर या राज्यामध्ये सुरु झालेले आहे. त्यांनी राज्य सरकारची किंवा मुंबई विद्यापीठाची कोणतीही परवानगी घेतलेली नव्हती. म्हणूनच प्रश्न निर्माण झालेला आहे की, एखाद्या शैक्षणिक संस्थेला अभ्यासक्रम सुरु केला आणि काही अनियमितता झाली, चुकीचे काही झाले तर विद्यार्थ्यांचा प्रश्न निर्माण होतो. त्या संदर्भात भावना तयार होतात.

यानंतर श्री.बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आज सुध्दा हाच प्रश्न मांडला जातो की, राय फाऊंडेशन कदाचित बाहेरचे असेल, कदाचित संस्थाचालक चुकले असतील परंतु मुले आपली आहेत, आपल्या मुलांसाठी काही करणार की नाही ? ही या राज्यातील मुले आहेत. मुक्त विद्यापीठांची स्थापनाच यासाठी झालेली आहे की, ज्या लोकांना कधी शाळेमध्ये, कॉलेजमध्ये जाण्याची संधी मिळाली नाही त्यांना डिस्टन्ट एज्युकेशनच्या माध्यमातून मुक्त विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळावी. त्या ठिकाणी वयाची अट नाही. रेग्युलर युनिव्हर्सिटीमध्ये टर्म भरण्याचा प्रश्न असतो. मुक्त विद्यापीठामध्ये टर्म भरण्याचा प्रश्न राहात नाही. त्या ठिकाणी प्रवेश मिळाल्यानंतर सिलॅबल पूर्ण केल्यानंतर, परीक्षा पास केल्यानंतर 50 वर्षाच्या किंवा 60 वर्षाच्या ज्येष्ठ व्यक्तींना सुध्दा विद्यापीठ पदवी देऊ शकते. ही व्यवस्थाच यासाठी करण्यात आलेली आहे. या सगळ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, विद्यार्थ्यांना कोठे तरी शिक्षणाची संधी मिळावी हा यामध्ये उद्देश आहे. मी याबाबत बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशनला सांगितले की, या विद्यार्थ्यांसाठी काय करता येईल ? नवीन कोर्सेस डिझाईन करता येतील काय ? याबाबतीत सुध्दा भूमिका मांडली. कोणाच्या ऊरावर किंवा शिरावर देण्याचा प्रश्न नाही. ही मुले आपली आहेत. त्यांचे जीवन अंध:कारमय होऊ नये यासाठी शेवटच्या मिनिटापर्यंत जे प्रयत्न होऊ शकतात ते करुन या सिस्टीममध्ये सामावून घेण्याबाबत शासन विचार करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथील मेयो रुग्णालयाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रस्ताव

(४) * १८७१२ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मेयो रुग्णालयाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने फेरप्रस्ताव मंत्री मंडळाच्या पायाभूत सुविधा नियंत्रक समितीच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे काय वा कधीपर्यंत सादर करण्यांत येणार आहे,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास कधीपर्यंत मंजुरी मिळणार आहे वा मंजुरी मिळालेली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाची प्रत्यक्षात कधीपासून कामास सुरुवात होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : (१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाच्या प्रस्तावाशी निगडीत असलेल्या वित्त, नगरविकास व नियोजन विभागाचे प्रस्तावावरील अभिप्राय प्राप्त झाले आहेत. या अभिप्रायांवर विभागाची भूमिका स्पष्ट करुन विषयांकित प्रकरणीचा सुधारित प्रस्ताव मंत्री मंडळाच्या पायाभूत सुविधा समितीपुढे निर्णयार्थ ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही लवकरच करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) वरील प्रस्तावातंर्गत वेग-वेगळ्या पर्यायावर विचार होणार असल्याने मंजूरीकरीताच्या कालावधीबाबत आताच सांगता येणे शक्य नाही. परंतु याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही प्राथम्याने करण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये प्रश्न असा विचारलेला आहे की, नागपूर मेयो रुग्णालयाचे आधुनिकीकरण करण्याचा प्रकल्प व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने फेरप्रस्ताव मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा नियंत्रक समितीच्या निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे काय वा कधी पर्यंत सादर करण्यात येणार आहे ? या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, आधुनिकीकरणाच्या प्रस्तावाशी निगडीत असलेल्या वित्त, नगरविकास व नियोजन विभागाचे प्रस्तावावरील अभिप्राय प्राप्त झाले आहेत. या अभिप्रायांवर विभागाची भूमिका स्पष्ट करुन विषयांकित प्रकरणीचा सुधारित प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीपुढे निर्णयार्थ ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही लवकरच करण्यात येत आहे. सभापती महोदय, हे प्रकरण बऱ्याच दिवसांपासून चालू आहे. यामध्ये तीन चार विभागांचा संबंध आहे. नगरविकास, वित्त आणि नियोजन विभागांनी आपल्याला कोणते अभिप्राय दिलेले आहेत ? जो सुधारित प्रस्ताव आपण प्रायाभूत सुविधा समितीसमोर ठेवणार आहात तो प्रस्ताव तयार झाला आहे काय ? प्रस्ताव तयार झाला असल्यास मंत्रिमंडळासमोर कधी ठेवणार ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र. 18712 .....

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, नागपूर येथील मेयो रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाचा विषय बरेच दिवस चालू आहे. त्याची प्राथमिक मान्यता 25.3.2003 ला त्या काळामध्ये शासनाने दिलेली आहे. त्याला जवळपास 190 कोटी रुपये खर्च येणार आहे. ही मान्यता दिल्यानंतर त्यातून एक बेसिक स्किम दिली होती. मेयो हॉस्पिटलची 39 एकर जमीन आहे. 190 कोटी रुपये आपण राज्याच्या बजेटमध्ये उपलब्ध करुन देऊ शकत नसल्यामुळे त्या ठिकाणी असलेल्या जमिनीचा उपयोग करुन, त्यातील काही जमिनीमध्ये कमर्शियल बांधकाम करावे आणि त्या बांधकामामधून येणाऱ्या रिटर्नमधून मेयो हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजच्या संदर्भात काही सुविधा निर्माण कराव्या. यासंदर्भात मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. नागपूर एन.आय.टी.ची एजन्सी म्हणून नेमणूक केली. या सगळ्या प्रकरणाची ज्यावेळी छाननी केली किंवा नव्याने अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, ज्या पध्दतीचे कमर्शियल बांधकाम त्या ठिकाणी होणार आहे आणि ज्या पध्दतीचे बांधकाम करुन मिळणार आहे आणि त्यातून शासनाला येणारा जो परतावा आहे किंवा हॉस्पिटलला येणारी जी परताव्याची रक्कम आहे ती कमी आहे. त्यामुळे याबाबत पुन्हा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे असे वाटले म्हणून या प्रकरणाच्या संदर्भात ज्यावेळी पुनर्विचार केला. सगळ्या शक्यता तपासून पाहिल्यानंतर ज्यासाठी मंत्रिमंडळाकडे जाऊन प्रस्तावाला मान्यता दिलेली होती त्यामध्ये तो विकासक जास्त काही देऊ शकणार नाही अशी भूमिका स्पष्ट झ ाल्यानंतर

यानतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासंदर्भात नागपूर शहरातील एफएसआयचा विचार करता पाहिजे तेवढे रिटर्न मिळत नाही. त्यामुळे ही विशेष बाब करावी यासाठी राज्य शासनाकडे जाण्याची भूमिका घेतली. याबाबतीत राज्य सरकारने 2 एफएसआय दिला तर जास्त उत्पन्न येईल. सुरुवातीला केवळ इमारतीचाच विचार करण्यात आला होता. त्या इमारतीसाठी लागणारे फर्निचर, इक्वीपमेंट यांचा विचार करण्यात आलेला नव्हता. जेव्हा मी या विभागाचा कार्यभार स्वीकारला त्यावेळी हा परिपूर्ण प्रकल्प करावा अशा प्रकारच्या सूचना दिल्या. याबाबतीत माझ्या स्तरावर तीन बैठका झालेल्या असून माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर एक बैठक झालेली आहे. कॅबिनेट नोट तयार झालेली आहे. मुख्य सचिवांच्या स्तरावर हा प्रस्ताव आहे. महिन्याभरामध्ये हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवून अंतिम निर्णय घेतला जाईल.

डॉ. दीपक सावंत : हे मेयो हॉस्पिटल सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटल व्हावे यासाठी मागील दोन-तीन अधिवेशनामध्ये सातत्याने प्रश्न विचारण्यात येत आहेत. तेव्हा खास बाब म्हणून हा प्रस्ताव संमत करुन एका ठराविक मुदतीमध्ये इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात येणार आहे काय?

श्री. दिलीप वळसे-पाटील : याबाबतीत अंतिम निर्णय मंत्रिमंडळाने घ्यावयाचा आहे. प्रस्ताव घेऊन मंत्रिमंडळापुढे जाण्याची विभागाची जबाबदारी आहे. कॅबिनेट नोट तयार झालेली आहे. एक-दोन आठवडयात मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव जाईल.

डॉ. दीपक सावंत : प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेतला जाईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : हा प्रकल्प होऊ नये अशी कोणाचीही इच्छा असणार नाही. राज्याने प्रयत्न केल्यामुळे केन्द्र सरकारकडून 100 कोटी रुपये मिळालेले आहेत. राज्यामध्ये जे.जे. रुग्णालय हे ऐम्सच्याधर्तीवर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. विदर्भ, मराठवाडा या भागातील गरीबांसाठीही अशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने मंत्रिमंडळ योग्य तो निर्णय घेईल.

डॉ. एन.पी.हिराणी : मेयो हॉस्पिटलच्या आधुनिकीकरणाचा विषय हाती घेतल्या बद्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. त्याठिकाणी जे जुने हॉस्पिटल आहे त्याठिकाणी कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा आणि स्टाफ नाही. त्यामुळे त्याठिकाणी सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल सुरु झालेले नाही. तेव्हा जे जुने हॉस्पिटल आहे त्या ठिकाणी शासन सोयीसुविधा आणि स्टाफ उपलब्ध

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करुन देणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबईतील जे.जे.हॉस्पिटल हे अेम्सच्या धर्तीवर करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाणी आहे. तेव्हा जुने मेडिकल कॉलेज हे सुपरस्पेशॅलिटी आणि अेम्सच्या धर्तीवर करण्याबाबत शासन प्रयत्न करणार आहे काय ?

...नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.हिराणी यांनी अनेक महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. ही बाब खरी आहे की, आज मेडिकल कॉलेज आणि इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये अनेक जागा रिक्त आहेत. या जागा रिक्त असण्याचे कारण राज्याची असलेली आर्थिक परिस्थिती हे आहे. या सगळया पदांचा घेत असलेला आढावा आणि वरिष्ठ स्तरावरील जागांची रिक्रूटमेंट करावयाची आहे या संदर्भात मेडिकल एज्युकेशन विभागामध्ये सर्व पदांचा आढावा पूर्ण करण्यात आला असून हा आढावा पूर्ण करुन पब्लिक सर्विस कमिशनकडे रिक्रूटमेंटच्या मागणीचा प्रस्ताव गेलेला आहे. लवकरच राज्यातील सर्व मेडिकल कॉलेजांमध्ये टिचिंग कोर्स आणि नॉन टिचिंग कोर्स रिक्रूटमेंटच्या संदर्भात आपण निर्णय घेत आहोत. पुरवणी मागण्या पाहिल्या तर मेडिकल हेल्थ युनिव्हर्सिटीमध्ये 117 पदांच्या रिक्रूटमेंटसाठी पुरवणी मागणी सादर केलेली आहे. या राज्यातील हॉस्पिटल्स, मेडिकल कॉलेज याठिकाणी चांगल्या सुविधा निर्माण करणे महत्वाचे आहे. ज्यावेळी सुपरस्पेशालिटी म्हणतो त्यावेळेला आज नागपूरचे एखादे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल असेल, पुण्याचे ससून किंवा मुंबईचे जे.जे. हॉस्पिटल याठिकाणी सुपरस्पेशालिटीचे काम व्हावयास पाहिजे. परंतु स्थानिक नगरपालिका किंवा महानगरपालिकांकडून जनरल हॉस्पिटल्सना आवश्यक आहे तेवढी व्यवस्था न केल्यामुळे आता या सगळया सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल्सना जनरल हॉस्पिटलचे काम करावे लागेल. नागपूरच्या संदर्भात नागपूरच्या शासकीय रुग्णालयामध्ये मॅटर्निटी वॉर्डचा विचार केला तर महानगरपालिकेच्या मॅटर्निटी वॉर्डमध्ये लोक जात नाहीत. शासनाच्या हॉस्पिटलमध्ये जमिनीवर गाद्या टाकून रुग्णांना ठेवावे लागते अशी परिस्थिती आहे. यामध्ये नगरपालिका किंवा महानगरपालिकांनी आपापल्या क्षेत्रामध्ये जनरल आरोग्याच्या सुविधा पुरेशा उपलब्ध करुन दिल्या तर विशेष उपचार करण्यासाठी या हॉस्पिटल्सचा उपयोग करावा लागेल. तो अधिक इफेक्टिव्ह करता येईल यासाठी सर्वंकष आराखडा तयार केला आहे. या सगळया हॉस्पिटल्सचे संगणकीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी 180 कोटी रुपये खर्च करीत आहोत. हे सगळे करीत असताना मुंबईमध्ये जे.जे.रुग्णालय एम्सच्या धर्तीवर करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्याच पध्दतीने बाकीच्या ठिकाणी मागणी असली तरी या संदर्भात केंद्र सरकारची भूमिका सुध्दा समजून घेणे गरजेचे आहे. एकाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेळेला एका राज्यामध्ये दोन किंवा तीन हॉस्पिटल्सना पैसे द्यावयास केंद्र सरकार तयार होईल असे मला वाटत नाही. टप्प्याटप्प्याने काम पूर्ण झाले की, दुसऱ्या टप्पयामध्ये दुसऱ्या हॉस्पिटलची मागणी केंद्र सरकारकडे घेऊन जाऊ. निश्चितपणे त्या दृष्टीकोनातून आम्ही प्रयत्नशील राहू.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. खरे म्हणजे 24.3.2003 रोजी मान्यता मिळाली. तेव्हापासून जुलै, 2006 पर्यंत फक्त अभिप्राय मागविणे सुरु आहे. खरे म्हणजे मान्यता मिळाल्यानंतर यासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. वित्त विभाग, नियोजन विभाग किंवा नगरविकास विभागामध्ये प्रकरण फिरत आहे. नगरविकास विभाग आणि नियोजन विभागाने जे अभिप्राय दिले ते काय आहेत?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, हा जो प्रकल्प आहे हा प्रकल्प संपूर्णपणे बीओटी तत्वावर आहे. बीओटी तत्वावर प्रकल्प हाती घेतो तेव्हा त्यामध्ये विकासकाला किती फायदा होतो आणि संस्थेला किती फायदा होतो या दोन गोष्टी महत्वाच्या ठरतात. मी ज्यावेळी या संदर्भात विचारविनिमय केला आणि मला वाटले की, विकासकाला मिळणाऱ्या फायद्यापेक्षा संस्थेला कमी फायदा मिळतो, म्हणून पुनर्विचार करावयास सांगितले. पुनर्विचार केल्यानंतर आता मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव एवढाच जाणार आहे, 1 एफएसआय देतो त्याऐवजी 2 एफएसआय दिला तर कन्स्ट्रक्शन एरिया वाढेल. मग त्यामधून या हॉस्पिटलच्या विकासासाठी आणि मेडिकल कॉलेजच्या विकासासाठी लागणारी इनफ रक्कम उपलब्ध झाली तर डेव्हलपर आणि संस्था या दोघांना फायदा होईल. या गोष्टी अतिशय पारदर्शक पध्दतीने मंत्रिमंडळासमोर सादर करण्यासाठी ही नस्ती नियोजन विभाग आणि वित्त विभागाकडे गेली होती. आता ती नस्ती राज्य मंत्रिमंडळासमोर लवकरच पोहोचेल आणि मंत्रिमंडळ याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

(नंतर श्री.जुन्नरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, नागपूरचे मेयो हॉस्पिटलच्या संदर्भात तसेच इंदिरा गांधी वैद्यकीय रुग्णालयाच्या संदर्भातील आधुनिकतेचा प्रस्ताव शासनाने मंजूर केलेला आहे. मेयो हॉस्पिटलची कमर्शिअल धर्तीवर उभारणी होईल यासंदर्भात वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती, भूमीपूजन सुध्दा करण्यात आले होते असे असतांना मेयो हॉस्पिटलचा पुनर्विचार करण्याची गरज आपल्यला का पडली हा माझा प्रश्न आहे. अगोदर ज्या पध्दतीने ठरले होते त्या पध्दतीने काम का होत नाही? मेयो हॉस्पिटलची दुरावस्था झालेली असल्यामुळे नागपूरच्या जनतेचे, रुग्णांचे हाल होत आहेत. मेया हॉस्पिटलचे मानचित्र नागपूर सुधार प्रन्यासने तयार केले होते, ते वर्तमान पत्रात प्रसिध्द झाले होते, त्याचे भूमीपूजन देखील झाले होते असे असतांना मेयो हॉस्पिटलला विलंब का लागावा ? तसेच या हॉस्पिटलचे काम लवकरात लवकर म्हणजे किती दिवसात काम पूर्ण होणार आहे?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, पूर्वीचा जो आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही. या ठिकाणी प्रश्न फक्त आर्थिक व्हायबिलीटीचा आहे. हा प्रोजेक्ट चांगल्या पध्दतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहे. केवळ इमारत बांधून काम होणार नसून त्या ठिकाणी फर्निचर, इक्वीपमेंट हे सुध्दा लागणार आहे. तसेच या हॉस्पिटलला अगोदर एक एफएसआय होता त्या ऐवजी दोन एफएसआय देण्याच्या संदर्भात निर्णय झालेला आहे. या प्रकल्पाची आर्थिक व्हायबिलीटी मिळविण्याच्या दृष्टीने अधिक विचार झालेला आहे. यासंदर्भात मी पुन्हा पुन्हा आपल्याला सांगितले आहे की, यासंदर्भात 15 दिवसात योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या कुटुंबाच्या याद्या करण्याबाबत

(५) * १७६२९ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , श्री.सागर मेघे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने दिनांक २३ फेब्रुवारी २००६ च्या पत्रान्वये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या याद्यांना ग्रामसभेची मंजूरी घेऊन अंतिम रित्या प्रसिध्द करण्याबाबत कळविले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत कोणकोणत्या जिल्ह्यांच्या याद्यांना ग्रामसभेची मंजूरी घेण्यात आलेली आहे,

(३) बुलढाणा जिल्ह्यातील अशा याद्यांबाबतची सद्य:स्थिती काय आहे व हे काम अपूर्ण असल्यास ते केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) प्रत्येक जिल्ह्यात ग्रामसभानिहाय कार्यवाही सुरु आहे. तक्रारीवर अपिलाची कार्यवाही सुरु असल्याने प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामसभेची नेमकी आकडेवारी देणे शक्य नाही.

तथापी बुलढाणा जिल्ह्यात ग्रामसभेने नामंजूर केलेल्या १०३ ग्राम पंचायतीच्या याद्या, व त्यासंदर्भात ४५,२४२ इतक्या तक्रारी उपविभागीय अधिकारी (महसूल), तहसीलदार यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारींची गावनिहाय चौकशी करण्याचे काम शासनाच्या सूचनेनुसार महसूल विभागामार्फत सुरु आहे. चौकशीचे कामपूर्ण झाल्यानंतर दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या याद्या अंतीम करण्यात येतील.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये थोडी सुधारणा आहे. "103 ग्रामपंचायतीच्या याद्या ऐवजी 62 ग्रामपंचायतीची याद्या" असे वाचण्यात यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न यासाठी विचारला होता की, या राज्यामध्ये जवळपास 40 टक्के लोक दारिद्रय रेषेच्या खाली जीवन जगत आहेत. दारिद्रय रेषे खाली जीवन जगणा-या माणसाला शासनाच्या योजनेचा लाभ मिळावा म्हणून पास आणि कार्ड देणे महत्वाचे आहे. केंद्र शासनाच्या आदेशानुसार या राज्यातील दारिद्रय रेषेच्या कार्डचा सर्व्हे करुन ग्रामसभेची मान्यता असणे आवश्यक असते व त्यानंतर या याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात असे केंद्रशासनाचे आदेश आहेत. या याद्या तयार करीत असतांना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. हे कार्ड देतांना ज्यांची पक्की घरे आहेत, ज्यांच्याकडे टी.व्ही. आहे अशा लोकांना दारिद्रय रेषेचे कार्ड देण्यात आलेले आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या दारिद्रय रेषेच्या कार्डचा सर्व्हे कोणी केलेला आहे?बुलढाणा जिल्हयात दारिद्रय रेषेचा सर्व्हे करीत असतांना मोठया प्रमाणात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

भ्रष्टाचार झालेला आहे व तशा प्रकारच्या तक्रारी सुध्दा समोर आलेल्या आहेत. त्यामुळे ख-या दारिद्रय रेषेच्या माणसाला लाभ मिळेल यासाठी पुन्हा दारिद्रय रेषेचा सर्व्हे करण्यात येणार आहे काय? तसेच या प्रकरणात जो भ्रष्टाचार झालेला आहे तो शोधून अगोदर ज्या श्रीमंत माणसांना दारिद्रय रेषेचे कार्ड दिलेले आहे ते कॅन्सल करुन ख-या गरीब माणसाला दारिद्रय रेषेचे कार्ड दिले जाणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, बीपीएलचे इकॉनॉमि अँड एक्सपेंडीचर रिपोर्ट व सोशो इकॉनॉमिक इंडिकेटरच्या आधारावर निकष ठरविण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17629....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्रीमंतांना रेशनिंग कार्ड देण्यात आलेली आहेत....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माझे उत्तर अजून पूर्ण झालेले नाही. ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेसंदर्भात केंद्र शासनाने 13 निकष ठरवून दिलेले आहेत.....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झाल्याची शंका आहे. तेव्हा त्या अनुषंगाने चौकशी होईल काय, असा माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा प्रश्न आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, कदाचित कोणाला वाटले.....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, या योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे, त्यांचे म्हणणे खरे असण्याची शक्यता आहे. तेव्हा ग्रामसभेमध्ये या याद्यांचे वाचन करण्यात यावे. जर याद्यांमध्ये चुकीची नावे असतील तर ती नावे वगळण्यात यावीत, ज्यांची नावे राहिली असतील तर त्यासाठी मुदत ठेवण्यात आली आहे. ही योजना केंद्र सरकारची आहे. आम्हाला ही योजना बंद करण्याचा अधिकार नाही.

सभापती : मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाच्या बाबतीत सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. समाजातील गरिबातील गरीब माणसाचे नाव या यादीमध्ये कसे आणता येईल त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावा. माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे आहे की, बुलढाणा जिल्हयात व राज्यातील अनेक भागांत अशाप्रकारे याद्या तयार करीत असताना त्यामध्ये काही श्रीमंत व्यक्तींची नावे आले असतील तर ती वगळण्यात यावीत आणि ज्यांनी यादीमध्ये चुकीची नावे घातली त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या याद्यांना ग्रामसभा मंजुरी देते. शासन मंजुरी देत नाही. ग्रामसभेला संपूर्ण अधिकार देण्यात आले आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17629....

सभापती : या प्रश्नाच्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी उत्तर देणे गरजेचे आहे कारण हा राज्यातील गोरगरिब माणसाशी संबंधित प्रश्न आहे. आपण म्हणता की, याद्यांना ग्रामसभा मंजुरी देते, परंतु ती यादी बिनचूक असते का ? माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे आहे की, बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आले आहे. यादी ग्रामसभा मंजूर करते, परंतु याद्याबद्दल तक्रार असेल तर त्याबाबतची चौकशी आपण करावयाची आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, ... शासनाच्या सूचनेनुसार महसूल विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रिमहोदयांनी "कदाचित" असा शब्दप्रयोग वापरला. मी आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, बुलढाणा जिल्ह्यात 45 हजार तक्रारी आलेल्या आहेत. गरीब लोकांना कार्ड देण्यात आलेली नाहीत....

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर राज्यमंत्रिमहोदयांनी नीट अभ्यास करुन द्यावयास पाहिजे, दुर्दैवाने त्यांच्याकडून अभ्यासपूर्ण उत्तरे आली नाहीत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत गांर्भीयाने वस्तुस्थिती सांगितली जात आहे.

सभापती : हा प्रश्न बुलढाणा जिल्हयाशी संबंधित विचारला असून तो राज्याच्या दृष्टीनेही अतिशय महत्वाचा आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयांमध्ये 15 हजार बोगस कार्ड वाटप करण्यात आले आहेत. त्याबाबत आपण कारवाई करणार का ?

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी हा प्रश्न खालच्या सभागृहामध्ये आला होता त्यावेळी मी प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलो होतो, त्यावेळी माननीय अध्यक्षांनी असे निर्देश दिले होते की, केंद्र शासनाचे नॉर्म्स बदलण्याच्या बाबतीत राज्य सरकारने विचार करावा. त्यावर आपण कोणती कारवाई केली ? याठिकाणी जो सर्व्हे झालेला तो चुकीचा झालेला आहे. नवीन सर्व्हे करण्याच्या दृष्टीनेही माननीय अध्यक्षांनी निर्देश दिले होते, त्याबाबत काय झाले ?

सभापती : हा प्रश्न राज्यातील सामान्य माणसांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. त्यामुळे या प्रश्नाच्या बाबतीत मी एक तासाची चर्चा मान्य करीत आहे.

आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 11 जुलै,2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटालावर ठेवतो.

सभापती : दिनांक 11 जुलै,2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची यादी छापावी.)

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 12 जुलै,2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटालावर ठेवतो.

सभापती : दिनांक 12 जुलै,2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची यादी छापावी.)

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री.वसंत छोटेलाल चव्हाण, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.वसंत छोटेलाल चव्हाण, माजी विधान परिषद सदस्य व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो :-

सभापती महोदय, कै.वसंतराव चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतिव दु:ख व्यक्त करते. ही अतिशय दुर्दैवी आणि दु:खद घटना आहे. या घटनेमुळे या सभागृहाचे व विधान सभा सभागृहाचे कामकाज एक अपवाद म्हणून घेऊ नये असे ठरले होते. कै.वसंत छोटेलाल चव्हाण यांचा जन्म 15 ऑक्टोबर,1942 रोजी नाशिक जिल्हयात देवळाली कँप येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.बी.पर्यंत झाले होते. एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेमध्ये संस्कृत विषयांमधील सुवर्णपदक त्यांनी प्राप्त केले होते.

कै.चव्हाण यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व प्रवक्ते म्हणून कार्य केले. पुणे महानगरपालिकेचे सदस्य, पुणे येथील विद्यार्थी सेवा संघाचे विश्वस्त, महाराष्ट्र राज्य अंत्योदय परिषदेचे व अंत्योदय कामगार परिषदेचे अध्यक्ष तसेच, महात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले. 1999 पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये ते कार्यरत होते.

कै.चव्हाण यांना राजकारण व समाजकारणाबरोबरच साहित्य, कला, क्रीडा व संस्कृती अशा अनेक विषयात रस होता. उत्कृष्ट वक्ते तसेच संयमी, विनयशील व समंजस व्यक्तीमत्व म्हणून त्यांच्याबद्दल सर्वांना आदर होता.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

सभापती महोदय, कै.चव्हाण 1986, 1992 व 1998 असे तीन वेळा विधानसभा सदस्यांव्दारे विधानपरिषदेवर व 1980 मध्ये पर्वती मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. विधिमंडळाच्या विविध समित्यांचे प्रमुख म्हणूनही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. एक उत्कृष्ट संसदपटु अशी त्यांची ख्याती होती. महाराष्ट्र विधान परिषदेतील 1996-97 चा "उत्कृष्ट भाषण पुरस्कार" त्यांनी प्राप्त केला होता. राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये नगरविकास, उत्पादन शुल्क, अन्न व नागरी पुरवठा, आदिवासी विकास, विधी व न्याय तसेच, अन्न व औषध प्रशासन या खात्यांचे मंत्रीपदही त्यांनी भूषविले होते. 2005 मध्ये प्रथम पोटनिवडणुकीने व 2006 मध्ये दुस-यांदा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे राज्यसभेवर ते निर्वाचित झाले होते.

सभापती महोदय, अशा या उत्कृष्ट संसदपटुचे व थोर समाजसेवकाचे मंगळवार दिनांक 11 जुलै 2006 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, ते पुणे जिल्हयाचे रहिवासी होते. मी या सदनाला आठवण करुन देऊ इच्छितो की, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.उल्हास पवार यांच्या सत्काराचा एक समारंभ पुण्यामध्ये आयोजित करण्यात आला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या समारंभाला मीही उपस्थित होतो. त्या ठिकाणी झालेले कै.वसंतराव चव्हाण यांचे भाषण मी लक्षपूर्वक ऐकले. मला असे वाटले नाही की इतक्या लवकर त्यासंदर्भातील शोक प्रस्ताव मांडण्याची दुर्देवी वेळ माझ्यावर येईल. वास्तविक पाहता सर्वांना बरोबर घेऊन जाणारा, समाजातील सामान्य माणसांना न्याय देण्याच्या भूमिकेतून काम करणारा एक उत्कृष्ठ संसदपटू म्हणून ज्यांचा आपण पुरस्कार देऊन गौरव केला त्या नेत्याला आपण मुकलो आहोत. राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांनी ज्या ज्या विषयावर भाषणे केली त्यासंदर्भातील थोडीफार माहिती संसदीय कार्यमंत्री म्हणून मला मिळत होती. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचेच केवळ नुकसान झाले असे नाही तर राज्यातील अनेक प्रश्नांमध्ये समन्वयाची भूमिका घेऊन त्या त्या प्रश्नांवर मतैक्य निर्माण करणा-या या नेत्यामुळे महाराष्ट्राचेही नुकसान झाले आहे. आज दुर्देवाने ते आपल्यातून निघून गेले आहेत. मी या सदनामध्ये संसदीय कार्यमंत्री म्हणून शोक प्रस्ताव मांडतो अतिशय तीव्र दु:ख व्यक्त करतो आणि आपणा सर्वांच्या वतीने त्यांच्या कुटुंबियांना या दु:खातून सावरण्यासाठी ईश्वराने त्यांना शक्ती द्यावी, अशी भावना व्यक्त करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ KGS/ MAP/ MHM/

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, संसदीय कार्यमंत्री, सन्माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांनी श्री.वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 11 जुलै हा दिवस ख-याअर्थाने महाराष्ट्रासाठी काळा दिवस ठरला. 11 जुलैच्या सकाळी 9 वाजता ज्यावेळी श्री.वसंतराव चव्हाण यांच्या निधनाची बातमी समजली त्यावेळी आम्हाला धक्का बसला. याचे कारण असे होते की, त्यांचे निधन होईपर्यन्त ते कार्यरत होते. त्यांचा आणि माझा परिचय 1980 साली ज्यावेळी मी विधानसभेमध्ये निवडून आलो त्यावेळी झाला, त्याचवेळी तेही विधानसभेत निवडून आले होते. विधानसभेत कामकाज करीत असतांना आणि विधान परिषदेत 18 वर्षे काम करीत असतांना सर्वसामान्य माणसांसाठी लढणारा एक लढाऊ नेता म्हणून त्यांनी आपले स्थान निर्माण केले होते.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.पांडुरंग फुंडकर .....

खरे म्हणजे कै.वसंत चव्हाण यांनी नगरपालिकेपासून आपली राजकीय कारकीर्द सुरु करुन, नगरपालिका, विधानसभा, विधान परिषद आणि त्यानंतर राज्यसभा अशा टप्प्याटप्प्याने त्यांनी प्रगती केली. विधानसभा, विधान परिषद आणि राज्यसभेमध्ये काम करीत असतांना त्यांनी संघटनेमध्ये देखील काम केलेले आहे. ज्या संघटनेमध्ये ते काम करीत होते ती संघटना बळकट झाली पाहिजे, मजबूत झाली पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. संघटनेच्या पदावर राहून संघटन मजबूत करीत ते आपले जीवन जगले. या ठिकाणी सविस्तर प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. मी प्रस्तावावर जास्त वेळ बोलणार नाही. कै.वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे एका उत्कृष्ट संसदपटूला आपण मुकलो आहेत. मी या सभागृहामध्ये मागच्या 4 वर्षापासून काम करीत आहे. मी या सभागृहामध्ये आलो त्यावेळी सुरुवातीच्या 2-3 वर्षामध्ये कै.वसंत चव्हाण आपल्या सभागृहात होते. ज्यावेळी एखाद्या विषयावर वाद निर्माण व्हावयाचा, संसदीय प्रथा आणि परंपरेला सोडून काही गोष्टी सभागृहात होण्यास सुरुवात व्हावयाची त्यावेळी कै.वसंत चव्हाण उभे राहून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना थांबवित असत. सभागृह संसदीय प्रथेप्रमाणे, परंपरेप्रमाणे चालले पाहिजे याचे मार्गदर्शन दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांना ते करीत असत, हे मी स्वत: बघितले आहे. ज्यावेळी सभागृहात घटनात्मक पेच प्रसंग निर्माण होत होता, मग तो घटनेच्या 371 कलमाचा वाद असो किंवा विदर्भाच्या अनुशेषाचा विषय असो त्यावेळी ते सभागृहात मार्गदर्शन करीत असत. आता ते राज्यसभेचे सदस्य होते. राज्यसभेवर त्यांनी आपली छाप उमटविली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडणूक प्रमुख म्हणून ते काम करीत होते. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, दिवसभर त्यांनी काम केले, पक्षाच्या बैठका घेतल्या आणि रात्री हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. दलित समाजामध्ये त्यांचा जन्म झाला. ते सतत दलितांसाठी, दलितांवर होणा-या अन्याय अत्याचाराविरुध्द झगडत राहिले. दीन, दलित, पिडीत माणसांसाठी झगडणारा एक नेता आपल्यातून निघून गेला आहे. आपल्या सभागृहामध्ये 18 वर्षे त्यांनी चांगली छाप उमटविली. त्यांची सभागृहातील भाषणे,

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभागृहातील काम नवीन सभासदांना सदैव प्रेरणा देत राहील, अशा प्रकारचे त्यांनी काम केलेले आहे. मी त्यांना विरोधी पक्षाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबियांना परमेश्वर दु:ख झेलण्याची शक्ती देवो अशी प्रार्थना करतो व माझे बोलणे संपवितो.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माझ्या शालेय जीवना पासूनचे माझे मित्र आणि सामाजिक, राजकीय तसेच विद्यार्थी चळवळीमध्ये माझ्या बरोबर काम करणारे एक सहकारी आणि आपणा सर्वांचेच मित्र असलेल्या श्री.वसंत छोटेलाल चव्हाण यांचे अकाली झालेल्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव या सदनामध्ये सादर झालेला आहे त्यावर सहवेदना, भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी आणि वसंत चव्हाण हे तसे जवळ जवळच म्हणजे नानापेठ आणि भवानी पेठेमध्ये रहात होतो. ते ज्या भागामध्ये रहात होते त्या ठिकाणी उपेक्षित, दलित समाजाची वस्ती मोठी आहे. वसंत चव्हाण हे भवानी माता मंदिराजवळील हरका नगर मध्ये रहात होते आणि त्या भागात मेहतर समाजाची वस्ती पूर्वीपासून आहे. ज्या वस्तीमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये महात्मा गांधी यांनी सहभोजनाचा कार्यक्रम घेतला होता आणि त्याची आठवण त्यांना त्यांच्या वडिलांनी व इतर समाज बांधवांनी सांगितली होती व ती ते मला नेहमीच सांगत असत. श्री.वसंत चव्हाण हे दलित समाजामध्ये जन्माला आले होते हा भाग वेगळा. त्यांचे वडील सफाई कामगार म्हणून एका कार्यालयात नोकरी करीत होते. त्या संपूर्ण परिसरामध्ये अभ्यासाची परंपरा नाही, वातावरण नाही., तेथील एकूणच वातावरण भयानक गरीबीचे असे होते आणि अशा वेगळ्या वातावरणामध्ये कोठलीही सोय नसताना साध्या शाळेमध्ये ते शिकले आणि नंतर आमच्या संस्थेच्या, कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या राजा धनराज हायस्कूलमध्ये, मी त्याच शाळेचा विद्यार्थी, तिला नुकतीच 140 वर्षे पूर्ण झाली आहेत, आणि ती महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांच्या प्रेरणेतून सुरू केलेली आहे., त्या संस्थेच्या शाळांमध्ये ते आणि मी एकत्र शिकलो. याच संस्थेमध्ये आचार्य अत्रे हे फार पूर्वी 18 वर्षे मुख्याध्यापक होते. अशा संस्थेत पुढे वसंतराव चव्हाण हे विद्यार्थी नेता म्हणून शालेय जीवनामध्ये प्रथमत: निवडून आले. त्यावेळी 11 वी मध्ये ऑब्जेक्टिव प्रश्नांची पद्धत नव्हती त्यामुळे गुण मिळविणे हे तितकेसे सोपे नव्हते. पण तरीही त्यावेळी एसएससी बोर्डाच्या परीक्षेमध्ये ते मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये पहिले आहे आणि त्यांना संस्कृत विषयाची नाना शंकरशेठ स्कॉलरशीप मिळाली होती. इतकेच नव्हे तर नंतर उच्च शिक्षण घेतानाही फर्ग्युसन कॉलेजमध्ये बी.ए.ला इंग्रजीमध्ये ते मेरिटमध्ये आले होते आणि एलएलबी मध्ये तर एका विषयाचे सुवर्ण पदक त्यांनी मिळविले होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते संगम पुलाजवळील सीआयडी खात्यामध्ये नोकरीस

..... W W 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

लागले. आताचे बसपा नेते श्री.कांशीराम यांनी त्यावेळी संरक्षण विभागामध्ये तेथील दलित कामगारांची एक युनियन काढली होती आणि त्यामध्ये श्री.कांशीराम आणि वसंतराव चव्हाण यांनी एकत्र काम केले होते. त्यातून त्यांचा सामाजिक आणि राजकीय चळवळीतील सहभाग वाढला आणि सरकारी नोकरीमध्ये मात्र ते अधिक काळ रमले नाहीत. त्यानंतर 1974 मध्ये ते पुणे महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून निवडून आले. त्या ठिकाणी त्यांना श्री.मोहन धारिया आणि अण्णासाहेब मगर यांच्या सारख्यांचे मार्गदर्शन मिळाले. 1980-85 मध्ये ते पुन्हा महापालिकेमध्ये निवडून आले. त्याच कालावधीत ते पुणे पर्वती मतदार-संघातून विधानसभेमध्ये देखील निवडून आले आणि त्यानंतर मग विधान परिषदेवर तीन वेळा निवडून आले. त्या काळात त्यांनी महानगरपालिकेत नगरसेवक आणि विधानसभेमध्ये आमदार म्हणून एकाच वेळी काम केले. तणावाचे वातावरण असेल तर नियमांचे भान ठेवून येथील प्रथा, परंपरा लक्षात घेऊन त्यांनी तणावाचे वातावरण बदलण्याचे काम विधानसभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये देखील सातत्याने केले आहे. तसेच काम त्यांनी पुणे महापालिकेमध्ये देखील केले. तेथे तर विरोधी पक्षाच्या बाकांवर असलेले नगरसेवक कोठलाही कायद्याचा मुद्दा अडला तर त्यांच्या टेबलाकडे जात होते. ते एक उत्तम वक्ता होते तसेच ते मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी व उर्दू भाषा त्यांना उत्तम रितीने येत होत्या. उर्दू भाषेतील साहित्य देखील ते उत्तम तऱ्हेने वाचत होते. ते आणि मी अनेक उर्दू मुशायरांमध्ये सहभागी होत होतो. त्यांचे उर्दूवर विलक्षण प्रभुत्व होते. कित्येकदा मुस्लिम बांधवांच्या सभांमध्ये ते बोलावयास गेले की तेथील प्राध्यापक देखील त्यांचे कौतुक करीत असत. ....

(यानंतर श्री. सरफरे .... एक्सएक्स 1 ..

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

त्याचप्रमाणे आपल्याला एका गोष्टीची आठवण करुन देतो की, केंद्रामधील मंत्री पूर्वी महाराष्ट्रामध्ये यायचे. त्यामध्ये श्री. स्टीफन हे केरळमधील एक उत्तम संसदपटू होते. आज ते हयात नाहीत. ते एकदा पुण्यामध्ये आले होते. अशाप्रकारे अन्य नेते पुण्यामध्ये येऊन इंग्रजीमध्ये भाषण करावयाचे. त्यावेळी त्या इंग्रजी भाषणाचे भाषांतर करुन सांगण्यास कै.बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ आणि श्री. मोहन धारीया हे माननीय श्री. वसंतराव चव्हाण यांना सांगत असत. त्या क्षणी ते त्या भाषणाचे उत्तम भाषांतर करुन सांगत असत. त्यासंबंधीचा अनुभव मी अनेक वेळा घेतला आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या कल्पनेतील जी अंत्योदयाची कल्पना होती, त्या परिषदेचे नेतृत्व त्यांनी महाराष्ट्रात केले. त्यांनी विद्यार्थी सेवा संघ दलित, उपेक्षित लोकांच्या मदतीसाठी काढला. त्याला त्यांनी कोणतेही जातीवाचक नाव दिले नाही. कै. वसंतराव चव्हाण यांचे हे एक वैशिष्टय होते की, जातीवाचक अशा चळवळीमध्ये दलित, उपेक्षित गरीब समाजातील माणसासाठी संघर्ष करुन त्यांची बाजू मांडीत राहणे, त्याच्यासाठी लढणे हे त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोलाचे काम राहिले आहे. आज आपल्याला जे अभावाने पहावयास मिळते की, सामाजिक कार्यकर्ते जातीय मेळाव्याला जाऊ लागले आहेत. त्या पार्श्वभूमीवर कै. वसंतराव चव्हाण यांचे वैशिष्टय या सभागृहामध्ये मला अतिशय प्रकर्षाने जाणवले आहे हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. ज्या ज्यावेळी पुण्यातील पश्चिम भागामध्ये त्यांची भाषणे होत असत त्यावेळी विशेषत: या सदनाचे माजी सभापती कै. जयंतराव टिळक, माननीय श्री. मोहन धारीया, माननीय श्री. अण्णासाहेब मगर, माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांनी सातत्याने कै. वसंतराव चव्हाण यांना प्रोत्साहन दिले. कै. वसंतराव चव्हाण यांना सामाजिक भान होते. कोणत्याही संकुचित जातीच्या चौकटीमध्ये किंवा वर्तुळामध्ये न रमता त्याला एक व्यापक स्वरुप देऊन समाजातील दुबळया उपेक्षित शेवटच्या माणसाच्या कल्याणासाठी सातत्याने संघर्ष करीत राहिलेला असा हा नेता इतक्या अकाली आपल्यामधून निघून गेला. याठिकाणी माननीय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी आठवण करुन दिली. परवाच पुणे सफाई कामगार आयोग व कार्यकर्त्यांच्या वतीने माझा सत्कार होता,त्यावेळी त्याठिकाणी माननीय कै. वसंतराव चव्हाण यांनी अप्रतिम असे भाषण केले. अजातशत्रू म्हणून त्यांनी त्याठिकाणी माझा उल्लेख केला. ते माझ्या शेजारी बसले आणि म्हणाले की, दादा तुमचा आणि माझा स्वभाव सारखा आहे. संघर्ष करावा परंतु मुद्दा सोडू नये. आणि तो मुद्दा न सोडता कुणी दुखावले जाणार नाही, त्यामधून वाद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

पेटणार नाही याची काळजी आपण घेतो. त्यामुळे आपण समाजामध्ये चांगले काम करतो. याची आठवण त्यांनी त्या समारंभामध्ये करुन दिली. आवाबेन या राष्ट्र सेवा दलातील फार मोठया कार्यकर्त्या होत्या त्यांचे स्मृती केंद्र म्हणून एक संस्था आहे. त्या संस्थेच्या समारंभामध्ये आम्ही दोघे उपस्थित होतो. ज्या आवाबेन यांनी झोपडपट्टीमध्ये काम केले, त्यांच्या संस्थेला माननीय श्री. भाई वैद्य आणि श्री. बाबा आढाव यांच्या उपस्थितीत त्यांनी आपल्या खासदार फंडामधून 20 लाख रुपयांची मदत जाहीर केली. मलाही त्यांनी सांगितले की, दादा, तुम्हीही या संस्थेला मदत करा. त्यांच्या सांगण्यावरुन मी त्या गरिबांकरिता काम करणाऱ्या संस्थेला मदत जाहीर केली. अशाप्रकारच्या अनेक आठवणी सांगता येतील. त्यांच्या जाण्यामुळे एक उत्तम संसदपटू, अभ्यासू नेता, अत्यंत संयमी नेता, समन्वय साधणारा नेता आणि शेवटच्या माणसाला न्याय देतांना मुद्दा न सोडता कोणतेही वातावरण न पेटू देता काम करणारा नेता आपल्यामधून गेला आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली याठिकाणी अर्पण करतो.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दोन दिवसापूर्वी स्वर्गीय वसंतराव चव्हाण यांचे देहावसान झाले. ध्यानीमनी नसतांना हा विषय आज आपल्यासमोर आला आहे. मी या सभागृहामध्ये नेहमी उल्लेख केला आहे, व विधानसभेमध्ये आणि लोकसभेमध्ये देखील केला आहे. या सदनामध्ये निवडून येणारे आम्ही सदस्य आहोत. आमची याठिकाणी कमाई काय आहे? ही सर्वात मोठी कमाई आहे. येथून माणूस जिथे जातो, देवाला प्रिय ठरतो, लवकर निघून जातो, तो गेल्यानंतर या सदनामध्ये श्रध्दांजली वाहिली जाते. आणि त्या शोकप्रस्तावाची एक प्रत त्यांच्या कुटुंबियांकडे पाठविली जाते. माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणांचे भाषांतर करुन पाठविली जाते. या कमाईव्यतिरिक्त अन्य काय कमाई आहे? याची मला कल्पना नाही. परंतु ही सर्वात मोठी त्यांची कमाई आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

कै. वसंतराव चव्हाण यांचे असेच झाले. मला त्यांचे या सदनातील शेवटचे भाषण आठवते. त्यावेळी या सभागृहात शिर्डीच्या साई संस्थानच्या संदर्भातील विधेयक चर्चेला आले होते. ते विधेयक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मंजूर करु द्यावयाचे नव्हते. त्या विधेयकाच्या चर्चेमध्ये वेळ काढावयाचा होता. काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यामध्ये आपापसात वाटाघाटी चालू होत्या. ते विधेयक चर्चेला आले होते परंतु चर्चा होऊन ते मंजूर होऊ नये अशा प्रकारची त्यामध्ये भूमिका होती. ते बिल मंजूर व्हावे असे कॉग्रेस पक्षाला वाटत होते आणि ते बिल मंजूर होऊ नये असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला वाटत होते. त्या लढतीमध्ये कै. वसंतराव चव्हाण या ठिकाणी बोलण्यासाठी उभे राहिले. ते एक तास बोलले, दोन तास बोलले आणि पुढे बोलतच होते. एखादा विषय खरोखर लांबवावयाचा असेल तर तो कसा लांबवावयाचा याचा उत्कृष्ट नमुना कै. वसंतराव चव्हाण यांनी या सदनामध्ये सादर केला. सर्व विषयांचा त्यांचा अभ्यास होता. ते सभापती तालिकेमध्ये होते आणि तालिका सभापती म्हणून या ठिकाणी बसत होते. त्यांनी दिलेल्या प्रत्येक निर्णयाकडे माझे सुध्दा लक्ष असावयाचे. ते माझे सुध्दा जुने मित्र होते. त्यांचा स्वभाव ही सगळ्यात महत्वाची चांगली गोष्ट होती. कोणावरही न चिडता दुसऱ्यांचे विचार समजून घेऊन आपले विचार त्यांच्या मनामध्ये कसे उतरवावयाचे याची उत्तम कला त्यांच्याकडे होती. त्यामुळे कोणताही विषय टोकाला जाणार नाही, त्यातून संघर्ष निर्माण होणार नाही याची काळजी ते सातत्याने घेत असत. त्या विधेयकाच्या बाबतीत सुध्दा तसेच झाले. शेवटी त्यांचे भाषण चालू असतानाच त्या विधेयकाच्या बाबतीत तडजोड झाली. ते विधेयक मागे घेतले गेले आणि पुढची चर्चा थांबली. कै. वसंतराव चव्हाण यांना टाईमपास करण्याची आवश्यकता भासली नाही. त्यानंतर ते राज्यसभेमध्ये निवडून गेले. महाराष्ट्रातून दिल्लीत निवडून गेलेले अनेक खासदार मी पाहिलेले आहेत. महाराष्ट्रातून लोकसभेवर 48 खासदार निवडून जातात तसेच राज्यसभेमध्ये सुध्दा खासदार निवडून जातात. महाराष्ट्रातून लोकसभेमध्ये निवडून जाणाऱ्या खासदारांची संख्या 48 असली तरी बोलणाऱ्या खासदारांची संख्या दहाच असते. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर हे सुध्दा माझ्याबरोबर लोकसभेमध्ये होते. आम्ही हे सर्व त्या ठिकाणी पाहिलेले आहे. ज्यावेळी खरोखरच गरज होती अशा वेळी कै. वसंतराव चव्हाण राज्यसभेमध्ये निवडून गेले. आमच्या सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर सरपोतदार .....

सदस्यांची संख्या कमी झाली होती. महाराष्ट्रातील राज्यसभा सदस्यांची संख्या कमी होती. अशा वेळी ते त्या ठिकाणी पोहोचले. मला एका गोष्टीची खात्री होती की, महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित झाला तर ते निश्चितपणे त्या प्रश्नाला न्याय देतील. मी पक्षाच्या प्रश्नाबाबत म्हणत नाही तर महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत बोलत आहे. पक्षाचे समर्थन ते जरुर करतील परंतु महाराष्ट्राकडे दुर्लक्ष करणार नाहीत. दीनदुबळ्या लोकांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणार नाहीत. गरीब, दलित, आदिवासी जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणार नाहीत असा आत्मविश्वास मला त्याच्या विषयी होता. ज्यावेळी ते राज्यसभेवर निवडून गेले त्यावेळी मी त्यांचे अभिनंदन केले होते. मी त्यांना म्हणालो की, या सदनामध्ये आपण पुष्कळ वर्षे काम केले आहे, आता तुम्ही त्या सदनामध्ये जात आहात आणि त्या ठिकाणी सुध्दा अशीच भूमिका पार पाडून महाराष्ट्राच्या प्रश्नाला न्याय द्याल असा मला पूर्ण विश्वास वाटतो. त्यावेळी ते असे म्हणाले की, मी माझ्याकडून चांगला प्रयत्न करीन. ते असा प्रयत्न करणार याबद्दल माझ्या मनामध्ये कोणताही संदेह नव्हता. या सदनामध्ये त्यांनी खूप काम केले. जीवनातील 18 वर्षे त्यांनी या सदनामध्ये व्यतित केलेली आहेत. त्या काळात निरनिराळे सभापती आले आणि गेले. अनेक सन्माननीय सदस्य आले आणि गेले. प्रत्येक जण कामाचा काही ना काही ठसा कायम ठेऊन जातात. कै. वसंतराव चव्हाण हे आपली जी खासियत आणि वैशिष्ट्य मागे ठेऊन गेलेले आहेत ते तुम्हाला आम्हाला भविष्यामध्ये निश्चितपणे मार्गदर्शक ठरेल. म्हणून त्यांची आज प्रकर्षाने आठवण झाली. दोन दिवसांपूर्वी ज्यावेळी त्यांचे निधन झाले त्यावेळी सर्व नियम, सर्व संकेत, परंपरा बाजूला ठेऊन सदनाचे कामकाज बंद ठेवण्याचा आपण निर्णय घेतला. केवळ त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी नाही तर त्यांचे अंत्यदर्शन घेता यावे म्हणून सदनाचे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. नाही तर त्यांचे अंत्यदर्शन झाले नसते. कारण नंतर त्यांचे पार्थिव पुण्याला नेते असते व त्यांना आम्हाला कधीच पाहता आले नसते. ही त्यामागची भावना होती. म्हणून त्या दिवशी तसा प्रस्ताव मांडला. येथून आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात गेलो. मी तसेच सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब तसेच आम्ही सर्वजण त्या ठिकाणी अंत्यदर्शनासाठी गेलो होतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...

अनेक माणसे, अनेक पुढारी तेथे आले होते. सर्वांनी त्यांचे अत्यंदर्शन घेतले. वसंतराव हे झोपले आहेत असे वाटत होते, चेह-यावर कोणतीही चिंता दिसत नव्हती. जसे झोपेत असतात तसेच वसंतराव आम्ही पाहिले. त्यावेळी माझ्या मनात एकच विचार आला की, इतक्या निष्ठूरपणे काळाने त्यांना का उचलून न्यावे ? या प्रश्नाचे उत्तर मला सापडले नाही. हेच तर माणसाचे जीवन आहे. जन्माला आल्यानंतर जीवन कधी संपणार याचा अंदाज माणसाला नसतो ही शोकांतिका आहे. जन्माला आल्यानंतर कोणी चांगले काम करतो तर कोणी वाईट काम करतो, हे त्या त्या व्यक्तीवर अवलंबून असते. काय केले तर ते चांगले आणि काय केले तर ते वाईट हा ज्याने-त्याने निर्णय घ्यायचा असतो. परंतु "मरावे परी कीर्तिरुपे ऊरावे", हे माणसाने कधीच विसरता कामा नये. वसंतराव हे कीर्तिरुपाने मागे राहिलेले आहेत आणि हीच त्यांना श्रध्दांजली आहे. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांना झालेले दु:ख सहन करण्याचे सामर्थ्य परमेश्वर देवो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी श्री.वसंतराव चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे त्यावर सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. हे खरे आहे की, समाजातील ज्या जागेवरुन त्यांनी आपल्या जीवनाच्या प्रवासाची सुरुवात केली त्या जागेवरुन प्रवास करणे कठीण असते. या प्रवासामध्ये शैक्षणिक आणि संसदीय जीवनामध्ये त्यांनी उत्तम यश प्राप्त केले. त्यांचे विधानसभेमध्ये एक आणि विधानपरिषदेमध्ये तीन कार्यकाळ होऊन ते राज्यसभेवर निवडून गेले. त्यांच्या एकूणच कामकाजाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे, अनेक लोक मागासवर्गातून, मागासलेल्या भागातून येतात. परंतु आपण तेथून आलेलो आहोत याची आठवण त्यांना अनेकदा राहात नाही. परंतु वसंतरावराच्या बाबतीत तसे म्हणता येणार नाही. त्यांनी घट्टपणे आणि खंबीरपणे आपला प्रवास केला. त्यांचे एक उदाहरण मी याठिकणी देतो. ते या सदनामध्ये तालिका सभापती म्हणून चेअरवर बसले होते आणि मी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या बिलाला 5 सुधारणा दिल्या होत्या. त्यावर सभागृहामध्ये 18-18 असे मतदान झाले. त्यावेळी त्यांनी तालिका सभापती म्हणून चेअरवरुन असे सांगितले की, नेहमी स्टेटस्कोच्या बाजूने सभापती मतदान करीत असतात. परंतु हा मागासलेल्या भागाचा प्रश्न असल्यामुळे मी सुधारणेच्या बाजूने मतदान करतो. त्यावेळी काहींनी असे म्हटले की, विरोधातील सरकार असल्यामुळे त्यांनी ते केले. उपसभापती महोदय, त्यांच्या पक्षाचे सरकार असतानाही आपल्या उपस्थितीमध्ये झालेल्या एका गोष्टीचा मी उल्लेख करु इच्छितो. विनियोजन विधेयकाला सुधारणा सूचवून ते विधानसभेकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी विधानसभेची बैठक संपलेली होती. त्यानंतर सर्व पक्षांच्या गटनेत्यांची बैठक घेऊन विधानसभेचे अधिवेशन टाळता येईल का यासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी तत्कालीन सभापती श्री. ना.स.फरांदेसरांनी सांगितले आता त्याला काही उपाय नाही. मुख्यमंत्र्यांनी देखील अधिवेशन टाळता येईल का ते पहावे असे सांगितले. त्यावेळी वसंतरावांनी केलेले भाषण मी कधीच विसरु शकत नाही. संसदीय पध्दतीमध्ये फाटाफुटीमुळे वेगळे विचार मांडले जातात की काय,असे मला त्यावेळी वाटले होते. पण वसंतरावांनी सांगितले की, अशा प्रकारची शिफारस मागे घेता येत नाही. ही शिफारस विधानसभेमध्ये जावी लागेल. शासनाचे धोरण ठरविण्याच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहासमोर जाता येईल, अन्यथा मागास विभागामध्ये याबाबतचा वाईट संदेश जाईल. विधिमंडळाच्या विशेषहक्क समिती आणि आश्वासन समितीमध्ये त्यांच्या सोबत काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.बी.टी.देशमुख...)

करण्याची मला संधी मिळाली. त्या समित्यांचे कामकाज करीत असताना त्यांनी अतिशय उत्तम रीतीने साक्षी नोंदविल्या. रेल्वे प्रकरणी सभासदांचा हक्कभंग झाल्याबद्दलच्या विषयावरील रिपोर्ट सादर करण्याच्या बाबतीत त्यांनी अतिशय मेहनतीने सहभाग घेतला होता. ते नगरविकास विभागाचे मंत्री होते. राज्याच्या विकासाच्या संदर्भातील अनेक प्रश्न या समितीकडे पाठवा त्या समितीकडे पाठवा असे होते.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

भाई सुदाम देशमुख, रा.सु.गवई यांचे सर्वपक्षीय आंदोलन झाले. ते स्वत: नगरविकास मंत्री होते. नगरविकास मंत्री या नात्याने याबाबत एक उत्तम ॲग्रीमेंट त्यांनी नोंदवून दिले आणि सांगितले की, मागासलेल्या विभागांना अशा प्रकारे वागणूक देणे बरोबर नाही. त्यांचे ते लेखी ॲग्रीमेंट पुढच्या लोकांना सभागृहामध्ये ठेवावे लागले आणि त्यांची मागणी पूर्ण करावी लागली. मी मुद्दाम उल्लेख करु इच्छितो. नगरविकास मंत्री म्हणून त्यांची स्वत:ची सही त्यावर आहे. त्यांच्या चेंबरमध्ये रात्री 10.30 ते 11.00 वाजेपर्यंत भाई सुदाम देशमुख, रा.सु.गवई आणि आम्ही सर्वजण, त्या विभागाचे प्रतिनिधी त्या कामामध्ये सहभागी होतो. सभापती महोदय, रेल्वेच्या संदर्भात त्यांनी त्या समितीमध्ये जे काम केलेले आहे ते सुध्दा खरोखर लक्षात राहण्यासारखे आहे. मनापासून मी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकभावना व्यक्त करतो आणि श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत दु:खद अंत:करणाने या सभागृहाचे संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आमचे मित्र स्व.वसंत चव्हाण यांच्या दु:खद निधनानिमित्त जो शोकप्रस्ताव सभागृहासमोर मांडला आहे त्या प्रस्तावावर माझ्या वेदना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या आयुष्यात तरी कधी वाटले नव्हते की, सभागृहात असताना केव्हातरी अशी वेळ माझ्यावर येईल. मी 10 जुलै रोजी सभागृहाची बैठक सकाळी लवकर असल्यामुळे विधानभवनाकडे येत होतो. बीपीटीच्या निम्म्या रस्त्यावर आल्यानंतर मला त्यांचे स्वीय सचिव श्री.संजय बेंद्रे यांचा दूरध्वनी आला आणि दूरध्वनीवर बोलत असताना ते ओक्साबोक्शी रडत होते आणि त्यांनी मला सांगितले की, तुम्ही ताबडतोब या, वसंत चव्हाण यांचे दु:खद निधन झाले आहे. ताबडतोब या राज्याच्या गृहमंत्र्यांचा मला फोन आला. मी त्यांना ही बातमी सांगितली व म्हटले की, तुम्ही सभागृहात न जाता सरळ मॅजेस्टिक एमएलए हॉस्टेलवर या. सभापती महोदय, स्व.वसंत चव्हाण यांच्याबरोबर 9 तारखेला रात्री 9.00 वाजेपर्यंत आम्ही सर्व मंडळी राष्ट्रवादी पक्ष कार्यालयात चर्चा करीत होतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निवडणुका त्याठिकाणी सुरु आहेत. या निवडणुका कण्डक्ट करण्याची जबाबदारी निवडणूक अधिकारी म्हणून खासदार वसंत चव्हाण यांच्याकडे दिलेली होती. मागील तीन वेळा जेव्हा पक्षांतर्गत निवडणुका झाल्या त्या निवडणुका प्रदेश निवडणूक अधिकारी म्हणून वसंत चव्हाण यांनीच घेतल्या होत्या आणि यावेळी सुध्दा ती निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी गेले 2-3 दिवस ते मुंबईमध्ये होते. 9 तारखेला रात्री 9.00 वाजता मी पक्ष कार्यालयातून बाहेर पडलो आणि ते आणि त्यांचे इतर दोन सहकारी मॅजेस्टिक एमएलए हॉस्टेलमधील रुमवर गेले. तेव्हा आम्हाला वाटले नव्हते की, ते आम्हाला सोडून जातील. सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयात त्यांचे पोस्टमार्टेम झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात त्यांचे पार्थिव जनतेला अंत्यदर्शन घेण्यासाठी आम्ही ठेवले होते. ज्यावेळी पक्ष कार्यालयात त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवले होते तेव्हा त्यांचे दर्शन घेण्यासाठी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. कोणताही पक्ष किंवा पक्षाचा नेता आला नाही असा पक्ष नाही आणि नेताही नाही. या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी, या राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख त्याठिकाणी होते.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी.....

त्यावेळी भाजपाचे माननीय भाऊसाहेब फुंडकर साहेब, श्री. नितीन गडकरी, तसेच शिवसेनेच नेते श्री. दिवाकर रावते श्री. मधुकर सरपोतदार असे किती तरी आमदार आणि मंत्री अंत्यदर्शनासाठी उपस्थित राहिले होते. आम्ही अंत्यविधीच्या कार्यक्रमासाठी सर्व मंडळी पुण्याला गेलो होतो. रात्री नऊ-सव्वानऊच्या सुमारास शव वाहिनी त्यांच्या घरी पोहचली तेव्हा त्या ठिकाणचे वातावरण फार शोकाकूल होते. हजारो माणसे त्या ठिकाणी ओक्सा बोक्सी रडत होती. त्या ठिकाणी पुण्याचे सर्व आमदार,महापौर जमले होते. साडेनऊ-पावणेदहा वाजता अंत्य विधीचा कार्यक्रम आटोपून काल या सभागृहात उपस्थित झालो. माननीय आमदार उल्हास पवार आणि त्यांचे वर्षानुवर्षाचे संबंध होते. कै. वसंत चव्हाण यांना 1984 मध्ये पुणे महानगर पालिकेत काम करण्याची संधी मिळाली होती. कै. वसंत चव्हाण युवक काँग्रेसमध्ये असतांना त्यांनी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार साहेबांबरोबर युवक काँग्रेसचे काम केले होते. ज्यावेळी सन 1999 मध्ये राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाची स्थापना झाली, त्यावेळेस पहिल्या प्रथम कै. वसंत चव्हाण यांनी, माननीय शरद पवार साहेबांवर व नेतृत्वार विश्वास दाखवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आले. पुण्यामधून सर्वात प्रथम ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आले होते. 1999 पासून ते आतापर्यंत म्हणजे गेली सात वर्षे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सेवा केलेली आहे. या सात वर्षात पक्षाची वाटचाल चालू असतांना कै. वसंतराव चव्हाण यांच्यावर पक्षाने ज्या ज्या जबाबदा-या टाकल्या त्या त्या जबाबदा-या त्यांनी कौशल्याने पूर्ण केल्या. कै. वसंतराव चव्हाण यांनी या सभागृहाची 18 वर्षे सेवा केलेली आहे. कै. वसंतराव चव्हाण जेव्हा या सदनातून 84 मध्ये निवृत्त झाले त्यांनतर त्यांना पुढे कोणत्याही सभागृहात पाठविता आले नाही. कै. वसंतराव चव्हाण सन 2004 मध्ये विधान परिषदेचे तिकीट मिळू शकले नाही पण पुढे ज्यावेळेस 2004 मध्ये राज्यसभेची निवडणूक जाहीर झाली तेव्हा त्यांचा राज्यसभेचा फॉर्म पक्षातर्फे भरला होता परंतु नंतर त्यांना तो फॉर्म पक्षातर्फे मागे घेण्यास सांगण्यात आले. त्यांच्या जागेवर माननीय श्री. तारीक अन्वर यांना पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. माननीय श्री. तारीक अन्वर यांना राज्यसभेवर पाठविले तरी सुध्दा त्यांना वाईट वाटले नाही. त्यांनी असे सांगितले की, माझ्या पक्षाच्या नेत्यावर माझा विश्वास आहे. आज नाही तर मला उद्या संधी मिळेल असे त्यांनी सांगितले होते. परत जेव्हा म्हणजे 2004 मध्ये राज्य सभेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी.....

निवडणूका जाहीर झाल्या त्यावेळेस त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पाठविण्यात आले. परंतु त्यांना 5-6 महिन्याचीच टर्म मिळू शकली. त्यामुळे त्यांना पुन्हा सहा वर्षासाठी राज्यसभेवर पाठविण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतला होता. राष्ट्रवादी पक्षाची निवडणूक प्रक्रिया 17 तारखे पर्यंत होती. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी पक्षातर्फे त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. परंतु आता ते आमच्यात राहिले नाहीत. कै. वसंतराव चव्हाण आम्हाला अचानक सोडून गेल्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अतोनात नुकसान झालेले आहे. सुदैवाने किंवा दुर्दैवाने कै. वसंतराव चव्हाण यांची जागा कोणीही भरुन काढू शकणार नाही. कै. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे राष्ट्रवादी पक्षात मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. मी माझ्या राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने त्यांना अभिवादन करतो व श्रध्दांजली वाहतो. श्री. वसंतराव चव्हाण यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर जो आघात झाला तो सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांच्या पत्नीस आणि मुलाला देवो व त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.हर्षवर्धन पाटील यांनी कै.श्री.वसंत छोटेलाल चव्हाण यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर दु:ख व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी सहा वर्षापूर्वी या सभागृहात आलो, त्यावेळी मी कामकाजामध्ये बिचकत बिचकत भाग घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी मला कै.वसंतराव चव्हाण यांच्या रुपाने खरा मार्गदर्शक लाभला. मला त्यांच्या बरोबर पाच वर्षे काम करण्याची संधी मिळाली. मी सभागृहातील कामकाज करीत असताना काही चुकत असे, त्यावेळी ते मला मार्गदर्शन करायचे आणि सांगायचे की, तू अशाप्रकारे बोलू नकोस. जर मी चांगले भाषण केले तर माझी पाठ देखील थोपटायचे. सभापती महोदय, एकदा मी एका पोलीस स्टेशनमध्ये गेलो असताना तेथील इन्स्पेक्टरने माझा अवमान केला. ही घटना मी सभागृहात मांडली. त्यावेळी राज्यमंत्री श्री.माणिकराव ठाकरे या संदर्भात उत्तर देताना सांगत होते की, सदस्य जे बोलत आहे ते चुकीचे आहे. त्यावेळी कै.वसंतराव चव्हाण उठून उभे राहिले आाणि त्यांनी सांगितले की, "जर एखादा सदस्य माहिती देत असेल तर ती माहिती आपण खरी समजतो." त्यांच्या या वक्तव्याने सभागृहाचे वातावरण एकदम बदलून गेले आणि त्या अधिकाऱ्याला सस्पेंड करण्यात आले. त्यावेळी त्यांनी शासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी कशाप्रकारे वागावे यासंबंधी मांडलेले विचार आजही माझ्या स्मरणात आहेत.

सभापती महोदय, कै.वसंतराव चव्हाण हे मॅजेस्टीक आमदार निवासातील खोली क्रमांक 311 मध्ये राहत होते. मी सुध्दा त्याच आमदार निवासात रुम 316 मध्ये राहत आहे. सभागृहातील कामकाज संपल्यानंतर आम्ही राजकीय विषयावर खूप चर्चा करायचो. रात्रौ दोन-तीन वाजेपर्यंत आमची चर्चा चालायची. त्यांचे आवडते खाद्य म्हणज मासे. अधिवेशन नसताना मी मुंबईत कामासाठी यायचो त्यावेळी ते मला मासे आणायला सांगायचे. माझी भेट झाली नाही तर ते माझ्या पत्नीकडे निरोप द्यायचे. जेवणाच्या वेळीही आमच्या खूप गप्पा रंगायच्या. आम्ही कशाप्रकारे काम करायचो आणि तुम्ही कशाप्रकारे काम केले पाहिजे याबद्दल ते सांगायचे.

सभापती महोदय, ज्यावेळी त्यांना राज्यसभेचे तिकीट दिले आणि नंतर ते नाकारण्यात आले त्यावेळी मी त्यांना भेटून माझी नाराजी व्यक्त केली होती. मी त्यांना सांगितले की, तुम्हाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

तिकिट नाकारुन तुमचा अपमान केलेला आहे. एक परराज्यातील व्यक्तीसाठी एक चांगला संसदपटू, ज्यांनी दोन्ही सभागृहात चांगले काम केलेले आहे अशा एका नेत्याचे तिकिट कापण्यात आले, याबद्दल त्यांच्याजवळ नाराजी व्यक्त केली होती. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला ते पटले नाही. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, "श्री.शरद पवार आमचे नेते आहेत, त्यांच्यावर माझी निष्ठा आहे. तेव्हा त्यांच्या निर्णयानुसार मला वागले पाहिजे." सभापती महोदय, कै. वसंतराव चव्हाण एकदा मला म्हणाले होते की, "श्री.शरद पवार काँग्रेस पक्षातून बाहेर पडत आहेत हे त्यांना मान्य नव्हते, त्यांनी काँग्रेस पक्षात रहावे अशी त्यांची इच्छा होती. श्री.पवार साहेब माझे व्यक्तिगत मित्र असल्यामुळे मी त्यांच्याबरोबर बाहेर पडलो. मी मनाने अजूनही काँग्रेसमध्ये आहे, काँग्रेसच्या विचारांत मी वाढलेलो आहे." त्यांची श्री.शरद पवार यांच्यावर निष्ठा होती. म्हणूनच त्यांना पुन्हा राज्यसभेवर पाठविण्यात आले. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार म्हणाले की, राज्यसभेमध्ये आणि लोकसभेमध्ये महाराष्ट्रातील काही ठराविक लोकांनी छाप पाडलेली आहे. त्यामध्ये कै.वसंतराव चव्हाण यांचे देखील नाव आहे. त्यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. दिल्लीमध्ये महाराष्ट्रातील खासदारांना भाषेची अडचण मोठ्या प्रमाणावर येते. दिल्लीमध्ये उत्तर भारतीयांचा प्रभाव व प्रभुत्व जास्त आहे हे मी स्वत: पाहिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील...

राज्यसभेमधील त्यांची पहिल्याच दिवशीची छाप व त्याची वृत्तपत्रामध्ये आलेली दखल किंबहुना इलेक्ट्रॉनिक मिडियाने घेतलेली दखल, ही वाखाणण्याजोगी होती. त्यांच्या सोबत काम करण्याची संधी आमच्यासारख्या कार्यकर्त्यास मिळाली, याचा आम्हाला अभिमान आहे. याठिकाणी मी निश्चितपणे सांगेन की, त्यांच्या दु:खद निधनामुळे महाराष्ट्राची फार मोठी हानी झालेली आहे. महाराष्ट्रातील अनेक योजनांच्या माध्यमातून निधी आणण्याचे मोठे काम त्यांनी पुढील काळात केले असते. आज प्रामुख्याने या महाराष्ट्राला त्यांची गरज होती. त्यांच्या निधनामुळे या महाराष्ट्राची फार मोठी हानी झालेली आहे. आज त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर, मित्रपरिवारांवर व पक्षावर मोठे दु:ख कोसळले आहे, त्यांच्या दु:खामध्ये मी माझे कुटुंब व पक्ष सामील असून सर्वांच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

धन्यवाद !

.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी दिवंगत सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव छोटेलाल चव्हाण यांच्या दु:खद निधनाचा जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या देशाच्या धर्म, जात आणि समाजव्यवस्थेचे आणि समाजाच्या विकासाच्या प्रगतीच्या मानसिकतेचे पंख कापून टाकले. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृपेने या कापलेल्या पंखांना पुन्हा बळ मिळाले. जेव्हा उपेक्षित, वंचित समाजातील एखाद्या व्यक्तीला संधी मिळते तेव्हा तो काय करु शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणून दिवंगत वसंतराव चव्हाण यांचे देता येईल. एका सफाई कामगाराच्या घरामध्ये जन्माला आलेला हा पोरगा आपल्या कर्तृवाने केवढा मोठा झाला हे आपल्या सर्वांना माहीत आहे. शालेय जीवनामध्ये त्यांचे मेरीटोरीअस अशा प्रकारचे कर्तृत्व होते. नगरपालिकेपासून विधान सभा, विधान परिषद आणि राज्यसभा असा त्यांच्या जीवनचा उत्तुंग राजकीय आणि सामाजिक आलेख असून त्यांच्या या आलेखावरुन त्यांच्या प्रगतीची दिशा आपल्या लक्षात येईल. त्यांनी नगरविकास मंत्री पदाचा भारही सांभाळला. नगरविकास विभागाचे मंत्री म्हणून ते कार्यभार सांभाळत असताना राज्यातील गोर-गरीब जनतेला, झोपडपट्टीवासियांना न्याय देण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न मुंबईतील आणि महाराष्ट्रातील जनता कदापि विसरु शकणार नाही. कायद्याचा हा गाढा अभ्यासक, संविधानावर प्रगाढ अशा प्रकारची निष्ठा असणारा आणि कायद्याची प्रगाढ जाण असलेला विद्वान व आमच्या सभागृहामध्ये गेली 18 वर्षे ज्यांनी या सभागृहामध्ये मौलिक अशा प्रकारचे योगदान दिले, अशा व्यक्तीमत्वास आपण आज आदरांजली वाहत आहोत. उत्कृष्ट संसदपटू कसा असावा याचे ज्वलंत उदाहरण याठिकाणी आपण सर्वांनी पाहिलेला आहे. मघाशी शिर्डीच्या विधेयकाबाबतचा उल्लेख माननीय श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी व मीही काल केला होता. त्याबाबत कै.चव्हाण यांनी अशी भूमिका घेतली होती की, शिर्डीचे विधेयक मंजूर होता कामा नये, ते कसे टाळता येईल यादृष्टीने त्यांनी मॅराथॉन अशा प्रकारचे केलेले भाषण आमच्या सर्वांच्या कायम लक्षात राहण्यासारखे आहे. त्या बिलावरील चर्चेदरम्यान माननीय पीठासीन अधिकारी वारंवार बेल वाजवून त्यांना थांबवत होते. त्यावेळी त्यांनी माननीय सभापतींना सांगितले होते की, अशावेळी चर्चा करीत असताना वेळेचे बंधन नसते.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

याचाच अर्थ असा होतो की, सभागृहाच्या नियमावलींचे देखील त्यांना अत्यंत काटेकोर ज्ञान होते, त्याची त्यांना माहिती होती. असा जाणकार सन्माननीय सदस्य आपल्यातून निघून गेला आहे. श्री.वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे दलित, सोशीत, वंचित, उपेक्षित अशा एकूणच मागासवर्गीय समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. केवळ मागासवर्गीय समाजासाठीच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेकरिता आणि राज्यसभेत गेल्यानंतर देशाकरिता त्यांनी जे कार्य केले ते आम्ही कदापिही विसरु शकणार नाही. मी त्यांना 'दादा' म्हणत असे. आम्ही त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकण्याचा प्रयत्न केला. लॉबीमध्ये एकदा बसलो असतांना मी त्यांना विचारले की, "दादा, पुणे शहरामध्ये आणि जिल्हयामध्ये तसेच पश्चिम महाराष्ट्रामध्ये ज्या हजारो एकर महार वतनाच्या जमिनी आहेत त्या जमिनी बिल्डर लोकांनी, जातदांडग्यांनी, धनदांडग्यांनी, शिक्षण क्षेत्रातील, सहकार क्षेत्रातील लोकांनी बळकावल्या आहेत, या जमिनी दलित लोकांना कशा परत करता येतील ? या दृष्टीकोनातून आपण निश्चितपणे प्रयत्न करावा, अशी विनंतीही मी त्यांना केली. यासंदर्भात ते म्हणाले होते की, "प्राध्यापकसाहेब, आपण काळजी करण्याचे कारण नाही. महाराष्ट्रात ज्या महार वतनाच्या जमिनी बळकावल्या गेल्या आहेत त्या परत मिळविण्यासाठी शासन दरबारी, मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर काय करता येईल ते आपण करु आणि या प्रश्नाची तड लावू. कै.वसंतराव चव्हाण हे संयमीपणा, सबूरी या दोन गुणांचे ज्वलंत उदाहरण होते. विधान परिषदेसाठी ज्यावेळी निवडणुक होती त्यावेळी दुस-या कुणाला तरी पुढे करण्यात आले होते, राज्यसभेच्या वेळीही आणखी कुणाला पुढे करण्यात आले होते. अशा परिस्थितीत दुसरे कुणी असते तर त्यांनी आकांड-तांडव केले असते. परंतु, अन्याय झाला ही भावना न ठेवता संयम आणि सबुरीने त्यांनी आपली मार्गक्रमणा केली, हे आम्हाला त्यावेळी पहावयास मिळाले. अलिकडे एक मोठा वाद माजलेला आहे. मागासवर्गीयांना आरक्षण देऊ नये अशा प्रकारची चर्चा सुरु आहे. दुर्दैवाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील काही नेत्यांकडून देखील मागासवर्गीयांना आरक्षण देण्याला विरोध होत आहे. या विषयावरही माझे त्यांच्याशी बोलणे झाले होते. ते अतिशय अस्वस्थ होते. "माझ्या पक्षाने आरक्षणाचे धोरण स्वीकारले असतांना, काही नेत्यांनी विरोध करावा," अशी अस्वस्थता त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती. "पक्ष पातळीवर मी निश्चितपणे यासंदर्भातील माझी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

भूमिका मांडण्याचा प्रयत्न करीन", असेही त्यांनी मला सांगितले होते. ॲट्रॉसिटीचा कायदा रद्द करावा, अशीही मागणी झाली होती. "हे सर्व चुकीचे आहे, हे कदापिही होता कामा नये आणि त्यासंदर्भात मला जे काही करता येण्यासारखे असेल ते मी करणार आहे", असे त्यांनी मला सांगितले होते. श्री.वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळे त्यांच्याकडून आम्हाला जी प्रेरणा मिळत होती त्याला आम्ही मुकलेलो आहोत. त्याचप्रमाणे या देशातील, राज्यातील उपेक्षित, वंचित समाजाचेही प्रचंड नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर, परिवारावर जे दु:ख कोसळले त्या दु:खामध्ये मी व माझा पक्ष सहभागी आहोत. माझ्यातर्फे, माझ्या परिवारातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे कै.वसंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस मी आदरांजली वाहतो. धन्यवाद.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहातील जवळपास सर्वच पक्षाच्या नेत्यांनी श्री.वसंतराव छोटेलाल चव्हाण यांच्या निधनाबद्दल आपल्या सहभावना व्यक्त केल्या आहेत. कै.वसंतराव चव्हाण यांच्या सानिध्यात राहून मला देखील काम करण्याची बराच काळ संधी मिळाली. एक अत्यंत निगर्वी, विनम्र, दूरदृष्टी असलेला तळागाळातील नेता म्हणून त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावासा वाटतो. राष्ट्रावादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून ज्या ज्या घटना घडत गेल्या त्या घटनाक्रमामध्ये कै.वसंतराव चव्हाण यांनी योगदान दिलेले होते. एवढेच नव्हे तर या पक्षाच्या उभारणीला निश्चितपणे त्यांचा फार मोठा सहभाग लाभला.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

कै.वसंत चव्हाण यांनी त्यांच्या कार्यपद्धतीच्या शैलीची सभागृहामध्ये निश्चितपणे छाप पाडलेली आहे. त्यांच्या निधनाच्या आदल्याच दिवशी एका अडचणीसंदर्भात मी त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला होता आणि त्यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. मीच तुमच्याकडे येईन असे त्यांनी मला सांगितले होते. आपण जेवणासाठी माझ्याकडे यावे असे मी त्यांना सांगितले आणि त्यांनी होकार दिला होता. परंतु दुर्दैव असे की, दुस-या दिवशी सकाळी मला त्यांच्या निधनाचा निरोप मिळाला. त्यांच्या निधनाच्या आदल्याच दिवशी त्यांचे आणि माझे दूरध्वनीद्वारे झालेले संभाषण माझ्या सदैव स्मरणात राहील. दूरदृष्टी असलेल्या नेत्याला महाराष्ट्र मुकला आहे. त्यांचे व्यक्तिमत्व राष्ट्रवादी कॉंग्रेस पुरतेच मर्यादीत होते असे नाही. सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी स्वत: सहमत आहे. सर्व समावेशक असे नेतृत्त्व आपल्यातून नाहीसे झाले आहे त्याबद्दल मी देखील खंत व्यक्त करतो. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो अशी मी प्रार्थना करतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

उपसभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक 4.00 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 3.23 ते 4.00 वाजेपर्यंत मध्यंतर.)

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर ...)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपाल यांनी दिलेल्या निदेशास अनुसरून वार्षिक योजना 2005-06 करिता दिनांक 31 मार्च 2006 पर्यंत उपलब्ध निधीचे वाटप तसेच झालेल्या खर्चाचा जिल्हानिहाय तपशील सभागृहा समोर ठेवतो.

उपसभापती : जिल्हानिहाय तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

***

विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषदेच्या सन 1986 चे पहिले अधिवेशन ते सन 2005 चे तिसरे अधिवेशन या कालावधीमध्ये देण्यात आलेल्या एकूण 424 आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या विवरण पत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया सोबतची विवरणपत्रांची यादी येथे छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठवणे</u>.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषदेच्या सन 2006 च्या पहिल्या अधिवेशनात दिनांक 13 मार्च 2006 ते दिनांक 21 एप्रिल 2006 या कालावधीत माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या एकूण 622 आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया सोबतची यादी येथे छापावी.)

..... 3जी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करते. ..

शनिवार, दिनांक 15 जुलै,2006 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 13 जुलै,2006रोजी समितीची बैठक झाली. विधानपरिषदेकडे सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची दोन विधेयके पुर:स्थापनार्थ आहे. त्यासाठी 10 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 140 मिनिटांचा वेळ अशासकीय विधेयकांना खालीलप्रमाणे देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1.	सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 7 - अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,2006, श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांचे	35 मिनिटांपेक्षा जास्तनाही.
2.	सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 12 - मुंबई महानगर-पालिका (सुधारणा) विधेयक,2006 श्री.दिवाकर रावते यांचे	35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3.	सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र विशेष फौजदारी न्यायालय विधेयक,2006, श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांचे	35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
4.	सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 2 - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2006, श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.	35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही विधेयकाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या विधेयकास देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

..... 3जी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्रीमती सुधा जोशी : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(यानंतर श्री. किल्लेदार ... 3एच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व मु.शी. : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

डॉ.एम.ए. अझिज (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल सादर करतो.

महोदय, सदर अनुपालन अहवाल सभागृहास सादर करीत असताना मी त्यातील प्रमुख बाबींचा या ठिकाणी मुद्दाम उल्लेख करु इच्छितो.

ठाणे महानगरपालिका कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेष यासंबंधीचा नववा अहवाल (2003-2004) दिनांक 11 जून 2004 रोजी दोन्ही सभागृहात सादर केला होता. त्यानंतर पुन्हा सदर समितीने दिनांक 21 नोव्हेंबर 2005 रोजी ठाणे महानगरपालिकेस भेट देऊन माहिती घेतली. ठाणे महानगरपालिकेच्या सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा भरती बाबतचे नियम तयार करुन 1998 मध्ये शासनाकडे पाठविले. सात वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी सदर नियमांना मान्यता दिलेली नाही. त्यामुळे समितीने आपल्या अहवालात नाराजी व्यक्त केली आहे. शासनाने हे प्रकरण गंभीरतेने घेऊन सेवा प्रवेश नियमावलीस त्वरित मान्यता देण्याची शिफारस समितीने आपल्या अहवालात केली आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए.अझिज .....

ठाणे महानगरपालिकेत अधिकारी/कर्मचारी यांच्या एकूण 201 केडर्स आहेत. त्यापैकी काही केडर्सच्या बिंदू नामावलीची (रोस्टरची) तपासणी शासनाने केली आहे. परंतु, सर्व म्हणजे 201 केडर्सच्या रोस्टरची तपासणी केलेली नाही. ठाणे महानगरपालिका स्थापन होऊन 23 वर्षांचा कालावधी झाला आहे. परंतु अद्यापही सर्व केडर्सची तपासणी झालेली नाही, ही बाब गंभीर आहे. तरी रोस्टर तपासणीचे काम तात्काळ पूर्ण करण्याची समितीची शिफारस आहे.

सद्य:स्थितीत ठाणे महानगरपालिकेमध्ये 393 पदांचा अनुशेष बाकी आहे. ही पदे भरण्यासाठी विशेष मोहीम घेण्याची समितीने शिफारस केली आहे.

उपसभापती : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा दहावा अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती महोदय हा अहवाल सादर करताना काही महत्वाच्या बाबींकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. नाशिक महानगरपालिका तसेच येवला व त्र्यंबकेश्वर नगरपरिषद, जिल्हा रुग्णालय व निरीक्षणगृहे यासंदर्भातील शिफारशी या अहवालात केलेल्या आहेत. महानगरपालिकांवर शासनाचे नियंत्रण किती मर्यादेपर्यंत आहे हे समितीने तपासले असता, आर्थिक बाबींवर शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याचे समितीस आढळून आले.

महिलांच्या आरक्षण, अनुशेष व पदोन्नती संदर्भातही राज्यातील महानगरपालिका विशेष लक्ष देत आहेत ही बाब सुध्दा समितीला आढळून आली नाही. नियमानुसार महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील 5 टक्के निधी महिला व बालकल्याणसाठी राखून ठेवावा व त्याचा खर्च महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सल्ल्याने खर्च करावा, असे असतानाही महिला व बालकल्याणाच्या योजना ह्या कागदावरच राहिलेल्या असतात व त्यासाठी निधीही दिला जात नाही. अत: असा खर्च करण्याचे बंधन महानगरपालिकांवर घालण्यात यावे व तसे न करणाऱ्या महानगरपालिकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील 5 टक्के निधी महिलांसाठी राखीव ठेवण्याबाबत महानगरपालिकेच्या आयुक्तांना अधिकार देण्यात यावेत व त्यासाठी आवश्यक असल्यास नियमात सुध्दा बदल करण्यात यावा. राज्य शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयांचा व परिपत्रकांचा फेरआढावा घेऊन त्यातील कालबाह्य योजना व कार्यक्रम रद्द करुन नवीन योजनांचा समावेश करण्यात यावा अशा शिफारशी अहवालात करण्यात आल्या आहेत.

उपसभापती : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा औचित्याचा मुद्दा मांडतो. वैद्यकीय प्रवेशाच्या संदर्भात प्रेफरंस फॉर्म भरुन देण्याची उद्या म्हणजे 14 जुलै, 2006 ही शेवटची तारीख आहे. सर्वांना मुंबईमध्येच फॉर्मचे वाटप आणि सेंट्रलाईज्ड ॲडमिशन होणार आहे. माझी विनंती आहे की, ही प्रवेश प्रक्रियेची मुदत 14 तारखेपासून आणखी 4 दिवस म्हणजे 17 तारखेपर्यंत वाढवून देण्याचे आदेश द्यावेत. शासनाची मेरिट लिस्ट उद्या लागणार आहे परंतु खाजगी कॉलेजेसची 14 जुलै ही शेवटची तारीख आहे. ती मुदत 17 तारखेपर्यंत वाढवून देण्यात यावी. जी मेरिट लिस्ट लागेल त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. वसंत पवार...)

ॲडमिशनच्या शेवटच्या तारखेमध्ये देखील बदल होईल. याबाबतीत शासनाला आदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : ॲडमिशन प्रोसेस संबंधी लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली आहे. त्यावेळी मी यासंबंधी उत्तर देईन.

-

श्री. संजय दत्त : उपसभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे. पावसाळयापूर्वी कल्याण-शीळ महामार्गाची डागडुजी न झाल्यामुळे त्या रस्त्याची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. या विषयावर लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली होती आणि त्यावर बरीच चर्चा देखील झालेली होती. उपसभापती महोदय, आपण देखील त्या रस्त्याला भेट दिलेली होती. बांधकाम विभागाचे मंत्री हे कार्यक्षम आहेत. परंतु अधिकारी योग्य प्रकारे काम करीत नाहीत. या रस्त्याबाबत ताबडतोब कार्यवाही व्हावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री. अनिल देशमुख : नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : मी हा विषय सभागृहामध्ये नेहमीच उपस्थित केलेला आहे. टेंडरवर निर्णय झालेला नाही त्यामुळे रस्त्याचे काम होत नाही. या रस्त्याच्या बाबतीत सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी तीन वेळा आश्वासन देऊनही ते पाळलेले नाही.

श्री. अनिल देशमुख : वर्क ऑर्डर दिलेली आहे. ज्याला टेंडर दिलेले आहे तो बॅक आऊट झालेला नाही. तीन महिन्याच्या कालावधीत प्रोसेस पूर्ण व्हावी लागते.

उपसभापती : प्रोसेसबद्दल काही म्हणणे नाही. परंतु रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमध्ये लोकांनी पडून मेलेले चालेल काय ?

श्री. अनिल देशमुख : रस्त्याचे काम सुरु होईपर्यन्त दुरुस्तीचे काम करण्याच्या सूचना देण्यात येतील.

उपसभापती : 7 दिवसांमध्ये दुरुस्तीचे काम होईल काय ?

श्री. अनिल देशमुख : दुरुस्तीचे काम 7 दिवसात करु.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : उपसभापती महोदय, मुंबई विद्यापीठामध्ये सध्या जे गुणवाढीचे प्रकरण सुरु आहे त्याकडे मी सन्माननीय मंत्री महोदयांचे या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे. मुंबई विद्यापीठाला 150 वर्षे पूर्ण होत आहेत. हे एक अत्यंत आदर्श आणि दर्जेदार विद्यापीठ म्हणून या विद्यापीठाचा जागतिक स्तरावर लौकिक आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून या विद्यापीठामध्ये गुण वाढविण्याचे गैरप्रकार होत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत आहेत. अभियांत्रिकी परीक्षांमध्ये अनेक गैराप्रकार झालेले आहेत. अनेक विद्यार्थ्यांना याबाबतीत अटक झालेली आहे. काही परीक्षक आणि मॉडरेटर्स, शिपाई, क्लार्क या सर्वांनी मिळून 10 चे 70, 22चे 72 असे गुण वाढविलेले आहेत. त्यासाठी त्यांनी 70-70 हजार, एक-एक लाख रुपये घेतलेले आहेत. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मुंबई विद्यापीठाला कलंक लावणारी ही कृती आहे. तेव्हा शासनाने याबाबतीत निवेदन करावे असे आपण शासनाला निदेश द्यावेत जेणे करुन या विद्यापीठाच्या बाबतीत लोकांच्या मनात निर्माण झालेली शंका दूर होऊ शकेल.

--

...3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वये सूचना</u>

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "जुलै, 2006मध्ये रायगड जिल्ह्यातील किहिम, ता. अलिबाग येथे गुलाबचंद या परप्रांतीयाने मातीचा भराव करुन विनापरवाना बांधकाम केल्याने शेतीचे व पावसाचे इतर ठिकाणचे पाणी वाहून जाण्याचा मार्ग बंद होणे त्यामुळे शेतीचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "राज्यातील अवर्षणप्रवण असलेल्या 148 तालुक्यांमध्ये सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी शासनाने दिनांक 14 जुलै, 2005 रोजी श्री. रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली समिती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी दि.6 जुलै, 2006 रोजी देवळाली कॅम्प (जि.नाशिक) या भागातील कुमारी प्रियांका चरणसिंग लकारिया या 14 वर्षीय मुलीचे अपहरण करुन व तिच्यावर बलात्कार करुन करण्यात आलेली हत्या या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "मे.किनवटकर कृषी उद्योग प्रा.लि., मे.डेक्कन सेल्स प्रा.लि., मे.एम.ए.आय.डी.सी.प्रा.लि. या व इतर कंपन्यांकडून राज्यातील शेतकऱ्यांना होत असलेला भेसळयुक्त मिश्र खतांचा पुरवठा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "दि.4 व 5 जुलै, 2006 रोजी पावसामुळे मुंबईतील रस्त्यांची झालेली वाईट स्थिती व त्याकडे एम.एम.आर.डी.ए., महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे होत असलेले दुर्लक्ष"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "दि.10 मार्च, 2004 च्या शासन निर्णयानुसार रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या भरतीत मागासवर्गीयांना डावलून अप्रशिक्षित मागासवर्गीयांची नेमणूक करणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

यानंतर सर्वश्री प्रताप सोनवणे, नितीन गडकरी, रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यात कळणेजवळ फोंडेगाव परिसरात गेले पाच दिवस जंगली हत्तींनी धुमाकूळ घातल्याने शेतकऱ्यांचे 15 लाखांचे नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे व इतर वि.प.स. यांनी "दि.1 जुलै, 2006 रोजी भंजरथ, ता.माजलगाव, जि.बीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील प्रभारी मुख्याध्यापिका व त्यांचे सहकारी शिक्षक व शिक्षिका यांना एक पालक व त्याच्या साथीदारांनी 4 तास एका खोलीत डांबून ठेवण्याची घडलेली घटना"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "डायरेक्टर टेक्निकल एज्युकेशन यांची वेबसाईट दि.11 जुलै, 2006 पासून सुरु असणे परंतु, ती धिम्या गतीने चालत असल्यामुळे विद्यार्थ्यांना होत असलेला त्रास"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 4 जून, 2006 रोजी कणकवली वाघदे, डंगळवाडी येथे खाजगी आराम बस झाडावर आदळून पेट घेणे, त्यात 1 प्रवासी ठार व 9 जखमी होणे तसेच दिनांक 1 जुलै, 2006 रोजी ओरस-खर्येवाडा येथे ट्रक-एस.टी.बस व खाजगी व्होल्वो यांच्या अपघातात 21 प्रवासी जखमी होणे तसेच दिनांक 2 जुलै, 2006 रोजी हुमरमळा येथे सुमो गाडीला अपघात होऊन 16 जण जखमी होण्याची घडलेली घटना"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने यासंबंधी निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

अन्य नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

श्री.मधु चव्हाण : सभापती महोदय, आम्ही सोमवारी ज्या नियम 93 च्या सूचना दिलेल्या होत्या, त्या मांडण्याची आम्हाला संधी मिळालेली नाही. स्व.वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे सोमवारी कामकाज झाले नाही तसेच मंगळवारी स्थगन प्रस्तावाच्या चर्चेमुळे कामकाज झाले नाही. त्यामुळे आम्ही दिलेल्या 93 च्या सूचना पुन्हा देण्याची गरज नाही असे आम्हाला सांगण्यात आले होते. आम्हाला सूचना मांडण्याची संधी मिळावी अशी विनंती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदविधर) : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्यामार्फत आपल्या सभागृहाचे विशेष लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो. आपले अधिवेशन 21 तारखेलाच संपणार असून 23 जुलैला लोकमान्य गंगाधर टिळकांची 150 वी जयंती सुरु होत आहे. लोकमान्य टिळकांचे महत्व सांगण्यासाठी मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. कारण त्यांच्या बद्दल सर्वांनाच माहिती आहे. त्यांची एक घोषण होती की, "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे" तसेच "या सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?" अशा प्रकारचा अग्रलेख त्यांनी 150 वर्षापूर्वी लिहिला होता. 150 व्या जयंतीच्या निमित्ताने "सुराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे" आणि त्या अनुषंगाने "सरकारचे डोके ठिकाणावर आहे का "? यासंदर्भात महाराष्ट्र टाईम्स लेख लिहीत आहे. या जयंतीचे औचित्य धरुन महाराष्ट्र सरकारने सुराज्य निर्मितीचे काम त्यांच्या जयंती पासून सुरु करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

तसेच दुसरा मुद्दा असा आहे की, याच बरोबर हे वर्ष अजून एका मोठया पुरुषाच्या जन्म शताब्दीचे वर्ष आहे त्यामुळे त्याची नोंद सरकारने घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. कोकणातील गोळवली गावचे परंतु नागपूर मध्ये जन्म घेतलेले आणि नागपूरमध्येच वाढलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सर संघचालक श्री.मा.स. गोळवलकर गुरुजी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचा विस्तार इतका मोठा केला की, आज जगामध्ये सगळयात मोठी व्हयूमन ऑर्गनायझेशन कोठली असेल, तर ती आहे "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ". "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ" जीवनातील सर्व क्षेत्रात काम करतो. द्वितीय सर संघचालक श्री.मा.स. गोळवलकर गुरुजी यांची जन्मशताब्दी 26 फेब्रुवारी, 2007 मध्ये येत आहे. सरकारने यासंदर्भात काही तरी करावे अशी अपेक्षा मी धरत नाही परंतु महाराष्ट्राच्या थोर नेत्यांनी, ज्याची नोंद केवळ स्वर्गीय इंदिरा गांधी यांनीच घेतली आहे असे नसून महाराष्ट्रातील सर्व मोठया नेत्यांनी त्यांची नोंद घेतलेली आहे. गोळवलकर गुरुजी हे थोर भूमिपुत्र आहेत त्यामुळे मला असे वाटते की, श्री. गोळवेलकर गुरुजींच्या जन्मशताब्दीचे एक औचित्य साधून या औचित्याच्या मुद्यामार्फत मी सांगू इच्छितो की, विचारांची मतभेदता जरी असली तरी माणसाच्या कर्तृत्वाला व त्याचा मानसन्मान राखण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. ती परंपरा महाराष्ट्राने जपावी अशी अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पोद्दार आयुर्वेदिक रुग्णालयात श्री. चंद्रकात तळवणेकर या रुग्णावर करण्यात आलेले चुकीचे उपचार

मु.शी. : पोद्दार आयुर्वेदिक रुग्णालयात श्री. चंद्रकात तळवणेकर या रुग्णावर करण्यात आलेले चुकीचे उपचार याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण व रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण व रामनाथ मोते यांनी "पोद्दार आयुर्वेदिक रुग्णालयात श्री. चंद्रकात तळवणेकर या रुग्णावर करण्यात आलेले चुकीचे उपचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, पोद्दार हॉस्पिटलच्या बेपरवाईमुळे एका रुग्णाचा मृत्यू झालेला आहे. यासंदर्भातील जे निवेदन देण्यात आलेले आहे त्यामध्ये काही बदल करण्यात आलेला आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, निवेदनामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. आपण सांगितले आहे की, पोद्दार हॉस्पिटलच्या डॉक्टरांमुळे रुग्णाचे निधन झालेले आहे परंतु ही वस्तुस्थिती नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे की, या रुग्णाने 19 एप्रिल रोजी माननीय मुख्यमंत्री आणि हॉस्पिटलच्या डीनकडे विनंती वजा अफेडेविट केलेले आहे. त्यामध्ये सर्व वस्तुस्थिती कथन करण्यात आलेली आहे. डॉक्टरांकडे गेल्यानंतर डॉक्टरांनी त्याला तपासले आणि डॉक्टरांनी त्यांना 22 तारखेला ॲडमिट व्हावयास सांगितले. परंतु आपण येथे म्हणत आहात की, डॉक्टर त्यावेळी रजेवर होते. त्यांच्यावर वेगवेगळया प्रकारचे अन्याय झाल्यामुळे त्यांना डिसचार्ज करण्यात आले. त्यांना हायपेटीक कोमा झालेला नाही असे आपल्या उत्तरात सांगण्यात आले. या डॉक्टरांनी कस्तुरबा हॉस्पिटलच्या सीएमओ यांना पत्र लिहिले आहे की, आम्ही हा पेशंट तुमच्याकडे ट्रान्सफर करीत आहोत व तो हायपेटीक कोमामध्ये आहे , डॉक्टरांच्या सहीचे पत्र सुध्दा आता माझ्याजवळ आहे. येथे सांगण्यात आले की, तो डायबेटीजचा पेशंट होता. ऑपरेशन पूर्वी तो नॉर्मल होता. त्याची कुठलीही रक्त तपासणी किंवा लघवी तपासणी न करता या डायेबेटीज पेशंटचे ऑपरेशन करण्यात आले. हा पेशंट पायावर सूज आली म्हणून उपचार करण्यासाठी डॉक्टरांकडे गेला होता व त्याचे ऑपरेशन करण्यात आले. त्याला नंतर सांगण्यात आले की, 14 पुडया घ्या. कुठलीही पुडी उचलून घ्या. या ठिकाणी कशा प्रकारे गैरव्यवहार चालतात यासंदर्भातील सी.डी. सुध्दा माझ्याकडे आहे ती सी.डी. मी आपल्याकडे देतो. शेवटी वॉर्ड बॉयला सांगण्यात आले की, तू रुग्णाला औषध दे. डॉक्टरांना वेड लागलेले आहे असे वार्डबॉयने सांगितलेले आहे. यासंदर्भात माझ्याकडे पत्र देखील आहे. वॉर्ड बॉयने नातेवाईकांना दिलेले निवेदन आहे. त्याने सांगितले की, डॉक्टरांना कळत नाही, खरे म्हणजे, 14 पुडया एकत्र करुन त्याचा काढा द्यावयाचा असतो. पेशंटच्या नातेवाईकांने सांगितले की, आम्हाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

असे वाटते की, पेशंटला कावीळ झाली आहे परंतु डॉक्टराने सांगितले की, तुम्हाला यातील काय कळते? पेशंटला दुस-या कारणाने पोटात दुखते. परंतु चारच दिवसांनी सांगण्यात आले की, आता आपण रुग्णाची काविळीची औषधे सुरु करु आणि पोटाची औषधे बंद करु. खालच्या सभागृहात याच डॉक्टरांच्या संदर्भात चौकशी करण्यात येईल असे माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले आहे. यासंदर्भातील ....

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

माझ्याकडे विधानसभा सभागृहात झालेले प्रोसिडीग आहे. मी पोद्दार हॉस्पिटलमधील केस पेपर आणलेला आहे. तो पेशंट कोमामध्ये असताना त्याला झालेली जखम बरी करण्यासाठी त्याला दुसऱ्या टेबलवर नेण्यात आले. पेशंटच्या नातेवाईकांनी डॉक्टरांना विचारले की, पेशंट कोमामध्ये आहे असे तुम्ही सांगत असताना त्याला दुसरीकडे कशाला हलविता? त्यावर डॉक्टरांनी त्यांना सांगितले की, तुम्हाला काय कळते, पेशंट अर्धबेशुध्द आहे. त्याठिक्राणी डॉ.प्रशांत नावाचा शिकाऊ डॉक्टर होता. नंतर त्या पेशंटला कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करण्यात आले. परंतु पेशंट कोमामध्ये असल्यामुळे कस्तुरबा हॉस्पिटलने दाखल करुन घेण्यास नकार दिला. त्यानंतर पेशंटला बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमीट करण्यात आले तेथे त्याचा मृत्यू झाला. या डॉक्टरविरुध्द विधानसभा सभागृहात सी.आय.डी.चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पेशंटचा मृत्यू झालेला आहे. यासंबंधी पेशंटच्या मुलाने माननीय मुख्यमंत्र्यांकडे निवेदन दिलेले आहे. डीनकडे निवेदन दिलेले आहे. तरी त्यास न्याय मिळालेला नाही. विधानसभा सभागृहात या डॉक्टरला वाचविण्याचा प्रयत्न झाला. त्याच्या विरुध्द सी.आय.डी.चौकशी करण्यात येईल,असे सांगून देखील अजूनही तो कार्यरत आहे. तेव्हा या डॉक्टरला सस्पेंड केले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, श्री.चंद्रकांत तळवणेकर हे सुरुवातीस के.ई.एम. रुग्णालयात डायबीटीसवर उपचार घेत होते. ते पोद्दार रुग्णालयात दिनांक 22.4.2006 रोजी ॲडमीट झाले. त्यांच्या पायाला सूज होती म्हणून त्यांना ॲडमीट करण्यात आले. त्यांच्या हाताला फोड आला होता व त्यामध्ये "पू" झाला होता, त्यामुळे ही जखम धुवून काढण्यासाठी त्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर पेंशट ॲडमीट असताना त्याने स्वत:हून डिसचार्ज मागितला. त्याने असे लिहून दिले होते की, I am taking voluntary discharge. त्याने काविळीवरील उपचार कस्तुरबा रुग्णालयात घेंतले. तेथेही त्यांनी स्वत:हून दिनांक 4 रोजी डिसचार्ज घेतला. त्यांनतर तो बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल झाला आणि त्याच ठिकाणी त्याचा मृत्यू झाला. माझ्याकडे त्यांचे कॉज ऑफ डेथ आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील माहिती माझ्याकडे द्यावी. त्याबाबत चौकशी करुन हे अधिवेशन संपण्यापूर्वी ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर लोणावळानजीक कोसळलेली दरड

मु. शी.:मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर लोणावळानजीक कोसळलेली दरड . याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर लोणावळानजीक कोसळलेली दरड" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दरड कोसळणे हे नैसर्गिक संकट आहे हे मी समजू शकते. "ज्या ठिकाणी दरड कोसळली ते ठिकाण नवीन असून तेथे कोणतीही दरड संरक्षण व्यवस्था केलेली नाही." असे निवेदनात सांगितलेले आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे हा आपणा सर्वांना अभिमान वाटावा असा आहे.हा रस्ता अतिशय चांगल्या प्रकारचा आहे. असे असले तरी ज्या पध्दतीने या रस्त्यांचे मेन्टेनन्स व्हावयास पाहिजे त्याप्रमाणे ते होत नाही. या एक्सप्रेस हायवेवर मी आठवड्यातून दोन-तीनवेळा प्रवास करते. सभापती महोदय, ज्यावेळी दरड कोसळण्यासारख्या घटना घडतात, दरड कोसळलेल्या जागेपासून किमान चार-पाच कि.मी.च्या आधी वाहतूक दुसरीकडे वळविण्यात येत असल्याबाबतची सूचना दिलेली नसते. त्यामुळे वाहनचालक वेगात गाडी चालवित पुढे येतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. तेव्हा जेथे वाहतूक डायर्व्हट करण्यात येते, त्याची सूचना त्याठिकाणापासून पाच कि.मी.आधी दिली पाहिजे.

माझा दुसरा मुद्दा म्हणजे या एक्सप्रेस हायवेवरील बोगद्यांमध्ये पाणी झिरपते. त्याठिकाणी लावण्यात आलेले दिवे बऱ्याचवेळा बंद असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे.

तिसरी बाब अशी की, जर दरड कोसळली असेल तर त्याची अधिकृत माहिती पहिल्या टोल नाक्यावर मिळाली पाहिजे किंवा गस्त करणाऱ्या जीपवर स्पीकर लावून अशा घटनासंबंधी माहिती द्यावी. तसेच जे हेल्पलाईनचे नंबर आहेत ते बऱ्याचवेळा बंद असतात.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी लाल दिवा नसताना आणि पोलिसांचा एस्कॉर्ड नसताना साध्या गाडीतून पाहणी करावी. खड्डे कमी असतात त्या बाजूने पोलिसांच्या गाडया पुढे जातात, मंत्र्याच्या गाडया तर त्याठिकाणी जातच नाहीत. त्यामुळे ज्याठिकाणी जोड रस्ते असतात, जे रस्ते पेट्रोल पंपाकडे किंवा मॉलकडे डाव्या व उजव्या बाजूने वळण घेतात, त्याठिकाणी प्रचंड मोठे खड्डे असतात तसेच त्याठिकाणी वाहतूकही प्रचंड असल्यामुळे कसा बसा जीव वाचवून बाजुला जावे लागते. आता पावसाळा सुरु झालेला आहे. त्यामुळे आपण असे रस्ते लवकरात लवकर दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. तसेच दरड कोसळण्याच्या संदर्भात सरंक्षक व्यवस्था करणे आवश्यक आहे. माझ्या सर्व प्रश्नांची सविस्तर व समाधानकारक उत्तरे माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावीत.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, दरड कोसळण्याचे मुंबई-पुणे हायवेवर प्रकार घडतात. अशा प्रकारची दरड कोसळण्याची घटना तीन तारखेला घडलेली आहे. त्या संवेदनाशील 40 ते 48 किलो मीटरच्या दरम्यान दरड कोसळली होती. ज्या ज्याठिकाणी अशा प्रकारच्या दरडी कोसळतात, त्या सर्वच ठिकाणचा सर्व्हे केंद्रीय रस्ते संशोधन केंद्र, दिल्ली व इतर तज्ज्ञांच्या कमिटीमार्फत करुन स्टील वायर नेटींगच्या माध्यमातून दरडी कोसळयाचे प्रमाण कसे कमी करता येईल यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. अशाप्रकारचे जवळपास 12 स्पॉट संवेदनाशील असून त्यापैकी 8 ठिकाणची कामे झाली आहेत व 4 ठिकाणची कामे चालू आहेत. अतिसंवेदनाशील 4 स्पॉट असून त्यापैकी 2 ठिकाणची कामे झाली आहेत. अशा प्रकारे आपण याबाबतीत संपूर्णपणे काळजी घेत आहोत. त्याच बरोबर आपण याठिकाणी मेंटेनन्सच्या बाबतीतही काळजी घेतो. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या या तक्रारीकडे आवश्यक लक्ष घातले जाईल. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी डायर्व्हशनच्याबाबतीत सूचना केली. सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय योग्य असून त्याबाबतीत व्यवस्थित अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच, याठिकाणी बोगद्यामधील पाण्याची व लाईटची तक्रार करण्यात आली. त्याठिकाणच्या पाण्याच्या बाबतीत आपल्याला काही करता येणार नाही, परंतु लाईटच्या बाबतीत आपण आवश्यक त्या सूचना देऊ. त्याठिकाणी मिनिमम 40 लक्स लाईट पाहिजे. त्यादृष्टीने आपण आवश्यक त्या सूचना देऊ व याची प्रत्यक्षात व्हीजीट देऊन पाहणी करु. तसेच, याठिकाणी टोल नाक्याच्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख...

बाबतीत सूचना करण्यात आली. यासंदर्भात आम्ही टेलिफोनच्या माध्यमातून सूचना देत असतो. टोल नाक्यावरील अशा प्रकारच्या डायर्व्हशनच्या बाबतीत व दरडी कोसळण्याच्या बाबतीत आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. तसेच, त्याठिकाणी मॉलकडे जाणारे जे रस्ते आहेत व त्यामध्ये जे खड्डे पडलेले आहेत, ते रस्तेसुध्दा 15 दिवसांच्या आत दुरुस्त करुन घेण्यात येतील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पाठयपुस्तके उपलब्ध करुन न दिल्यामुळे मुलांमध्ये व पालकांमध्ये पसरलेला असंतोष

मु. शी. : पाठयपुस्तके उपलब्ध करुन न दिल्यामुळे मुलांमध्ये व पालकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत श्रीमती संजीवनी रायकर,सर्वश्री.रामनाथ मोते व प्रतापराव सोनवणे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री.रामनाथ मोते व प्रतापराव सोनवणे यांनी पाठयपुस्तके उपलब्ध करुन न दिल्यामुळे मुलांमध्ये व पालकांमध्ये पसरलेला असंतोष या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या शैक्षणिक वर्षापासून पहिली ते पाचवी व नववी ते अकरावी या चार वर्गाचा अभ्यासक्रम पूर्णपणे बदलला आहे. हा अभ्यासक्रम बदलण्याचे यापूर्वीच ठरले होते. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षात नवीन अभ्यासक्रमाची पाठयपुस्तके लागणार याची कल्पना असतानाही ती उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्रामध्ये एकाच दिवशी म्हणजे 12 जुनला शाळा सुरु झाल्या. परंतु शाळा सुरु होऊन महिना झाला तरी अद्यापी कोणत्याही वर्गाची व विषयाची पुस्तके मुलांना उपलब्ध करुन दिलेली नाहीत. तसेच, याठिकाणी शासनाने जे उत्तर दिलेले आहेत ते पूर्णपणे दिशाभूल करणारे व गोलगोल फिरवणारे अशा प्रकारचे आहे. आपण याठिकाणी म्हणता की, पाठयपुस्तक मंडळामार्फत पुस्तकांची छपाई होत आहे, पुस्तकांची छपाई करण्यास मुद्रकांना अडचणी आहेत, पुस्तकाच्या वाहतुकीसाठी वाहनेच मिळाली नाहीत, अशा प्रकारचे उत्तरे दिलेली आहेत, ती अतिशय गोलगोल फिरवणारी उत्तरे आहेत. त्यामुळे याबाबतीत माझा असा प्रश्न आहे की, मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी आणि ऊर्दू या माध्यमातील पहिली ते पाचवी व नववी ते अकरावीच्या किती विद्यार्थ्यांना आपण हा सर्व संच आवश्यक होता ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास मोते.....

शाळा सुरु होऊन एक महिना झालेला आहे. तेंव्हा, यापैकी किती विद्यार्थ्यांना आजपर्यन्त संच पुरवू शकलेलो आहोत आणि त्यामध्ये तूट किती आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आजच्या घडीला 98 टक्के पुस्तके छापून तयार झाली आहेत. 12.50 कोटींपैकी 12 कोटी 35 लाख पुस्तके छापून तयार झाली आहेत. उर्वरित पुस्तके येत्या 4/5 दिवसात छापून मिळतील.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : भाईंदर-काशिमिरा रस्त्यावरील सोनम-आकाश या इमारतीचा भाग खचल्याचे निदर्शनास येणे

मु.शी.: भाईंदर-काशिमिरा रस्त्यावरील सोनम-आकाश या इमारतीचा भाग खचल्याचे निदर्शनास येणे याबाबत सर्वश्री ॲड.अनिल परब, विलास अवचट वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री ॲड.अनिल परब, विलास अवचट यांनी "भाईंदर-काशिमिरा रस्त्यावरील सोनम-आकाश या इमारतीचा भाग खचल्याचे निदर्शनास येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत उल्हासनगर नंतर कोणाचा नंबर लागत असेल तर तो भाईंदर या शहराचा लागतो. या ठिकाणी जी इमारत खचली आहे त्यासंदर्भात सन्माननीय मंत्रीमहोदयांन निवेदन केले आहे. या इमारत बांधकामाला परवानगी सन 2001 मध्ये देण्यात आली व ऑक्युपेशन सर्टिफिकेट सन 2003 मध्ये देण्यात आले आणि आता 3 वर्षांनी या इमारतीचा काही भाग खचलेला आहे. याचा अर्थ, विकासकाने चार मजल्यांची इमारत बांधली आणि महापालिकेने त्या इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले. आता महापालिकेने सरदार पटेल इंजिनिअरिंग कॉलेजकडे तांत्रिक चाचणी अहवाल मागितला असून त्याचा अहवाल अद्याप मिळावयाचा आहे. हा अहवाल शासनाला किती कालावधीत मिळणार आहे ? मधल्या कालावधीत ही खचलेली इमारत जर पडली तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? तसेच, या बांधकामाचे ठेकेदार कोण होते ? ज्याअर्थी ही इमारत खचली आहे त्याअर्थी या इमारतीचा पाया मजबूत नाही. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर महापालिकेने कारवाई केली आहे काय ? केली नसेल तर करण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सरदार पटेल इंजिनिअरींग कॉलेजकडून उद्यापर्यन्त अहवाल प्राप्त होणार आहे. या अहवालात ज्या सूचना केल्या जातील त्यांचे तंतोतंत पालन महापालिकेच्या वतीने केले जाईल. त्यामध्ये जर इमारत तोडून पुनर्बाधणी करण्याबाबतची सूचना असेल तरीही ती मान्य करण्यात येईल. इमारतीतील रहिवाश्यांची पर्यायी व्यवस्था करण्याविषयी सूचना असेल तर तेही निश्चित मान्य केले जाईल. बिल्डरनेही हे सर्व मान्य केले आहे व त्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, पर्यायी जागा देण्याचे मान्य केले आहे, असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. परंतु, 3 वर्षामध्ये ही इमारत खचली, यास कोण जबाबदार आहे ? महापालिकेचा इमारत प्रस्ताव विभाग असतो, त्या ठिकाणी कॉम्पीटंट इंजिनिअर्स असतात, त्यांनी यासंदर्भातील अहवाल देणे आवश्यक होते. तेंव्हा, याबाबतची चौकशी करण्यात येईल काय ? आणि दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल काय ?

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मला या ठिकाणी जबाबदारीने सांगावयाचे आहे की, महापालिकेने सरदार पटेल इंजिनिअर कॉलेजकडून तांत्रिक अहवाल मागितला आहे, उद्यापर्यन्त तो मिळणार आहे. ही इमारत कशामुळे खचली, 3 वर्ष वयोमान असलेली इमारत खचते याचा अर्थ त्यामध्ये काहीतरी तांत्रिक दोष आहे, हे कोणा भविष्यवेत्याला विचारण्याची आवश्यकता नाही. निश्तिचप्रकारे त्या अहवालावर कारवाई केली जाईल. जबाबदार असणा-या बिल्डरवर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता आहे, ती केली जाईल.

...5.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लोकमान्य मतीमंद मुलांच्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेतरांना वेतन न मिळणे

मु.शी.: लोकमान्य मतीमंद मुलांच्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेतरांना वेतन न मिळणे याबाबत सर्वश्री सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.धर्मराव बाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी यांनी "लोकमान्य मतीमंद मुलांच्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेतरांना वेतन न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी नागपूर जिल्हयातील नरखेड तालुक्यातील लोकमान्य मतीमंद मुलांची शाळा आहे या शाळेतील शिक्षकांचा प्रश्न आहे. या ठिकाणी 93 ची सूचना दिल्यानंतर संबंधित अधिका-यांनी माझ्या माहितीप्रमाणे 6 तारखेला भेट दिलेली आहे. यासंबंधी 2 महत्वाच्या समस्या होत्या. शिक्षकांना 22 महिन्यांपासून पगार न मिळणे आणि 3 शिक्षकांना कामावर येण्यास प्रतिबंध करणे. शासनाच्या अधिका-यांनी भेट दिली त्याचा परिणाम असा झाला की, 3 शिक्षकांना कामांवर घेण्यात आले आहे आणि ही समस्या सुटलेली आहे. आता 22 महिन्यांचा जो पगाराचा प्रश्न आहे तो शिल्लक राहिलेला आहे. तेंव्हा, 22 महिन्यांपैकी किती महिन्यांचा पगार शिक्षकांना देण्यात आलेला आहे ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

माझ्या माहिती प्रमाणे त्या शिक्षकांना 12 ते 13 महिन्यांचा पगार मिळालेला नाही. संस्थेला पैसे मिळालेले आहेत. परंतु संस्थेने त्यांना पगार दिलेला नाही. 52 लाख रुपये सर्वांच्या नावावर बँकेकडून कर्ज काढलेले आहे. उर्वरित पगाराच्या बाबतीत आणि त्यांना ज्या पद्धतीने कर्जप्रकरणामध्ये अडकविले त्यासंदर्भात शासन काय करणार आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, दिनांक 1.4.2004 ते 17.8.2004 या 4 महिन्यांचा पगार देणे बाकी आहे. तरतूद नसल्यामुळे आपण थांबलेलो आहोत. डिसेंबर महिन्यापर्यंत 4 महिन्याचा पगार दिला जाईल. 31 मार्च, 2006 पर्यंतचा पगार दिलेला आहे. दिनांक 18.8.2004 ते 31 मार्च, 2006 पर्यंतचा पगार दिलेला आहे. 4 महिन्यांचा पगार थांबविलेला आहे. कारण शिक्षक पगार घेत नव्हते. आता पगार रिलिज करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊनही कोकण विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना न होणे.

मु. शी. : शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊनही कोकण विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना न होणे यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"1998 साली माध्यमिक व उच्च माध्यमिक मध्यवर्ती शिक्षण मंडळ पुणे यांनी ठराव पास करुन, कोकण विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ निर्माण करण्याची अनुमती दर्शविणे, यावर शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन कोकण विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ निर्माण करण्यास अनुमती देऊनही आतापर्यंत त्याची स्थापना न होणे. महाराष्ट्रात भौगोलिक सलगतेचा निकष लावून आतापर्यंत नऊ माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळे स्थापन करण्यात आली आहेत, परंतु कोकणाकरीता हा निकष असतानाही त्या संबंधी निर्णय न होणे, कोणतीही समस्या असल्यास सध्याच्या व्यवस्थेप्रमाणे सिंधुदूर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, संस्था चालकांना कोंल्हापूर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ संलग्न असल्याने कोल्हापूरला जावे लागणे. रायगड जिल्हा पुणे मंडळाला सलग्न असल्याने पुण्याला तर ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व पालकांना नाशिकला जावे लागणे, परिणामी विद्यार्थी, शिक्षक, संस्था चालक यांचे आर्थिक नुकसान होणे व वेळेचाही अपव्यय होणे, त्याचप्रमाणे दप्तर दिरंगाई व प्रशासकीय गैरसोय होणे, कोकणाकरीता कोकण विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची निर्मिती न केल्याने विद्यार्थी, शिक्षक, संस्था चालक व पालक यांच्या मनात शासनाबद्दल निर्माण झालेला असंतोष व संताप यावर करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.वसंत पुरके (शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

--------- ...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, त्यांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.वसंत पुरके : सभापती महोदय, उत्तरामध्ये दुरुस्ती नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 9 उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे आहेत. 10 वी आणि 12 वीच्या परीक्षा घेण्यासाठी लातूर जिल्हयासाठी वेगळे मंडळ स्थापन केलेले आहे. मार्च महिन्यामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदय रत्नागिरीमध्ये गेले असता कोकणासाठी वेगळे विभागीय मंडळ स्थापन करु, असे त्यांनी सांगितले होते. सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनामध्ये असे उत्तर दिलेले आहे की, तेथे उपसंचालकांचे वेगळे कार्यालय करावे लागेल. उपसंचालक विभागीय मंडळाचे पदसिध्द सदस्य असतात. मंडळाचा दैनंदीन कारभार करण्यासाठी चिटणीस व इतर कर्मचारी वर्गाची आवश्यकता असते. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे आणि ठाणे ग्रामीण इतर विभागांशी संलग्न केले आहे. परीक्षेचे पेपर तपासण्यासाठी, कार्यालयीन कामासाठी, एखाद्या शिक्षकाचा प्रॉव्हिडंड फंड असेल तर त्यासाठी त्यांना कोल्हापूरला जावे लागते. माझा पहिला प्रश्न असा आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मार्च, 2006 मध्ये रत्नागिरी येथे जाहीर केल्याप्रमाणे कोकणासाठी वेगळे मंडळ स्थापन करणार काय ? माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये त्या ठिकाणी खर्च वाढेल असे म्हटलेले आहे. एक रुपया सुध्दा शासनाला खर्च करावा लागत नाही. कारण 10 वी आणि 12 वीची मंडळे आर्थिक फायद्यामध्ये आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या वचनाप्रमाणे आणि सन 1998 साली केंद्रीय मंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आपण कोकणासाठी वेगळे मंडळ स्थापन करणार आहात काय आणि केव्हा करणार आहात ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, कोकणासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करता येणार नाही असा निर्णय सन 1998 मध्ये झालेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या शब्दाचे मी त्यांना स्मरण करुन देईन आणि योग्य तो प्रस्ताव सादर करीन. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, खर्च येणार नाही. हे मंडळ स्वायत्त असल्यामुळे त्याचा मुलांवर, पालकांवर भूर्दंड पडेल. सध्या हे करता येणार नाही, तरी मी ही बाब माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या लक्षात आणून देईन.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणासाठी स्वतंत्र विभागीय मंडळ स्थापण्यासाठी प्रशासकीय तसेच आर्थिक बोजा पडेल असे या निवेदनामध्ये सांगण्यात आले आहे. म्हणजे कोकणाला काही द्यायचे म्हटले तर लगेच आर्थिक बोजा, प्रशासकीय अडचणी वगैरे सर्व गोष्टी सरकारला सुचतात. आता असे स्वायत्त मंडळ करण्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता की नाही हे मंत्री महोदय तपासून पाहणार आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी जे कोकण पॅकेज दिले त्यामध्येच त्यांनी हा शब्द दिलेला आहे हे मी माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देतो. येथील मुले परीक्षांना बसतात त्यासाठी ते फी भरतात आणि त्यावरच तर आपला कारभार चालतो आणि नाही तरी रत्नागिरीमध्ये यासाठी उपकेंद्र आहेच. तेव्हा त्या ठिकाणी हे स्वतंत्र मंडळ, केंद्र होऊ शकते याचा अभ्यासही पूर्ण झालेला आहे. तेव्हा मंत्री महोदय यासाठी अशा प्रकारे चालढकल कशासाठी करीत आहेत ? आम्ही कोकणासाठी देखील स्वतंत्र शिक्षण मंडळ देत आहोत असे त्यांनी स्पष्टपणे जाहीरच करून टाकावे, तसे ते करणार आहेत काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, तूर्त तरी हा निर्णय घेता येणार नाही. तरीही हा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भामध्ये दोन वेगळी मंडळे आहेत, मराठवाड्यामध्ये पूर्वी एकच मंडळ होते पण आता लातूरला देखील आपण स्वतंत्र मंडळ केल्यामुळे मराठवाड्यामध्ये देखील दोन केंद्रे झाली. त्यानंतर नाशिकचे केंद्र आहे, पुणे येथे आहेच. संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रासाठी पुणे येथे केंद्र आहे. तेव्हा कोकणातील मुले मुंबईमध्ये येऊन परीक्षांना बसणार आणि त्यांच्या परीक्षांच्या एकंदर व्याप पाहता कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करणेच उचित होणार आहे. नाही तरी आपल्या सध्याच्या मंडळाची हालत काय आहे हे टीव्हीवर पहावयास मिळतेच आहे. तेव्हा तुमचे तुम्हाला आवरता येत नाही असे असताना यासाठी अधिक खर्च येणार आहे हे कशासाठी आपण सांगता आहात ? कोकणासाठी स्वतंत्र असे स्वायत्त शिक्षण मंडळ झाले तर चांगलेच होणार आहे. त्यामध्ये कोकण म्हणजे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हा भाग आपण घ्यावा. आज या भागातील वाढलेली लोकसंख्या लक्षात घेता वेगळे स्वायत्त शिक्षण मंडळ करण्यास काय हरकत आहे ? आर्थिक बोजा आणि प्रशासकीय अडचणीचे सांगता आहात पण राजकीय सोयी-सोयरिकी करता करता वैधानिक विकास मंडळे देखील आपण केली. उर्वरित महाराष्ट्रासाठी देखील स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आपण केले. कोकणासाठी देखील वैधानिक

..... 3 क्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

विकास मंडळ करण्याचा निर्णय घेतला. केवळ दोन जिल्ह्यांसाठी वैधानिक विकास मंडळ आहे मग कोकणातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयी-सुविधेसाठी हे होत असेल तर त्यासाठी अडचणी कशाला आपण सांगता ? याबाबतीत सगळ्या सदनाचे एकमत आहे तेव्हा तुम्ही आणखी काही कारणे यासाठी देऊ नका. कोकणासाठी वेगळे स्वतंत्र शिक्षण मंडळ आपण स्थापन करा, तेथील लोकांना स्वायत्तता द्या., वाटल्यास, कोकण भवनमध्ये ते करा. तसे आपण करणार का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सभागृहाची ही भावना लक्षात घेऊन हा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांच्या मार्फत पुढे केला जाईल.

(काही सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात .... अडथळा ...)

उपसभापती : सन्माननीय मंत्री महोदयांना मी या संदर्भात सांगू इच्छितो की, एक तर या लक्षवेधी सूचनेद्वारा समस्त सभागृहाने, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संबंधात केलेल्या घोषणेकडे आपले लक्ष वेधलेले आहे. विशेषत: रत्नागिरी येथे अशा प्रकारचे स्वायत्त शिक्षण मंडळ होऊ शकते असे सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनीही सांगितले आहे. तेव्हा मला देखील असे वाटते की, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अशा प्रकारचे स्वायत्त मंडळ होणे आवश्यक आहे आणि त्यासाठी हे अधिवेशन संपण्यापूर्वी आपण या बाबतीतील प्रत्यक्ष प्रपोजल सभागृहासमोर मांडावे. तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना मी रोखून ठेवत नाही. मात्र या बाबतीत जो काही निर्णय आपल्याला घ्यायचा आहे तो आपण सकारात्मक घ्या. वाटल्यास, त्यासाठी संपूर्ण चर्चा करून कोकणासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करण्यासाठीचा प्रस्ताव सभागृहाच्या माहितीसाठी घेऊन यावा.

प्रा. वसंत पुरके : ठीक आहे.

****

(यानंतर श्री. सरफरे .... 3आर 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

पृ. शी. : खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या असोसिएशनने विद्यार्थ्यामागे सुमारे सात लाख रुपये शुल्क आकारण्याची शासनाकडे केलेली मागणी.

मु. शी : खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या असोसिएशनने विद्यार्थ्यामागे सुमारे सात लाख रुपये शुल्क आकारण्याची शासनाकडे केलेली मागणी यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, विलास अवचट, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनिल परब, सुरेश जेथलिया, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांना शासनाच्या शुल्क समितीने प्रवेश शुल्कात 10 टक्क्यांनी दिलेली वाढ, परंतु खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या असोसिएशनने प्रत्येक विद्यार्थ्यामागे सुमारे सात लाख रुपये शुल्क आकारण्याची शासनाकडे मागितलेली मुभा,शासनाच्या शुल्क समिती समोर त्यांना हवी असलेली वाढ व कॉलेजचा प्रशासकीय खर्च, याबाबत सविस्तर माहिती खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी शासनाच्या शुल्क समितीकडे पाठविली असून त्या आधारेच शुल्क समितीने शुल्क ठरविले असताना, त्या विरुध्द संताप व्यक्त करुन शासनाने प्रती विद्यार्थी सात लाख रुपये शुल्क आकारणीस परवानगी दिल्यास खाजगी वैद्यकीय महाविद्यालये बंद करण्याची शासनाला, विद्यार्थ्यांना व पालकांना दिलेली धमकी, परिणामी विद्यार्थ्यांत व पालकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शुल्क समितीने केलेल्या शिफारशी खाजगी शैक्षणिक संस्थांनी आम्हाला मान्य नाहीत, आमची कॉलेजेस बंद करु अशाप्रकारची धमकी दिलेली होती त्या संदर्भातील ही लक्षवेधी आहे. निवेदनामध्ये दिलेल्या माहितीवरुन दिसते की, धमकीचे पत्र त्यांना नंतर मिळालेले आहे. निवेदनामध्ये असे म्हणतात की, आमची त्यांच्याशी बैठक झाली. त्यातून काही तरी मार्ग निघेल. अबु आझमी यांनी धमकी दिल्यानंतर पोलीस चौकीच्या कामाला स्थगिती दिली. त्यानंतर खाजगी शैक्षणिक संस्था चालकांनी धमकी दिल्यानंतर ताबडतोब बैठक घेऊन त्यांच्याबरोबर तडजोड केली जाते. शासन नावाची यंत्रणा महाराष्ट्रामध्ये अस्तित्वात आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, गरीब विद्यार्थ्यांसाठी शुल्क समितीने जी शिफारस केलेली आहे, ती मान्य न करण्याचे कारण काय आहे ? संस्थांकडे या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी स्वत:ची रुग्णालये आहेत काय ? याचा खुलासा करावा.

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या फीच्या संबंधातील लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. या खाजगी मेडिकल कॉलेजच्या फी संबंधातील प्रकरण सन 2002 पासून सुप्रीम कोर्टामध्ये आणि हायकोर्टामध्ये आहे. आता 7 जुलै रोजी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या असोशिएशननी पहिल्यांदा प्रेसमध्ये सांगितले की, शिक्षण शुल्क समितीने ठरविलेली फी आम्हाला मान्य नाही. आम्ही विद्यार्थ्यांना प्रवेश देणार नाही. यासंबंधीचे पत्र शासनाकडे 7 तारखेला पत्र प्राप्त झाले. या विषयातील गंभीरता पाहून वैद्यकीय शिक्षण मंत्री सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील साहेबांनी असोसिएशनचे पदाधिकारी यांची बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. ही बैठक घेण्याचा हेतू एवढाच होता की, गेली तीन-चार वर्षे प्रवेश प्रक्रिया डिस्टर्ब झालेली आहे. कोर्टाचे आदेश हे 30 सप्टेंबरपर्यन्त प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन मेडिकल कॉलेजेस सुरु करावीत, असे आहेत. म्हणून बैठक घ्यावी लागली. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या असोशिएशनचे काय म्हणणे आहे, ते ऐकून घेण्यासाठी बैठक घेतली होती. या विषयाच्या संदर्भामध्ये प्रत्येक अधिवेशनामध्ये या ठिकाणी चर्चा झालेली आहे. कोर्टामध्ये 2002 पासून प्रकरण आहे. शिक्षण शुल्क समिती ही हायकोर्टानेच नेमलेली आहे. ही शिक्षण शुल्क समितीने अंतरिम फी ठरविलेली आहे. त्यामुळे खाजगी मेडिकल कॉलेजना शिक्षण शुल्क समितीने ठरविलेली फी मान्य नसेल तर पुन्हा हायकोर्टामध्ये अपील करता येईल. फायनल फी ही शिक्षण शुल्क समिती ठरविणार आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

शासनाचे असे धोरण आहे की, शिक्षण शुल्क समिती जी फी ठरवील तीच फायनल राहणार आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : ज्या शैक्षणिक संस्था वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देतात त्यापैकी किती संस्थांची स्वत:ची रुग्णालये आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : ती यादी घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने फी ठरविण्याचा अधिकार संस्थेस दिला आहे, हे खरे आहे काय ? सर्वोच्च न्यायालयाने जे निर्णय दिलेले आहेत ते शासनाने गंभीरपणाने वाचलेले आहेत काय ? जर सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय वेगळे असतील तर सदनाच्या पटलावर माननीय मंत्रिमहोदय जी माहिती देत आहेत ती गांभीर्यपूर्वक देत आहेत काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सभागृहात बोलताना मंत्री गांभीर्यपूर्वकच बोलतात.

डॉ. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय गांभीर्यपूर्वक बोलत आहेत म्हणून मला काही परिच्छेद वाचून दाखविणे भाग आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारावयाचे असतात. या ठिकाणी चर्चा होत नसते. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. शासनातर्फे त्याचे उत्तर देण्यात येईल.

डॉ. कमलकिशोर कदम : सभापती महोदय, सभागृहाच्या पटलावर गांभीर्यपूर्वक दिलेली माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधात नसावी म्हणून या ठिकाणी ही माहिती देणे आवश्यक वाटते. या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "Our answer to Question 3 is that every institution is free to devise its own fee structure but the same can be regulated in the interest of preventing profiteering. No capitation fee can be charged." पुन्हा त्यांनी असे लिहिले आहे की, "To set up a reasonable fee structure is also a component of "the right to establish and administer an institution" within the meaning of Article 30(1) of the Constitution, as per the law declared in Pai Foundation."

3S2...

डॉ. कमलकिशोर कदम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याला घटनेचा आधार आहे. यामध्ये सरकारचा जी.आर., रुल्स, रेग्युलेशन्स चालत नाही. हा संस्थेस घटनेने दिलेला अधिकार आहे. या परिच्छेदामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "Every institution is free to devise its own fee structure subject to the limitation that there can be no profiteering and no capitation fee can be charged directly or indirectly, or in any form." समितीचे काम हे संस्थेने ठरविलेली फी प्रॉफिटियरींग आहे की काय ? हे पाहण्याचे आहे. ही जी समिती नेमली ती संस्थेची फी ठरविण्यासाठी नेमलेली नाही. या लक्षवेधी सूचनेला असे उत्तर देण्यात आले आहे की, शैक्षणिक वर्ष 2006-07 करिता खाजगी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांकरिता अंतरित शुल्क ठरविण्याकरिता शुल्क समिती गठीत करण्यात आली आहे. शुल्क ठरविण्यासाठी ही समिती नेमण्यात आलेली नाही तर या समितीचे काम आम्ही जे शुल्क ठरवू....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सुप्रीम कोर्टाने ज्या दोन समित्या नेमलेल्या आहेत त्यामध्ये शैक्षणिक शुल्क समिती आहे आणि त्याची जी व्याख्या दिलेली आहे त्यामध्ये त्यांची फी ठरविण्याचा त्यांना अधिकार आहे. यापूर्वी देखील तेच फी ठरवित होते. तसेच प्रवेशाचे नियंत्रण कसे करावयायाचे हेही ते ठरवित आहेत. या दोन समित्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार नेमण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांच्याकडून चुकीचे वक्तव्य आलेले आहे. त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

यानंतर श्री. शिगम...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

डॉ. कमलकिशोर कमद : श्री. उन्नीकृष्णन यांनी असे सांगितले की, राज्य सरकारने शिक्षणाचे नॅशन्लायझेशन केलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : माझ्या हरकतीच्या मुद्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा .

उपसभापती : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न ऐकून घेतल्या शिवाय हरकतीचा मुद्दा उपस्थित करणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य प्रश्नाची पार्श्वभूमी सांगत आहेत. ते जर चुकीचे सांगत असतील तर ते रेकॉर्डवरुन काढता येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य याठिकाणी प्रश्न विचारण्या ऐवजी भाषण करीत आहेत हा माझा हरकतीचा मद्दा आहे.

डॉ. कमलकिशोर कदम : उपसभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेले आहेत. त्यामध्ये फी ठरविण्याचे अधिकार संस्थेला आहेत असे सांगितलेले आहे. परंतु त्यामध्ये प्रॉफिटिअरिंग होत असेल तर ते रेग्युलराईज करण्यासाठी समिती नेमलेली आहे. तेव्हा समितीने शिक्षण संस्थांकडील कागदपत्रे पाहून प्रॉफिटिअरिंग होते की नाही हे पाहिले पाहिजे. मात्र समितीला फी ठरविण्याचे अधिकार नाहीत. समितीने कागदपत्रे मागवून ती तपासावीत. समितीला ॲडहॉक फी ठरविता येणार नाही. शासनाने निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार विनाअनुदानित महाविद्यालयांचे शुल्क ठरविण्यासाठी शिक्षण शुल्क समिती गठित करण्यात आलेली आहे." प्रॉफिटिअरिंग होत असेल तर ते तपासण्यासाठी शिक्षण शुल्क समिती आहे. याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता आहे. म्हणून मी पुन्हा पुन्हा हे सांगत आहे की, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेली समिती ही फी रेग्युलराईज करण्यासाठी, प्रॉफिटिअरिंग होऊ नये म्हणून नेमलेली असून त्या समितीला शुल्क ठरविण्याचा अधिकार नाही .

श्री. सुरेश शेट्टी : या समितीचे नाव शिक्षण शुल्क समिती असे आहे. ही समिती फी ठरविणार आहे असे आम्ही कुठे सांगितलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया नुसार फी संस्था ठरविणार आहे. पण ती रिझनेबल आहे की नाही हे शिक्षण शुल्क समिती ठरविणार आहे. हे लेडडाऊन प्रोसिजर आहे. प्रत्येक संस्था शिक्षण शुल्क समितीकडून पेपर्स् तपासून घेतात. शिक्षण शुल्क समितीमध्ये चार्टर्ड अकौण्टण्ट, विभागाचे सचिव, अशी मंडळी आहे. ही समिती पेपर्स पाहून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश शेट्टी...)

अमूक एका ऑर्गनायझेशनसाठी अमूक अमूक इतकी रिझनेबल फी आहे असे सांगते. हे प्रोसिझर मान्य झालेले आहे. या सभागृहामध्ये आपण जजमेंटवर चर्चा करणे योग्य होणार नाही. शिक्षण शुल्क समितीने इंटेरिम रिपोर्ट दिलेला आहे. आमचे संस्था चालकांना हेच सांगणे आहे की, शिक्षण शुल्क समितीने जी फी रेकमेण्ड केलेली आहे त्याबाबतीत काही तक्रारी असतील तर त्यांनी पुन्हा शिक्षण शुल्क समितीला भेटावे.

...नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2.... श्री.सुरेश शेट्टी.....

आपले पेपर्स पुन्हा सादर करावेत आणि त्यांच्याकडून निर्णय फिरवून घ्यावा. शासनाची त्याला हरकत असणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, शिक्षण शुल्क समितीकडे पुन्हा जा आणि रेग्युलराईज करुन घ्या.....

Shri Suresh Shetty : Sir,it is an Interim Report and they have a right to make an appeal against this. Sir, definitely, they can go back to the Committee.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाचा जो निर्णय आहे त्यानुसार एक शेड्यूल दिलेले आहे. ॲडमिशन्स केव्हा व्हाव्यात, सीईटी परीक्षा केव्हा व्हावी, प्रवेश केव्हापर्यंत व्हावेत, फी केव्हापर्यंत भरावी याचा संपूर्ण कार्यक्रम ठरवून दिलेला आहे. त्या कार्यक्रमानुसार फी घेणार का? संस्था चालक आणि शासन यांच्यातील वादाशी आम्हाला काही घेणे देणे नाही. विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागू नये ही आमची भावना आहे. त्यामुळे शेड्यूलप्रमाणे अंमलबजावणी होईल का? खाजगी संस्था चालकांनी शासनाला धमकी दिली आहे की, आम्ही कॉलेज बंद करु, त्या धमकीला बळी पडणार का?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आम्ही शासनाच्या मेडिकल कॉलेजातील प्रवेशाचे वेळापत्रक 2-3 महिन्यापूर्वीच निश्चित केले होते. त्यामध्ये कट ऑफ डेट एमबीबीएस, बीडीएस व इतर वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी 30 सप्टेंबर ही निश्चित केली आहे. काही वेळापूर्वी सन्माननीय सदस्यांनी औचित्याच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला होता, 14 जुलै ही सिलेक्ट यादी जाहीर करण्याची तारीख आहे त्याप्रमाणे सिलेक्ट लिस्ट जाहीर होणार आहे ती 2-3 दिवस पुढे ढकलण्यात यावी.....

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, ॲक्सेप्टन्स ऑफ प्रेफरन्स फॉर्मची मुदतवाढ मागितली होती, त्याची तारीख पुढे ढकलण्याची विनंती केली होती.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2....

श्री.सुरेश शेट्टी : शासनाने जे टाईमटेबल निश्चित केले होते त्यानुसार फिलिंग ऑफ ॲडमिशन फॉर्मचा 28.6.2006 ते 4.7.2004 पर्यंत कार्यक्रम होता. डिक्लेअर ऑफ सिलेक्टेड कॅण्डिडेट लिस्ट उद्या 14 जुलै रोजी जाहीर होणार, त्याप्रमाणे आम्ही उद्या ती निश्चित जाहीर करु. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांची गॅरंटी आम्ही घेत नाही. खाजगी मेडिकल कॉलेजांच्या वतीने कोर्टात एमओयू अंडरटेकिंग दिले आहे, त्यांच्या तारखा त्यांनी कोर्टात सांगितल्या आहेत.

डॉ.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्रीमहोदयांनी ज्या एमओयूचा उल्लेख केला त्या संदर्भात कोर्टात संस्थेने पुन्हा आक्षेप नोंदविला आहे. आमच्या असोसिएशनच्या कोणाही पदाधिकाऱ्यांनी त्यावर सही केलेली नाही. एमओयूवर ज्या सह्या आहेत त्या डायरेक्टर, मेडिकल एज्युकेशन, शासन, पॅरेंटस् असोसिएशनचे पदाधिकारी आणि आणखी 2-3 लोकांच्या सह्या आहेत. त्यामध्ये खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या असोसिएशनच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याची सही नाही. मंत्रीमहोदय जो एमओयू वाचून दाखवित आहेत तो आम्हाला मान्य नाही हे आम्ही हायकोर्टामध्ये सिव्हिल ॲप्लिकेशनद्वारे दाखल केले आहे.

श्री.सुरेश शेट्टी : कोर्टात जे एमओयू झाले ते संस्था चालकांना मान्य आहे की नाही हे मला माहिती नाही. ते कोर्ट ठरविणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. शेड्यूलप्रमाणे फी घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देणार की धमकीला बळी पडणार आहात?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी सांगितले, असोसिएशनला मान्य नाही. सभापती महोदय, कोर्टात असोसिएशनचे पदाधिकारी जात नाहीत. कोर्टात सरकारतर्फे आमचे वकील जातात, पॅरेंट आणि संस्था चालकांच्या असोसिएशनचे वकील जातात. असोसिएशनच्या वकिलांनी एमओयूवर सही केली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

आता ते कोर्टामध्ये अपिलात गेलेले आहेत. यासंदर्भातील कोर्टाचा निर्णय येईपर्यंत आपण थांबू या . Sir, they are not agreed with the terms and conditions and hence, they went into appeal to the Court. त्यांचा निर्णय येईपर्यंत आपण थांबू. And the last date of joining the Association Colleges is 7th September, 2006.

डॉ.कमल किशोर कदम : सभापती महोदय, मी असोशिएशनच्या वतीने खुलासा करतो की, शासनाने वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाबतीत माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी माहिती दिलेली आहे. मेडीकल कॉलेजेस सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे 31 ऑगस्ट पासून सुरु होणार आहेत.

(Interruptions.)

Dr. Deepak Savant: Sir, let the Hon. Minister of State for Medical Education Department to continue his reply. Let the reply come from the Horses mouth.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सांगितल्या प्रमाणे कोर्टात एमओयु साईन झाले आहे. त्यासंदर्भातील पेपरसुध्दा माझ्याकडे आहेत. वाटले तर ही माहिती मी पटलावर ठेवतो. मेमोरंड्म साईन झाल्यानंतर पदाधिका-यांनी सांगितले की, We are not a party to this M.O.U. because it was not signed by them. But, the fact remains that the lawyers, who are representing the Association, have these-selves signed this M.O.U. Sir, since the Association itself has gone in an appeal against this, the Court will take the decision. Now, we will not make any comment on it. Let the Court decide about it. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये जितके प्रायव्हेट मेडीकल कॉलेजेस आहेत त्यामध्ये जे विद्यार्थी ॲडमिशन घेणार आहेत किंवा जे विद्यार्थी शिकत आहेत, त्यांसदर्भात प्रॉफिटरींग प्रिव्हेंन्ट करण्यासाठी महाराष्ट्र शासन पूर्ण कार्यवाही करेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सोलापूर मध्ये रस्ते विकास महामंडळाकडून झालेली निकृष्ट दर्जाची कामे.

मु.शी.: सोलापूर मध्ये रस्ते विकास महामंडळाकडून झालेली निकृष्ट दर्जाची कामे यासंबंधी प्रतापसिंह मोहिते-पाटील,संजय दत्त, सुधाकर गणगणे, रणजितसिंह मोहिते-पाटील वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर शहरात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून रस्त्यांची कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली असून त्यात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे अलिकडेच माहे जून 2006 वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, रस्त्यांच्या कामात अनेक ठिकाणी मोठे खड्डे व दुभाजक चिरुन पडलेले असून त्याचा उपयोग लोक कचरा टाकण्यासाठी करत असणे, तसेच झेब्रा क्रॉसिंग व रोड मार्कींगसाठी वापरण्यात आलेल्या रंगाच्या साहित्यात देखील मोठया प्रमाणात फरक असल्याचे आढळणे, थर्मोप्लास्टिक पेंट वापरण्याऐवजी साधे पेंट वापरणे, तसेच ब-याच ठिकाणी फरशीकरणाऐवजी कोबा करण्यात येणे व फूटपाथचे काम अर्धवट स्थितीत करुन शासनाच्या पर्यायाने जनतेच्या पैशाचे मोठया प्रमाणात नुकसान करणे, परिणामी जनतेत पसरलेली असंतोषाची व नाराजीची भावना, जर 15 दिवसांत कारवाई झाली नाही तर ठिय्या आंदोलन करण्याचा स्थानिक नागरिकांनी दिलेला इशारा, याबाबत शासनाने लक्ष घालून करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक उपक्रम मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये रस्त्याच्या कामाच्या दर्जाच्या चौकशीसाठी श्री. धिंग्रा, श्री. टोपकर आणि श्री. खातू या त्रिसदस्यीय समितीची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कमिटीच्या आधारे या ठिकाणी उत्तरे देण्यात आलेली आहेत. या त्रिस्तरीय समितीने जो अहवाल दिलेला आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, क्वालीटी मॅन्युअल कॉन्ट्रयाक्टरने केले नाही, मटेरिअल टेस्टींग सॉफट्वेअर ठेवले नव्हते, सेफट्री इन्स्ट्रूमेंट वापरले नाही, डेनेजची व्यवस्था केलेली नाही, स्ट्रेन्थ तपासणी केली नाही, रस्त्याची स्टेटस तपासणी केली नाही, तपासणीसाठी कोणतेही रिपोर्ट मिळाले नाहीत, रिक्वायरमेंटचे काम झालेले नाही, स्ट्रेन्थ उपाययोजना केलेली नाही, क्वालीटी मेंटेन केलेली नाही. अशा प्रकारच्या त्रुटी अहवालात देण्यात आलेल्या आहेत. या अहवालाच्या आधारे या ठिकाणी उत्तरे देण्यात आलेली आहेत. या रस्त्याच्या कामाच्या संदर्भात महापालिका आयुक्तांनी तक्रारी केलेल्या आहेत तसेच या संदर्भात लोकांनी सुध्दा तक्रारी दिलेल्या आहेत. त्यामुळे आपण या ठिकाणी जी माहिती दिलेली आहे ती खरी आहे की, अहवाल खरा आहे ? याचे उत्तर प्रथम देण्यात यावे तसेच यासंदर्भात तपासणी करण्यात येणार आहे का? या रस्त्याची दुरुस्ती होणे अतिशय महत्वाचे आहे. तसेच या रस्त्याच्या 29 वर्षापैकी 2 वर्षे रस्ता महामंडळ दुरुस्ती करणार आहे आणि 27 वर्षे महापालिका दुरुस्ती करणार आहे व टोल महामंडळ घेणार आहे हे खरे आहे का असे माझे एकूण तीन प्रश्न आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सोलापूर शहरात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून 100 कोटी रुपयांची कामे सुरु आहेत. या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्यासंबंधी तक्रारी आल्या होत्या. या संदर्भात चौकशी करण्यासाठी श्री.धिंग्रा, श्री.टोपकर व श्री.खातू यांची त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली होती. त्यांच्या अहवाल कुठेही कामे निकृष्ठ दर्जाची झाली आहेत असा कुठेही उल्लेख नाही. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त यांचेबरोबर सुध्दा माझे बोलणे झालेले आहे. त्यांनी सुध्दा या कामाबद्दल कोणतीही नापसंती व्यक्त केलेली नाही. या जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांचेबरोबर सुध्दा माझे बोलणे झाले. त्यांनी सुध्दा कोणतीही नाराजी व्यक्त केली नाही. सध्या अनेक ठिकाणी कामे सुरु आहेत. ज्याठिकाणी 100 टक्के काम पूर्ण झालेले आहे त्याठिकाणी कामाच्या बाबतीत कोणतीही तक्रार नाही. काही ठिकाणी वाहनांच्या धडकेने दुभाजक पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत, परंतु त्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. या सर्व कामांमध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत याची मी ग्वाही देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्रिस्तरीय रिपोर्ट माझ्याकडे सुध्दा आहे. त्रिस्तरीय रिपोर्ट खरा की निवेदनावरील उत्तर खरे ? रिपोर्टमध्ये काय म्हटले आहे ते मी वाचून दाखवितो.: "The system of product tagging identification was not very clear. Hence, there is a poor traceability of materials received on sites, Samples materials and the section where the material finally used." क्वॉलिटी डिव्हाडरचे नॉर्म्स नेहमीच्या पध्दतीने ठरविलेले होते, परंतु त्याप्रमाणे काम झालेले नाही. मी आपल्याकडे रिपोर्टची कॉपी पाठवितो.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, त्रिस्तरीय सदस्यांनी दिलेला रिपोर्ट 200 पानांचा आहे. काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे असा त्यांच्या कंक्ल्युझनमध्ये उल्लेख नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांना हे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे असे वाटत असेल तर क्वॉलिटी कंट्रोल विभागाकडून फेरतपासणी करुन एक महिन्यात रिपोर्ट घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या कामामध्ये भ्रष्टाचार झाला असेल म्हणूनच त्रिस्तरीय नेमण्यात आली आणि त्यांनी 200 पानांचा रिपोर्ट दिला. माननीय मंत्रिमहोदयांना त्यांच्या रिपोर्टवर विश्वास नाही म्हणून ते क्वॉलिटी कंट्रोल विभागाकडून फेरतपासणी करीत आहेत. हा रिपोर्ट एक महिन्यानंतर येईल. तेव्हा माझी मागणी आहे की, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि पुढील अधिवेशनात ही लक्षवेधी सूचना घ्यावी त्यावेळी क्वॉलिटी कंट्रोल विभागाचा रिपोर्ट सुध्दा प्राप्त झालेला असेल.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याचा प्रश्न येत नाही. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे जर सन्माननीय सदस्यांचे समाधान होत नसेल तर क्वॉलिटी कंट्रोल विभागाकडून फेरतपासणी करण्यात येऊन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, अहवालातील मुद्दा क्रमांक 52 च्या बाबतीत रिपोर्ट तपासणीसाठी उपलब्ध झाले नाहीत. मुद्दा क्रमांक 22 व 23 हे सर्वच मुद्दे पाहिले तर अहवालाच्या विरुध्द उत्तरे येत आहेत. हा अहवाल निगेटीव्ह आहे का ? आपण याबाबतीत फेर तपासणी करणार आहात, याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु आपण त्याठिकाणी टोल घेणार आहात, हे खरे आहे का ? टोलच्या बाबतीत आपण सुस्पष्ट असा खुलासा करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सोलापूर शहरात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून जी रस्त्यांची कामे झाली आहेत, त्याची मी व पालकमंत्र्यांनी पाहणी केलेली आहे. याबाबतीतील जो रिपोर्ट आहे तो त्याठिकाणी चांगल्या प्रकारचे काम झालेले आहे असा आहे. तरीही सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी ज्या सूचना केल्या त्या आम्हाला मान्य आहेत. त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे त्याबाबतीत आपण फेरतपासणी करणारच आहोत. टोलच्या बाबतीत ओरिजनल ॲग्रीमेंट किती वर्षाचे आहे ते पहावे लागेल. टोलची वसुली ओरिजनल ॲग्रीमेंटनुसार करता येईल. महाराष्ट्रातील नागपूर व बारामतीमध्ये एआरडीपीच्या माध्यमातून अतिशय चांगल्या प्रकारची कामे झालेली आहेत. हे दोन जिल्हे अतिशय सुंदर झाले आहेत. त्याच माध्यमातून तिसरे काम हे सोलापूरमध्ये होत असून पुढील सहा महिन्यात महाराष्ट्रातील तिसरे सुंदर शहर म्हणून सोलापूर आपल्याला पहावयास मिळेल. त्याठिकाणी फार चांगल्या प्रकारचे काम चालू आहे. तरीही याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्याबाबतीत आपण फेरतपासणी करु. एआरडीपीच्या माध्यमातून सोलापूर शहरामध्ये चांगल्या प्रकारे काम करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न राहतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अकोला बायपास रोडची फारच दूर्दशा झालेली असून त्याठिकाणी अर्धवट काम झाले आहे. असे असतानाही त्याठिकाणी बेकायदेशीररित्या टोल घेणे चालू आहे. तो आपण रद्द करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अकोला बायपासचे काम आमच्या विभागाकडे येत नाही. ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे येते.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांनी जो माझ्याकडे रिपोर्ट दिलेला आहे, त्यामध्ये सुस्पष्ट असे म्हटले आहे की, बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे झाले आहे. आपण व पालकमंत्र्यांनी त्याठिकाणी पाहणी केली असेल. पालकमंत्री हे शासनाचे एक प्रतिनिधी आहेत. ही लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी दिलेली असून ते याबाबतीत तक्रारदार आहेत. त्यामुळे त्यांना सोबत घेऊन त्यांच्यासमवेत नगरसेवकांना, पालकमंत्र्यांना घेऊन आपण स्वत: त्याठिकाणची पाहणी करावी. आपण तक्रारदारांना व महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांना समवेत घेऊन पाहणी केली तर त्यांच्या प्रश्नांचे निरसन होऊ शकेल. त्यामुळे आपण त्यांनासोबत घेऊन पाहणी करणे योग्य होईल, असे मला वाटते. तसेच तालिका सभापती, सन्माननीय श्री.विनोद तावडे हे प्रतिनिधी म्हणून आपल्या सोबत असतील. ही पाहणी आपण या आठवडयामध्ये....

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ही पाहणी आम्ही अधिवेशन संपल्यानंतर करु. मी स्वत: सन्माननीय सदस्यांचा वेळ घेऊन याबाबतची पाहणी करेन. तसेच त्याठिकाणी महापालिकेच्या महापौरांना एकत्रित घेऊन व तेथील सर्व पदाधिकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना एकत्रित घेऊन त्यांच्याशी चर्चा करुन त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही यादृष्टीने काळली घेऊ.

उपसभापती : आपणांकडून जी कार्यवाही करण्यात येईल त्याचा अहवाल मला सादर करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ठीक आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पृ.शी.: नवी मुंबईतील महापालिकेच्या शाळांची झालेली दयनीय स्थिती

मु.शी.: नवी मुंबईतील महापालिकेच्या शाळांची झालेली दयनीय स्थिती यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी, भास्कर जाधव, विनायकराव मेटे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"नवी मुंबईतील जिल्हा परिषदेकडून महापालिकेकडे हस्तांतरित झालेल्या शाळांची स्थिती अत्यंत दयनीय असून शाळांमध्ये फेरफटका मारल्यास तुटक्या खिडक्या, मोडकी दारे, उखडलेल्या लाद्या, फुटलेले फळे, बसण्याची सोय नाही, विजेचा अभाव, तुटेले पंखे, तुटलेली बाके, प्रसाधनगृहे नसणे, अपूरे शिक्षक अशा परिस्थितीत 1,064 विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे आढळून येणे, शिक्षण मंडळे व अभियांत्रिकी विभागाच्या दुर्लक्षामुळे शाळांची दुरावस्था होणे, परिणामी विद्यार्थी, शिक्षक व पालक वर्गात पसरलेला तीव्र असंतोष, नवी मुंबई महानगरपालिका शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी त्या शहरातील खाजगी संस्थांना चालविण्यास देण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ SBT/ MHM/ KGS/ MAP/

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, 24 हजार गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनाचा आणि आरोग्याचा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी या सभागृहात उपस्थित करीत आहे. नवी मुंबई हे सुनियोजित शहर म्हणून ओळखले जाते. नवी मुंबईमध्ये सिडको, एमआयडीसी आणि महापालिका यांच्या माध्यमातून अनेक प्रकल्प उभे रहात आहेत. नवीन मुंबई नगरी ही पुणे शहरानंतर शिक्षणाची नगरी म्हणून उदयास येत आहे. नवी मुंबई महापालिकेच्या ज्या शाळा आहेत त्या शाळांची दुर्दशा पाहिल्यावर, दयनीय अवस्था पाहिल्यावर लोकप्रतिनिधी म्हणून मनात खंत निर्माण होते. गेल्या आठवडयामध्ये 19 नंबर शाळेमध्ये फायझर कंपनीच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत वहया-पुस्तके वाटण्यासाठी मी गेली असतांना पालकांनी, शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी, मुख्याध्यापकांनी मला शाळेची पाहणी करण्यासंबंधी विनंती केली. शाळेची पाहणी केल्यावर आमची आम्हालाच लोकप्रतिनिधी म्हणून लाज वाटावयास लागली. 7 व्या इयत्तेतील वयात आलेली विद्यार्थीनी कुमारी मनिषा पवार हिने असे लक्षात आणून दिले की, या शाळेमध्ये मुलींसाठी बाथरुम, टॉयलेटची सुविधा नसल्याने त्यांना उघडयावर बसावे लागते. नवी मुंबईसारख्या शहरामध्ये शाळेची एवढी वाईट अवस्था असेल हे मला माहित नव्हते. 2/3 दिवस वर्तमानपत्रात ही बातमी प्रसिध्द होत होती. त्या दिवशी ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर लाजेने, शरमेने मान खाली घालावी, अशी अवस्था झाली. सभापती महोदय, आपण त्या विभागातील लोकसभेचे उमेदवार आहात. हा विषय फार गंभीर असल्याने व विद्यार्थ्यांशी संबंधित असल्यामुळे मी आपल्याकडे थोडा अधिक वेळ बोलण्यासाठी मिळावा म्हणून विनंती करीत आहे. प्रत्येक शाळेमध्ये गेल्यानंतर पाणी पडणे, दरवाजे नसणे, खिडक्या नसणे, बाथरुम, टॉयलेट नसणे, लाईट नसणे, फॅन नसणे अशी अवस्था आहे. मी मनिषा विद्यालयामध्ये गेली होते त्या ठिकाणीही अशीच अवस्था होती. नवी मुंबईतील 24 हजार विद्यार्थ्यांच्या जीवन-मरणाचा हा प्रश्न आहे. 'ई' टी.व्ही.वर देखील ही बातमी आली होती. अशा अवस्थेतील महापालिकेच्या या शाळा आहेत. मनिषा विद्यालयाची इमारत ही 3 वर्षे झाली 'धोकादायक इमारत' म्हणून महापालिकेने जाहीर केली आहे. असे असतांनाही त्या ठिकाणी वर्ग घेतले जात आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

त्या वर्गांना मी भेट दिल्यानंतर त्या वर्गातील एका छोटया विद्यार्थीनीने मला सांगितले की, मी रोज येथे बसते. हे छत कधी पडेल आणि छत पडल्यामुळे मला काय होईल, हे सांगता येत नाही. अशा मानसिक अवस्थेमध्ये तेथील विद्यार्थी कसे शिक्षण घेतील ? सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. त्या शाळेचे मुख्याध्यापक त्यांची नोकरी जाईल म्हणून माझ्याशी बोलावयास घाबरत होते. तुम्ही बिनधास्त बोला असे मी त्यांना सांगितले. मी संपूर्ण शाळेची पाहणी केली. 10 दिवसापासून त्या शाळेची साफसफाई झालेली नव्हती. घाणीमुळे दुर्गंधी येत होती. मी अधिका-यांना फोन करुन शौचालय साफ करण्यास सांगितले. सभापती महोदय, करोडो रुपये खर्च करुन रस्ते बांधले जातात. मग महानगरपालिकेच्या शाळांसाठी महानगरपालिकेच्या बजेटमध्ये तरतूद का केली जात नाही ? तसेच, जी तरतूद केली जाते ती इतर कामांसाठी वापरली जाते. माननीय मंत्री महोदयांना माझा असा प्रश्न आहे की, या शाळेची दुरुस्ती करण्यात यावी आणि प्रथम प्राधान्याने शौचालय, बाथरुमची साफ सफाई करण्यात यावी, ती केव्हा केली जाईल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी जो विषय मांडला तो अतिशय गंभीर आहे. त्या भावना विवश होऊन बोलत होत्या. माननीय श्री.प्रभाकर मोरे शिक्षण मंत्री असतांना त्यांनी धोरण जाहीर केले होते. त्यावेळी मी सकाळी 6.30 वाजता त्यांना फोन करुन त्यांचे अभिनंदन केले होते. प्रत्येक शाळेमध्ये मुलींकरिता बाथरुम असले पाहिजे असा त्यांनी कायदा केला होता. त्या कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर आपण संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी भावना विवश होऊन नवी मुंबईमधील शिक्षण क्षेत्रातील महानगरपालिकेच्या शाळेचा प्रश्न व्यथित केला. या सर्व 49 शाळा जिल्हा परिषदेकडून महानगरपालिकेकडे सन 2000 मध्ये हस्तांतरीत झालेल्या आहेत. भौतिक सुविधा, शाळेचे बांधकाम महानगरपालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. जिल्हापरिषदेच्या शाळा सन 2000 मध्ये महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत. मागच्या

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....

5-6 वर्षामध्ये अनेक शाळा महानगरपालिकेने देखील बांधलेल्या आहेत. शाळेमध्ये बाके नाहीत, फळे नाहीत असा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. सभापती महोदय, मला असे वाटते की, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी बरेच प्रश्न विचारले असल्यामुळे मला सविस्तर उत्तर देण्यास काही हरकत नाही.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

सभापती महोदय, या ठिकाणी शैक्षणिक दर्जा वाढावा आणि भौतिक सुविधा देण्याच्यादृष्टीने महापालिकेच्या वतीने काही प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे. या वर्षीच्या म्हणजे 2006-07 च्या बजेटमध्ये 7 कोटी रूपये शाळांच्या नवीन इमारती बांधकामासाठी तरतूद केलेली आहे तसेच शाळा दुरूस्तीसाठी 50 लाखाची तरतूद केलेली आहे. या शाळांमध्ये जो काही भौतिक सुविधांचा अभाव असेल, शैक्षणिक दर्जाचा प्रश्न असेल, उदा. सन्माननीय सदस्यांनी तेथील शाळांमध्ये शौचालये नाहीत, दारे-खिडक्या नाहीत वगैरे जे काही सांगितले आहे ते सारे गांभीर्यानेच घेतले जाईल आणि या 6 कोटीतून त्यासाठी अग्रक्रमाने खर्च केला पाहिजे अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्या श्रीमती म्हात्रे यांनी तेथील शाळांची भयानक अवस्था येथे कथन केली आहे आणि सभागृहाच्या परंपरेनुसार ती माहिती खरी आहे असे गृहीत धरावयाचे असते. त्याप्रमाणे ते खरे आहे हे गृहित धरून त्यासाठी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून बराच निधी देता येतो तो आपल्याला तेथे देता येईल. त्या दृष्टीने विभागाच्या प्रधान सचिवांची समिती गठित करून, तेथील शाळांबाबत अभ्यास करून त्या अनुषंगाने महापालिकेला प्राधान्याने खर्च करावा असे सांगितले जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी जो विषय येथे मांडला, त्यांचे सविस्तर निवेदन ऐकल्यानंतर असे वाटले की, तुटक्या खिडक्या, मोडकी दारे, कशी शिक्षण घेत असतील तेथील पोरे अशी स्थिती तेथे आहे. सर्व शिक्षा अभियानामधून नवी मुंबईला जो पैसा आला आहे त्यातील किती पैसा प्रत्यक्ष वापरला गेला आहे ? आणि किती पैसा न वापरता परत गेला आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्याजवळ आता अशा प्रकारे पूर्ण जिल्ह्याची माहिती नाही. मात्र मी इतकेच सांगू इच्छितो की, सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत मागील वर्षी अनेक शाळा बांधकामासाठी पैसे वापरण्यात आलेले आहेत. कोठेही तो पैसा परत गेलेला नाही. आता येथे जो मुख्य मुद्दा आहे की, त्या शाळांमध्ये शौचालये व्हायला पाहिजेत व अशाच अन्य भौतिक सुविधा देखील असावयास पाहिजेत तर त्यासाठी या 6 कोटीच्या तरतुदीतून प्रथम प्राधान्याने घेण्याच्या दृष्टीने शासनाकडून महापालिकेला सूचना दिल्या जातील. त्याचप्रमाणे प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांची एक समिती गठित करून नवी मुंबईतील महापालिकेच्या 57 शाळांच्या बाबतीत सर्व सुविधा पूर्ण केल्या जातील.

*****

..... 4ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करून घेणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो. ..

" कामकाज सल्लागार समितीच्या गुरूवार, दिनांक 13 जुलै 2006 रोजी भरलेल्या बैठकीत, समितीने विचार विनिमय करून शुक्रवार, दिनांक 14 जुलै 2006 ते शुक्रवार, दिनांक 21 जुलै 2006 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला. इ

जुलै, 2006

शुक्रवार, दिनांक 14	अशासकीय कामकाज (गतसत्रातील प्रलंबित ठराव)
शनिवार, दिनांक 15	बैठक होणार नाही.
रविवार, दिनांक 16	सुट्टी.
सोमवार, दिनांक 17	शासकीय विधेयके.
मंगळवार, दिनांक 18	1) शासकीय विधेयके 2) सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या प्रस्तावावर चर्चा.
बुधवार, दिनांक 19	शासकीय विधेयके.
गुरूवार, दिनांक 20	सभागृहाची विशेष बैठक इ सकाळी 10 ते दुपारी 12.45 पर्यंत होईल. या बैठकीत अशासकीय विधेयके घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरू होईल. 1) शासकीय विधेयके. 2) अंतिम आठवडा प्रस्ताव.
शुक्रवार, दिनांक 21	अशासकीय कामकाज (ठराव)

उपसभापती : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(यानंतर श्री.सरफरे ...4बी 1 ...

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई शहर व उपनगरात अनधिकृत चालणाऱ्या बीअर बार,पब्ज व डिस्कोथेकमुळे महसुली उत्पन्नाचे होणारे नुकसान

मु. शी : मुंबई शहर व उपनगरात अनधिकृत चालणारे बीअर बार,पब्ज व डिस्कोथेकमुळे महसुली उत्पन्नाचे होणारे नुकसान यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मणराव जगताप, राजेंद्र जैन,प्रा.जोगेंद्र कवाडे, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उपमुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई शहर व उपनगरात अनधिकृत चालणारे बीअर बार, पब व डिस्कोथेक यांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणे, यापैकी केवळ 26 पबना शासकीय परवाना असणे तर सुमारे 150 पब हे अनधिकृतपणे सुरु असणे, या 150 पबमध्ये पाली हिल, बांद्रा या एकाच भागातील क्लब-9, परपल हेज, बोट क्लब इत्यादी पबचा समावेश असणे, अनधिकृतपणे सुरु असलेल्या पबपासून मिळणारा महसूल शासनास न मिळणे, त्यामुळे शासनाचे दरमहा लक्षावधी रुपयांचे होणारे नुकसान, हे नुकसान होण्यास जबाबदार असणाऱ्या शासकीय यंत्रणेविरुध्द कठोर कारवाई न होणे, त्यामुळे भ्रष्टाचारास मिळत असलेले संरक्षण, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदय, आपल्याला निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : मुंबई शहरामध्ये डान्सबार बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला. हा निर्णय घेतल्यानंतर हॉटेल मालक मुंबई शहरातील बांद्रा ते अंधेरी या परिसरामध्ये जवळपास अनधिकृत 150 पब्स चालवतात, अशाप्रकारची तक्रार असलेले पत्र दिनांक 29 एप्रिलला राज्याच्या गृहमंत्र्यांना आणि दिनांक 13 एप्रिलला पोलीस कमिशनरांना दिले होते. त्या पत्रासोबत पब्सची यादी दिलेली होती. सरकार इतके कार्यक्षम आहे की, त्या संदर्भात एप्रिलपासून जूनपर्यन्त काहीच कार्यवाही केलेली नाही. अधिवेशनामध्ये ज्यावेळेला प्रश्न दिला त्यावेळेला थातूरमातूर चौकशी करण्यात आली आणि एक-दोन ठिकाणी धाडी टाकल्या, आणि त्यानंतर त्यांना लगेचच सोडून देण्यात आले. त्या परिसरामधील पोलीस अधिकाऱ्यांना मी पत्र लिहिले होते त्याला त्यांनी असे लेखी उत्तर दिले की, "वरच्या अधिकाऱ्यांना विचारावे लागेल". माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की,बांद्रा ते अंधेरी परिसरामध्ये आज एकही अनधिकृत पब्स नाही असे म्हटलेले आहे. परंतु मी 50 पब्स अनधिकृत असल्याबाबतची यादी दिलेली होती. या पब्सवर कारवाई न केल्यामुळे सरकारचे कराचे नुकसान झाले. जिल्हाधिकाऱ्यांकडून कर वसूली केली जात नाही. वर्षानुवर्षे हे अनधिकृत पब्स चालतात त्यांच्याकडून कर मिळाला नाही त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. तेव्हा त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी कमिशनरांना लिहिलेल्या पत्राचा उल्लेख केला. त्यांनी त्यांना 30 पब्सची यादी दिलेली आहे. त्या 30 पैकी 25 आस्थापनांना पीपीइएल, मद्य विक्रीसाठी परवाना देण्यात आलेला आहे. कारण त्यांच्याकडे पी.एल-III लायसन्स आहे. या 25 पैकी 16 पब्स मालकांकडे वाद्यवृंध, डिस्को परवाना व तसेच जागेचा परवाना आहे. तीन पब्जच्या मालकांकडे खाद्यगृह परवाना आहे, 9 जणांकडे आस्थापना, पी.पी.इ.एल, मद्यविक्री इ. परवाना आहे. Co 2 नावाचे हॉटेल सदर जागेवर नाही, परंतु व्होन नावाचे एकच आस्थापना हॉटेल आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : 30 पब्सना परवानगी दिलेली आहे. पहिल्यांदा 26 डिस्को पब्सना परवानगी दिली. तक्रार केल्यानंतर पुन्हा 8 पब्सना परवानगी दिली. जी अनधिकृत पब्स आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. पोलीस कमिशनरांना अधिकृत पब्स किती आणि अनधिकृत पब्स किती याची माहिती नाही. माझा प्रश्न असा आहे की, एका पबला परवानगी देण्याकरिता किती सर्टिफिकेटची आवश्यकता असते ?

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

(यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, परवानगी देत असताना मनोरंजनाच्या जागेच्या परवान्यासह खालील गोष्टींची पूर्तता करावी लागते. (1) आस्थापना ही गर्दीच्या भागत व प्रामुख्याने लोकवस्तीच्या भागामध्ये नसावी. (2) आस्थापनेसमोरील रस्त्याची रुंदी 40 फुटापेक्षा कमी नसावी. (3) आस्थापनेपासून 75 मीटरच्या परिसरात धार्मिक स्थळे, शाळा, कॉलेज, कोचिंग क्लास, रुग्णालय असू नयेत (4) आस्थापनेत निर्माण होणारा आवाज/गोंगाट सदरहू जागेपासून 15 फूट अंतरापर्यंत ऐकू येऊ नये. (5) 75 मीटर परिघात मनोरंजनाचे कार्यक्रम असणारी दुसरी आस्थापना असू नये (6) वाहतुकीच्या दृष्टीकोनातून वाहतूक शाखेचे नाहरकत पत्र. (7) 10 बाय 12 चा रंगमंच (8) आस्थापना भागीदारीत चालवत असल्यास भागीदारीविषयक करार (9) आस्थापना भाडे तत्वावर असल्यास भाडे पावती (10) बृहन्मुंबई महानगरपालिकेत मालमत्ता कर भरत असल्यास कर विषयक पावती (11) प्रस्तावित जागेचा आराखडा (नृत्यासाठी नृत्यमंचाची राखीव जागा दर्शवून) (12) अधिक्षक उत्पादन शुल्क यांनी मंजूर केलेल्या नकाशाची प्रत (13) वास्तुशास्त्रज्ञाने अंतर्गत रचनेच्या तपशीलासह सांक्षांकित केलेल्या नकाशाची प्रत.

श्री. पांडुरंग फुंडकर : यासाठी आणखी सर्टिफिकेट्स लागतात याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांना नाही काय ? जवळपास 20 प्रकारची ना हरकत प्रमाणपत्रे लागतात. माननीय मंत्रिमहोदयांनी 12- 14 बाबी वाचून दाखविल्या. या सर्व परवानाधारकांनी 20 नाहरकत प्रमाणपत्रे दिलेली आहेत काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या आस्थापना देत असताना जिल्हाधिकारी असतील किंवा पोलीस खात्याचे प्रमुख असतील हे सर्व बघूनच आस्थापना देत असतात. सर्व गोष्टी दिल्या असतील तरच लायसन्स दिले जाते.

श्री. पांडुरंग फुंडकर : अशा प्रकारचे अनधिकृत पब्स निदर्शनास आणले तर शासन काय कारवाई करणार ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी याच्या व्यतिरिक्त यादी द्यावी. जर तसे असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. प्रकाश शेंडगे : माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी डिस्कोथेक आणि पब्सना परवानगी देत असताना 75 मीटरच्या आसपास शाळा नसावी असे म्हटले आहे. एखाद्या शाळेने जर परवानगी मागितली तर देणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : शाळेने परवानगी मागितली तर अजिबात देणार नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : कर्जत तालुक्यामध्ये एका आंतरराष्ट्रीय स्कूलमध्ये जेव्हा एखादा मुलगा प्रवेशासाठी जातो तेव्हा त्यांच्या पालकांना त्या ठिकाणी डिस्कोथेक कसे चालते हे दाखविले जाते. माननीय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. अशी जी शाळा असेल त्या आंतरराष्ट्रीय शाळेवर शासन कारवाई करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी निश्चितपणे त्या शाळेचे नाव द्यावे. त्यांची चौकशी करण्यात येईल. त्या ठिकाणी तशा प्रकारे डिस्कोथेक चालत असेल तर त्यांच्यावर कारवाई करु.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांनी त्या शाळेचे नाव माननीय मंत्रिमहोदयांकडे द्यावे.

श्री. प्रकाश शेंडगे : एन.आर.आय. त्या ठिकाणी शाळा चालवितात. त्या शाळेचे नाव मी माननीय मंत्रिमहोदयांना देईन.

प्रा. जोगेंद्र कवाडे : आपल्या सरकारने डान्सबार बंदी केलेली आहे परंतु जे पब्स आणि क्लब्स आहेत त्या ठिकाणी मुलींचा डान्स होतो काय ? जर होत असेल तर त्यांना डान्सबार बंदीचा कायदा लागू होईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या पब्समध्ये डान्स होतो परंतु डान्स फ्लोअर लांब असतो. त्या ठिकाणी बाजूला खुर्च्या लावलेल्या असतात त्यावर बसून डान्स बघतात.

प्रा. जोगेंद्र कवाडे : मग डान्सबार आणि यामध्ये काय फरक आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्यामध्ये फरक आहे. डान्सबारवर बंदी घातलेली आहे. पब्सवर बंदी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अंधेरी येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील डॉलविरका टॉवरमधील फ्लॅटमध्ये मोलकरणीवर बलात्कार करुन झालेली हत्या.

मु. शी. : अंधेरी येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील डॉलविरका टॉवरमधील फ्लॅटमध्ये मोलकरणीवर बलात्कार करुन झालेली हत्या यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, डॉ. दीपक सावंत व श्री. विलास अवचट ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील अंधेरी ओशिवरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील डॉलविरका टॉवर मधील फ्लॅट मध्ये सोनू निर्मलकुमार या मोलकरणीवर दिनांक 23 जून, 2006 रोजी वा त्या सुमारास कथित बलात्कार करुन डांबून करण्यात आलेली हत्या, याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊनही अद्याप तपास पूर्ण झाला नसल्याचे आढळून येणे, राज्यात अनेक ठिकाणी अशाप्रकारे मोठया प्रमाणात वासनाकांड घडत असल्याचे आढळून येणे, या वासनाकांडाला बळी पडलेल्या निष्पाप निराधार व घरकाम करणाऱ्या मोलकरणीचे संपूर्ण जीवन उद्ध्वस्त झाल्याने पसरलेले भीतीचे व चिंतेचे वातावरण व त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र संताप व असंतोष, अशाप्रकारे वारंवार घडत असलेल्या वासनाकांडास कायमस्वरुपी आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कठोरपणे केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : पोस्टमार्टेम अहवाल आणि पोलीस तपास यामध्ये विसंगती आहे. तेव्हा खरे कोणाचे मानायचे. पोस्टमार्टेम करणा-या डॉक्टरांचे की पोलिसांचे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबईमध्ये सुमारे 1 लाख 45 हजार घरेलू बाल कामगार आहेत. अनेक लहान मुली अशा प्रकारच्या लैंगिक शोषणाच्या शिकार होतात. मुलींचे लैंगिक शोषणापासून संरक्षण व्हावे यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे?.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : पोस्ट मार्टेम रिपोर्टमध्ये मुलीच्या अंगावर जखमा झाल्याचे म्हटलेले आहे. सी.ए.च्या रिपोर्टमध्ये 15 वस्तूबाबत माहिती दिलेली आहे. त्यामध्ये बलात्कार झालेला नाही असे म्हटलेले आहे. मुलीच्या गुप्तांगावर रॉडने पहार केलेला आहे असे रिपोर्टमध्ये आहे. मुलीचे रक्त ओ पाझिटिव्ह असून रॉडवरील रक्त देखील ओ पॉझिटिव्ह आहे.

श्रीमती कांता नलावडे : दोन्ह रिपोर्टमध्ये विसंगती आहे. शवविच्छेदनाचा रिपोर्ट काय आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मयत मुलीच्या शवविच्छेदनात तिच्यावर नैसर्गिक व अनैर्गिक जबरी संभोग करुन गुदमरुन मृत्यू झालाचा अहवाल प्राप्त झाला आहे.

श्री. संजय दत्त : शवविच्छेदन कोणत्या डॉक्टरांनी केलेले आहे ? शवविच्छेदनाचा अहवाल चुकीचा असेल तर त्या डॉक्टरांवर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : श्री. एस.व्ही.कचरे व शिंदे यांनी शवविच्छेदन केले. शवविच्छेदनाच्या अहवालामध्ये बलात्कार झालेला आहे असे म्हटलेले आहे तर सी.ए.च्या रिपोर्टमध्ये बलात्कार झालेला नाही असे म्हटलेले आहे.

तालिका सभापती : दोन रिपोर्टमध्ये विसंगती आहे. याबाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सी.अे.च्या रिपोर्टमध्ये ताब्यात घेतलेल्या वस्तूवरील रक्त आणि मुलीचे रक्त यामध्ये साम्य आहे. दोन्ही ठिकाणचे रक्त ओ पॉझिटिव्ह आहे. नो सिमेन्स इज डिटेक्टेड असा अहवाल प्राप्त झालेला आहे.

डॉ. नीलम गो-हे : या गुन्ह्यामधील आपल्या भावाला वाचविण्यासाठी अशा प्रकारचे पुरावे त्या महिलेने तयार केलेले आहेत. लक्षवेधीला दिलेल्या उत्तरावरुन, अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंदवून तपास करण्यात आला असे राज्यमंत्री महोदयांना म्हणावयाचे आहे काय ? उमा भाटीयाचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...

भाऊ त्यामध्ये गुन्हेगार आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, त्या संपूर्ण कुटुंबावरच संशय आहे. जेव्हा या प्रकरणी पोलीस स्टेशनला तक्रार करण्यात आली त्यावेळी ती नोंदवून घेण्यास टाळाटाळ करण्यात आली. अल्पवयीन मुलींवर बलात्कार करुन त्यांची हत्या करुन पुरावे नष्ट केले जातात. तेव्हा लहान मुला-मुलींना बालकामगार म्हणून कामावर ठेवणे हा दखलपात्र गुन्हा केला पाहिजे. तसे करण्यात येईल काय ? दिनांक 10.8.2000ला कामगार विभागाने एक परिपत्रक जाहीर केलेले आहे.

..नंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या परिपत्रकानुसार घरामध्ये बाल घर कामगार ठेवणे या संदर्भात उल्लेखच नाही. पाच महानगरपालिकांचा त्यात उल्लेख आहे. त्या पाच महानगरपालिकांच्या क्षेत्राबाहेरील भागात बाल घर कामगार कामासाठी ठेवले जातात त्यांना संरक्षण देण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यामुळे सगळया आरोपींना गुन्हेगार म्हणून त्यांच्यावर कलमे लावली पाहिजेत. त्यातील सुत्रधार शोधला पाहिजे. रोमा भाटिया हिचा भाऊ वारंवार त्या मुलीवर बलात्कार करीत होता त्याला प्रमुख आरोपी केले पाहिजे. 18 वर्षाच्या आतील मुलांना घरकामास ठेवल्यास दखलपात्र गुन्हा समजण्यात आला पाहिजे. परिपत्रक बदलून बाल कामगारांची व्याख्या व्यापक करणार का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्या डॉ.गो-हे यांनी सांगितले त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्या घरात ही मुलगी काम करीत होती त्या कुटुंबातील राजेंद्र, त्याची बहिण, आई व वडील या सर्वांना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्यावर भा.द.वि.कलम 376, 377, 302, 201, 34, 370, 374, बाल अधिनियमाच्या कलम 23, 25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये राजेंद्र, त्याचे वडील विनोद, आई मधु विनोद व बहिण रोमा भाटिया या चौघांनाही आरोपी करण्यात आले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदया, दोन्ही अहवालामध्ये तफावत का आढळली? मंत्रीमहोदयांनी सांगितले की, रॉडने गुप्तांगावर जखम केली गेली. शवविच्छेदन करणाऱ्या व्यक्तीने जबरी अनैसर्गिक संभोग असे म्हटले आहे. रॉडने केलेली जखम आणि जबरी अनैसर्गिक संभोगाने झालेली जखम यामध्ये फरक आहे. त्यामुळे अहवाल बदलण्यात आला असण्याची दाट शक्यता आहे. शवविच्छेदन करणारी व्यक्ती डॉक्टर असेल तर ती रॉडने केलेली जखम आणि जबरी अनैसर्गिक संभोगाने झालेली जखम नक्की ओळखू शकेल. या बेसिक अहवालामध्ये गफलत आहे, मंत्रीमहोदयांनी कोणाला पाठिशी घालण्याचा प्रयत्न करु नये. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.कडे देणार का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पहिल्या पोस्टमार्टेम अहवालामध्ये जेनेटल इंन्ज्युरी म्हणून म्हटले आहे व दुसऱ्या अहवाल सुध्दा तोच आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, मंत्रीमहोदयांनी निवेदनामध्ये मयत मुलीचे शवविच्छेदन केले असता, अनैसर्गिक संभोगाने जखमा झाल्याचे म्हटले आहे. पुढे अधिक गुन्हयाचा तपास केला असता, असे म्हटले आहे. याचा अर्थ गुन्हयाच्या तपासावरुन पोस्टमार्टेम ठरतो की पोस्टमार्टेमवरुन गुन्हयाचा तपास ठरतो याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. गुन्हयाचा तपास परिस्थितीजन्य असतो. हा सायंटिफिक अहवाल आहे. गुन्हयाच्या तपासाच्या आधारे सायंटिफिक रिपोर्टला चॅलेंज करीत आहात की गुन्हयाच्या तपासाला सायंटिफिक रिपोर्टची मदत घेत आहात?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, सी.ए.चा अहवाल नंतर आलेला आहे. पहिल्या आणि सी.ए.च्या अहवालात जेनेटल इंन्जुरी म्हटले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी): या घटनेच्या संदर्भात जो काही तपास केलेला आहे व त्यासंदर्भात या ठिकाणी जी काही उत्तरे दिलेली आहेत त्या उत्तरावरुन आपले तरी समाधान झालेले आहे काय? या प्रकरणाच्या संदर्भात योग्य त-हेने तपास झालेला आहे असे आपल्याला वाटते काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, या प्रकरणाच्या संदर्भातील केलेला तपास सन्माननीय सदस्यांना अपूरा वाटत असेल तर उच्च अधिका-याकडून यासंदर्भातील चौकशी करण्यात येईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गुजरात भुकंपाच्यावेळी पुनर्वसनाचे काम केलेल्या सुशिक्षित बेरोजगार आणि अभियंत्यांना शासन सेवेत समावून घेण्याबाबत.

मु. शी : गुजरात भुकंपाच्यावेळी पुनर्वसनाचे काम केलेल्या सुशिक्षित बेरोजगार आणि अभियंत्यांना शासन सेवेत समावून घेण्याबाबत सर्वश्री विनायक मेटे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गुजरातमध्ये झालेल्या भुकंपाचे वेळी तेथे पुनर्वसन काम केलेल्या महाराष्ट्रातील लातूर जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार आणि अभियंत्यांना किल्लारी भुकंपाच्या पुनर्वसनात काम केलेल्या अभियंत्याप्रमाणे शासकीय सेवेत घेण्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी घोषित करणे, याबाबतची नस्ती प्रधान सचिव, भूकंप व पुनर्वसन विभाग यांचेकडे प्रलंबित असणे, अद्यापही या 9 कंत्राटी अभियंत्यांना शासन सेवेत न घेतल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, ज्या प्रमाणे किल्लारी येथे झालेल्या भूकंपाचे वेळी काम करणा-या अभियंत्यांना शासन सेवेत घेतले त्याचप्रमाणे या 9 अभियंत्यांनासुध्दा शासन सेवेत घेण्याबाबत शासनाने केलेली कारवाई व शासनाची भूमिका "

डॉ. राजेंद्र शिंगणे (भूकंप पुनर्वसन व मदतकार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदया, या ठिकाणी गेल्या अनेक दिवसापासून हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे या प्रश्नाला वाचा फोडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. परंतु या ठिकाणी शासनाच्या वतीने जे उत्तर देण्यात आलेले आहे ते अत्यंत चुकीचे व निखालस असत्या असे उत्तर आहे. लेखी निवेदनातील शेवटच्या पॅरामध्ये असे म्हटले आहे की, "यासंदर्भातील कलेक्टर लातूर यांचे पत्र आहे, यासंदर्भातील कलेक्टरांची ऑर्डर सुध्दा माझ्याकडे आहे. या ऑर्डरमध्ये कलेक्टरांनी अतिशय स्पष्ट म्हटले आहे की, "रिलीफ ॲन्ड रिहॅबीलीटेशन वर्क". यासंदर्भात माननीय कलेक्टर साहेबांचे 10 च्या 10 ऑर्डर असतांना या ठिकाणी शासनातर्फे या प्रश्नाच्या संदर्भात अतिशय खोटी आणि निखालस चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे शासनाने या ठिकाणी दिलेले जे उत्तर आहे ते मागे घेऊन दुरुस्त केले जाणार आहे काय? तसेच शासनाने चूक करुन या तरुणांवर जो अन्याय केलेला आहे त्यासंदर्भात या तरुणांना नोकरी देणार आहात काय? तसेच शासन त्यांना सेवेत समाविष्ट करुन घेणार आहे काय?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. मेटेसाहेबांनी लक्षवेधी सूचनेमध्ये जे नमूद केले आहे, खरे म्हणजे या 9 अभियंत्यांना शासनाने नियुक्त केले नव्हते. युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत गुजरात राज्याने त्यांना व्यवस्थापक अभियंता म्हणून नियुक्त केले होते. हे पत्र ज्युनिअर इंजिनिअर आणि डेप्युटी इंजिनिअरच्या संदर्भात आहे. खरे म्हटले तर हे सर्व काम मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून झालेले आहे. महाराष्ट्र शासनाचा कोणताही निधी यासाठी वापरण्यात आला नव्हता. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांच्याकडे जी माहिती आहे ती तपासून घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, यासंदर्भात लातूर कलेक्टरांचे ऑर्डर त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांच्याकडील पत्र तपासून घेण्यात येईल. परंतु माझ्याकडे जी माहिती होती त्या माहिती प्रमाणे या ठिकाणी उत्तर देण्यात आलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांजवळ असलेले 9 अभियंत्यांच्या संदर्भातील पत्र तपासून घेतले जाईल.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.....

जर ती माहिती खरी असेल तर सन 2005 मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरग्रस्तांच्या पुनवर्सनाच्या कामामध्ये 9 अभियंत्यांना कंत्राटी पध्दतीने नियुक्त केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : श्री.पठाण यांना लॉटरी लागूनही त्यांना बक्षिसाची रक्कम न देणे

मु.शी.: श्री.पठाण यांना लॉटरी लागूनही त्यांना बक्षिसाची रक्कम न देणे यासंबंधी श्री.विलास अवचट ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक ६ ऑक्टोबर, २००२ रोजी सांगली येथील "मंजू लॉटरी सेंटरवर" वैजापूर, जि.औरंगाबाद येथील श्री.अजिज खान पठाण यांना "महाराष्ट्र राज्य लॉटरी आकर्षक पुष्कराज सोडत क्र.३७ चे" १४ लाख रुपयांचे बक्षीस लागल्यानंतर त्यांनी ते जिल्हा कोषागार अधिकारी, यांच्याकडे सादर करणे, सदर तिकिटाची रक्कम मोठी असल्याने ती मंत्रालयाच्या वित्त विभागातून घेण्यास सदर अधिकाऱ्याने सल्ला दिल्याप्रमाणे श्री.अजिज खान पठाण यांनी ते तिकिट बक्षीसाची रक्कम मिळण्यासाठी वित्त विभागास सादर करणे, वित्त विभागाने सदर तिकिटाची सत्यता पडताळणीसाठी शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड येथे पाठविणे, सदर तिकिटाचे शेवटच्या चार अंकामध्ये फेरफार करण्यात आल्याचे सांगून श्री.पठाण यांना बक्षीसाची रक्कम नाकारण्यात येणे, सदर तिकिट बनावट असल्याचे सांगून श्री.पठाण यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणे, सदर तिकिट बोगस ठरवून वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करुन बक्षीसाची रक्कम हडप करण्यात येणे, यात शासनाने वेळीच कारवाई न केल्याने श्री.पठाण यांना लॉटरी लागूनही त्यांना बक्षीसाची रक्कम न देता त्यांच्यावरच कारवाई करण्यात येणे, यामुळे जनसामान्यात पसरलेली तीव्र संतापाची लाट, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भुमिका."

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदया, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट : सभापती महोदया, श्री.पठाण यांनी लॉटरीच्या तिकिटाचे बक्षिस नाकारल्यामुळे महाराष्ट्रातील लॉटरी ही बनावट असते असा सर्वदूर मॅसेज गेलेला आहे. या अगोदर मी हा विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित केला होता. श्री.पठाण राहणार वैजापूर, जि.औरंगाबाद यांनी महाराष्ट्र लॉटरीचे एक तिकिट खरेदी केले. या तिकिटाचा निकाल दिनांक 10 ऑक्टोबर 200र रोजी लागला. त्याला तिकिटाचे बक्षिस लागले म्हणून त्याने ते तिकिट आयुक्त, अ.ब.व रा.लॉ.यांच्या कार्यालयास दिनांक 2.11.2000 सादर केले. शासकीय मुद्रणालयाकडून हे तिकिट बनावट असल्याचे दिनांक 14 फेब्रुवारी 2003 रोजी कळविण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक 28.5.2003 रोजी श्री.पठाण यांना त्यांचे तिकिट बनावट असल्याचे कळविण्यात आले. त्याचे तिकिट बनावट असल्याचे जाहीर करण्यास सात महिन्यांचा उशीर का लागला ? लॉटरीच्या तिकिटस् अधिकृत विक्रेत्यामार्फत देण्यात येतात, तेव्हा कोणावर तरी जबाबदार निश्चित केली पाहिजे. ज्यावेळी हे प्रकरण लोकायुक्तांकडे गेले त्यावेळी त्यांनी हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपवावे असे निर्देश दिले. अशा बनावट तिकिटांमुळे शासनाचा महसूल बुडणार आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आतापर्यंत अशा तऱ्हेच्या किती केसेस प्राप्त झालेल्या आहेत ? त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, बनावट तिकिटांच्या किती तक्रारी प्राप्त झाल्या यासंबंधीची माहिती आता माझ्याजवळ नाही, ती माहिती मी पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, श्री.पठाण यांना त्यांचे तिकिट बनावट आहे हे कळविण्यास उशीर का झाला ? याबाबत सांगू इच्छितो की, हे तिकिट खरे आहे की खोटे आहे हे सिध्द करण्यासाठी ते शासकीय मुद्रणालयात पाठविण्यात आले होते. त्याठिकाणी ॲसिड टेस्टींग व वॉटर टेस्टींग करावे लागते. यासाठी काही कालावधी लागतो. जेव्हा तिकिट बनावट आहे असे समजले तेव्हा त्यांना तसे कळविण्यात आले.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदया, तिकिट बनावट आहे हे चार-पाच महिन्यांनतर कळविण्यात आले. श्री.पठाण यांनी त्यांना न्याय मिळण्यासाठी अनेक व्यासपीठांचा आधार घेतला. त्यांना न्याय मिळण्यासाठी ते लोकायुक्तांकडे गेले. त्यांचे ॲपी-183-1217882 हे तिकिट बोगस होते तर त्या नंबरला हे बक्षिस लागलेले आहे त्यांनी बक्षिसासाठी दावा केला आहे काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, श्री.पठाण यांचे तिकिट बनावट असल्यामुळे त्यांना बक्षिस नाकारण्यात आलेले आहे. श्री.शैलेंद्र जयसिंग थोरात, ता.कराड, जि.सातारा यांना बक्षिस मिळालेले आहे. त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र, फोर्ट, मुंबई येथे चेक जमा केलेला आहे. त्यांना तिकिटाची रक्कम 26.5.2005 रोजी मिळालेली आहे. .

यानंतर श्री.पुरी..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदय आपण राज्य चालवता. सांगली येथील बस स्थानकाच्या जवळ मंजू लॉटरी सेंटर आहे. ते लॉटरी सेंटर अधिकृत आहे की नाही, हे माहीत नाही. परंतु त्याठिकाणी ते आहे. लॉटरी सेंटर अधिकृत आहे की अनधिकृत आहे हे सामान्य जनतेला माहीत नसते.सर्वसामान्य माणसे पैसे देऊन लॉटरीचे तिकीटे घेतात. रिझल्ट लागल्यानंतर आपल्याला बक्षीस लागले म्हणून ते त्या सेंटरवर आणून देतात. परंतु ते बनावट तिकीट असेल तर त्याबाबतची नोंद आहे का ? ते सेंटर बनावट तिकिट विकत असेल तर त्या सेंटरवर कारवाई ही झालीच पाहिजे. अशा प्रकारे जर ते बनावट तिकिट विकत असतील तर या संदर्भातील भूर्दंड हे त्यांच्याकडून भरुन घेतला पाहिजे. याबाबतीतील दोष तिकिट घेणा-या सामान्य माणासाचा नाही. त्यामुळे या भूर्दंडाच्या बाबतीत आपण काही निर्णय घेणार का ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे. या माणसाने सांगली बस स्टँण्ड जवळील मंजू लॉटरी सेंटरवरुन तिकीट विकत घेतले होते. ज्या मंजू लॉटरी सेंटरने हे तिकीट प्रोडयूस केले, त्या सेंटरचा आम्ही शोध घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्या मंजरू लॉटरी सेंटरचा आता-पत्ता आम्हाला मिळाला नाही. श्री.शैलेंद्र जयसिंग थोरात या व्यक्तीच्या ओरिजनल तिकीटाला बक्षिस लागले होते, त्याच्या तिकीटावर सेंटरचा ठप्पा होता. त्याप्रमाणे आपण त्याचा शोधही घेतला. मंजूर लॉटरी सेंटरवरुन तिकीट घेतलेल्या व्यक्तीस लॉटरी लागल्यामुळे तो त्याठिकाणी गेला परंतु त्याठिकाणी त्याला पैसे मिळाले नाहीत. कारण मंजूर लॉटरी सेंटर हे अस्तित्वातच नव्हते. त्यामुळे हे तिकिट खोटे होते, हे त्यावरुन अधिकृतरित्या प्रुव्ह होते.

श्री.विलास अवचट : सभापती महोदया, याठिकाणी महाराष्ट्र शासनाच्या महसूलाचा प्रश्न निर्माण होतो. अशा प्रकारची प्रकरणे जर होत असतील तर याबाबतीत आपण अधिक गंभीरतेने दखल घेणे आवश्यक आहे. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, बनावट तिकिट प्रकरणांची माहिती घेऊन ती पटलावर ठेवली जाईल. वास्तविक पाहता, एवढा गंभीर विषय असताना आपण याबाबतची सविस्तर माहिती आपल्या खात्याकडून घेणे आवश्यक आहे. "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो." माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकरची प्रकरणे आपल्याकडे किती आली की हे एकच प्रकरण आपल्याकडे आले ?

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, आपल्याला 10 वर्षाचे रेकॉड पाहिजे का 15 वर्षाचे रेकॉर्ड पाहिजे की, लॉटरी सुरु झाल्यापासूनचे रेकॉर्ड पाहिजे ? याबाबतची माहिती मी पटलावर ठेवतो असे म्हणालो.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, आपल्याकडे बनावट तिकीटे होती, हे आपणच सिध्द केले आहे. मग, असे जर असेल तर आपण याबाबत कोणती कारवाई केली ? आपण म्हणालात की, ते बनावट तिकीट होते, मग आपण त्याबाबतीत कोणती कारवाई केली ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदया, या बनावट लॉटरींची नोंद होत नाही त्यामुळे अशा केसमध्ये ज्यांनी लॉटरी प्रोडयूस केली त्यांच्यावरच एफआयआर लाँज होऊ शकतो. श्री.पठाण यांनी प्रोडयूस केलेले तिकिट बोगस आहे. अशा केसमध्ये बोगस तिकिट दिल्यामुळे त्यांच्यावरच एफआयआर नोंद होऊन चौकशी होऊ शकते. तिकिटाची सत्यता पडताळणीसाठी गव्हर्नमेंट प्रेसमध्ये पाठविले जाते. तेथे एसिड टेस्ट, वाटर टेस्ट, ऑईल टेस्ट करुन तिकिटाचे परीक्षण केले जाते. अशा प्रकारचे हे तिकिट तपासाचे पॅरामीटर आहे. या केसमध्ये बोगस तिकिट होते हे सिध्द झाल्यामुळे त्याच माणसावर एफआयआर लाँज करावा लागेल व त्यातून अजून प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी - माननीय उपसभापती)

पृ.शी.: 11 जुलै 2006 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटातील मृतात्म्यांना श्रध्दांजली

मु.शी.: 11 जुलै 2006 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटातील मृतात्म्यांना श्रध्दांजली संबंधी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे निवेदन

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करतो :-

निवेदन

(प्रेस - येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ SBT/

पृ.शी.: औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यात रोहयोतील कामात झालेला भ्रष्टाचार.

मु.शी.: औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यात रोहयोतील कामात झालेला भ्रष्टाचारासंबंधी श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यात रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचारामुळे मे, 2006 मध्ये विभागीय आयुक्तांनी उप अभियंत्यास निलंबित करणे, फुलंब्री तालुक्यातील कोटयवधी रुपयांचा निधी वाया जाणे, रोहयोत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी अभियंते आपल्या सोयीने वर्षानुवर्षे करीत असणे, काही ठिकाणी यंत्राने कामे करणे तर काही ठिकाणी यंत्राने कामे न करता बोगस मस्टर भरणे, कोणत्याही कामाचे चावडी वाचन न होणे, हया कामात जिल्हाधिकारी कार्यालय, आयुक्तालय व मंत्रालयातील काही अधिका-यांचा समावेश असणे, मुकादमापासून ते मंत्रालयातील अधिका-यांपर्यन्त 35 टक्के वाटप केल्याशिवाय निधीच उपलब्ध होत नसल्याची चविष्ट चर्चा खेडयापाडयांत प्रत्येक ठिकाणी मोठया प्रमाणात होत असणे, डिसेंबर 2005 व जानेवारी 2006 या महिन्यांत कोणतेही रोजगार हमी योजनेचे काम चालू नसताना हया भ्रष्टाचारी टोळीने रोहयोमध्ये कोटयवधी रुपयांची एल.ओ.सी.करण्याचे बोगस पत्र सार्वजनिक बांधकाम विभागातून तयार करुन ते कलेक्टर ऑफिस मार्फत मंत्रालयाकडे पाठविण्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, या प्रकरणातील आरोपींवर कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राणा जगजितसिंग पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामात भयानक भ्रष्टाचार सुरु आहे व त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आजचे हे प्रकरण आहे. आतासुध्दा एवढी लक्षवेधी सूचना सभागृहात आल्यानंतरही फरक पडत नाही. 1 ते 8 जुलै या कालावधीमध्ये मराठवाडयामध्ये मुसळधार पाऊस असतांना 50 हजार मजूर रोजगार हमी योजनेवर कार्यरत होते. दैनिक सकाळ या वृत्तपत्रात बातमी छापून आल्यावर या मजूरांची संख्या कमी झाली आहे. फुलंब्री तालुक्यामध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, फुलंब्री तालुक्यात गेल्या 3 वर्षात 25 कोटी रुपयांची 50 कामे मंजूर झालेली आहेत. परंतु, प्रत्यक्षात कामे झालेली नाहीत. तेथील उपअभियंता, श्री.कटारिया यांना विभागीय आयुक्तांनी निलंबित केलेले आहे. हे कटारिया नावाचे अधिकारी रोहयोमधील 'दाऊद' समजले जातात. हा अधिकारी येवला, सिल्लोड, सोनगांव, फुलंब्री येथे कार्यरत होता व त्या ठिकाणी करोडो रुपयांचे बोगस काम केलेले आहे. स्थानिक आमदार, श्री.कल्याण काळे यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार केलेली आहे. ही तक्रार केल्यानंतर उपजिल्हाधिकारी यांनी चौकशी केली. ही तक्रार केल्याबद्दल तेथील मस्टर असिस्टंट, श्री.शेख याने उपसरपंच यांना सगळयांसमोर मारहाण केली. सभापती महोदय, या प्रकरणासंबंधीची सर्व वृत्तपत्रातील कात्रणे मी आपल्याकडे पाठवू इच्छितो. या वृत्तपत्रातील कात्रणांमध्ये असे म्हटले आहे की, 250 बनावट मजूर दाखवून काम झाले असून त्याची नावानिशी माहिती देण्यात आलेली आहे. यामधील एकही मजूर त्या पंचक्रोशीतील नव्हता, असे ग्रामपंचायतीने डिक्लेअर केलेले आहे आणि हे डिक्लेअर करणा-या उपसरपंचांना मारहाण करण्यात आली आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून फुलंब्री तालुक्यामध्ये कोणत्याही कामाचे चावडी वाचन न होता करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे याची सखोल चौकशी शासन किती दिवसात करणार आहे ? संपूर्ण औरंगाबाद जिल्हयातील रोजगार हमी योजनांच्या कामाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात येईल काय ? त्याचे कारण असे आहे की, यामध्ये बरेचसे अधिकारी गुंतलेले आहेत. दुसरे प्रकरण असे आहे की, त्यामध्ये मंत्रालयापर्यन्तचे अधिकारी गुंतलेले आहेत. जोपर्यन्त मंत्रालयाचे संरक्षण आहे तोपर्यन्त हा भ्रष्टाचार बाहेर पडणार नाही. 1.25 कोटी रुपयांचे एलओसी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विभागीय आयुक्तांच्या सहीने मंत्रालयात आले. चौकशी केल्यानंतर असे आढळून आले की, ही एलओसी विभागीय

..4.....

अशोधित प्रत / मुद्रणेसाठी नाही

SRR/ MHM/ SBT/

श्री.श्रीकांत जोशी.....

आयुक्तालयाने पाठविलेलीच नाही. ही एलओसी बोगस होती. ही एक प्रकारची चेन आहे. मंत्रालयातील अधिका-यांपासून उपअभियंता स्तरापर्यन्त सगळे अधिकारी यामध्ये सामील आहेत. त्यामुळे या सर्व प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात येईल काय ? ज्यांना निलंबित करण्यात आले आहे ते सर्व उपअभियंता स्तरावरील अधिकारी आहेत. त्यामुळे कार्यकारी अभियंता, उपजिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तालयातील अधिकारी यांना निलंबित करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, आमदार श्री.काळे साहेबांनी जे पत्र दिले होते त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला होता की, कामाची पाहणी करण्यासाठी गेलो असतांना त्यांनी अनियमितता दाखविली. त्याच दिवशी स्थानिक उप विभागीय अधिका-यांनी देखील पाहणी केली होती. त्यावर प्रशासकीय चौकशी झाली. दक्षता पथक पाठविण्यात आले होते. दक्षता पथकाच्या अहवालाप्रमाणे काम करण्यात आले होते. जे मजूर होते ते स्थानिक नसून बुलढाणा जिल्हयातील होते, असे प्रथम दर्शनी आढळून आले. तीन अधिका-यांना निलंबित करण्यात आले आहे. उप अभियंता श्री.कटारिया, स्थानिक उप विभागीय अधिकारी श्री.जिलानी, हजेरी सहाय्यक श्री.शेख यांना निलंबित करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता यांच्याकडे निलंबन निधी फिक्स करण्याचे काम दिलेले आहे. त्यानंतर विभागीय चौकशी सुरु करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न एल.ओ.सी. संदर्भात विचारला.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, श्री.शेख यांनी काम केलेलेच नाही हे लोकांनी दाखवून दिलेले आहे. मी आपल्याला बातमी दिली आहे, ती बातमी मी आपल्याला वाचून दाखवितो. 18 लाखाचा खर्च झालेला आहे. त्या ठिकाणी एकही मजूर कामावर आला नव्हता. हे काम पूर्वीच झालेले आहे. सरकार संबंधितांना पाठीशी घालत आहे. ही बाब गंभीर आहे. लोक कामावर आले नाहीत, असे उपसरपंचांनी सांगितले. माननीय मंत्री महोदयांकडे कागदपत्रे आहेत. जी कामे झालेली आहेत ती बोगस आहेत आणि ती मंजूर केलेली आहेत.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, स्थानिक एक्झिकेटीव्ह इंजिनिअर यांनी स्वत: कामाची पाहणी केलेली आहे. काम झालेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काम झालेले नाही असा ग्रामसभेचा रिपोर्ट आहे. ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी. पोलीस यंत्रणेने सादर केलेल्या अहवालामध्ये काय म्हटले आहे, हा महत्वाचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांनी संयुक्त समिती स्थापन करावी. त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना घ्यावे आणि स्वत: तेथे जाऊन काम झालेले आहे किंवा नाही हे पहावे. प्रत्यक्ष काम झालेले नाही. अधिकारी आपल्याला कागदावर रिपोर्ट देतात. आपण स्वत: जाऊन कामाची पाहणी करावी. तुम्हाला आम्हाला भ्रष्टाचारी अधिका-यांना वाचविण्याची काय आवश्यकता आहे ? एका एका तालुक्यामध्ये 5-5 कोटी रुपये गायब केलेले आहेत.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभपती महोदय, कोणी चुकीचे काम केले असेल तर त्याला वाचविण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्यांनी जॉईंटली जाऊन कामाची पहाणी करावी असे म्हटले, ते मी मान्य करतो. एल.ओ.सी. हा फार महत्वाचा विषय आहे. आमदार श्री.माने साहेबांनी शासनाला पत्र दिलेले आहे. त्यामध्ये त्यांनी एल.ओ.सी. चा उल्लेख केला होता. 1 कोटी 21 लाखाची एल.ओ.सी. आहे. त्यांनी एल.ओ.सी.ची फोटो कॉपी पाठविली होती. एल.ओ.सी.ची कॉपी आयुक्तांकडे पाठविण्यात आली. आपण कॉपी का पाठविली नाही अशी त्यांच्याकडे विचारणा करण्यात आली. आयुक्तांचे असे पत्र आले की, आम्ही एल.ओ.सी. पाठविलेली नाही. आमच्या कार्यालयातून पत्र व्यवहार झालेला नाही. आयुक्तांनी स्थानिक पोलिस स्टेशनला गुन्हयाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्याचा रिपोर्ट आलेला आहे. श्री.रेगे नावाचे लिपिक आणि ठेकेदार यांच्यावर करवाई करावयास पाहिजे असे रिपोर्टमध्ये नमूद केलेले आहे. महत्वाची बाब ही आहे की, भ्रष्टाचार कोठेही झालेला नाही.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील ....

यातील एलओसी ही आयुक्तांकडे आलेलीच नाही आणि आयुक्तांनी ती मंत्रालयात पाठविलेलीच नाही. केवळ माने नावाचे आमदार आहेत त्यांनी यासाठी पत्र दिले होते त्यासोबत त्यांनी एलओसीची फोटोकॉपी जोडलेली होती.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, त्या एलओसीवर विभागीय आयुक्तांनी सही केलेली नव्हती हे मान्य आहे. पण आयुक्त कार्यालयातून अशी एलओसी तयार करण्यात आलेली होती आणि ही एलओसी कार्यकारी अभियंता तयार करीत असतो, त्याची छाननी उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडून केली जाते आणि तेथून ती आयुक्त कार्यालयाकडे पाठविली जाते आणि आयुक्त कार्यालयाकडून ती मंत्रालयात पाठविली जाते. या प्रकरणी संबंधितांनी केलेले सगळे खुलासे आयुक्तांनी फेटाळले आहेत. पण ते आयुक्त निवृत्त झाले आणि हे सारे प्रकरण बासनात टाकले गेले. पण ही सारी लिंक आहे, आयुक्त कार्यालयामधील. तेव्हा ही एलओसी तयार कोणी केली ? त्यावर सही कोणाची होती ? तसेच त्या प्रस्तावावर उपजिल्हाधिकाऱ्यांची सही झालेली आहे ...

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा सांगतो की, एलओसी तयार करण्यात आली होती आणि त्यावर सही बरोबर होती पण ती एलओसी 41.81 कोटीची होती. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे 121 कोटीची एलओसी तयार करण्यातच आलेली नाही. 41 कोटीच्या एलओसीवर सही होती आणि ती मूळ एलओसी आहे. ती कार्यालयातही उपलब्ध आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, 41 लाखाचे 1 कोटी कसे होतात, त्यात कोण दोषी आहेत, तेच कळत नाही हे कसे काय ? या संबंधात विभागीय आयुक्तांनी चौकशी केली होती ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या निवेदनातच आपण म्हटले आहे की, औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर आणि खुल्ताबाद तालुक्यातील रोहयोच्या कामावरील रूपये 121.51 लक्ष इतक्या कुशल पतमर्यादेच्या रकमेच्या आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक 2 जुलै 2005 च्या प्रस्तावाचा मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करण्याच्या हेतूने त्याची झेरॉक्स प्रत माननीय आमदार श्री.माने-पाटील यांनी त्यांच्या 22 ऑगस्ट 2005 च्या पत्रासोबत शासनास सादर केली. म्हणजे कशाच्या तरी आधारे त्यांनी ही झेरॉक्स काढलेली आहे हे नक्की आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, मागील आयुक्त या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करीत होते, ते आता

..... 4के 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

निवृत्त झालेले आहेत. तेव्हा ज्याप्रमाणे आपण निवृत्त न्यायाधीशांकडे चौकशी देत असतो त्याप्रमाणे आता या निवृत्त आयुक्तांकडे, अधिकाऱ्यांकडे हे प्रकरण चौकशीसाठी द्यावे. नाही तरी ते अजूनही आपल्या सेवेत ठेवलेले असतील. तेव्हा त्यांच्याकडे ही चौकशी देऊन ती चौकशी पूर्ण करू देणार का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची ही सूचनादेखील मान्य करायला हरकत नाही. या प्रकरणी सदरहू निवृत्त विभागीय आयुक्तांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले जाईल व त्यांच्याकडून चौकशी केली जाईल.

*****

..... 4के 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुरूड (जि.रायगड) येथील शासकीय गोदामात संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचा 4 हजार क्विंटल तांदूळ बुरशी लागून खराब होणे.

मु.शी. : मुरूड (जि.रायगड) येथील शासकीय गोदामात संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचा 4 हजार क्विंटल तांदूळ बुरशी लागून खराब होणे याबाबत सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. ..

" मुरूड, जिल्हा रायगड येथील शासकीय गोदामात संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेसाठी असलेल्या 4 हजार क्विंटल तांदूळ बुरशी आल्याने गुठळ्या पडून वाया गेल्याची जून 2006 च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली घटना. परिणामी उडालेली प्रचंड खळबळ, राज्यात एकीकडे कुपोषणाची समस्या वाढत असताना अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात तांदूळ वाया जात असल्याचे उघडकीस आल्याने शासकीय यंत्रणेची सिद्ध होत असलेली अकार्यक्षमता, हा तांदूळ वाटप का करण्यात आला नाही असा विचारण्यात येत असलेला प्रश्न तसेच एवढ्या मोठ्या प्रमाणावर धान्य वाया घालविण्यास कारणीभूत असलेल्यांवर तात्काळ कारवाई करण्याची होत असलेली मागणी, तथापि, याकडे जाणीवपूर्वक करण्यात येत असलेले दुर्लक्ष, सबब, याबाबत तातडीने केलेली अथवा करावयाची कार्यवाही व उपाय योजना व शासनाची प्रतिकिया. "

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, या लक्षवेधी सुचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने, मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्या लक्षवेधी सुचनेवरील निवेदनानंतर ...)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मुरूड तालुक्यामध्ये श्रीवर्धनचे आमदार श्री. सुर्वे यांनी सरकारी गोदामाला भेट दिली असता तेथील सर्व धान्य, सुमारे 3577 क्विंटल धान्याला बुरशी लागलेली होती आणि ते धान्य मानवाला खाण्यालायक राहिलेले नव्हते असे दिसून आले म्हणून त्याबाबत चौकशी करावी अशी मागणी केलेली होती हे खरे आहे काय ? तसेच सदरहू बुरशी लागलेले धान्य रो.ह.यो.वरील कामगारांना आपण देणार होता हे खरे आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, विधानसभा सदस्यांनी मुरूड येथील शासकीय गोदामाला भेट दिली होती हे खरे आहे आणि संपूर्ण ग्रामीण आश्वासित योजनेंतर्गत करावयाच्या कामाचा मोबदला जसा रोख रकमेमध्ये देण्यात येतो तसाच उरलेला मोबदला हा धान्य स्वरूपात देण्यात येतो त्यासाठी देण्यात आलेले होते.

श्री. जयंत प्र. पाटील : परंतु हे बुरशी लागलेले धान्य, जे मानवाने खाण्या लायक नव्हते, ते धान्य आपण त्या कामगारांना देणार होता हे खरे आहे काय ?

(यानंतर श्री. सरफरे ....4एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हे खरे नाही. हे धान्य आदल्या वर्षासाठी साठा करुन ठेवले होते. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचा आराखडा मंजूर होतो त्या अनुषंगाने डी.आर.डी.ए.कडून पुरवठा विभागाकडे त्या प्रमाणामध्ये धान्याची मागणी प्रत्येक तालुकानिहाय केली जाते. त्या अनुषंगाने मुरुड तालुक्यामध्ये 2004-05 या आर्थिक वर्षामध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत करावयाच्या कामासाठी जे धान्य द्यावे लागले होते ते मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात आले होते.दुर्दैवाने त्या वर्षी त्या तालुक्यातील अपेक्षितपणे कामे पूर्ण झाली नाहीत. त्यामुळे ते धान्य शिल्लक राहिले होते. त्याची पूर्णपणे तपासणी करण्यात आली. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे जे धान्य खराब होते ते पूर्णपणे साफ करुन ते खाण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर ते उपलब्ध करुन ठेवण्यात आले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 3577 क्विंटलपैकी किती धान्य खराब झाले, त्याची किंमत किती आणि शिल्लक राहिलेल्या धान्याची किंमत किती?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एकूण 3577.87 क्विंटल तांदूळ शिल्लक होता. त्यापैकी 1249.26 क्विंटल तांदूळ जाळीयुक्त शिल्लक होता. त्याची साफसफाई करुन व तो खाण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर तो उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, उरलेला चांगला तांदूळ कुणाला देण्यात आला?

श्री. सुनील तटकरे : हे धान्य संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आले होते. जस जशी गट विकास अधिकाऱ्यांकडून कामाच्या प्रमाणात तहसिलदार यांचेकडे धान्याची मागणी करण्यात येईल, त्याप्रमाणे मजुरांना देण्यासाठी ते धान्य वितरीत करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सांगली जिल्हयातील कुपवाड औद्योगिक वसाहतीतील ओंकार थिनर व सॉल्वंट या कंपनीवर पोलिसांनी घातलेला छापा" या विषयासंबंधी सर्वश्री शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी दिनांक 9 जून 2004 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर इ ालेल्या प्रश्नोत्तरांच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी. : परभणी शहरात बी.पी.एल. लाभधारकांचे पुर्नसर्व्हेक्षण होऊनही यादी न लावणे

मु.शी. : परभणी शहरात बी.पी.एल. लाभधारकांचे पुर्नसर्व्हेक्षण होऊनही यादी न लावणे याबाबत माननीय .सदस्या प्रा. फौजिया खान वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"बी.पी.एल. लाभधारकांचे परभणी शहरात नुकतेच पुर्नसर्व्हेक्षण करण्यात आले. या सर्व्हेक्षणात पात्र ठरलेल्या लाभधारकांची यादी नगरपालिकेत ठराविक तारखेला लावली जाईल अशी जाहिरातही वृत्तपत्रात देण्यात आली. परंतु लाभधारकांच्या याद्या शेवटपर्यंत बोर्डावर लावण्यातच आल्या नाहीत. यामुळे पात्र बी.पी.एल. धारकांची दिशाभूल झाली असून या लाभापासून ते वंचित राहिले आहेत. ज्या उद्देशाने पुर्नसर्व्हेक्षण करण्यात आले त्या उद्देशालाच यामुळे सुरुंग लागला असून पात्र लाभधारकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. याबाबतीत वेळीच दखल घेऊन तातडीने कार्यवाही होणे गरजेचे आहे."

सभापती महोदय, बी.पी.एल. च्या यादीमध्ये रास्त लाभधारकांची नावे यावीत आणि कुणीही त्यापासून वंचित राहू नये यासाठी शहरी सुवर्ण जयंती योजनेंतर्गत परभणी जिल्हयामध्ये जुलै 2005 मध्ये पुर्नसर्व्हेक्षण करण्यात आले होते. या सर्व्हेक्षणामध्ये पात्र ठरलेल्या लाभधारकांची यादी बोर्डावर जाहीर केली जाईल, व जनतेला तिचे अवलोकन करण्यासाठी दिनांक 27.6.2006 पर्यंत ती बोर्डावर राहील अशी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात या तारखेपर्यंत अशी कुठलीही यादी परभणी नगरपालिकेच्या बोर्डावर लावण्यात आली नाही. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

जनतेची झालेली दिशाभूल लक्षात घेऊन या यादीचे अवलोकन करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी लेखी मागणी परभणीच्या जिल्हाधिकाऱ्यांना दोन वेळा केली आहे. परंतु त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, ही खेदाची बाब आहे. त्यामुळे ठराविक तारखेपर्यंत बोर्डावर यादी न लावल्यामुळे आणि यादी पहाण्याकरिता मुदतवाढ न दिल्यामुळे यादीमधील आपल्या नावाची शहानिशा संबंधित लाभधारक करु शकले नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (पुढे सुरु....

परिणामी पात्र लाभधारक वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला असून, त्यांच्यामध्ये प्रचंड असंतोष धुमसत आहे. प्रशासनाच्या "हम करे सो कायदा" या भूमिकेमुळे पुन्हा सर्वेक्षणाच्या उद्देशालाच सुरुंग लागला असून एकाही पात्र लाभधारकाचे नाव बी.पी.एलच्या यादीत येण्याचे राहून जाऊ नये, याकरिता तातडीने कार्यवाही करण्याची गरज आहे.

उपसभापती : विशेष उल्लेखाच्या सूचना पटलावर ठेवायला हरकत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आम्ही विशेष उल्लेखाची सूचना मांडल्यानंतर त्यासंबंधीचे उत्तर हे एक महिन्याच्या आत मंत्री महोदयांकडून यायला पाहिजे. परंतु तसे होत नाही. मी विशेष उल्लेखाच्या संबंधाने तीन पत्रे पाठविली परंतु गेले चार महिने उत्तर दिलेले नाही. त्यासंबंधीचे आपण आदेश द्यावेत, अशी विनंती आहे.

उपसभापती : महत्वाची गोष्ट अशी आहे की, आज सभागृहासमोर भरपूर कामकाज आहे. त्यामुळे विशेष उल्लेखाच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी पटलावर ठेवाव्यात. त्याची उत्तरे एक महिन्यामध्ये विभागाने देण्याबाबत निर्णय देतो.

श्रीमती सुधा जोशी : माझी विशेष उल्लेखाची सूचना आहे. ती मी मांडते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

पृ. शी. : अभ्युदयनगर,काळाचौकी येथील इमारती खाजगी बिल्डर्सनी पाडून टॉवर्स बांधण्याचा प्रयत्न सुरु करणे

मु. शी. : अभ्युदयनगर,काळाचौकी येथील इमारती खाजगी बिल्डर्सनी पाडून टॉवर्स बांधण्याचा प्रयत्न सुरु करणे, याबाबत श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती सुधा जोशी यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

अभ्युदयनगर, काळाचौकी येथे म्हाडाची वसाहत आहे. त्या ठिकाणी काही खाजगी बिल्डर्सनी तेथील इमारती पाडून टॉवर्स बांधण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. रहिवाशांच्या घरोघरी जाऊन त्यांनी संमतीपत्र भरुन देण्याबाबत फॉर्मही वाटलेले आहेत. त्यांना म्हाडाची परवानगी आहे किंवा नाही, ले आऊट मंजूर झालेला आहे की नाही, त्यांना किती एफ.एस.आय. मिळणार याबाबत रहिवाशांना काहीही कल्पना नाही. त्यामुळे नागरिक संभ्रमावस्थेत आहेत. याबाबतची वस्तुस्थिती समोर येणे आवश्यक आहे. म्हणून मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून ही बाब उपस्थित करीत आहे.

--

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

पृ. शी. : प्राथमिक शिक्षण परिषद अंतर्गत करारपध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे.

मु. शी. : प्राथमिक शिक्षण परिषद अंतर्गत करारपध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणे याबाबत,प्रा.शरद पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य प्रा.शरद पाटील,वि.प.स.यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद अंतर्गत करार पध्दतीवर काम करणाऱ्या कर्म्रचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद राज्यस्तरीय करार कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वारंवार मागणी करुनही शासनाने त्याकडे पूर्णत: दुर्लक्ष केले आहे. सन 1994 साली सर्व शिक्षण अभियानासाठी 2003 मध्ये करार पध्दतीत नियुक्ती देताना परिषदेने सेवायोजन कार्यालयातून यादी मागवून उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या होतया. सद्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनापेक्षा निम्म्याहून कमी पगारात काम करावे लागते. शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा करारावरील कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन, रजाभत्ते यामध्ये विसंगती असून कमालीची अन्यायकारकर तफावत आहे. सर्व शिक्षा अभियान प्रकल्प सन 2010 पर्यंत असल्याने शिक्षण विभागातील व जिल्हापरिषद शिक्षण विभागातील हजारो कर्मचारी सेवानिवृत्त होऊन त्यांच्या रिक्त जागा उपलब्ध होत आहेत. गेल्या 9 वर्षापासून करार पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत विनाविलंब सामावून घेण्यात यावे याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी." म्हणून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विहित केलेल्या आरक्षण प्रणालीनुसार प्रवेश देण्याचे आदेश सर्व अल्पसंख्यांक अनुदानीत माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना शासनाने देणे

मु. शी. : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विहित केलेल्या आरक्षण प्रणालीनुसार प्रवेश देण्याचे आदेश सर्व अल्पसंख्यांक अनुदानीत माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना शासनाने देण्याबाबत याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य प्रा.जोगेंद कवाडे,वि.प.स. यां□□ ए□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

शासनाने शासन निर्णय क्र.एस.एस.एन.2103/850/03/मा.शी-2 दिनांक 27 मे, 2003 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.पै.फौंडेशन व इतर विरुध्द कर्नाटक शासन व इतर या प्रकरणी याचिका क्र.317/1993 दिनांक 31.10.2002 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त शासन निर्णयात भाग 2 (क) मध्ये असा उल्लेख करण्यात आला की, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देताना व्यवस्थापनाने मंजूर प्रवेश क्षमतेनुसार आणि गुणवत्तेनुसार प्रवेश द्यावयाचे आहेत, असे प्रवेश देताना मागासवर्गीय विद्यार्थी उपलब्ध होत असल्यास संबंधित मागासवर्गीय संवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण पाळणे व्यवस्थापनावर बंधनकारक राहील. अल्प संख्याकांनी चालविलेल्या अशा शाळांबाबत आरक्षण लागू राहणार नाही.

वरील परिच्छेदातील शासनास अभिप्रेत अर्थ असा की, ज्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था शासनाचे अनुदान घेतात त्यांनी मागासवर्गीय संवर्गाकरीता विहीत आरक्षण पाळणे बंधनकारक आहे.

परंतु शिक्षण उपसंचालक, शालेय शिक्षण विभाग, चर्नीरोड, मुंबई यांनी उपरोक्त परिच्छेद भाग 2 (क) चा अर्थ असा लावला आहे की, अल्पसंख्याकांनी चालविलेल्या अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यामध्ये आरक्षण बंधनकारक नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

उपसंचालकाच्या या अर्थामुळे मागील चार वर्षापासून मुंबई विभागात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागले आहे. त्यांचे प्रवेश अर्ज सुध्दा स्वीकारले जात नाहीत.

सध्या अनेक महाविद्यालयामध्ये जसे एच.आर.महाविद्यालय के.सी.महाविद्यालय, सेंट झेवीयर्स सोफिया, एम.व्ही.एच.यू., चिनॉय, मिठीबाई, एन.एम.महाविद्यालय इत्यादी महाविद्यालयामध्ये मागासवर्गीय संवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण पाळले जात नाही, सदर महाविद्यालयांमध्ये प्रवेश पक्रिया सुरु आहे. या महाविद्यालयांनी याही वर्षी मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज स्वीकारलेले नाहीत, या सर्व महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया त्वरित स्थगित करुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विहित केलेल्या आरक्षण प्रणालीनुसार प्रवेश देण्याचे आदेश सर्व अल्पसंख्यांक अनुदानित माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना शासनाने द्यावेत अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूर विभागातील अनुदानित अपंग शाळा, कर्मशाळा विभागातील शिक्षक, निदेशक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्या.

मु. शी. : नागपूर विभागातील अनुदानित अपंग शाळा, कर्मशाळा विभागातील शिक्षक, निदेशक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्या याबाबत श्री. व्ही. यू. डायगव्हाणे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. व्ही. यू डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"नागपूर विभागातील अनुदानित अपंग शाळा, कर्मशाळा विभागातील शिक्षक, निदेशक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित व तातडीच्या समस्यांवर विभागीय अधिकारी समाज कल्याण विभाग, नागपूर विभाग, नागपूर यांचे दुर्लक्ष झाले आहे. नागपूर जिल्हयातील समस्या निवारणार्थ विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ प्रतिनिधी व लोक प्रतिनिधीने दिनांक 3 जून, 2006 रोजी समाज कल्याण अधिकारी गट "अ" जिल्हा परिषद नागपूर यांचेशी चर्चा करुनही कार्यालयाने दखल घेतली नाही. चर्चेतील मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत. 1) मासिक वेतन 1 तारेखला नियमित न होणे, 2/3 महिन्याचे एकाच वेळी अदा करणे 2) 50% महागाई भत्त्याची थकबाकी अनेक कर्मचाऱ्यांना अद्यापही अदा न करणे 3) भविष्य निर्वाह निधीच्या अद्ययावत हिशेब चिठ्ठया (2-3 वर्षापासून प्रलंबित असलेल्या) कर्मचाऱ्यांना वितरित न करणे, वरिष्ठ श्रेणीची प्रकरणे निर्णयासाठी माननीय संचालक, पुणे यांचेकडे अनेक महिन्यापासून प्रलंबित असणे, अशा प्रकरणात जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यात निर्णय देण्याचा अधिकार असावा. अनुज्ञाप्ती (लाईसेन्स) ची प्रकरणे माननीय शिक्षण संचालक, पुणे दडवून ठेवतात व 1-1 वर्षाची परवानगी देऊन प्रशासकीय अनियमितता करुन संस्था चालक, शिक्षक यांना वेठीस धरतात. शिक्षक कर्मचाऱ्यांना दुय्यम सेवा पुस्तिका देण्याचे कार्यात मोठया प्रमाणात अनियमितत आहेत. या समस्यांना न्याय द्यावा यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : 11 जुलै, 2006 रोजी मुंबईत उपनगरीय पश्चिम रेल्वेत इ
ालेल्या बॉम्बस्फोटाच्या अनुषंगाने रेल्वे स्थानकावर करावयाच्या उपाययोजना

मु. शी. : 11 जुलै, 2006 रोजी मुंबई उपनगरीय पश्चिम रेल्वेत इ
ालेल्या बॉम्बस्फोटाच्या अनुषंगाने रेल्वे स्थानकावर करावयाच्या उपाययोजना याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"11 जुलै, 2006 रोजी मुंबईत उपनगरीय पश्चिम रेल्वेच्या मार्गावर 7 ठिकाणी भीषण बॉम्बस्फोट घडून आणले, परिणामी शेकडो लोक गंभीर जखमी झाले. मोठया प्रमाणात लोक मृत्युमुखी पडले, या प्रसंगी तात्काळ संपर्कासाठी रेल्वेच्या प्रत्येक स्टेशनावर अत्यावश्यक दूरध्वनी सेवा, तसेच रुग्णवाहिका सेवा आणि हमाल उपलब्ध नव्हते, परिणामी जखमी व्यक्तींना तात्काळ वैद्यकीय मदत मिळण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या, जनतेने जखमींना रुग्णालयात हलविण्याची जबाबदारी स्वत:हून स्वीकारली. याबाबत मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, रेल्वे प्रशासनाकडून चोवीस तास हेल्पलाईन, तसेच रुग्णवाहिका सेवा, तसेच प्रत्येक स्टेशन जवळ ॲम्बुलन्स साठी पार्किंगची व्यवस्था, दोन स्ट्रेचर, इमातीची व्यवस्था आणि प्रत्येक ट्रेनमध्ये वॉकिटॉकीची व्यवस्था तातडीने करण्याची आवश्यकता आहे. याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाला कळवून तातडीने या गोष्टींची सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. या अत्यंत महत्वाच्या सार्वजनिक मुद्दांबाबत विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो."

अशुद्धीत मूल / मुद्रणेसाठी नाही

मु.शी.: उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासाठी केंद्र शासनास शिफारस करणे.

मु.शी.: उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासाठी केंद्र शासनास शिफारस करण्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो. सभापती महोदय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत जो प्रस्ताव छापलेला आहे त्यामध्ये थोडी सुधारणा आहे. त्या सुधारणेसह मी प्रस्ताव वाचतो.

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) (अ) मध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांचेसाठी माननीय राष्ट्रपती महोदयांनी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्याबाबतची तरतूद आहे. कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळा स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे. खानदेश व उत्तर महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनीही स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासंबंधी केंद्र शासनास शिफारस करण्यात यावी अशी मागणी केली आहे. सदर मागणीचे अनुषंगाने उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक आणि अहमदनगर या 5 जिल्ह्यांपुरते मर्यादित स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत केंद्र शासनास शिफारस करणे आवश्यक आहे. उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासाठी भारतीय संविधनाच्या अनुच्छेद 371 (2) (अ) मध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केंद्र शासनाने करावी व अशी सुधारणा संसदेच्या दोन्ही सदनांच्या माननीय सदस्यांनी मंजूर करावी अशी विनंती ही विधानपरिषद करीत आहे."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने सन्माननीय वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांनी नवीन वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यासबंधीचा प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे. मुळातच हा प्रस्ताव कसा आला ? हा प्रस्ताव का यावा लागला ? सभापती महोदय, घटनेच्या अनुच्छेद 371 (2) (अ) मधील तरतुदीनुसार मागास भागाकरिता खास तरतूद फक्त महाराष्ट्राकरिता केलेली आहे. विदर्भ आणि मराठवाडा या दोन मागास भागाकरिता हे वैधानिक विकास मंडळ स्थापन केले गेले आहे. राहिलेले तिसरे वैधानिक विकास मंडळ उर्वरित महाराष्ट्राकरिता असेल. वैधानिक विकास मंडळाचा माजी अध्यक्ष या नात्याने माझा अनुभव आहे. माननीय राज्यपालांच्या बैठकीमध्ये माननीय राज्यपाल प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाड्याचा अहवाल घेत असताना उर्वरित महाराष्ट्राच्या वैधानिक विकास मंडळाने कोठे काम करावे याचेही निर्देश देत असत. प्रामुख्याने ते असे सांगत असत की, तुम्हाला जो निधी उपलब्ध झालेला आहे तो जास्तीतजास्त धुळे, नंदुरबार, जळगाव या भागामध्ये वापरावा. ठाणे जिल्हा हा प्रगत जिल्हा असला तरी आणि ठाणे जिल्ह्याचे पर कॅपिटा इन्कम मुंबईच्या खालोखाल असले तरी ठाण्याचा एक भाग प्रगत आहे आणि दुसरा तलासरी, डहाणूकडील भाग मागासलेला आहे. त्या भागात हे पैसे वापरले जावेत तसेच पश्चिम महाराष्ट्रामध्ये जे दोन तालुके मागासलेले किंवा नेहमी दुष्काळी असलेले तालुके आहेत त्या ठिकाणी हे पैसे उपलब्ध करुन द्यावेत अशा सूचना प्रत्येक बैठकीमध्ये त्यावेळचे माननीय राज्यपाल डॉ. ॲलेक्झांडर देत असत. तसेच त्यामध्ये प्रामुख्याने कोकणाचा उल्लेख असावयाचा. वैधानिक विकास मंडळाच्या निर्मितीमध्ये मराठवाडा आणि विदर्भाला त्यांच्या मागासलेपणामुळे हक्काने ही वैधानिक विकास मंडळे मिळालेली आहेत.

यानंतर श्री. शिगम ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

उर्वरित महाराष्ट्रासाठी ही वैधानिक विकास मंडळे निर्माण झाल्या पासून उपलब्ध निधी कोठे आणि कशा पध्दतीने वापरला याचा शोध आणि बोध घेतल्यानंतर दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, वैधानिक विकास मंडळासाठी दिलेल्या निधीचा उपयोग मागास भागात झालेला नाही. विदर्भ, मराठवाडा आणि कोकण ही तीन वैधानिक विकास मंडळे व्हावीत असा ठराव केला. विदर्भ, मराठवाड्यामध्ये कोकणही टाकले. कोकणाला न्याय दिला गेला नाही. खरे म्हणजे त्यावेळी कोकणावर अन्याय झाला. आता विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी त्या भागातील सर्वसामान्य जनतेची मागणी लक्षात घेऊन प्रस्ताव मान्य केला. उत्तर महाराष्ट्रातील जनतेच्या हे लक्षात आले नव्हते. परंतु मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने आणि आजच्या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने सिंचनाच्या बाबतीत जी काही परिस्थिती माननीय वित्त मंत्र्यांनी निर्माण केलेली आहे ती उत्तर महाराष्ट्रातील जनतेच्या लक्षात आली. मागासलेल्या भागाकडे सातत्याने दुर्लक्ष करावयाचे आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये येन केन प्रकारेन्, वेगवेगळया प्रकारे, माननीय राज्यपालांचे निर्देश डावलून, घटनेची पायमल्ली करुन निधी ओढून नेण्याचे काम करायचे, असे प्रकार सातत्याने सुरु आहेत. मला आठवते मागील अधिवेशनामध्ये विधानसभेतील सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही पक्षाचे आमदार वेलमध्ये आले होते. सिंचनासाठी 100 कोटींची तरतूद झालेली नव्हती म्हणून माननीय राज्यपालांनी ती तरतूद बदलली. त्यावेळी श्री. सुरेशदादा जैन यांची समजूत काढण्याचा प्रयत्न झाला होता. पण त्यांनी कुणाचेही ऐकले नाही. दोन्ही बाजूच्या आमदारांचे त्यांनी नेतृत्व केले आणि आपल्या भागाला न्याय मिळण्यासाठी त्यांनी वेगळ्या प्रकारचा लढा दिला. त्याबाबतीत माननीय अर्थमंत्र्यांनी स्वतः राज्यपालांची भेट घेऊन निकष बदलून पुन्हा त्या भागाला सिंचनासाठी निधी उपलब्ध करुन दिला. त्यानंतर केवळ अर्थसंकल्पच नाही तर पुरवणी मागण्यासुध्दा मला दाखविल्या शिवाय सभागृहामध्ये मांडू नयेत असे आदेश माननीय राज्यपालांनी दिले. पुरवणी मागण्यांवरील विनियोजन विधेयकावर सही करण्यासाठी माननीय राज्यपालांनी 4 दिवस लावले होते. या शासनाची आणि अर्थखात्याची मानसिकता ही सिंचनासाठी पश्चिम महाराष्ट्रामध्ये निधी ओढून नेण्याची आहे. आता वैधानिक विकास मंडळे निर्माण केल्यामुळे कोणत्या भागाचा विकास झाला आहे किंवा प्रगती झाली आहे असे समजून कोणी भ्रमात राहू नये. अशी कोणाची समजूत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

असेल तर ती चुकीची आहे, फसवी आहे. याचे कारण मराठवाडा आणि विदर्भ वैधानिक विकास मंडळाचा पूर्ण अभ्यास करुन मी हे बोलत आहे. या सभागृहामध्ये ॲडव्होकेट जनरल यांना बोलावण्याची वेळ आली. या सभागृहाने त्याबाबतीत इतिहास रचलेला आहे. मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, आपण केवळ हा प्रस्ताव केन्द्राला पाठवून गप्प बसू नका. त्या प्रस्तावाचा तुम्ही पाठपुरावा करा. उत्तर महाराष्ट्राला मनापासून न्याय द्यावयाचा असेल तर तशी राजकीय इच्छाशक्ती दाखवा. उद्याच्या नाही तर पुढच्या अधिवेशनामध्ये घटनात्मक दुरुस्ती करण्यासाठी केन्द्र सरकारला भाग पाडा. माननीय अर्थमंत्री हे दिल्लीला जात असतात. त्यांना जे जे काही करता येईल ते ते त्यांनी करावी अशी मी त्यांना विनंती करतो. सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याकरिता हे वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. त्याला मी शुभेच्छा देतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात याठिकाणी 2-3 महत्वाच्या मुद्यांवर माझे विचार मी मांडणार आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनोद तावडे)

सभापती महोदय, बाब क्रमांक-2, पृष्ठ क्रमांक 4 याठिकाणी सामान्य प्रशासन विभागातर्फे निवडणुकीसाठी 47 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, कोकण विभाग शिक्षक, नाशिक विभाग शिक्षक, मुंबई शिक्षक आणि मुंबई पदवीधर या चार मतदारसंघातील विधानपरिषद निवडणुकीसाठी 47 लाख रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणूक मागील डिसेंबर, 2004 मध्ये झाली. सध्या कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची निवडणूक झालेली नाही. तरी याठिकाणी खर्च दाखविला आहे. नाशिक विभाग शिक्षक, मुंबई शिक्षक, मुंबई पदवीधर आणि कोकण विभाग शिक्षक या मतदारसंघाची निवडणूक असा उल्लेख आहे. कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक नुकतीच झाली होती. चुकीची माहिती नमूद केली आहे याचा शासनाने खुलासा करावा.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक-12 वर 11 ते 28 क्रमांकाच्या मागण्या आहेत. या मागण्यांचे मी समर्थन करतो. परंतु खरोखर पोलीस हा सर्वसामान्य जनतेचा मित्र आहे का या संदर्भात विचार होणे आवश्यक आहे. सर्वसामान्य माणसांमध्ये, नागरिकांमध्ये अशी भावना झाली आहे की, या पोलिसांकडून जेवढा त्रास देता येईल तेवढा दिला जातो अशा प्रकारची भावना लोक व्यक्त करतात. मी दोन उदाहरणे याठिकाणी सांगणार आहे. महात्मा फुले पोलीस स्टेशन, कल्याण येथे भिकी मौरा नावाच्या माणसाने तक्रार केलेली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

त्याच्या 11 वर्षाच्या लालमती या मुलीला पळवून नेले आहे. यासंदर्भात कोर्टात केस दाखल झालेली आहे. यासंदर्भात आरोपीनां अटक करण्यात यावी असे न्यायालयाने आदेश दिलेले असतांना पोलीस या गुन्हेगारांना अटक करीत नाहीत. हे गुन्हेगार पोलीस स्टेशनमध्ये येत असतांना सुध्दा पोलीस त्यांना अटक करत नाहीत, त्यांच्यावर कोठल्याही प्रकारची कारवाई करीत नाहीत. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे या बाबीचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

नोकरी लावून देतो म्हणून 1.5 लाख रुपये घेतलेले आहेत यासंदर्भात उल्हास नगरमधील अनील कुराडे यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. परंतु यासंदर्भात अजूनपर्यंत काहीही कारवाई होत नाही.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 40, बाब क्रमांक 57 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. शिक्षण विभागाच्या नवीन माध्यमिक शाळांना आणि तुकडयांना अनुदान देण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मागच्या अधिवेशनात सांगण्यात आले होते की, 30 एप्रिल पर्यंत शाळांच्या याद्या जाहीर करु, तुकडयाना अनुदान देऊ व त्याच्याही याद्या जाहीर करु असे जाहीर करण्यात आले होते परंतु प्रत्यक्षात अनुदान मंजूर झाल्यानंतर त्याबाबतीत शंका व्यक्त केल्या जातात. त्यावेळी सांगण्यात आले होते की, 15 दिवसात यादी जाहीर करु परंतु अद्याप पर्यंत शाळा जाहीर केल्या नाहीत तुकडयांची यादीही मिळालेली नाही. या ठिकाणी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे परंतु ही तरतूद फार अपूर्ण आहे असे मला वाटते. या सर्व शाळांना अनुदान आणि तेथील तुकडयांना मान्यता देण्यासाठी 3-4 महिन्याचे पगार सुध्दा यातून दिले जाणार नाहीत एवढी ही रक्कम अपूर्ण आहे. अनुदानासाठी पुन्हा लोकप्रतिनिधींना आंदोलन करावे लागेल अशी परिस्थिती आहे. अपंग विद्यार्थ्यांसाठी 21. 65 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु 11 वी आणि 12 वी चे एकूण किती अपंग विद्यार्थी आहेत याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करणा-या माध्यमिक शिक्षकांना 3 जून 2000 पासून 7225 /- रुपये पगार देण्याच्या संदर्भात ग्रामविकास विभागाने जी.आर. काढला होता. परंतु त्यामध्ये नोट आहे की, यासंदर्भातील पूरक मागण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची राहील. परंतु शिक्षण विभागाने यासंदर्भात प्रयत्न केले नाहीत. सन 2003-2004,2004-2005

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

तसेच सन । 2005-2006 या वर्षात पायाभूत पेक्षा जादा पदांना मान्यता द्यावयाच्या होत्या. सन 2003-2004 ला 231, 2004-2005 ला 338 असे एकूण 569 पदांना आवश्यक असलेला निधी वित्त विभागाने मंजूर केलेला नाही. त्यामुळे 3 वर्षापासून शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. त्यामुळे शासनाने या शिक्षकांना निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, विद्यार्थी अपघात विमा योजना शासनाने सुरु केलेली आहे. 26 जुलै, 2005 च्या पूर परिस्थितीत ज्या ज्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले होते त्यांची फाईल विमा कंपनीकडे पाठविण्यात आली होती परंतु या विमा कंपनीने सर्व विद्यार्थ्यांचे प्रस्ताव फेटाळलेले आहेत. तसेच या पूर परिस्थितीत शाळेंचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. या पुरामध्ये उल्हासनगर मधील 3 शाळांचे , मुब्रा येथील 7 शाळांचे तसेच माणगाव येथील एस.एस. निकम शाळेचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. परंतु या शाळांना अजूनपर्यंत एक नया पैशाची मदत सुध्दा मिळालेली नाही.

पृष्ठ क्रमांक 166-167 च्या संदर्भात आदिवासी विभागाच्या ज्या काही योजना आहेत त्या योजना आदिवासी विभाग ठरवित असतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

आदिवासी विभागाने योजना ठरवावयाच्या आणि वित्त विभागाने पैशाची तरतूद करायची नाही. आदिवासी क्षेत्रातील कल्याणकारी योजनांसाठी वित्त विभागाकडून कोणताही निधी मिळत नाही. आदिवासी क्षेत्रात काम करणारे उच्च माध्यमिक शिक्षकांना 7222 वेतनश्रेणीवर काम करायचे काय ? या संदर्भात मी आदिवासी मंत्र्यांना भेटलो, त्या विभागाच्या सचिवांना देखील भेटलो. त्यांनी मला सांगितले की, आम्ही वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे, परंतु वित्त विभागाने त्यास मान्यता दिलेली नाही. आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांनी कमी वेतनावर काम करावे अशी वित्त विभागाची अपेक्षा आहे काय ? आदिवासी भागातील 599 शिक्षकांना मान्यता मिळालेली आहे, काही शिक्षकांना अजून मान्यता मिळालेली नाही. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडून काही रिमार्क्स दिलेले आहेत आणि ती फाईल आदिवासी विभागाकडे आलेली आहे असे मला समजले आहे. एक वर्षापासून सात वर्षापर्यंत आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना न्याय द्यावा, एवढे बोलून वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 6, पृष्ठ क्रमांक 5 - नेसरी-पावनखिंड, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथील प्रतावराव गुजर यांच्या स्मारकाच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेली आहे, ही एक चांगली बाब आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांचे रक्षण करण्यासाठी बाजीप्रभू देशपांडे यांनी पावनखिंड येथे देह ठेवला. त्यांचा पुतळा पन्हाळा गडावर आहे. तेव्हा पावनखिंडीमध्ये बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा उभारण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 14 - पोलिसांसाठी गणवेष खरेदीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मध्यंतरी कोल्हापूर येथे मला काही कॉन्स्टेबल येऊन भेटले होते. त्यांच्या मुलांनी सुध्दा डॉक्टर्स किंवा इंजिनिअर्स व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. परंतु त्यासाठी लागणारी फी त्यांना परवडणारी नाही. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, ज्या कॉन्स्टेबल आणि हेड कॉन्स्टेबलची मुले मेरीटमध्ये आली असतील तर त्यांना फीमध्ये 50 टक्के सूट द्यावी जेणेकरुन त्यांच्या मुलांनाही डॉक्टर्स किंवा इंजिनिअर्स होते येईल. तेव्हा त्यांच्या मागणीचा विचार करण्यात यावा अशी विनंती आहे.

बाब क्रमांक 22, पृष्ठ क्रमांक 15 - व्हिडीओ कॉन्फरन्सींग यंत्रणेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ज्यावेळी एम.टी.एन.टी.ची सेवा बंद होती त्यावेळी व्हिडीओ कॉन्फरन्सींग सुरु करावी अशी मागणी सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी त्यावेळी केली होती. आता किती ठिकाणी अशा व्हिडीओ कॉन्फरन्सींग आहे ? गुन्हेगाराला कोर्टात ने-आण करण्यासाठी जो खर्च होतो तो टाळण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सींग सुरु करण्यात आली. माझा प्रश्न आहे की, यामुळे किती बचत झाली ?

बाब क्रमांक 197, पृष्ठ क्रमाक 160, शासकीय वैद्यक महाविद्यालय, नागपूर इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर येथे सिकल सेल करिता यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत .....

करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु कोणकोणती साधनसामुग्री खरेदी करण्यात येणार आहे याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. सिकल सेल खरेदी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. मागील अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित झाला होता त्यावेळी मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी अहवाल देऊ असे सांगितले होते, तेव्हा तो अहवाल आम्हाला प्राप्त होईल का ? सध्या सिकल सेलची काय परिस्थिती आहे ?

बाब क्रमांक 196, पृष्ठ क्रमांक 160- ग्रँट वैद्यक महाविद्यालय, मुंबई करिता यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही साधनसामुग्री एच.पी.सी.एल.कडून खरेदी करण्यात येणार आहे.

यानंतर श्री.पुरी..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, जे.जे. हॉस्पीटलची परिस्थिती पाहिली तर आज त्याठिकाणी टेक्निशियनची अनेक पदे रिक्त आहेत. त्याठिकाणी 130 ऑनररी आहेत. त्याठिकाणी फक्त 40 ऑनररीच येतात. त्याठिकाणी जवळपास 40 टक्केच लोक काम करीत आहेत. ही सर्व पदे आपण कधी भरणार ? यासाठी ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट किती वर्षाचे करणार ? दुसरी म्हत्वाची गोष्ट म्हणजे, रेट कॉन्ट्रॅक्टच्या बाबतीत मागे सभागृहामध्ये सांगोपांग चर्चा झाली होती. त्याबाबतीत आपण त्रीसदस्यीय समिती नेमणार होतात, अशी तीन सदस्यीय समिती अस्तित्वात आली का ? याचे विश्लेषण होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 178 व 177 च्या सौर जल तापक यंत्रणा बसवणेच्या बाबतीत मी बोलणार आहे. आपण अशा प्रकारचे यंत्र बसवून सौरऊर्जा घेण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा प्रकारची यंत्रणा बसविण्यापूर्वी आपण तात्पुरती यंत्रणा कधी बसविणार आहात ? यासाठी किती कालावधी लागणार आहे ? यासाठी आपण तात्पुरती व्यवस्था करणार आहात काय ? दुसरी गोष्ट म्हणजे, नवरोजी वाडिया रुग्णालयाला अनुदान देण्यासाठी आपण काय करणार आहात ? हे रुग्णालय अतिशय चांगले असून आज हे रुग्णालय खाजगीकरणाच्या मार्गावर आहे व याबाबत ऑब्जेक्शन घेतलेले आहे, त्यामुळे या नवरोजी वाडिया रुग्णालयाची नेमकी परिस्थिती काय ?

सार्वजनिक खात्यातर्फे मार्ग व जिल्हा मार्ग यांमध्ये मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की,गेल्या 40 वर्षापासून रस्ते अस्तित्वात नाहीत. आपण त्या भागातील वाळीवंडे, बागगेट, चांदोशी, तळेबाजार ही चार गांवे रस्त्यांना जोडलेली नाहीत. ही चार गावे रस्त्याला जोडण्यासाठी फक्त 19 लाख रुपये खर्च येणार आहे. परंतु ते आपण करत नाहीत, म्हणून ते आपण केले पाहिजेत, अशी माझी मागणी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांची बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 37-टप्पा अनुदानाच्या बाबतीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी 100 कोटी रुपये दिले. याबाबतीत माझा प्रश्न आहे की, गुणवत्तेचा सत्कार करण्याचा निर्णय आपण रद्द केला. याबाबतीत गुणवत्तेची यादीही नाही व सत्कारही नाही.आपल्याला गुणवत्तेची कदर नाही. आपण सत्कार करण्यासाठी जे काही 100-200 रुपये खर्ची पडणार आहेत, ते आपण खर्च करावेत.

बाब क्रमांक 62, पृष्ठ क्रमांक 41-थिएटर वार्डच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती.त्याबाबतीत सिडकोच्या नाटयगृहाचे टेंडर निघावयास पाहिजे होते. माननीय मुख्यमंत्र्यांची ही घोषणा प्रत्यक्षात सुरु व्हावी, अशी माझी अपेक्षा आहे.

बाब क्रमांक 74, पृष्ठ क्रमांक 56- ग्रामीण रस्त्यांच्या बाबतीत आपण रुपये 219,73,00,000/- एवढी अतिरिक्त रक्कम उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, यासाठी रुपये 899.30 कोटी एवढी तरतूद अर्थसंकल्पीय अंदाजात करण्यात आली आहे. आज ग्रामीण रस्ते सुधारत नाहीत. जिल्हा परिषदेमध्ये पंचायत समित्यांमध्ये पैसे वाटून घेतले जातात. त्यामुळे याबाबतीत माझी सूचना आहे की, याबाबतीत जिल्हा स्तरावर ॲडव्हायजरी मॉनिटरिंग कमिटी नेमावी व त्यामध्ये लोकप्रतिनिधींना, तज्ज्ञांना घ्यावे. ग्रामीण भागातील रस्ते सुधारले पाहिजेत व किमान ग्रामीण भागातील बाजारपेठा जोडण्याच्या दृष्टीने आपण काही तरी करण्याची आवश्यकता आहे.

बाब क्रमांक 93, पृष्ठ क्रमांक 68- औरंगाबाद मेडिकल कॉलेजसाठी 88 लाख रुपये देण्यात आले. 33 कोटी रुपयांची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली होती. त्याबाबतीत फक्त 88 लाख रुपयांची प्रोव्हीजनच करण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांना व मराठवाडयाला शरम वाटावी अशी ही घटना असून हे वर्ष मराठवाडयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी 33 कोटी रुपयांची घोषणा केली. परंतु प्रोव्हीजन फक्त 88 लाख रुपयांची करण्यात आली. याबाबतीत मी सातत्याने मागणी करीत आलो आहे. तसेच, नांदेड येथील आयुर्वेद महाविद्यालयाचा प्रश्न सुवर्ण महोत्सवी वर्ष असूनही सूटला नाही. त्याठिकाणी प्रोव्हीजन तर काहीच नाही. सिंचनाच्या बाबतीत मी एवढेच सांगणार आहे की, माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार मराठवाडयाच्या गोदावरी विकास महामंडळाचे उर्वरित 250 कोटी रुपये आपण कधी देणार ? आम्हाला आमचे पैसे परत द्यावेत. (नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

मंत्रीमहोदय घटनेने जे मराठवाडयाच्या वाटयाला आलेले आहे ते तरी तुम्ही आम्हाला दिले पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 188, पान क्रमांक 144 अन्वये संसर्गजन्य रोगासाठी 12 कोटी रुपये दिलेले आहेत. संभाजीनगर महापालिकेचे 6 कोटी रुपये राहिलेले आहेत तेवढे रिलिज करण्यात येतील काय ? खरे म्हणजे, सन्माननीय मंत्री, श्री.दिलीप वळसे-पाटील आणि सन्माननीय मंत्री, श्री.सुरेश शेट्टी यांचा सत्कार केला पाहिजे. कारण त्यांनी चांगल्याप्रकारे मार्डला बनविले आहे. त्यांनी सिनियर रेसिडन्स डॉक्टरांना केवळ 100 रुपयांची वाढ दिलेली आहे. यासंदर्भात देखील शासनाने लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 142 पान क्रमांक 34, जलसंधारण विभागाची ही मागणी आहे. मला वाटते जलसंधारण विभाग बंद केलेला बरा. जर जलसंधारण विभागाला प्रोव्हिजनच मिळणार नसेल तर हे खाते सिंचन विभागामध्ये वर्ग करण्यात यावे. आमच्या विभागात अनेक प्रकल्प राहिलेले आहेत. आमच्या विभागाला काही तरी निधी द्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 140 च्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, या मागणी अन्वये कार्यकारी अभियंता यांच्या पदासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु, या कामासाठी मुख्य अभियंता स्तरावरील अधिकारी नेमणे आवश्यक आहे. कारण, त्या ठिकाणी निधी अखर्चित राहतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्रमांक 6 पान क्रमांक 5 अन्वये प्रतापराव गुजर स्मारकासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. मी गेल्या 4 वर्षांपासून बा.सी.मर्ढेकर यांच्या स्मारकासाठी 20 लाख रुपयांची तरतूद करावी, अशी मागणी करीत आहे. परंतु, शासनाने अद्याप ही मागणी मान्य केलेली नाही. हे माझे शेवटचे अधिवेशन आहे. त्यामुळे येत्या हिवाळी अधिवेशनापूर्वी या कामासाठी निधीची तरतूद शासनाने करावी, अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे प्रतापगडावर जीवा महाले यांचा पुतळा उभारण्याबाबतही शासनाने निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे. याबरोबर संपूर्ण प्रतापगडाची दुरुस्ती देखील करावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाची बाब क्रमांक 208, पान क्रमांक 169 अन्वये वसतीगृह व आश्रमशाळांच्या इमारतीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. नंदुरबार जिल्हयामध्ये अनेक आश्रमशाळा आहेत परंतु त्या ठिकाणी अद्याप पिण्याच्या पाण्याची देखील सोय झालेली नाही. 300 ते 350 लोकसंख्येमागे एक हातपंप आहे. हे पाणी आणण्यासाठी तेथील लोकांना 1 किलो मीटर दूरवर जावे लागते. तसेच, पाणी साठवण्याची कायमस्वरुपी व्यवस्था त्या ठिकाणी नाही. धडगाव या ठिकाणी अजूनही बैलगाडीतून पाणी पोहोचविले जाते. बोरद या ठिकाणी 438 मुलींसाठी 2 हॅण्डपंप आहेत तसेच साठवणाची व्यवस्था नाही. या आश्रमशाळा म्हणजे एक प्रकारच्या कोडवाडाच आहेत. त्यामुळे या सर्व बाबतीत शासनाने लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी फक्त तीन बाबींवर बोलणार आहे.

बाब क्र.26, पृष्ठ क्र.16 ओरस, जिल्हा सिंधुदुर्ग येथील एस.पी. च्या कार्यालयीन इमारतीचे, निवासस्थानाचे बांधकाम करणे. पोलिसांच्या इमारतींकरिता जमीन भूसंपादन हा विषय आहे. मी निदर्शनास आणू इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जिल्हाधिकारी आणि एस.पी. हे पती पत्नी आहेत. ज्युडिशिअल पॉवर जिल्हाधिका-यांकडे आहेत आणि त्या हव्या तशा वाकवून त्याची अंमलबजावणी करण्याच्या पॉवर एस.पी. कडे आहेत. अशा प्रकारचे जोडपे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये काम करीत आहे. कोणताही प्रकार घडलेला नाही, काहीही घडलेले नाही असे असतांना फक्त कणकवलीमध्ये संचालबंदी लागू केली. संचारबंदी एवढया करीता की, आमच्या राज्यातील एका मंत्र्याच्या गावामध्ये मोठया प्रमाणावर शिवसैनिक रस्त्यावर आले तर काय होईल याची काळजी वाहणारे जिल्हाधिकारी आणि एस.पी. यांनी आपल्या अधिकारांचा दुरुपयोग केला हे मी निदर्शनास आणू इच्छितो.

बाब क्र.125, पृष्ठ क्र.179 विदर्भ प्रदेशाच्या सहा जिल्हयांमधील कर्ज फेडण्यातील कसूरदार शेतक-यांच्या संदर्भातील हा मुद्दा आहे. मुळामध्ये या भागातील शेतकरी कर्जातून मुक्त व्हावा अशी शासनाची इच्छाशक्ती नाही, असे मला वाटते. कर्जाचे पुनर्वसन करावयाचे आणि कर्जाचे 3 हप्ते पाडावयाचे का 5 हप्ते पाडावयाचे यासंदर्भात निर्णय नाही. नवीन पत किती द्यावयाची हे निश्चित झालेले नाही. शासनाकडून बँकांना तशा प्रकारचे निर्देश गेलेले नाहीत. हे द्यावयाचे झाले तर आपण का निर्देश देत नाही ? सरकारला पैशांची उपलब्धता करुन द्यावी लागेल. ती होत नसल्यामुळे आपण येथे असे म्हटलेले आहे की, पैसा अपुरा आहे. आपल्याकडे पैशांची उपलब्धता नाही म्हणून आपण हप्ते कसे पाडावयाचे यासंदर्भात निर्देश देत नाही. शेतक-यांना नवीन पत किती द्यावी यासाठी धोरण ठरविले जात नाही. सरकारी आकडयाप्रमाणे 30 लाख शेतकरी कर्जाकरीता या 5-6 जिल्हयांमध्ये उपलब्ध आहेत असे आपण जाहीर केले आहे. व्याज माफीमध्ये 216 कोटी रुपये सरकारने भरले. नाबार्डकडून 36 हजार शेतक-यांना नवीन कर्ज मिळाले. विभागीय आयुक्तांच्या अहवालाप्रमाणे 3 लाख जुने शेतकरी कर्ज घेतलेले आहेत आणि नवीन 3 लाख शेतकरी कर्जाकरिता उपलब्ध होऊ शकतात, असा विभागीय आयुक्तांचा अहवाल

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

आहे. आज पर्यंत 3 लाख शेतक-यांना कर्ज मिळाले. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक शेतक-यांच्या दरवाजापर्यंत जातील आणि कर्ज घेणा-यास मदत करतील, असे आपण जाहीर केले होते. मी आपल्याला अधिकृत सांगतो की, कोणताही तलाठी किंवा ग्रामसेवक कोणत्याही गावातील कोणत्याही शेतक-याच्या घरी या 6 जिल्हयांमध्ये गेलेले नाहीत. एखादा अपवाद असेल तर तो सोडून द्या. माननीय पालकमंत्री येथे उपस्थित आहेत. माननीय पंतप्रधानांनी 1 जुलैला बैठक घेतली. त्या बैठकीला सर्व जिल्हाधिकारी आणि अग्रीम बँकांचे सरव्यवस्थापक हजर होते. आदेशाची वाट न पाहता कर्जाचे पुनर्वसन करा असे निर्देश त्या बैठकीमध्ये माननीय पंतप्रधानांनी दिले होते. मंत्री महोदयांनी हे केले आहे असे सांगितले तर आम्हाला अभिमान वाटेल. परंतु आपण तसे सांगू शकणार नाही. माननीय पंतप्रधान आल्यानंतर सुध्दा का आदेश पाळले गेले नाहीत ? 9 डिसेंबरला पॅकेजची घोषणा करण्यात आली आणि 19 डिसेंबरला आदेश काढण्यात आला. नाबार्डला कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. माननीय पंतप्रधान आल्यानंतर त्यांनी पॅकेजची घोषणा केली. ते पैसे शेतक-यांपर्यंत पोहचत नाहीत. दिल्लीमध्ये राजकारण खदखदत आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

मला कोणावर आक्षेप घ्यावयाचा नाही, त्यासाठी मी येथे उभा नाही. परंतु या परिस्थितीमध्ये आपण हे हप्ते नीट करीत नाही, पत देत नाही. एक छोटीशी गोष्ट आहे. उदाहरण म्हणून सांगतो. 1 एकराचे आपण शेतकऱ्यांना 1 हजार रूपये देत होता. जे असेल ते व्याज माफ झाले. पण त्यानंतर आता हप्ते पाडले गेले त्यानंतर नवीन धोरणानुसार 30 हजार रूपये कर्ज मिळाले पाहिजेत आणि त्यातून 2 हजार रूपये कापूर घेतले तर 28 हजार रूपये त्याच्या हातामध्ये आले पाहिजेत. अशा प्रकारे किती शेतकऱ्यांना आपण कर्ज उपलब्ध करून दिले आहेत हे आपण येथे सांगू शकलात तर आम्हाला आनंद होईल. पण असे घडलेले नाही हे मी येथे छातीठोकपणे सांगतो. यातील 22 कोटी रूपये उपलब्ध करावे लागणार आहेत. आपल्याकडे गेल्या पॅकेजप्रमाणे 1078 कोटी रूपये पाहिजेत पण पुरवणी मागण्या पाहिल्या तर यात 78 कोटी रूपये अतिरिक्त दाखविले आहेत. तेव्हा तुमची राजकीय मानसिकता काय आहे, इच्छाशक्ती काय आहे ? हे यातून ढळढळीत दिसते आहे. कारण आपण या दृष्टीने आपल्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली नाही. माननीय मंत्री महोदय, मराठवाड्यातून, हिंगोलीतून आलेले आहेत. त्यांचा अनुभव देखील चांगला आहे. ते कापूस उत्पादक आहेत. त्यामुळे कापसाला उत्पादनखर्च किती आहे हे ते सहज सांगू शकतील. मग त्याप्रमाणे आपण कर्ज वाटप करता का ? तेव्हा आपण जे कर्ज वाटप करता त्यातील जी तफावत आहे ती आपण येथे सांगावी. 3 हजार कोटीचे कर्ज वाटप झाले पाहिजे पण आपण 600 कोटी रूपये कर्ज उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्याला सावकाराकडे जावे लागते. त्यामुळे माननीय पंतप्रधानांनी सांगितल्यानंतरही 45 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सभापती महोदय, मी या निमित्ताने महसूल मंत्र्यांना जाब विचारू इच्छितो की, आपल्या निदेशाप्रमाणे, आदेशाप्रमाणे, इच्छेप्रमाणे माननीय पंतप्रधान येथे आल्यानंतर, त्यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिल्यानंतरही 45 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पण त्यांच्या घरी अजून पर्यंत आपले शासकीय अधिकारी पोहोचलेले नाहीत. पंतप्रधानाच्या भेटीनंतरही आपल्या शासनाकडून, शासकीय अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारे हेळसांड होणार असेल तर अशा अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई प्रपोज केली पाहिजे. असे झाले तर मग वाटेल की, या सात जिल्ह्यातील शेतकऱ्यांबद्दल आपणास खरोखरी काही वाटते आहे. तेव्हा आपण या बाबतीत उत्तर द्यावे. विदर्भातील शेतकऱ्यांसाठी काय देता ते सांगा अन्यथा शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालूच राहतील आणि त्याचे सारे पाप सरकारच्या डोक्यावर येईल एवढे सांगून मी थांबतो. धन्यवाद. ..... 4व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब 156, सामाजिक न्याय विभागाच्या पूरक मागणीच्या संदर्भात मी येथे बोलणार आहे. भटक्या विमुक्त समाजाच्या लोकांसाठी आपण 1 कोटी रूपये देत आहात. खरे पाहिले तर भटक्या विमुक्त जाती समाज हा खेडोपाडी विखुरलेला आहे, डोंगरकपारी राहतो आहे तेव्हा त्यांच्यासाठी आपल्या काय योजना आहेत याची माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून त्यांना उपलब्ध करून द्यावी अशी मी या निमित्ताने आपल्याला विनंती करतो. या भटक्या विमुक्त जातीच्या समाज खेडोपाडी, डोंगरकपारीतून राहत असल्याने तांडा विकास योजनेतून त्यांचा विकास केला जावा. भटक्या विमुक्त समाजाच्या आश्रमशाळा आहेत त्यापैकी दोन आश्रमशाळांसाठी 1 कोटी रूपये निधी दिलला आहे. तेथे अग्नीशामक यंत्रणा देण्यासाठी जो काही खर्च होईल तो वगळता बाकीचा निधी हा त्या आश्रमशाळांच्या विकासासाठी हस्तांतरित करावा अशी मी मागणी करतो. तसेच या आश्रमशाळा भटक्या विमुक्तांच्या संस्थांनाच देण्यात यावा. धनदांडग्यांच्या संस्थाना देण्यात येऊ नये अशीही मागणी मी या निमित्ताने करतो आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 165 यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी 3 कोटीची तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी आपण ज्याप्रमाणे आपण साखरशाळा काढल्या आहेत तशाच प्रकारे डोंगरी शाळा काढल्या गेल्या पाहिजेत. जेणे करून डोंगरकपारीमध्ये राहणारा, फिरणारा भटक्या विमुक्त जातीचा जो समाज आहे, धनगर समाज आहे, त्यांचा संसारच घोड्याच्या पाठीवर असतो, त्यांच्या साठी मोबाईल शाळा सुरू कराव्यात. त्यासाठी निधीची तरतूद करावी अशी आग्रही मागणी मी येथे करतो. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 4डब्ल्यू 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

सभापती महोदय, ग्रामीण विद्युतीकरणासाठी साडे नऊ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागील वेळेस माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सांगितले होते की, कोकणामध्ये डोंगर कपारीमध्ये धनगर लोकांची वस्ती आहे. त्याठिकाणी स्वातंत्र्यपूर्व काळापासून अंधार आहे. तेव्हा त्या धनगर वाडयांमध्ये उजेड आणण्यासाठी आपण हा निधी डायव्हर्ट करावा, आणि त्या वाडयांना आपण वीज द्यावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, आपण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्मारक केले. त्याप्रमाणे चौंडी येथे अहिल्यादेवींच्या स्मारकावर 2 कोटी रुपये खर्च होऊन 8 वर्षे झाली आहेत. परंतु आता 25 लाखाकरिता ती योजना अपूर्णावस्थेत आहे. मंत्रिमहोदयांनी मागील वर्षी अधिवेशनामध्ये चौंडी येथील स्मारकाचा विकास करण्यात येईल असे सांगितले होते. त्यानंतर दोन अधिवेशने होऊन गेली. परंतु त्या स्मारकाचा विकास अजून झालेला नाही. त्याठिकाणी फक्त कॉंग्रेस गवत उगविले आहे. त्यामुळे ही संपूर्ण योजना धूळ खात पडली आहे. मंत्रिमहोदयांकडे मी पुन्हा पुन्हा मागणी करीत आहे की, पुढील अधिवेशनापर्यंत आपण 25 लाखाचा निधी उपलब्ध करुन देऊन हे काम पूर्ण करावे.

सभापती महोदय, मेंढपाळांसाठी वन विभागाने भाडेपट्टीने जमिनी दिल्यास त्या जमिनीचा महसूल ते देतील आणि वनांचे रक्षण देखील धनगर मंडळी करतील. त्यादृष्टीने 25 वर्षे रेंगाळत पडलेला हा प्रश्न आपण प्राधान्याने सोडवावा अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगरविकास व सामान्य प्रशासन विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, माननीय सदस्या प्रा. फौजिया खान व इतर अनेक माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपले मनोगत व्यक्त केले आहे, व चांगल्या सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. राज्यामध्ये झपाटयाने नागरीकरण होत आहे. आपले राज्य हे एक मोस्ट अर्बनाईज स्टेट म्हणून देशामध्ये नावलौकिक पात्र झाले आहे. जवळ जवळ 43 टक्के इतके या राज्याचे नागरीकरण झाले आहे. जस जसे या राज्याचे नागरीकरण वाढत आहे, तस तसे नागरी सुविधांवर देखील ताण पडत आहे. त्यामुळे सभागृहामधील सर्व माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणातील एकच सार आपल्या लक्षामध्ये येत होते की, या कामासाठी निधी कमी पडता कामा नये. 74 वी घटना दुरुस्ती झाली त्या घटना दुरुस्तीचा मूळ गाभा किंवा विचार हा होता की, स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता मिळावी, त्यांना आत्मनिर्भरता प्राप्त व्हावी. परंतु आज आपण चित्र पाहिले तर नगरपालिका आणि महानगरपालिकांकडे निधीचा अभाव असल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे लोकांना नागरी सुविधा मिळाव्यात अशाप्रकारची अपेक्षा लोकप्रतिनिधींची आहे. सभापती महोदय, याठिक्राणी मी सांगू इच्छितो की, नगर विकास विभागाने यावर्षी प्लॅनमध्ये 2 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे, आणि नॉन प्लॅनमध्ये 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. असे मिळून 3 हजार कोटींची तरतूद या वर्षीच्या अंदाजपत्रकात केली आहे. आज प्रामुख्याने नगरपालिकेची परिस्थिती पाहिलीतर असे लक्षात येईल की, पाणी पुरवठयाचा अभाव, मोठया प्रमाणावर घनकचरा आणि मलनिस्सारण होत नसल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळते. अनेक नगरपालिकांमध्ये सिटी सर्व्हे अजून लागू करण्यात आलेला नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ....

□ही महा□रपालि□ पुरावा म्हणून सातबारा उताऱ्याचा वापर □रतात. या स□□ख्या □ष्टींच्या माध्यमातू□ जो □ही वि□स आरा□डा तयार होतो, त्या वि□स आरा□डयामध्ये □ी रिझर्वेश□ वि□सित □लेले याचे सरासरी चित्र पाहिले तर 10 ते 15 टक□ वि□स आरा□डा महापालि□ आ□ □□रपालि□ तयार करतात. यासाठी महा□□रपालि□ना,□□रपालि□□ मोठ्या प्रमा□वर □ी उपलब्ध □रू□ दे□याचा स्त्रोत □मा□ □लेला आहे. स□ 2006-2007 मध्ये 3100 □टी रुपयाची तरतूद □लेली आहे. आता 12 व्या वित्त आयो□□डे 155 □टी रुपयाची मा□□ □लेली आहे. 12 व्या वित्त आयो□च्या माध्यमातू□ महा□□रपालि□ना, □□रपालि□□ □ी उपलब्ध झाला तर त्यांचे प्रश□ सुटतील. अर्ब□ इ□फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट स□ीम फोर स्मॉल ॲन्ड मिडियम टाऊ□ यासाठी □ीची तरतूद □र□यात आली. त्यामुळे या □ीच्या माध्यमातू□ ई □व्ह□नस स्था□□ महा□□रपालि□□ दे□र आहोत. त्या ठि□णी 100 टक□ □म्युटराईज्ड, ई-□व्ह□□स हे □□रवि□स विभागाच्या माध्यमातू□ दे□याचा आमचा प्रयत□ आहे. अर्ब□ इ□फ्रास्ट्रक्चर,पा□□पुरवठा, ड्रे□ज सिस्टीम, रेन वॉटर हार्वेस्टीं□ सिस्टीम □र□याबाबत त्यांच्या मा□ला□लेलो आहोत. शहरामध्ये □रीब लो□ आहेत, त्यांच्यासाठी सुव□ जयंती शहरी रोजगार योज□ आहे. या संदर्भा□ स□मा□□□य सदस्यां□ ज्या □ही अ□□ सूच□ □लेल्या आहेत त्याचा □□भीर्या□ आ□ प्रामा□□ □□ विचार □र□यात येईल. □□रवि□स विभा□च्या बाब □मां□ 61 ते 64, तसेच सामा□य प्रशास□ विभा□च्या बाब □मां□ 1 ते 10 या मा□□या सभा□ृहा□ मंजूर □राव्यात, अशी मी वि□ती □रतो. तसेच ... **(सभापतीस्था□ मा□□□य उपसभापती)**

सभापती महोदय, जलसंधार□ विभा□च्या मा□□या सभा□ृहा□ मंजूर □राव्यात,अशी सभा□ृहाला वि□ती □रतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.दयानंद मस□ (गृह□र्मा□ राज्यमंत्री) : स□मा□□य सदस्य श्री.□पिल पाटील, स□मा□□य सदस्या श्रीमती सुधा जोशी, स□मा□□य सदस्य श्री. संजय □□र यां□ ज्या सूच□ □लेल्या आहेत, त्यांचा जरुर विचार □र□यात येईल. गृह □र्मा□ विभा□च्या बाब □मां□ 174,175 सभागृहा□ मंजूर □राव्यात अशी मी वि□ती □रतो.

--

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दोन उमेदवारांना सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत मॅटमध्ये लागलेल्या निकालाची अंमलबजावणी करण्याबाबत सुचविलेले आहे. मॅटचा निकाल तपासून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी महिला बचत गटांमार्फत नाई, म्हैसी देण्याबाबातचा उल्लेख केला, तसेच सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी बर्ड फ्लूच्या संबंधाने मुद्दा उपस्थित केला. सन्माननीय सदस्या श्री.बजोरिया यांनी अकोला येथील सहकारी कार्यालयाच्या इमारत बांधकामाचा मुद्दा उपस्थित केला, या सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा जरुर विचार करण्यात येईल. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी विनंती करतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन, सामाजिक न्याय,ओबीसी व भटके विमुक्त कल्याण, महिला व बालकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, परिवहन, सामाजिक न्याय, ओबीसी व भटके विमुक्त कल्याण तसेच महिला व बालविकास विभागाच्या ज्या मागण्या सभागृहासमोर ठेवलेल्या आहेत त्यावर बोलत असताना सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेबांनी चांगली योजना आणल्याबद्दल धन्यवाद दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे साहेबांनी काही सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांचा आम्ही विचार करु. सभागृहाने परिवहन, सामाजिक न्याय, ओबीसी व भटके विमुक्त कल्याण आणि महिला व बालविकास विभागाच्या मागण्या मंजूर कराव्या अशी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाची पुरवणी मागणी क्रमांक 128 सभागृहाने मंजूर करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग के बारे में माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, श्रीमती नीलम गो-हे तथा माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे ने कुछ मुद्दे उपस्थित किए हैं. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान ने कहा कि बी.पी.एल. के लोगों से राशन कार्ड के लिए 200 रुपए चार्ज करते हैं. यह उनकी गैर-समझ है और शासन ने ऐसा कोई निर्णय नहीं लिया है. सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्राम विकास, सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या एकूण चार मागण्या आहेत. यामध्ये बाब क्रमांक 136 मध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या संदर्भात विभाग स्तरावर जवळपास 34 पदे निर्माण करणार आहोत. त्यासाठी 33 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. बाब क्रमांक 139 मध्ये पुणे, नंदुरबार, सांगली इत्यादी जिल्हा परिषदेमध्ये मोटार लॉंच खरेदी करण्यासाठी जिल्हापरिषदांना अनुदान देण्यासाठी दीड कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. बाब क्रमांक 140 मध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजनेसाठी 100 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकूण 20 मागण्या आहेत. या मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, प्रा. फौजिया खान, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर, सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जीवनदायी योजनेमध्ये 50 हजार रुपयांपर्यंतचे अधिकार डेप्युटी डायरेक्टर स्तरावर आणि 70 हजार रुपयांपर्यंतचे अधिकार डायरेक्टर स्तरावर आहेत. ती रक्कम वाढवून दिली पाहिजे अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली. मी सांगू इच्छितो की, आता शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे जीवनदायीसाठी दीड लाख रुपये इतकी रक्कम राहणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आर.सी.सेलबद्दल माहिती मागितली. आम्ही उद्योग विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. काही क्वेरीज आहेत त्या पूर्ण करीत आहोत. वाडिया हॉस्पिटलसंबंधी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे 50 टक्के रक्कम शासनाला द्यावयाची आहे. दोन तीन वर्षाची आधीची जी ग्रँट होती ती दिलेली होती. सभापती महोदय, ग्राम विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ज्या पूरक मागण्या सभागृहासमोर सादर केलेल्या आहेत त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा निश्चितपणे आदर बाळगण्यात येईल असे मी सांगू इच्छितो. सभागृहाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : उपसभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत योजनेंतर्गत आणि योजनेतर अशी एकूण 930 कोटी 98 लक्ष 97 हजार इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. यामध्ये सर्वात महत्वाची मागणी ही 620 कोटीची आहे. विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ आणि गोदारवरी पाटबंधारे विकास मंडळ यांच्या बाबतीत माननीय राज्यपालांनी मागील वर्षी जे डायरेक्टीव्हज् दिलेले होते त्यासंदर्भात ही मागणी करण्यात आलेली आहे. तेव्हा जलसंपदा विभागाच्या मागण्या तसेच वित्त विभागाच्या 10 कोटी 54 लक्ष 68 हजार रु.च्या मागण्या आणि नियोजन विभागाच्या 291 कोटी 9 लक्ष 46 हजार रु.च्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : महसूल विभागाच्या मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. या मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत योग्य ते निर्णय घेतले जातील. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी मयत झालेल्या लोकांच्या नावामध्ये फेरफार झालेले असून त्याबाबत चौकशी करण्यास सांगितलेले आहे. त्याबाबतीत चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी तासगाव येथील महार वतनाच्या जमिनी बळकावल्या असल्याचे सांगितले. याबाबतीतही चौकशी करुन संबंधितांना जमिनी परत देण्याची भूमिका घेतली जाईल. तेव्हा महसूल विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : आदिवासी विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील (ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळता) व वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : उपसभापती महोदय, ऊर्जा, उच्च व तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय या तिन्ही विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्मानीय सदस्यांनी या मागण्यांवर इतके तास चर्चा केल्यानंतर निदान त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या बाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयास पाहिजे. मी ऊर्जा खात्याच्या संदर्भात 9 कोटी केबलचा मुद्दा मांडलेला होता. त्याबाबतीत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. दिलीप वळसे-पाटील : विजेवर आपण वेगळी चर्चा घेत आहोत. आता 2006-07ची जी वार्षिक मागणी मंजूर झालेली आहे त्यामध्ये निगोशिएटेड लोन उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जेथे निगोशिएटेड लोन उपलब्ध होणार नाही त्यासाठी ही तरतूद केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील.....

आता आपण चर्चेच्या ओघात केबलच्या संदर्भात उल्लेख केला. वीज मंडळाच्या कारभारासंबंधी वेगळी चर्चा घेतली तर त्याला माझी हरकत राहणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 9.49 कोटी रुपये ग्रामीण विद्युकरणासाठी मागितले आहेत. ग्रामीण विद्युतीकरणासाठी केबल व ट्रान्सफॉर्मर लागतात.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ग्रामीण विद्युतीकरणासाठी जो कार्यक्रम हाती घ्यावयाचा आहे त्यामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या बरोबरीने सिस्टिम इम्प्रूव्हमेंटचा कार्यक्रम घेत आहोत. वाड्या व वस्त्यांचे विद्युतीकरण, नवीन पथ दिवे, घरगुती कनेक्शन्स, विशेष घटकांसाठी, टीएसपी, बिगर आदिवासी योजना या सगळ्या योजनांमध्ये कार्यक्रम हाती घेतला आहे. 600 कोटी रुपयांची योजना करुन केंद्र सरकारकडे राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत पाठविली आहे. जे बजेट सादर केले, त्या बजेटच्या माध्यमातून या विभागाच्या मागण्या सादर केल्या, त्यात ही एक कमी रक्कम होती, ती कमी रक्कम याठिकाणी सादर करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या ज्या बाबी मांडल्या, या राज्यामध्ये आपण केबलच्या संदर्भात जो विषय उपस्थित करीत आहात त्यावर या सभागृहात एकदा चर्चा झाली. त्या संदर्भात प्रश्नही आलेला आहे. लोकांनी चुकीच्या पध्दतीने केबल पुरवठा केला त्या सगळ्या लोकांना काळ्या यादीत टाकण्याचे काम केले आहे. संबंधित अधिकारी बेजबाबदार होते त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम केले. या संदर्भातील सगळी सविस्तर माहिती मी आपल्याला स्वत: पत्र लिहून कळविण्याची व्यवस्था करतो. सभागृहाने कृपया या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, वन विभागाच्या एकूण 41, 42 व 43 या तीन मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो. विशेषत: बकऱ्या चरण्याच्या संदर्भात जो विषय उपस्थित केला त्याबाबत चर्चा लावावी. या संदर्भात शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे. एकत्रित बसल्याशिवाय हा प्रश्न सोडविता येणार नाही एवढे बोलून वन विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, बाब क्रमांक 11 ते 28 या पुरवणी मागण्या सदनाने मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या मागण्यांवर चर्चा होत असताना सन्माननीय सदस्य सर्वश्री विलास अवचट, मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, प्रा.फौजीया खान, प्रा.कवाडे सर, श्री.जयंत पाटील, श्री.रामनाथ मोते, डॉ.दिपक सावंत, श्री.दिवाकर रावते यांनी काही सूचना आणि काही अपेक्षा सुध्दा या निमित्ताने व्यक्त केल्या आहेत. ज्या सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. सभापती महोदय, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, पोलीस प्रशिक्षण, जी नवीन पदे आपण भरली त्यांना प्रशिक्षण देणे, जे सेवेत आहेत त्यांचे प्रशिक्षण सुरु करावे, पोलीस आयुक्तालय ठाणे व नागपूर यांच्या अखत्यारित वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन 9 पोलीस ठाणी नव्याने गठित करणे, पोलिसांसाठी गणवेष त्याचबरोबर पोलिसांच्या क्रीडाविषयक कौशल्यात वाढीकरीता, पोलीस गृहनिर्माण सोसायट्या या विविध पोलिसांच्या गरजा भागविण्यासाठी या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, आजपर्यंत गृहखात्याचे बजेट म्हणजे पोलिसांच्या पगारावर होणारा खर्च हे राज्य सरकारचे प्रमुख काम होते. राज्याची डेव्हलपमेंट करणे हे आपण मानत आलो. जगभरातील कोणत्याही राज्य व्यवस्थेचे पहिले काम हे जनतेच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे हे आहे. डेव्हलपमेंट करावीच लागेल. पण लोक सुरक्षित राहिले तर डेव्हलपमेंटला अर्थ आहे. कालच्या घटनेबद्दल याठिकाणी वेगळी चर्चा झालेली असली आणि त्यामुळे कोणी प्रश्न उपस्थित केलेला नसला तरी आज कालच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर विभागाने सादर केलेल्या मागण्या कमी आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

या मागण्या कालच्या घटना घडण्यापूर्वी केलेल्या आहेत. नजीकच्या काही दिवसापूर्वी मुंबई आणि राज्यातील जो संवेदनशील भाग आहे त्या ठिकाणी खर्च करावा लागणार आहे. सदनाच्या लक्षात एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, सी.एफ. ॲडव्हान्सचे पैसे उपलब्ध करुन दिले जातील. मुंबई आणि मुंबईतील रेल्वे, बसेस, धार्मिक ठिकाणे ज्या ठिकाणी जास्त गर्दी होते त्या ठिकाणी सुरक्षा वाढविण्याच्या दृष्टीने केंद्रशासनाकडे सहाय्य मागण्यात येईल. वेळ प्रसंगी अन्य कामे बाजूला ठेवून जनतेच्या जिवीताचे आणि मालमत्तेचे रक्षण पहिल्या क्रमांकावर ठेवून वाढीव खर्च पुढच्या अधिवेशनात निश्चित केला जाईल. या मागण्या सदनाने मान्य कराव्या अशी मी विनंती करतो. आज झालेल्या बैठकीमध्ये काही महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेले आहेत. रेल्वेमध्ये अतिशय तुटपुंजे मनुष्यबळ आहे. त्यामुळे रेल्वेसाठी 800 पोलीस शिपाई आणि 1000 होम गार्ड वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याच प्रमाणे मेटल डिटेक्टर आणि हँड मेटल डिटेक्टरने प्रवाशांची तपासणी केली जाणार आहे. त्याच प्रमाणे प्रवाशांमध्ये पोलिसांना सिव्हील ड्रेसमध्ये बसवून प्रवाशांवर लक्ष ठेवले जाणार आहे. केंद्रशासन याबाबतीत काय मदत करते याचा आढावा घेऊन भविष्यात राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी ज्या काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे त्या सर्व उपाययोजना केल्या जातील या गोष्टीची मी ग्वाही देतो. त्यामुळे गृहविभागाच्या आणि अन्य विभागाच्या मागण्या सदनाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

उपसभापती : सन 2006-2007 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक.

मु.शी.: L.A.aBill No.LXXIII OF 2006.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAINT FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH,2007.)

श्री. सुनील देशमुख (अर्थ व नियोजन राज्यमंत्री) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 73- दिनांक 31 मार्च, 2007 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित आणखी रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशीसंह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

मु.शी.: L.A.BILL NO.XXVIII OF 2004.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT,THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CROPORATIONS ACT,1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT,1948) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE.)

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) सभापती महोदय, सन 2004 चे वि.प.वि. क्रमांक 28 , मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक, विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 15 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, संयुक्त चिकित्सा समितीवर या सदनातील किती सन्माननीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे आम्हाला समजले तर बरे होईल.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, संयुक्त चिकित्सा समितीवर खालीलप्रमाणे विधानपरिषद सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

1. श्रीमती सुधा जोशी, वि.प.स.
2. कर्नल सुधीर सावंत, वि.प.स.
3. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
4. श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स.
5. श्री.गुरुनाथ कुलकर्णी, वि.प.स.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

L.C. BILL N0.XVI OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT,1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT 1948, AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGPUR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्र.-16 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई महानगरपलिका अधिनियमात व नगरपालिकेच्या अधिनियमामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद आहे. यापूर्वी आरक्षण जागेवर नामांकनपत्र भरताना सक्षम अधिकाऱ्यांकडून जातीचे प्रमाणपत्र घ्यावे लागत होते. परंतु आता सक्षम अधिकाऱ्याऐवजी जात पडताळणी समितीकडून सर्टीफिकेट घ्यावे अशी तरतूद करण्यात येत आहे. कारण मुंबई महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका आणि नागपूर महानगरपालिका याठिकाणी अनुक्रमे 12, 9 व 7 नगरसेवकांना अवैध प्रमाणपत्रामुळे राजीनामा द्यावा लागला होता. अशा गोष्टींमुळे निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. हे सर्व टाळण्यासाठी ही सुधारणा आणण्यात आली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिक्राणी जी सुधारणा आणण्यात आली आहे त्याचे मी स्वागत करतो. उशिरा का होईना पण शासनाला जाग आली. पाच वर्षापूर्वी मुंबईतील 9 नगरसेवकांना राजीनामा द्यावा लागला होता. एप्रिल 2005 मध्ये महानगरपालिकेची मुंबईत निवडणूक झाली त्यावेळी 7 नगरसेवक अपात्र ठरले होते. त्यातील 3 प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. पुणे महानगरपालिकेतील 3 नगरसेवक, नागपूर महानगरपालिकेतील 12 नगरसेवक अपात्र ठरले होते. ज्या व्यक्तीकडून विशिष्ट जातीचे प्रमाणपत्र देण्यात येते ती व्यक्ती शासकीय असते.तेव्हा असे जातीचे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याविरुध्दसुध्दा कारवाई व्हावयास पाहिजे.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट...

त्याठिकाणी आम्ही जे सर्टीफिकेट आणून महापालिकेला दिले, ते सर्टीफिकेट त्याठिकाणी अवैध ठरले. ज्या अधिकाऱ्याने असे अवैध सर्टीफिकेट दिले होते त्यांवर आपण कारवाई केली पाहिजे. कारण, अजूनपर्यंत त्यांवर कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. शासनाने याठिकाणी या बिलाच्या माध्यमातून महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "राखीव मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना, त्यांनी प्रथम आपल्या जातीच्या प्रमाणपत्राची जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घ्यावी आणि ते जात प्रमाणपत्र नामनिर्देशन पत्रासोबत जोडावे अशी पूर्वअट घातल्यास, असे प्रसंग टाळता येऊ शकतील." म्हणून उशिरा का होईना अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे, त्याचे मी स्वागत करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 16 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 16 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.LXV OF 2006,

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 65-मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 65 -मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी या बिलाचे स्वागत करुन माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करु इच्छितो. आज खऱ्याअर्थाने नगरविकास राज्यमंत्र्यांचा आश्वासन पूर्तीचा दिवस आहे,असे मला वाटते. हे विधेयक एक वर्षापूर्वी या सभागृहामध्ये आले होते, त्यावेळी यावर जवळपास साडे तीन तास चर्चा झाली होती. त्यावेळी आम्ही सर्वांनी विनंती केली होती की, पुनर्विकास केलेल्या व प्रथम भोगवटा केलेल्या इमारतींमधील 350 चौरस फुटांहून अधिक फरसबंद क्षेत्र नसलेल्या निवासी गाळयांना देखील मालमत्ता करातील सवलत लागू करण्यात यावी. त्यादृष्टीने आपण या बिलाच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट.....

एक गोष्ट आहे की, सर्वसाधारणपणे अधिवेशनाच्या अगोदर अध्यादेश काढला जात नाही. 20 जून 2006 रोजी यासंदर्भातील अध्यादेश काढण्यात आला आणि कलम 144 (ड) मध्ये सुधारणा करण्यात आली. परंतु, हा अध्यादेश अद्याप महापालिकेला मिळालेला नाही. अध्यादेश काढण्यामागचा शासनाचा उद्देश बरोबर आहे. कलम 144 (ड) ची अंमलबजावणी महापालिकेला करावयाची आहे परंतु अद्याप त्यांना अध्यादेशाची प्रत मिळालेली नाही. यासंबंधी माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा व महापालिकेला अध्यादेशाची प्रत पाठविण्याबाबत कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, महापालिकेला जर अध्यादेशाची प्रत मिळाली नसेल तर ती पाठविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. ही बाब मी तपासून पहातो. प्रॉपर्टी टॅक्समध्ये 20 वर्षाची सवलत मोडकळीस आलेल्या इमारतींना आपण मिळवून देत आहोत. याचा फायदा जवळ जवळ 20 हजार सदनिकाधारकांना होणार आहे व हा फायदा जवळ जवळ 100 कोटी रुपयांएवढा आहे. यादृष्टीकोनातून हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 3, अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेश टोपे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 65 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 65 संमत झाले आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MHM/ SBT/

उपसभापती.....

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, शुक्रवार, दिनांक 14 जुलै, 2006 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 13 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 14 जुलै, 2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही